**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात.

**मु.शी.**: राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर यांचा प्रस्ताव.

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत करण्यात आला. )

**उपसभापती** : आज शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी दुपारी 1.00 वाजता सुरु होणारा प्रश्नोत्तराचा तास दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी सुरु होईल.

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. मला आठवते की, ज्यावेळी गृह खात्याची धुरा माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे आली त्यावेळी सभागृहामध्ये या विषयासंदर्भात प्रामुख्याने त्यांनी असे सांगितले की, गृह खात्याची क्षमता वाढविण्याकरिता जवळ जवळ 70 ते 85 हजार पोलिसांची गरज आहे. माझ्या कारकिर्दीमध्ये मी जास्तीत जास्त पोलीस भरती करण्यावर भर देणार आहे आणि त्याची गरज देखील आहे. मला माहीत आहे की, एक पोलीस तयार करण्याकरिता त्याला प्रथम 6 महिन्यांचे ट्रेनिंग द्यावे लागते. त्यानंतर पुन्हा 6 महिन्यांचे ट्रेनिंग असते. म्हणजे एक पोलीस तयार करण्याकरिता जवळ जवळ 1 वर्षाचा कालावधी लागतो. तोपर्यंत तो कार्यक्षम पोलीस होत नाही. माझ्या लक्षात आले की, शासनाच्या तिजोरीची परिस्थिती पाहता, महाराष्ट्र राज्याच्या इतर आवश्यक गरजा पाहता आणि इतर खात्यांमध्ये असलेला नोकर भरतीचा भार पाहता, न्यायालयाने शासनाला वेळोवेळी नोकर भरती करण्यासंदर्भात दिलेले नवीन नवीन निर्देश, त्यानंतर राखीव जागांचा अनुशेष भरुन काढणे यामध्ये भरत्या अडकलेल्या असतांना आपण यावर्षी किमान 30 ते 35 हजार पोलीस घ्यावयाचे ठरविले तरी ते एका वर्षामध्ये घेणे शक्य नाही. महाराष्ट्र राज्यात पोलीस ट्रेनिंगचे एकूण 5-6 कॅम्प आहेत. एका कॅम्पमध्ये एक हजार पोलीस तयार होत असतील. माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भातील माहिती त्यांच्या उत्तराच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-2

GRB/ MAP/ KGS/ 09:30

श्री.दिवाकर रावते .......

भाषणाच्यावेळी सभागृहामध्ये द्यावी, अशी मी या चर्चेच्या निमित्ताने त्यांना विनंती करतो. कितीही इच्छाशक्ती असली तरी एवढया मोठया संख्येने पोलीस तयार करुन त्यांना सेवेमध्ये दाखल करुन घेणे आणि त्यांची कार्यक्षमता वाढविणे वाटते तेवढे सोपे नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळावयाची असेल तर पूर्ण पोलीस दल असणे आवश्यक आहे. सभापती महोदय, हा प्रश्न किती गंभीर आहे आणि त्याचे गांभीर्य माननीय मंत्रीमहोदयांना माहीत नाही अशातला भाग नाही. यासंदर्भात श्री.माधव सानप यांची सुंदर मुलाखत आलेली आहे. त्यांच्या निर्धाराबद्दल त्यांचे कौतूक केले पाहिजे. परंतु तो नंतरचा भाग आहे. महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हयांतील लोकसंख्या आणि पोलीस यांची सरासरी कशी आहे, हे मी आता सांगणार आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

कोल्हापूरमध्ये 1600 माणसांमागे 1 पोलीस, सातार्‍यामध्ये 1200 माणसांमागे 1पोलीस, नांदेडमध्ये 1100 माणसांमागे 1 पोलीस, जळगावमध्ये 1300 माणसांमागे 1 पोलीस, पुणे जिल्ह्यात 1926 माणसांमागे 1 पोलीस आणि मुंबईमध्ये तर यापेक्षाही भयानक अवस्था आहे. तेव्हा सर्वत्र कायदा व सुव्यवस्था राखावयाची म्हटले तर जी वेगवेगळी परिस्थिती महाराष्ट्रात वेळोवेळी निर्माण झालेली आहे वा होते आहे त्या परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात जवळपास 365 दिवस आंदोलने ही चालू राहतात., अनेक संघटना, छोटे-मोठे पक्ष, नव्याने उदयास येणारे नेतृत्त्व तसेच त्या त्या भागातील, मोहोल्ल्यातील दादा, भाई, अण्णा हे लोक त्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांच्या लोकांकडून मग ते 25 पासून 5 हजारापर्यंतचे लोक असतील, पण त्यांच्याकडून जे काही प्रयत्न केले जातात त्यावर नियंत्रण, देखरेख ठेवण्यासाठी आपल्याला पोलीस ठेवावेच लागतात. आता तर एक नवीन ट्रेंड आलेला आहे. तोडमोड केल्याशिवाय आमच्याकडे कोणी पाहत नाही, पाहणार नाही म्हणून मुद्दाम मोठ्या प्रमाणात तोडफोड केली जाते. कित्येकदा या सरकारने हे प्रश्न निर्माण केलेले असल्याने महाराष्ट्रात आज ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सगळ्यामध्ये सरकारचे आजचे धोरण हा चर्चेचा वेगळा विषय असू शकतो. पण सरकारच्या नाकर्तेपणाचा परिणाम म्हणून मग लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो आणि त्यातून आंदोलने होतात. ते सारे विविध पातळीवर विविध पद्धतीने सुरू झाल्यामुळे ते सारे पोलिसांनाच निस्तरावे लागते. सभापती महोदय, मी सुरूवातीलाच आबांना म्हटले की, तुमची 25-30 हजार पोलीस निर्माण करण्याची इच्छा असली तरी आणि त्यास वित्त विभागाने मान्यता दिली असली तरी 5 वर्षामध्ये तेवढे पोलीस तयार करणे शक्य नाही. सभापती महोदय, मी औरंगाबाद वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असताना माझ्या असे लक्षात आले होते की, अनेक ठिकाणी इरिगेशन विभागाचे कॅम्प निर्माण केले जातात आणि ते प्रकल्प संपल्यानंतर ओस पडतात. त्या ठिकाणी कर्मचार्‍यांची घरे, कार्यालये वगैरे सर्व काही असते शिवाय हे कॅम्प निसर्गरम्य ठिकाणी असतात, जनतेपासून लांब असतात कारण इरिगेशन प्रकल्प हा असाच डोंगरदर्‍यामध्ये असतो. तर या कॅम्पस् चा उपयोग आपल्याला करून घेता आला तर तो आपण करून घेतला पाहिजे. आज आपल्याकडे एकंदर प्रशिक्षण कॅम्प केवळ 4 आहेत. महाराष्ट्रात इरिगेशनचे असे 50 मोठे कॅम्प आहेत की जे डोंगरदर्‍यामध्ये असून तेथे सर्व चांगल्या सुखसोईंनी, अमेनिटीजनी युक्त असलेले आहेत. सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की,

...... बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आपल्या पोलीस ट्रेनिंग कॅम्पमध्ये 8 दिवस राहिलेलो आहे. त्यामुळे मला त्याची चांगली माहिती आहे. तेव्हा आपले पोलीस दल वाढले नाही तर सरकारची कितीही इच्छा असली तरी सरकारला कायदा व सुव्यवस्था सांभाळणे कठीण जाणार आहे. आपण आम्हाला माहिती द्यावी की, 5 वर्षामध्ये आपल्याला 40 हजार पोलीस तयार करावयाचे असतील तर ते निर्माण करण्याची क्षमता काय असेल ? आणि त्यातून पूर्णपणे तयार होऊन येण्यासाठी किती अवधी जात असतो ? सभापती महोदय, अशा पद्धतीने काही हजार माणसांमागे एक पोलीस असेल तर मग कायदा व सुव्यवस्था राखणे केवळ अशक्य आहे आणि कायदा व सुव्यवस्था सांभाळणे ही तर सरकारची नैतिक जबाबदारी आहे. असे असताना तुम्हालाच यातून आज मार्ग काढावा लागणार आहे. आपल्याकडे पॅराफोर्स देखील आहेत. आता आपण विधानभवनामध्ये आणि या परिसरामध्ये किती पोलीस आहेत ते पहा. विधान भवनामध्ये आणि सभोवतालची सुव्यवस्था एक तज्ज्ञ पोलीस अधिकारी ठेवूनही आपण करू शकतो ना? तेव्हा एवढ्या पोलीस बलाची क्षमता आपण बाहेर वापरू शकलो तर ते जास्त महत्त्वाचे ठरेल. पण हे करावे लागेल. कारण आमची कायदा व सुव्यवस्थेची ढासळलेली परिस्थिती गंभीर झालेली असताना शासनामध्ये प्रशासकीय यंत्रणा किती निर्माण झालेली आहे ? ....

( यानंतर श्री. सरफरे ..... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

पोलिसांची कमतरता असल्यामुळे महाराष्ट्राची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती संभाळणे कठीण आहे. दैनंदिन जीवनामध्ये हाणामाऱ्या होतात, परंतु काल तर सभागृहामध्ये मारामारी करावयास मंत्री धावले. माझ्यासारख्या माणसाला सभागृहामध्ये मारामारी करणे शक्य नाही, बाहेर मी करीन. म्हणजे मानसिकता कशी झाली आहे? छोट्या छोट्या गोष्टीवरुन माणूस रागावतो. काल चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले व इतर माननीय सदस्य म्हणाले, महाराष्ट्रात आतंकवादाचे खोल जाळे पसरले आहे. त्याचप्रमाणे सायबर गुन्हे सुरु आहेत. माझा त्यावर अजून अभ्यास नाही. परंतु ही आव्हानात्मक अशी बाब आहे. हे गुन्हे दिसत नाहीत, परंतु मोठया प्रमाणात आहेत. यामधील गुन्हेगारांची क्षमता 100 पटीने वाढत आहे. त्या तुलनेत पोलीस यंत्रणा वाढत नाही ही चिंतेची बाब मी आपणासमोर मांडतो. श्री. सुभाष मल्होत्रा नुकतेच पुण्याचे आयुक्त होऊन गेले. या प्रश्नासंबंधी श्री. सानप यांनी त्यांच्याशी चर्चा केली. आपल्याकडे पोलिसांचे बळ फार कमी आहे, म्हणून राज्यातील पोलीस पाटलांना प्रशिक्षण देऊन गुन्हेगारी रोखण्याचा आपला मनोदय आहे. मी याठिकाणी एक गंभीरपणे मुद्दा मांडतो की, एक सैनिक तयार करण्यासाठी, एक डॉक्टर तयार करण्यासाठी आणि एक इंजिनिअर तयार करण्यासाठी तो जेवढी फी देतो त्याच्या 10 पटीने राज्य सरकारला खर्च येतो. त्याप्रमाणे पोलीस अधिकारी तयार करावयास राज्य शासनाला कोटयावधी रुपयांचा भुर्दंड पडतो. असा एक अधिकारी तयार केल्यानंतर त्याला त्याच्या क्षमतेमधून बाद करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. तो एक अधिकारी बाद झाला तर त्यामुळे राज्याचे किती नुकसान होणार आहे? पोलीस दलामध्ये जाती-पातीला मान्यता नाही. परंतु आज पोलीस दलामध्ये अशी एक लॉबी निर्माण झाली आहे, आज उच्च पदस्थ आय.ए.एस. अधिकारी आणि पोलीस अधिकारी हे बिहारी कसे याचे उत्तर आपल्याला मिळाले नाही. ते त्यांच्या खात्यामध्ये काम करीत असतांना त्यांच्यामध्ये असलेली जातीयता, प्रवृत्ती जात नाही. आणि मग ही लॉबी एका चांगल्या मराठी अधिकाऱ्याला निवडुंगासारखे बाजूला काढते. अशा अधिकाऱ्यांना केसेसमध्ये गुंतवून त्यांना बाद करावयाचे. आतंकवादी मेल्याचे दुःख नाही. परंतु अशा प्रकरणामध्ये अनेक चांगल्या अधिकाऱ्यांना तुरुंगामध्ये पाठविले जाते. श्री. देसाई यांना विशेष पथकामध्ये नेमण्यात आले होते. त्यांना एक-एक गुन्हयामध्ये गुंतवून ठेवावयाचे. आणि मग तुम्ही हा गुन्हा नोंदवून घेतला नाही म्हणून तुम्ही त्यामध्ये सामील आहात असे म्हणून त्यांना बाजूला काढावयाचे. 1993 च्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

बॉम्बस्फोटामध्ये आरोपी असलेला श्री. संजय दत्त याला टाडा कोर्टाने मुक्त केले. त्याबद्दल वर्तमानपत्रांनी किती कौतुक केले. संजय दत्त टाडामधून सुटला, म्हणजे आपला कुणीतरी सुटला. परंतु त्याने बेकायदेशीर वेपन बाळगल्यामुळे दुसऱ्या गुन्हयामध्ये त्याला गुन्हेगार ठरविला. दाऊद इब्राहीम याने पाठविलेल्या शस्त्रास्त्रामधील एक सतार त्याने वाजविण्यासाठी आपल्याकडे ठेवून घेतली.त्यावरुन त्याला गुन्हेगार ठरविले गेले. त्यासंबंधी वर्तमानपत्रामध्ये अग्रलेख छापून आले, तो आरोपामधून सुटल्याचे अग्रलेख छापून आले. परंतु महत्वाचा मुद्दा सांगावयाचा आहे तो असा की, शस्त्रास्त्रे भरलेला ट्रक त्याच्या घरी गेला आणि त्याने त्यामधून लहान मुले घेतात त्याप्रमाणे एक-दोन खेळणी काढून घेतली, बाकीची सर्व खेळणी पाठवून दिली. हे सर्व वर्तमानपत्रामधून छापून आले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

तरी त्याबाबत काही करेक्शन केले जात नाही. सीआयटीमार्फत खटले चालतात, त्यावेळेस ड्युटीवर असताना लक्ष दिले नाही, गुन्हा नोंदविला नाही म्हणून अशा पोलीस अधिकाऱ्यांना घरी पाठविण्याचे कारस्थान रचले जाते. ते अत्यंत परिश्रम घेऊन अधिकारी म्हणून आलेले असतात. अशा अधिकाऱ्यांच्या मागे विभागाने ठामपणाने उभे राहिले पाहिजे. जे अधिकारी भ्रष्टाचारामध्ये निलंबित होतात, त्यांची सहा महिन्यापर्यन्त चौकशीचे प्रकरण चालूच रहाते. त्यांची सहा महिन्यापर्यन्त चौकशी होत नाही. पण जे अत्यंत चाणाक्ष अधिकारी असतात अशा अधिकाऱ्यांना या ना त्या प्रकरणामध्ये गुंतवून त्यांना घरी पाठविण्याचे कारस्थान केले जाते. यामुळे 26 बॉम्बस्फोटची प्रकरणे रचण्याकरिता अतिरेकी यशस्वी झालेले आहेत. त्यांच्या मार्गातील काटे काढण्याचे काम व्यवस्थित केलेले आहे. आपण सगळेच राष्ट्रभक्त आहोत. आपल्या हातून राष्ट्रद्रोहाचे समर्थन करण्याचे पाप घडणार नाही. घरातील कोणी व्यक्ती जरी त्याचे समर्थन करत असेल तर त्याला आपण साथ देणार नाही, अशी राष्ट्रभक्ती आमच्या नसा नसामध्ये भिनलेली आहे. आमदार निवासात अतिरेक्यांनी वास्तव्य केल्याची बातमी छापून आली होती. ज्या सन्माननीय सदस्यांच्या निवासस्थानात ते राहिले त्यांचे नावही आलेले होते. ही बातमी आल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी दोन महिने झाले तरी जाहीररित्या खुलासा केला नाही. अधिवेशनामध्ये मी सभागृहात मुद्दा उपस्थित केला की, माझ्या सहकाऱ्यांवर अशाप्रकारचा आक्षेप असेल तर त्याचा त्यांनी खुलासा केला पाहिजे, तसे नसेल तर त्यांनी तसे येथे सांगितले पाहिजे, तसे असेल तर या सदनामध्ये त्यांना बसता येणार नाही, अशाप्रकारची भूमिका मी मांडली. त्यानंतर त्या संबंधातील खुलासा कोणाचे तरी मार्गदर्शन घेऊन आठ ते दहा दिवसांनी सन्माननीय सदस्यांनी केला. माझा प्रश्न असा आहे की, आतंकवादी आमदार निवासामध्ये आले हे मान्य केले तर ते आमदार निवासामध्ये नोकरांच्या बाथरूममध्ये हातपाय धुण्यासाठी आले होते काय ? गृहमंत्री महोदय, कोणी सदस्य हे स्वपक्षातील असोत किंवा आणखी कोणत्या पक्षातील असोत, त्यांना पाठिशी घालू नये. आमदार निवासामध्ये ज्या आमदारांकडे ते गेले असतील त्या आमदारांनी खुलासा करणे भाग आहे. हे अस्तनीतील निखारे तुम्हाला-आम्हाला पोसता येणार नाहीत. नाही तर मालेगाव प्रकरणामध्ये जे आपल्याला भोगावे लागले तसे पुढे भोगावे लागेल. मुंबई शहरातील पोलीस सह आयुक्त श्री.व्ही.एन देशमुख यांची वर्तमानपत्रामध्ये प्रकट मुलाखत छापून आली. मुस्लीम बांधवांचे आपण

2....

SKK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

नाव घेतो. मुस्लिमांना असे वाटते की, आम्ही मुस्लिमांना विरोध करतो, परंतु तशी परिस्थिती नाही. मुंबईचे सहपोलीस आयुक्त श्री.व्ही.एन.देशमुख यांनी मुंबई शहरात बांगला देशींची संख्या वाढली असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की बियरबारमध्ये बांगला देशी मुलींची संख्या जास्त आहे. सन्माननीय गृहमंत्री महोदय, डान्सबारच्या संबंधात कायदा केला, तेव्हा महाराष्ट्राने आपल्याला डोक्यावर घेतलेले होते.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

ते पुढे असे म्हणाले की, मुंबई शहरातील बिअरबारमध्ये बांगलादेशी मुलींची संख्या जास्त आहे. बिअरबारच्या माध्यमातून वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढू लागला आहे, हा कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठा प्रश्न आहे. बिअरबारची वेळ रात्री 12 नंतर सुमारे दीड वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. हा प्रकार कायदा व सुव्यवस्थेबरोबरच नैतिकतेच्या दृष्टीकोनातूनही अयोग्य आहे असे सांगून बिअरबार रात्री साडेअकरापर्यंतच उघडे राहिले पाहिजेत असे मत मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. बी. एन. देशमुख यांनी व्यक्त केले. शासन याची नोंद घेणार की नाही ? बिअरबारमधून निर्माण झालेली परिस्थिती सहपोलीस आयुक्तांनी मांडलेली आहे. त्याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा करावी. पोलिसांना बीअरबारमुळे अडचण निर्माण होत असेल, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडत असेल तर त्याचा विचार केला पाहिजे. बलात्कार प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत. दरोड्यांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत. प्रत्येक पेट्रोल पंपाला आपण पोलीस संरक्षण देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. बेरोजगार युवक कळत नकळत गँगस्टरीझमच्या, दहशतवादाच्या मार्गाला लागलेले आहेत. ते गुन्हेगारीकडे वळत असताना पोलीस प्रमुखांनी जे धोके आपल्याला दाखवून दिलेले आहेत त्याकडे शासनाला लक्ष द्यावे लागेल.

सभापती महोदय, यानंतर मला मोर्चाच्या बाबतीत सांगावयाचे आहे. खैरलांजी प्रकरणाच्या बाबतीत लाखो दलितांची अशी इच्छा होती की, नागपूरच्या अधिवेशनामध्ये आपला रोष प्रकट करावा. परंतु पोलिसांनी नागपूर अधिवेशनात मुंगीही शिरणार नाही अशी कायदा व सुव्यवस्था ठेवली. पोलिसांनी मनात आणले तर ते काय करु शकतात याचे दर्शन त्यांनी त्यावेळी दाखवले. त्यांच्या ताकदीचे, त्यांच्या सामर्थ्याचे दर्शन त्यांनी दाखवले आणि त्यामुळे तो मोर्चा निघू शकला नाही. दलितांचा तो मोर्चा अत्याचाराच्या विरोधात होता. स्वत:च्या स्वाभिमानासाठी तो मोर्चा होता. महाराष्ट्रात घडलेल्या घटनेच्या संदर्भात मोर्चा होता. मुंबईच्या आझाद मैदानावर 100-200 आंधळे लोक जमले होते. आम्हाला नोकरी द्या हे सांगण्यासाठी, त्यांच्या पोटापाण्यासाठी तो मोर्चा होता. महाराष्ट्रामध्ये आपले हक्क मिळविण्यासाठी तो मोर्चा होता. पोलिसांनी त्यांना बदडून काढले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. दिवाकर रावते ....

कोणत्या तरी देशामध्ये इस्मालमचा अपमान केला, पैगंबराचे कार्टून काढले त्याकरिता लाखो लोक आझाद मैदानावर आले आणि अनियंत्रितपणे वागले. त्यांनी टाइम्स ऑफ इंडियाचे कार्यालय फोडले. त्यावेळी आमच्या पोलिसांना त्यांना आवरता आले नाही. स्वकियांच्या पाठीवर घाव आणि परकियांना फुलांचे हार असा हा प्रकार आहे. सभापती महोदय, पोलिसांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते या ठिकाणी सांगणे महत्वाचे वाटते. काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांची बैठक अलीकडेच नैनितालमध्ये झाली. त्यात बोलताना विलासराव देशमुख यांनी सध्याचे कायदे दहशतवाद रोखण्यात अपुरे पडत असल्याची खंत व्यक्त केली होती. या बैठकीच्या निमित्ताने त्यांनी इंडियन पीनल कोडमध्ये कोणते बदल करणे गरजेचे आहे याचे टिपण तयार केले आहे. सध्या आरोपीला मिळणारी पोलीस कोठडी केवळ 14 दिवसांची असून ती किमान 45 दिवसांची असायला हवी, अशी त्यांची सूचना आहे. आरोपीची चौकशी नीट करता यावी, यासाठी 45 दिवस पोलीस कोठडी आवश्यकच असून, आरोपपत्र सादर करण्याची मुदतही वाढवावी, असेही त्यांनी नमूद केले आहे. सध्या कोणत्याही आरोपीवर 90 दिवसांच्या आत आरोपपत्र ठेवण्याचे बंधन आहे. ही मुदत 160 दिवस असावी, असे महाराष्ट्र सरकारचे म्हणणे दिसते. एवढेच नव्हे तर पोलीस उपायुक्त वा त्यावरील अधिकाऱ्यांसमोरील आरोपीचा कबुलीजबाब न्यायदंडाधिकाऱ्यापुढे खातरजमा करुन घेण्याची तरतूद केली जावी, त्यामुळे आरोपीला आपला कबुलीजबाब नंतर बदलता वा फिरवता येणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी आपल्या टिपणात म्हटले आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात अशा प्रकारचे निवेदन त्या परिषदमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांचे काय म्हणणे आहे ते त्यांनी सांगावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 09:55

(श्री. दिवाकर रावते...)

सभापती महोदय, मी शेवटचा अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. एका घरातील एक तरुणी गायब झाली, पोलिसात तक्रार केली, शोधाशोध केली. त्यानंतर दोन दिवसांनी तिचे प्रेत विहिरीमध्ये आढळून आले. मृत शरीर दोन दिवस विहिरीत असल्यामुळे ते कुजलेल्या अवस्थेत होते. ते पार्थिव ताब्यात घेण्यात आले. ही घटना उमरखेड येथील आहे. ते शव पोस्टमार्टेमकरिता 12.00 वाजता रुग्णालयात आणले. ती तरुणी आमच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्याची पत्नी असल्यामुळे शिवसेनेचे सर्व पदाधिकारी तेथे गेले. दोन दिवस गायब असलेल्या पत्नीचे शव विहिरीत सापडल्यानंतर तिच्या पतीची आणि कुटुंबियांची मानसिक स्थिती काय झालेली असेल? याची सभापती महोदय, आपणास कल्पना असेल. 12.00 वाजता शव रुग्णालयामध्ये पोस्टमार्टेमसाठी आणल्यानंतर रात्री 10.00 वाजता बॅटरीच्या झोतामध्ये पोस्टमार्टेम करण्यात आले. त्यावेळी तोल गेलेले शिवसैनिक डॉक्टरांना दोन गोष्टी बोलले. त्यावर डॉक्टर त्यांच्या अंगावर धावून गेले. त्यामुळे मानसिकदृष्ट्या विकल अवस्थेत असलेले तेथील शिवसेनेचे कार्यकर्ते साहजिक अनावर झाले आणि त्यांनी रुग्णालयाची मोडतोड केली, काचा फोडल्या. तीन दिवस प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात मिळालेले नव्हते, ते कुजलेल्या अवस्थेत होते. अशा परिस्थितीमध्ये तेथील डॉक्टरांनी केलेल्या मिजासगिरीतून हा प्रकार घडला. 22 रु.असलेली कॅशपेटी तोडली, तोडफोड केली, असा आरोप करुन शिवसैनिकांवर गुन्हे दाखल केले. परंतु या प्रकाराला कारणीभूत ठरलेल्या आणि असा प्रकार करण्यास प्रवृत्त करणा-या डॉक्टरावर मात्र गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तीन दिवस प्रेत ताब्यात मिळत नव्हते, मानसिकदृष्ट्या लोक संतप्त झाले होते, सकाळी आणलेल्या शवाचे रात्री पोस्टमार्टेम केले अशा परिस्थितीमध्ये डॉक्टरांना विचारणा केली म्हणून डॉक्टर तडक अंगावर धावून गेले. परिणामी भावनेच्याभरामध्ये ही घटना घडली. खरे म्हणजे ही घटना घडण्यास मुळात तेथील डॉक्टर कारणीभूत आहेत याची, सभापती महोदय, आपण नोंद घ्यावी आणि या सगळ्या प्रकरणाची सखोल चौकशी करुन या प्रकरणी शिवसैनिकांवर जे हकनाक गुन्हे दाखल केलेले आहेत ते मागे घ्यावेत आणि डॉक्टरांवर गुन्हा दाखल करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या प्रस्तावासाठी 11.30 वाजेपर्यन्त वेळ आहे. अजून अनेक सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. तेव्हा मी सर्व सन्माननीय सदस्यांना सूचना करतो की, त्यांनी जास्त वेळ न घेता या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या सूचना मांडाव्यात जेणेकरुन माननीय मंत्री महोदयांना देखील उत्तरासाठी वेळ मिळेल.

--

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था आणि गृह खात्याच्या संदर्भात जो प्रस्ताव आलेला आहे त्या प्रस्तावाच्या विरोधात भाष्य करण्यासाठी मी उभी आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये गुन्हे घडत नाहीत असे मी म्हणणार नाही. गुन्हे पूर्वी घडत नव्हते असेही मी म्हणणार नाही. परंतु हे गुन्हे घडू नयेत म्हणून आपण कोणती पावले टाकीत आहोत ? हे गुन्हे घडण्याची कारणे कोणती आहेत ? हे गुन्हे घडण्याच्या पाठिमागे कशा प्रकारचे वातावरण आहे ? या सगळया गोष्टींचा परामर्श मी घेणार आहे.

मला एका बाबीची नोंद कराविशी वाटते की, या सभागृहामध्ये बोलत असताना काही वेळेला जातीचा उल्लेख होतो. आपले राज्य आणि राष्ट्र हे धर्मनिरपेक्ष आहे. या देशाच्या घटनेप्रमाणे या देशातील कोणताही नागरिक मग तो हिंदू असो, मुस्लिम असो, शीख असो वा अन्य कुठल्याही धर्माचा असो, तो प्रथम जन्माने भारतीय नागरिक आहे. भारतातील नागरिकाने कोणता धर्म, जात, पंथ, रुढी, परंपरा स्वीकारावी याचे स्वातंत्र्य त्याला संविधानाने दिलेले आहे. परंतु मी या धर्माचा आणि समोरच्या त्या धर्माचा, अशी बाब जेव्हा घराचा उंबरठा ओलांडून रस्त्यावर येते - मग ते हिंदू धर्माचे लोक रस्त्यावर आलेले असोत की, मुस्लिम धर्माचे लोक रस्त्यावर आलेले असोत - असे लोक जेव्हा धर्मनिरपेक्षतेला छेद देण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी खरे गुन्हेगार कोण ? याचा विचार करणे भाग पडते. अजूनही एक बाब मला स्पष्ट बोलावीशी वाटते की, अमूक एका गुन्ह्यातील सगळे हेच का ? असा जेव्हा प्रश्न निर्माण केला जातो त्यावेळी मी गंभीरतेने हे सांगू इच्छिते की, कोणत्याही गुन्हेगाराला जात आणि धर्म असत नाही. आपले असलेले कायदे कुठे तरी कमी पडत आहेत. जे वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करतात त्यांना कठोर शिक्षा होत नाही. याठिकाणी महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन करणारे विधेयक पास करणे आवश्यक आहे. आयपीसीमध्ये तरतुदी असताना देखील डोमेस्टिक व्हायलन्सच्या संदर्भात आपणाला कायदा करावा लागला.

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.........

म्हणते आहे त्या कायद्यातील तरतुदी कमी पडतात का? महिलांवर होणारे अत्याचार, दलितांवर होणारे अत्याचार, अल्पसंख्यांकावर होणारे अत्याचार आणि समाजामध्ये दुही पसरविणारे जे प्रकार घडतात त्यावर बंधन आणण्याच्या दृष्टीने समाजाने कायदे करण्याची गरज आहे. हे विधान मात्र स्तुत्य आहे आणि त्याबाबत विचार झाला पाहिजे.

आणखी एका बाबीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. गुन्हेगारीला जात नसते हे म्हणत असताना वसई येथे एक प्रकार घडला. एका तरुण मुलीला होमामध्ये टाकून जिवंत जाळण्यात आले. हेतू मारण्याचा नव्हता. मला काहीतरी प्राप्त करायचे आहे म्हणून समोरच्याला मारले. अशा प्रकारचा घटना घडतात, या घटनांना आवर घालण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे का? हे तपासून घेतले पाहिजे. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून ते बिल सामाजिक हेतूच्या दृष्टीने आणण्याचा प्रयत्न निश्चित केला गेला. काल परवा नगरपालिकांच्या निवडणुका चांगल्या पध्दतीने पार पडल्या. चौपाटीवर बलात्काराचा प्रकार झाला. त्यामध्ये जलद गतीने न्याय देण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांमध्ये शासन कमी पडते असे नव्हे. स्वातंत्र्य जरुर असले पाहिजे. आरएसएसच्या हेडक्वार्टरला वाचविले त्यावेळी स्तुती केली गेली. परंतु ज्यावेळी सरकारकडून गोळीबार झाला त्याचे समर्थन मी करणार नाही, कोणीही करणार नाही आणि करु नये. असे गोळीबार कमीत कमी होऊन कायदा व सुव्यवस्था कशी जपता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. रमाबाईनगर येथे गोळीबार झाला आणि आता झालेला गोळीबार असेल याची तुलना होऊ शकत नाही. मरणाऱ्यांचा जीव गेला. आम्ही किती गोळया झाडल्या, तुम्ही किती झाडल्या या ऐवजी या गोळया झाडाव्या लागणार नाहीत यासाठी वातावरण निर्माण करणार की नाही? गुजराथमध्ये अल्पसंख्याक समाजाच्या गरोदर बाईला कापले जाते. तिच्या पोटातील गर्भ कापून टाकला जातो. यामध्ये मूलतत्ववादी कोण आणि मुस्लिम तत्ववादी कोण याची चर्चा या महाराष्ट्रामध्ये घडते. या चर्चा घडवितो कोण? वर्षानुवर्षे या गोष्टी घडत आहेत. कोणी देवाचे, कोणी मंदिराचे, कोणी धर्माचे नाव घेऊन स्वातंत्र्य असावे असे म्हणतो. या स्थळांना बदनाम करुन लोकांच्या भावना पेटवून कोणी राजकारण करतो. खऱ्या अर्थाने लोकांना धर्मनिरपेक्षतेचा धोका कोणापासून पोहोचतो? अशा शक्ती असतील तर शासनाने कितीही प्रयत्न केले तरी ते अपुरे पडणार आहेत. कायदा व सुव्यवस्थेवर बोलत असताना आरडीएक्स सापडले ही महत्वाची गोष्ट आहे. ते शोधले नसते तर काय घडले असते? या प्रश्नाचा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.........

विचार करण्याची गरज आहे. ज्या पध्दतीने महिलांवर बलात्कार होत आहेत किंवा अत्याचार होत आहेत ते चुकीचे आहे. माझा समाज महिलेला स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून मानायला, स्वीकारायला तयार नाही हे प्रमुख दु:ख आहे. स्त्री किती सुंदर आहे, तिला किती भोगता येते या विचारापेक्षा तिच्यात गुण काय आहेत हे पहायला शिकलो तर गुन्हयांची संख्या कमी होईल. परंतु स्त्रियांचे स्त्रीपण असणे, पुरुषांच्या बरोबरीने असणे ही कन्सेप्ट समाजामध्ये रुजविण्यासाठी सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी चळवळ केली त्या चळवळीला गती देण्याची गरज आहे. महिलांवर बलात्कार होतात. ते होऊ नयेत. ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो. परंतु एक पाऊल पुढे जाऊन पुनर्वसनाचा प्रश्न हाती घेतला पाहिजे. आजच केवळ बलात्कार होतात असे म्हणता येत नाही. पूर्वी देखील झाले. सीतेला घराबाहेर काढले गेले. द्रौपदीचे वस्त्रहरण झाले, या गोष्टीचे मी समर्थन करणार नाही. तेव्हापासून आजपर्यंत असे प्रकार घडत आहेत. मी जिवंत असताना, मला डोळे असताना माझ्या डोळयावर पट्टी बांधली जाते. महाभारतात देखील गांधारीच्या डोळयावर पट्टी बांधली गेली. नवऱ्याची इच्छा असताना पोटातील गर्भ मला पाडायचा नाही. म्हणून केवळ प्रश्नाकडे बोट दाखवून चालणार नाही. त्यासाठी सर्वांनी आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. सरकार कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित सांभाळीत आहे असे म्हणत असताना जे प्रश्न निर्माण होतात, त्यामध्ये अतिरेकी असतील, नक्षलवादी असतील, जातीयतेचे असतील, गुन्हेगारीचे असतील, महिलांवरील व दलितांवरील अत्याचाराचे प्रश्न असतील, हे प्रश्न निर्माण होऊ नयेत यासाठी सरकार प्रयत्न करते का? हे तपासून घेतले पाहिजे. प्रश्न निर्माण झाल्यानंतर पूर्ववत परिस्थिती येते का हे तपासले पाहिजे. मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर दोन तासात मुंबई पूर्वपदावर येते ही बाब समाधानाची आहे की नाही हे तपासून घेतले पाहिजे. कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाल्याबद्दल जो प्रस्ताव आलेला आहे त्याच्या विरोधात मी याठिकाणी उभी आहे. कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी महाराष्ट्र सरकार चांगले प्रयत्न करीत आहे. काही वेळेला कमी यश येत असेल, अपयश येत असेल परंतु प्रयत्न करीत आहे अशी भावना व्यक्त करुन माझे भाषण संपविते.

----

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MHM/ 10:10

श्री.संजय केळकर.........

त्याठिकाणी सामान्य माणसांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी पोलीस स्टेशन द्यावे. रझा ॲकॅडमीच्या लोकांना अटक झाली. 39 जणांवर खटले भरण्यात आले. गेल्या आठवड्यात गुन्हे दाखल झाले आहेत. त्याठिक्‌ाणी एका गटाने दोन पोलीस कर्मचाऱ्यांची निर्धृणपणे हत्या केली. त्यांना ठेचून मारण्यात आले. अशाप्रकारच्या घटनांमुळे जनतेला काय वाटत असेल ? कशासाठी त्यांचे लांगूनचालन चालू आहे ? गृह विभागात चांगले पोलीस अधिकारी आणि कर्मचारी देखील आहेत. ते चांगले काम प्रकारे काम करीत आहेत. परंतु काही पोलीस अधिक्‌ारी बाईट वागतात आणि संपूर्ण पोलीस खाते बदनाम होते. काल आम्ही वर्तमानपत्रात बातमी वाचली की, "शोले" आंदोलन मिटविण्यासाठी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील 135 पायऱ्या चढून गेले आणि लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल मी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पोलीस अधिकाऱ्यांचे वागणे कसे असते याचे मी आपणास उदाहरण देतो. पनवेल येथे निवडणुकीच्या काळामध्ये जीप मधून माझ्यासमवेत काही लोक मतदानासाठी मतदान केंद्रावर जात होते. वाटेत आमची जीप रस्त्याच्या मध्ये उभी राहिली म्हणून पोलीस इन्स्पेक्टर श्री.पाटील यांनी जीप अडविली. मी त्यांना सांगितले की, मी लोकप्रतिनिधी आहे, आम्हाला मतदान करण्यासाठी जायचे आहे. आता सव्वापाच वाजले आहेत आणि साडेपाचवाजता मतदान केंद्र बंद होणार आहे. पण त्याने आमचे काहीही ऐकले नाही. तो गाडीत बसूनच आमच्याशी बोलत होता. मी त्याला सांगितले की, आता आम्हाला उशीर होत आहे ड्रायव्हरला वॉर्निंग देऊन सोडा. तो आरडाओरड करीत तुमच्यावर गुन्हा दाखल करु असे सांगू लागला. जर आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींची अशी अवस्था होत असेल तर सर्वसामान्य जनतेशी पोलीस कशाप्रकारे वर्तन करीत असतील याचा आपण विचार करावा.

सभापती महोदय, आज मुंबईतील चाकरमानी आपला जीव धोक्यात घालून प्रवास करीत आहे. सकाळी नोकरीवर निघालेला चाकरमानी संध्याकाळी घरी परतेल की नाही अशी शंका त्यांच्या घरच्यांना सतावत असते. आपण आता घर सोडले आहे परंतु घरी परतू की नाही अशी शंका चाकरमान्याच्या मनात डोकावत असते. रेल्वे स्टेशनमध्ये,बस मध्ये, गर्दीच्या ठिकाणी कधी बॉम्बस्फोट होईल हे सांगता येत नाही अशी शंका त्याच्या मनात भेडसावत असते. सभापती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MHM/ 10:10

श्री.संजय केळकर.........

महोदय,जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये सामान्य माणसे मोठ्या प्रमाणावर भरडली गेली. या देशाचे तुकडे करणाऱ्या शक्ती याठिकाणी हे काम करीत आहेत. त्या आपण हुडकून काढल्या पाहिजेत आणि हे काम प्रामुख्याने गृह विभागाचे आहे.

सभापती महोदय, मुंबईत आणि इतरत्र जे बॉम्बस्फोट होतात त्याचे मटेरीयल ठाणे आणि कोकणामार्गे येतात. सन 1993 मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाचा निकाल चालू आहे. या बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपी दाऊद टकला याने कशाप्रकारे बॉम्बस्फोटाचे सामान उरविले हे सांगितले. यासाठी कोणकोणाला पैसे दिले ते सांगितले. सभापती महोदय,पडघा येथे सी.बी.कार्यरत आहे. या पडघा जवळ बोरिवली गाव आहे. ते गुन्हेगारांचे गाव म्हणून ओळखले जाते. त्याठिक्ाणी अनेक स्फोटके सापडली. माजी पोलीस महासंचालक श्री.जी.एस.गिल यांनी सांगितले की, दहशतवाद रोखण्याचे काम स्थानिक पोलिसांचे आहे. परंतु आपल्या राज्यात जोपर्यात संकट येत नाही तोपर्यत सुस्त प्रशासन हीच सर्वात मोठी आपत्ती ठरते. संकट कोसळल्यानंतर उपाययोजना करण्याच्या आश्वासनांची खैरात होते, परंतु तोपर्यंत अनेकांचे जीव जातात. मुंबईत गत जुलैमध्ये झ ालेल्या लोकल बॉम्बस्फोटाची माहिती केंद्रीय गुप्तचर खात्याने राज्य पोलीस यंत्रणेला दिली होती. परंतु नेहमीप्रमाणे पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केले, त्याचा परिणाम आपणा सर्वांना भोगावा लागला.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील पडघा पोलीस कार्यालयाने पोलीस स्टेशनच्या अंतर्गत असलेल्या बोरिवली येथे धाडी टाकून आक्षेपार्ह कागदपत्रे, धोकादायक हत्यारे व उर्दू भाषेतील छापीलपत्रके पकडली. सदर गुन्ह्यातील आरोपींवर न्यायालयाने दोषारोपपत्र दिलेले आहे. सदर गावात दिनांक 27.3.2003 रोजी आरोपी श्री.साकिब अब्दुल हमीद नाचण यास पकडले असता त्याने "अल्ला हो अकबरचा" नारा देऊन क्षणात 200-300 पुरुष व 40-50 महिलांना जमवून पोलिसांभावेती फेर धरला व तो आरोपी पळून गेला. त्यामुळे पोलिसांना त्याच्यावर कोणतीही कारवाई करता आली नाही.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.अजित... 10:15

श्री.संजय केळकर...

अशाप्रकारे त्याठिक्ाणी अतिरेकी कारवायांचे अड्डे, सिमी संघटनेचे अड्डे, पाकिस्तानी अतिरेक्यांचे अड्डे निर्माण होत आहेत, अशाप्रकारचे पत्र सहाय्यक पोलीस आयुक्तांना दिलेले आहे.

बोरीवली गावातील सिमी संघटनेचे सदस्य साकीब अब्दुल हमीद नाचन हा बोरीवली गावी मुस्लीम युवकांच्या मिटींगा घेऊन, देशविरोधी वक्तव्ये करुन व भाषणे देऊन मुस्लीम तरुणांना उत्तेजीत करीत असे. त्याचे पाकिस्तानी आयएसआय या संघटनेशी संबंध असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्याने व त्याचे पाकिस्तानी आयएसआय संघटनेचे लालसिंग राजपुत, मंजितसिंग रा. पंजाब, महमंद शारीत रा.पाकिस्तान, शोएब मुक्तार व ताहीर जमाल यांच्याशी संबंध होते. असे प्रकार आज त्याठिकाणी सुरु आहेत. याबाबतीत त्यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षकांना माहिती दिलेली आहे. या गावातील अनेक तरुणांवर अनेक प्रकारच्या केसेस दाखल झालेल्या आहेत. हे पत्र मी माननीय गृहमंत्र्यांना देणार आहे. सभापती महोदय, मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर 24 तासामध्ये शहापूरजवळ स्फोटके सापडली. त्यात 1450 डिटोनेटर्स, 275 किलो जिलेटीन, अमोनिअम नायट्रेट पावडरच्या 5 गोण्या, वायरचे 75 तुकडे आदींचा समावेश होता. सभापती महोदय, ती स्फोटके नाहीत का ? मग, याबाबतीत पुढील शोध का घेतला गेला नाही ? त्यामुळे एका बाजूला अशाप्रकारची स्फोटके ज्याठिकाणी उतरविली जातात, त्याठिकाणी आपण कोणत्याच प्रकारचे लक्ष देत नाही, हे योग्य नाही. आज अशाप्रकारची स्फोटके जर बंदरांमध्ये उतरविली जात असतील तर त्या ठिकाणी आपण बंदोबस्त ठेवणार आहात की नाही ? ज्यांच्याकडून अशाप्रकारची स्फोटके आपल्याला मिळाली त्यांच्यावर आपण गुन्हे दाखल करणार की नाही ? यामध्ये जे कॉन्ट्रॅक्टर आहेत, त्यांना आपण ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करणार की नाही ?

सभापती महोदय, कोकणामध्ये मुरुड जंजिरा भाग असून त्याठिकाणी एक अनधिकृत वस्ती उभारली गेली असून तेथे जी माणसे राहत आहेत, त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचे पुरावे नाहीत. त्याठिकाणी 102 गावे आहेत. त्याठिकाणच्या मूळ नागरिकांनी तहसिलदारांकडे मागणी केलेली आहे की, या वस्तीमध्ये माणसे अनधिकृतपणे राहतात, त्यांच्याकडे राष्ट्रीयत्वाचा कुठल्याही प्रकारचा दाखला नाही, त्यांच्याकडे रेशन कार्ड नाही किंवा कुठल्याही प्रकारची कागदपत्रे नाहीत. परंतु अशाप्रकारे ते आज त्याठिकाणी अनधिकृतपणे राहत आहेत. याबाबतीत

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये सिमीच्या कारवाया वाढलेल्या आहेत. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या नवीन अनधिकृत वस्त्या उभ्या आहेत, त्याठिकाणी देशविघातक कृत्य करणारी माणसे राहत असून ते तेथील लोकांना भडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यातून बॉम्बस्फोट घडवून आणण्यामध्ये त्यांच्याकडून मदत होत आहे. पंरतु एका बाजूला आपली सर्वसामान्य माणसे हवालदिल असून त्यांना आपण न्याय देऊ शकत नाहीत. सभापती महोदय, आपण आपल्या महाराष्ट्राला शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणतो. आपल्या देशाला वेगळी परंपरा आहे व त्यामध्ये आपले राज्य हे अग्रेसर राहिले पाहिजे, अशी सगळयांचीच भावना आहे. परंतु दुसऱ्या बाजूला अशाप्रकारची गद्दारी करणारी माणसे जर निर्माण होणार असतील तर आपला महाराष्ट्र कसा प्रगतीशील होणार ? हा खरा प्रश्न आहे. एवढे बोलून मी माझे मनोगत येथेच थांबवतो.

धन्यवाद !

-----

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोधी)**

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, सदरचा प्रस्ताव अतिशय सुस्पष्ट असा असून राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी अतिशय स्फोटकपणे याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडलेला आहे. सभापती महोदय, हे कोण नाकारु शकेल की राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले नाही ? गुन्हेगारीचे प्रमाण गेल्यावर्षीपेक्षा 60 टक्क्यांनी वाढलेले आहे. आज राज्यामध्ये क्राईम रेट वाढल्यामुळे पोलिसांची संख्या वाढणे आवश्यक आहे, लोकसंख्येची वाढ झाल्यामुळे पोलिसांच्या संख्येत वाढ होणे आवश्यक असते. परंतु पोलिसांची संख्या वाढत नाही. आज राज्यामध्ये क्राईम रेट वाढून वेगवेगळया प्रकारचे गुन्हे आपल्यासमोर येत आहेत.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.......

सायबर क्राईम, दरोडे, बलात्कार, महिलांवरील अत्याचार, मतिमंद मुलींवर झालेले बलात्कार, रेल्वे गाडयांमधील बलात्कार, मरिन ड्राईव्ह पोलीस चौकीमध्ये झालेला बलात्कार अशा पध्दतीने महिलांवर झालेल्या अत्याचाराची माहिती मी मुद्दाम सभागृहासमोर ठेवतो आहे. गेल्यावर्षी 198 महिलांवर बलात्कार झाले, त्यामध्ये 128 अल्पवयीन मुली होत्या. विनयभंगाच्या 384 तक्रारी प्राप्त झाल्या, अश्लिल चाळे 106, हुंडाबळी 8, विवाहितांच्या आत्महत्या 83 अशा प्रकारचे गुन्हे घडले. हे जर गेल्या वर्षातील चित्र असेल तर येणा-या वर्षामध्ये आपण काय करणार आहोत ? आपण महाराष्ट्रातील महिला पोलिसांची संख्या पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की ही संख्या वाढविण्याची गरज आहे. संपूर्ण पोलीस दलामध्ये 1 महिला सह पोलीस आयुक्त, 2 उपआयुक्त, 6 सहाय्यक पोलीस आयुक्त, 28 पोलीस निरिक्षक, 62 पोलीस उपनिरिक्षक, 121 पोलीस नाईक, 1126 पोलीस शिपाई, 117 हवालदार अशा प्रकारे महिला पोलीसांची आकडेवारी आहे. जर क्राईम रेट बघितला तर ही महिला पोलिसांची संख्या योग्य आहे का ? आपण पोलीस भरतीची गोष्ट करतो मग महिला पोलीसांची भरती किती करावयास पाहिजे याबाबत या सभागृहात कुणीही बोलले नाही. महिलांच्या अत्याचारात वाढ झाली आहे, त्याबाबतची आकडेवारी मी दिलेली आहे. यामागील कारण असे आहे की, आज दूरदर्शनच्या माध्यमातून आज तक, एनडीटीव्ही, झी मराठी, ई-टी.व्ही.मराठी या वाहिन्यांवरुन क्राईम रिपोर्टसारख्या मालिकांमधून गुन्हे कशा पध्दतीने करावेत याबाबतचे ट्रेनिंग दिले जाते आणि त्याच धर्तीवर आज महाराष्ट्रात गुन्हे घडत आहेत. त्यामुळे सर्वप्रथम या वाहिन्यांवरील अशा प्रकारच्या मालिका बंद झाल्या पाहिजेत. या वाहिन्यांवर शासनाचे कोणत्याही प्रकारचे बंधन नाही, असे सांगितले जाते. म्हणून त्यांना कुठेतरी कायद्याच्या अंमलाखाली आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. मेकॅन्झी अहवालाचा उल्लेख सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी केला आणि त्यांनी असे सांगितले की, 75 हजार पोलिसांची महाराष्ट्राला गरज आहे, त्यासाठी ट्रेनिंग कॅम्प काढले पाहिजेत. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे, क्राईम रेटमध्ये वाढ होत आहे आणि पोलिसांची संख्या मात्र कमी होत आहे. याचा समन्वय कसा साधणार आहात ? जास्तीत जास्त पोलीस कसे तयार करणार आहात ? आज पोलिसांना 14 तास काम करावे लागत आहे. सभागृहात काल झालेल्या चर्चेत असे सांगण्यात आले की,

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

पोलिसांना गेल्या साडेचार महिन्यामध्ये एकही सुटी मिळालेली नाही. परवा मुंबईमध्ये जी दंगल झाली त्यावेळी पोलिसांवर प्रचंड प्रेशर होते परंतु त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने ही घटना हाताळली. त्यामुळे खरी गरज आहे ती पोलिसांना मानसोपचार देण्याची, त्यांचे स्वास्थ टिकविण्याची. यासाठी कोणत्या प्रकारच्या सुविधा आपण उपलब्ध करुन देत आहोत ? सन्माननीय गृहमंत्री असे सांगताता की, आम्ही पोलिसांसाठी फाईव्ह स्टार हॉस्पिटलमध्ये व्यवस्था केली आहे. प्रश्न असा आहे की, या सोईचा फायदा आजपर्यन्त किती पोलिसांना मिळाला ? याचे लाभार्थी किती आहेत ? पोलिसांचे मानसिक संतुलन टिकविण्यासाठी, दंगल कशी हाताळावी, क्राईम कसा हाताळावा, यासाठी त्यांना मानसोपचार तज्ञांची आवश्यकता आहे. मघाशी असे सांगण्यात आले की, अतिरेक्यांना जात नसते, धर्म नसतो. आज सर्व विमानतळावर रेड अलर्ट देण्यात आला आहे.

यानंतर श्री.गागरे...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा .......

इसलिए माननीय सभापति महोदय, पुलिस को मजबूत करने की बात सरकार के द्वारा और हम सब के द्वारा होनी चाहिए, पुलिस कर्मचारियों को ज्यादा सुविधा देने की बात होनी चाहिए. यह बात सही है कि हमारे यहां पर जो ट्रेडिशनल क्राइम थे वह पूरे हिन्दुस्तान में कम हो रहे हैं, चोरी, डकैती, महिलाओं पर अत्याचार और दलितों पर होने वालों अत्याचारों की संख्या अब पहले से कम हो रही है, इस तरह के क्राइम्स की संख्या पूरे हिन्दुस्तान की तरह ही महाराष्ट्र में भी कम हो रही है. लेकिन दूसरे प्रकार के क्राइम अब बढ़ने लगे हैं, टेररिस्ट एक्टीविटीज अब ज्यादा बढ़ गई हैं, सायबर क्राइम अब ज्यादा होने लगे हैं. इसलिए इस तरह के क्राइम्स को रोकने के लिए बहुत जरुरी है कि हम पुलिस व्यवस्था को मजबूत करें. पॉलिटिकल लीडर्स और सोशल एक्टीविस्ट की यह जिम्मेदारी है कि पुलिस कर्मचारियों को हम मॉरल सपोर्ट दें.

माननीय अध्यक्ष महोदय, कोई भी सरकार यह नहीं चाहती कि उसके राज्य में लॉ एण्ड आर्डर की स्थिति खराब हो, लेकिन यह बात भी सही है कि लॉ एण्ड आर्डर की स्थिति में सुधार लाने की बहुत जरुरत है. साथ ही एक बात मैं यही भी कहना चाहूंगा कि लॉ एण्ड आर्डर की स्थिति में सुधार लाने का काम यह सरकार की कलेक्टिव जवाबदारी है. किसी एक मंत्री महोदय को इसके लिए जवाबदार रखना ठीक नहीं है. डेमॉक्रेटिव व्यवस्था में किसी एक व्यक्ति को सिंगल आऊट करना ठीक नहीं है क्योंकि यह जवाबदारी पूरी केबिनेट की है.

इसलिए माननीय सभापति मेरा सुझाव है कि पुलिस व्यवस्था का आधुनिकीकरण किया जाना चाहिए, पुलिस की संख्या बढ़ानी चाहिए, पुलिस में महिला कर्मचारियों की संख्या बढायी जानी चाहिए, पुलिस कर्मचारियों को आवश्यक साधन देने चाहिए, उनके पास गाड़ियां नहीं हैं, इसलिए उनको आवश्यक गाड़ी देनी चाहिए. साथ ही उनको स्वायत्ता दी जानी चाहिए क्योंकि आज हमारे यहां के पुलिस कर्मचारी बहुत ही दबाव में काम करते हैं. किसी तरह का दबाव उन के ऊपर नहीं होना चाहिए. पुलिस विभाग को बजट सपोर्ट देना बहुत आवश्यक है.

माननीय सभापति महोदय, मैं यहां पर एक और बात कहना चाहूंगा और वह यह कि जो टेररिस्ट एक्टिविस्ट हैं वे किसी जाति या किसी एक धर्म के नहीं होते. अभी आपने देखा होगा कि नागपुर में आर. एस. एस. मुख्यालय पर हमला हुआ तो हमारी पुलिस ने उसको नाकाम कर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा.....

दिया और अनेक मुस्लिम लोगों ने इस टेररिस्ट एक्टिविटी का विरोध किया. यदि आज हमारी पुलिस अच्छा काम नहीं करेगी तो हमारे राजकीय नेता भी सुरक्षित नहीं रह पायेंगे, वे भी अपना काम ठीक ढंग से नहीं कर पायेंगे. पुलिस के अच्छे काम की वजह से ही हम सब राजकीय नेता अपना-अपना काम ठीक ढंग से कर पाते हैं. इसलिए पुलिस ने आर.एस.एस. मुख्यालय को बचाकर बहुत ही अच्छा काम किया और उनके उस काम की सभी लोगों ने सराहना की है. उनको सम्मानित भी किया गया है, यह बहुत अच्छी बात हुई है.

एक और बात की ओर मैं सदन का ध्यान दिलाना चाहूंगा कि पुलिस कर्मचारियों को पगार बहुत कम दिया जाता है. किसी भी वर्ग से आप उनकी तुलना करें, चाहे केन्द्रीय सरकार के कर्मचारियों से तुलना करें या प्राइवेट सेक्टर के कर्मचारियों से उनकी तुलना करें, हमें यही देखने को मिलेगा कि पुलिस कर्मचारियों को तनख्वाह बहुत कम दी जाती है. इस बारे में सरकार अवश्य ध्यान देगी, ऐसी मैं उम्मीद करता हूं.

एक बात मैं पुलिस इंटेलिजेंस विभाग के बारे में कहना चाहूंगा कि इंटेलिजेंस विभाग भी मजबूत करना बहुत आवश्यक है. केन्द्र सरकार से हमारे पुलिस कमिश्नर को जो फैक्स आता है उसकी जानकारी बाहर के लोगों को कैसे हो जाती है, यह एक चिंता का विषय है. इस बारे में इंक्वायरी होनी चाहिए. इस बात पर मैं ज्यादा जोर देना चाहूगा कि टेररिस्ट एक्टिविस्ट को किसी जाति या धर्म से जोड़कर नहीं देखना चाहिए. आज श्रीलंका में आतंकवाद है, कई अन्य देशों में आतंकवाद है. हम कह सकते हैं कि टेररिस्ट क्राइम आज ग्लोबल लेवल पर हो गया है. यदि हम किसी एक धर्म से टेररिज्म को जोड़कर देखें तो पाकिस्तान में तो टेररिज्म होना ही नहीं चाहिए. वहां पर एक धर्म के लोग अपने ही धर्म के लोगों को प्रार्थना के समय पर मार देते हैं. इसलिए मेरा अनुरोध है कि आतंकवाद को किसी एक धर्म या जाति से जोड़कर नहीं देखना चाहिए तथा यहां के आम नागरिकों में जो असुरक्षा की जो भावना है, वह दूर होनी चाहिए. आतंकवाद को दूर करने की जवाबदारी भारत सरकार और महाराष्ट्र सरकार की सामूहिक जवाबदारी है. इसके अलावा हम सभी को एक साथ मिलकर पुलिस का मनोबल बढ़ाना चाहिए. इसी अपील के साथ में अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

( इसके बाद श्री बोरले )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अजून 6-7 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर केव्हा सुरु करावयाचे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आपण 11 वाजता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुरु करावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी फक्त मुद्दे मांडून आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 259 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे. सभागृहामध्ये या विषयावर ब-याच वेळा चर्चा झ ालेली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपापली मते मांडलेली आहे. एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या जीवीताचे आणि संपत्तीचे रक्षण करण्याची, समाजामध्ये शांतता राखण्याची जबाबदारी गृह खात्याची आहे. ख-या अर्थाने महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये जर आपण रेश्यो काढला तर त्याप्रमाणात पोलिसांची संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे. परंतु पोलिसांची संख्या कमी आहे, ही बाब अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून स्पष्ट झालेली आहे. म्हणून पोलिसांची संख्या वाढविण्याचा विचार होणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना यासंदर्भात गृह विभागाची कोणती योजना आहे, हे सांगणे आवश्यक आहे. जसे आमच्या शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षकांना 4-8 वर्षांनी रिफ्रेशन कोर्स घ्यावा लागतो, प्रशिक्षण घ्यावे लागते त्याच धर्तीवर या खात्यामध्ये काम करणा-या अधिका-यांना, कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सभागृहामध्ये काम करतांना असे लक्षात येते की, अनेक गंभीर गुन्हयांच्याबाबतीत संबंधित गुन्हेगाराला अटक होते. परंतु पोलिसांनी 90 दिवसात चार्जसिट दाखल न केल्यामुळे गुन्हेगार सुटतात. म्हणून या निमित्ताने मी अशी विनंती करणार आहे की, आपण अशा अधिका-यांना तंबी द्यावी की कोणत्याही परिस्थितीमध्ये 90 दिवसाच्या आत चार्जसिट दाखल करुन घेतली पाहिजे. जो पोलीस अधिकारी चार्जशीट दाखल करण्यामध्ये कुचराई करेल त्या पोलीस अधिका-यावर कारवाई केल्याशिवाय गुन्हेगारांना शिक्षा होणार नाही. मध्यंतरी कानपूरमध्ये एक घटना घडली. त्यानंतर जे वातावरण या राज्यामध्ये निर्माण झाले विशेषत: उल्हासनगरमध्ये जे वातावरण निर्माण झाले त्याचा मी साक्षीदार आहे. कानपूरच्या घटनेचे पडसाद

....2.........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ D/ KTG/ प्रथम श्री.सोनावणे....... 10:35

श्री.रामनाथ मोते ........

उल्हासनगरमध्ये उमटले. उल्हासनगरमध्ये मराठी, सिंधी, हिंदू व इतर समाज बांधव राहतात. ही सर्व मंडळी तेथे आनंदाने, गुण्यागोविंदाने वास्तव्य करीत आहे. पण या घटनेचा फायदा घेऊन काही समाजकंटकांनी उल्हासनगरमध्ये मोठया प्रमाणात अतिरेक घडवून फार मोठे नुकसान केले. उल्हासनगरमध्ये स्वामी शांती महाराज चौक आहे. तेथे स्वामी शांती महाराजांचे मंदिर आहे. सभापती महोदय, मी कोणावरही आरोप करणार नाही. या समाजकंटकांनी ते मंदिर तोडण्याचा प्रयत्न केला. वातावरण शांत करण्यासाठी मी रात्री 3.00 वाजता पोलीस अधिका-यांबरोबर त्या चौकामध्ये उपस्थित होतो. अशा प्रकारे वातावरण अशांत करण्याचा प्रयत्न काही समाजकंटकांनी केलेला आहे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

अनेक ठिकाणी मंदिरे तोडण्यात आली. त्यामुळे गंभीर वातावरण निर्माण झाले. तेथील राजगिरी नावाची बेकरी जाळून टाकण्यात आली, शाळेचे फर्निचर जाळून टाकले, इतकेच नाही तर शाळे समोरील 4 गाड्या जाळून टाकल्या गेल्या. अशा प्रकारे दहशतवादी कृत्य उल्हासनगरमध्ये घडले. मी स्वत: प्रत्यक्ष तेथे उपस्थित होतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांनी सांगितले की, कोणी पोलीस अधिकारी तेथे नव्हते. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, तेथे मी स्वत: उपस्थित होतो, तसेच पोलीस कर्मचारी आणि अधिकारीदेखील होते व त्यांनी आम्हाला चांगले सहकार्य केले. तेथे मोठा पोलीस फोर्स होता. मंदिर तोडण्याची घटना घडल्यानंतर साहजिकच तेथील सिंधी आणि अन्य भाषिक लोकांकडून प्रतिक्रिया उमटली. पण तरीही तेथे शांतता निर्माण करण्याचे काम पोलिसांनी केले. मात्र समोर प्रत्यक्ष बेकरी जाळण्याचे, गाड्या जाळण्याचे काम चालू असताना त्यांचेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही, त्याबाबतीतही कार्यवाही होणे आवश्यक होते.

सभापती महोदय, आज हे जे एकंदर असुरक्षिततेचे वातावरण आहे ते आमच्या शिक्षण क्षेत्रातही आलेले आहे. आमच्या आश्रमशाळा किंवा अन्य शाळांमध्ये बलात्काराच्या, अत्याचाराच्या, लैंगिक शोषणाच्या घटना घडतात. त्याबाबतीत संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे. काही संस्था चालक राजकीय दबावाने संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अन्याय करीत असतात. भिवंडी येथील पिंपळास येथे एका संस्थेची शाळा आहे. तेथे आमचे काही शिक्षक हजर होण्यासाठी गेले असता त्यांना तेथील संस्था अध्यक्षांनी हजर करून घेतलेच नाही पण त्यांना अक्षरश: चपलेने चोपून काढले. तेव्हा अशा प्रकारे शिक्षण क्षेत्रामध्येही वातावरण बिघडलेले आहे. सभापती महोदय, दररोज आपण वर्तमानपत्रांतून बातम्या वाचतो की, अमुक ठिकाणी अमुक संख्येने स्फोटके सापडली. अगदी परवाच मुंब्रा येथे पुन्हा स्फोटके सापडली आहेत. तेव्हा अशा ज्या घटना आहेत त्यामुळे संपूर्ण वातावरण असुरक्षित झाल्याची भावना निर्माण होते तेव्हा शासनाकडून, पोलिसांकडून सुरक्षित वातावरण निर्माण होण्याची गरज आहे. सभापती महोदय, शेवटी मी एकच मुद्दा मांडतो. आमच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी औरंगाबाद येथे शांततामय मोर्चा काढला. त्यामध्ये शिक्षकेतर कर्मचारी मुख्यमंत्र्यांना, उपमुख्यमंत्र्यांना भेटू इच्छित होते. परंतु तेथे एवढे वातारवण बिघडले आणि अन्लॉफुल असेंब्ली म्हणून त्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली,

..... ओ 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

वेगवेगळे खटले दाखल झाले आहेत. वस्तुतः पूर्व परवानगी घेऊनच हा मोर्चा काढण्यात आलेला होता. परंतु तरीही त्यांच्यावर अशा प्रकारे कारवाई करण्यात आली आहे. तेव्हा या निमित्ताने मी आपल्याला विनंती करतो की, कायदा व सुव्यवस्था बिघडल्यासारखी तेथे स्थिती निर्माण झालेली नव्हती. तरीही आमच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर पोलीस कारवाई झाली आहे तेव्हा त्या संबंधातील गुन्हे आपण मागे घ्यावेत एवढी विनंती करतो आणि आपण मला वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

***

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....... ओ 3 ...

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात अंतिम आठवडा प्रस्तावाच्या रूपाने येथे जी चर्चा घडवून आणली जात आहे त्यामध्ये भाग घेऊन माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या प्रसंगी मी मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोलीस दलाचा जो अनुभव मला आलेला आहे आणि त्याचे कार्य मला पहावयास मिळाले आहे ते कथन करणार आहे त्याची माननीय गृहमंत्र्यांनी नोंद घ्यावी. सभापती महोदय, मालवणची पोटनिवडणूक बऱ्याच प्रमाणात गाजली. तेथे पोटनिवडणुकीच्या निमित्ताने प्रचारासाठी आलेले आमदार, खासदार, नगरसेवक, महिला कार्यकर्त्या यांना पोलिसांकडून मारहाण झालेली आहे. पोलीस फोर्स त्या भागात असतानाही पोलिसांच्या आशीर्वादाने ती पोटनिवडणूक लढविली गेली. त्याचे एक उत्तम उदाहरण मी येथे देईन. मालवण तालुक्यातील शिवसेना तालुका प्रमुख श्री. दाजी जावजी या पोटनिवडणुकीमध्ये सक्रीय भाग घेणार म्हणून त्याच्या घरामध्ये 25 लाख रूपये असल्याची खोटी खबर दिली गेली आणि तेथील पीएसआयने पहाटे 4 वाजता त्यांच्या घरावर धाड टाकली. घरामध्ये दाजी जावजी स्वत: उपस्थित नसतानाही प्रवेश केला. वस्तुत: पहाटे 4 वाजता धाड टाकण्याऐवजी सकाळी 6 वाजता जरी धाड टाकली गेली असती तरी ते 25 लाख रूपये कोठे जाणार नव्हते. पण तेवढा वेळही न थांबता पहाटे काळोखात 4 वाजता त्यांच्या घरावर धाड टाकली आणि स्वत: पीएसआयने एक रिव्हॉल्वर तेथे टाकले. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... पी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

आर्म्ड गुन्हयाखाली केस टाकून 90 दिवस झाले तरी अजून चार्जशीट केली गेलेली नाही. याचा अर्थ ती खोटी केस केली आहे हे सिध्द होते.

सभापती महोदय, मालवणच्या निवडणुकीमध्ये श्री. रमेश गोवेकर हे हरवले आहेत. त्याबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांना एक शिष्टमंडळ भेटले, त्यावेळी आपण सांगितले की, आपल्या काही अधिकाऱ्यांना ते जीवंत असल्याचे आढळले असून ते आठ दिवसात घरी येतील. त्यांच्या तपासाची सूत्रे सी.आय.डी. कडून सी.बी.आय. कडे सुपूर्द करण्यात आली. श्री. गोवेकर याची मातोश्री अंथरुणावर खिळून पडली आहे आणि आपला मुलगा कधी येईल याची वाट पहात आहे. याबाबत गृह खात्याकडून दखल घेतली जात नाही. पालक मंत्री तेथील एस.पी. ची अनेक वेळा पाठ थोपटतात. ज्याप्रमाणे आपण ताडदेव व ठाणे येथील विषारी दारुच्या प्रकारणामध्ये ज्यांचे बळी गेले. त्यानंतर कारवाई करुन आदेश दिले की, अशाप्रकारचे गुन्हे ज्या पोलीस अधिकाऱ्याच्या हद्दीमध्ये घडतील त्यांना निलंबित केले जाईल.परंतु मालवणच्या एस.पी. च्या हद्दीमध्ये 1 कोटी 9 लाख रुपयांची बनावट दारु, गावठी दारु सापडते. त्याबाबत 449 गुन्हे गोव्यामध्ये दाखल होतात आणि 345 गुन्हे आपल्याकडे दाखल होतात. एवढे गंभीर गुन्हे असतांना देखील त्याठिकाणी कोणत्याही अधिकाऱ्याला निलंबित केले जात नाही.एवढेच नव्हेतर पोलिसांकडून माझ्या सारख्या आमदारावर कोणताही गुन्हा नसतांना एका रस्त्यावर अडवून मला मारहाण केली जाते, माझ्यावर केस दाखल केली जाते. अशाप्रकारचे अनेक गुन्हे या एस.पी. च्या माध्यमातून केले जात आहेत. एवढेच नव्हेतर आबांच्या पक्षाचे श्री.संदेश पारकर हे नगराध्यक्ष आहेत .त्यांनाही पोलीस चौकीमध्ये मारहाण झाली. तरीसुध्दा आपल्या एस.पी. बद्दल चांगले बोलले जाते. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, कोणत्याही अधिकाऱ्याला मराठी बोलता आले पाहिजे. परंतु हे एस.पी. मराठी बोलत नाही. आमच्या मालवणी भाषेत बोलणाऱ्या ग्रामस्थांना त्यांच्याबरोबर मराठी बोलता येत नाही, ते लोकांशी हिंदीतून बोलतात, लोकांना त्यांचे हिंदी समजत नाही, त्याचा फायदा हे एस.पी. घेतात. अलिकडे अशी एक घटना घडली की, गोव्यावरुन एक गाडी भरधाव आली. त्या गाडीने तीन चेक पोस्ट पास केल्यानंतर ती उलटी झाली. त्यामुळे त्या गाडीत असलेले पावडरच्या स्वरुपातील द्रव्य बाहेर पडले. ही घटना मी स्वत: त्याठिकाणी जाऊन बघितली आहे. त्याठिक्णी 3-4 लाखाची गाडी रस्त्यावर टाकून आरोपी पळून जातात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर...

आरोपी पळून गेल्यानंतर पोलीस सांगतात की, त्या गाडीमध्ये मैदा होता. याचा अर्थ असा की, आता मैद्याची तस्करी व्हावयास लागली आहे. अशा अनेक प्रकारच्या गंभीर घटनांमुळे एस.पी. यांच्या विरुध्द लोकांच्या अनेक तक्रारी आहेत. आज सी.आर.पी.सी. च्या कलम 21 खाली विशेष कार्यकारी अधिकारी नेमले जातात. त्यांच्याकडे काही केसेस सोपविल्या जातात. त्यामध्ये दारुच्या अड्डयावर धाडी टाकणे आणि त्यासंबंधी गुन्हे दाखल करणे या गोष्टी कराव्या लागतात. गुन्हे दाखल करण्यासाठी हे लोक खूप लांबून येतात परंतु आपले अधिकारी त्यांच्यासाठी थांबत नाहीत. त्यांना दोन-दोन दिवसांच्या तारखा दिल्या जातात. या तारखा देत असतांना आपल्या यंत्रणेमार्फत काही गैरव्यवहाराच्या केसेस आपसात मिटविल्या जातात. अशाप्रकारे लोकांना त्रास देणाऱ्या या एस.पी. ची बदली होणार आहे की नाही? यासंबंधीची कारवाई आबा करणार आहेत की नाही? तेव्हा ती कारवाई याठिकाणी आपण कथन करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 259 अन्वये सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, गुन्हेगारीमध्ये पोलिसांचा सहभाग यावेळी वाढलेला आहे. या संदर्भाने मी एक-दोन उदाहरणे सांगणार आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांच्या जिल्ह्यातील जत तालुक्यातील एक कुटुंब पोलिसांनी उध्वस्त केलेले आहे. एका व्यक्तीचे घर जाळण्यात आले, त्यामध्ये त्याच्या कुटुंबातील पाच व्यक्ती जळून खाक झाल्या. घर जाळण्यामध्ये पोलिसांचा सहभाग होता. चौसाळा येथील धनगर समाजातील महिलेला मारहाण करुन तिची नग्न धिंड काढण्यात आली. मारहाण करणाऱ्यांच्या सोबतच पोलिसांनी ओली पार्टी केली. त्या महिलेला अजूनही न्याय मिळालेला नाही. या संदर्भात याच सदनामध्ये गृहराज्यमंत्री महोदयांनी या गुन्हेगारांवर कडक कारवाई करू, त्यांना दारूचे लायसन्स दिलेले असतील तर ते रद्द करू, असे सांगितले होते. माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यन्त या प्रकरणामध्ये कोणती कारवाई झालेली आहे ? या प्रकरणातील गुन्हेगार मोकाट सुटलेले आहेत. अत्याचार झालेली महिला गावात आपले तोंड लपवून गप्प बसलेली आहे. त्या महिलेचे पुनर्वसन करणार आहात काय ?

कोल्हापूर जिल्ह्यातील रूकडी येथे एक घटना घडली. रूकडी गाव राष्ट्रवादीच्या खासदार श्रीमती निवेदिता माने यांचे आहे. त्या गावातील सरपंचाच्या शेतामध्ये धनगराच्या दोन मेंढ्या शिरल्या म्हणून त्याला मारहाण केली. त्याने सांगितले की, माझ्यावर काय गुन्हा दाखल करायचा तो करा, काय हॅरॅशमेंट करायची असेल ती करा परंतु मला मारू नका. पण त्याला चौकात उभे करुन फटकावण्यात आले. धनगरांची संपूर्ण वस्ती उध्वस्त झाली, परंतु आजपर्यन्त त्यांना न्याय मिळाला नाही. अशीच घटना धुळे जिल्ह्यातील जैताले खुर्द या गावामध्ये घडली. तेथील सरपंचाच्या शेतामध्ये दोन मेंढ्या शिरल्या.त्याने पोलिसांना बोलावून तक्रार केली. त्या धनगराला उघडे करून मारण्यात आले. त्या ठिकाणी जो मोर्चा काढण्यात आला त्यावेळी पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. त्यामध्ये 60-70 लोक जखमी झाले. त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. पोलिसांच्या संपूर्ण कंपनीनेच रात्री 12 वाजता धनगरांच्या वस्तीवर हल्ला केला त्यामध्ये अडीचशे लोक जखमी झाली. अतिरेक्यांनी हल्ला केला, समजू शकतो. यामध्ये पोलिसांनी हल्ला केला तर जाब कोणाला विचारायचा ? असा प्रश्न आहे. कहार समाजाचे नेते श्री.कांतीलाल लखानिया हे आहेत. त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकश शेंडगे (पुढे सुरू.....

पत्नीवर बलात्कार झाला. त्यामध्ये पोलिसांचा सहभाग होता म्हणून मंत्री महोदय आपल्याला सागितले. त्यामध्ये पोलिसांना सस्पेंड करावे लागले. भटक्या विमुक्त जाती समाजाचे लोक महाराष्ट्रामध्ये आहेत. आता महाराष्ट्राचा बिहार होत आहे. गुन्ह्यांमध्ये पोलिसांचा सहभाग वाढत आहे. ही परिस्थिती बदलली नाही तर उद्याचा महाराष्ट्र कसा असेल, या महाराष्ट्रातील जनतेच्या जीविताचे रक्षण पोलिस कसे करणार हा सवाल आहे ? एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ KTG/

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 259 अन्वये माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. दलित बांधबांनी केलेल्या आंदोलनाच्या संबंधाने राज्यकर्त्यांनी ओबीसी संघटनेला समोर ठेवून त्यांच्यामार्फत आंदोलन केले. अशाप्रकारच्या घटना घडतात, तेव्हा आपण शांतता व सुव्यवस्था समितीच्या बैठका घेतो. शांतता समितीमध्ये प्रतिष्ठीत नागरीक असतात, सर्वपक्षीय लोक असतात. त्या बैठकीचे मिनिटस् लिहिले जातात. त्याबाबत आपण विचार करतो काय ? शांतता राखणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजून पोलिसांना सहकार्य करतो. गोंदियामध्ये आंदोलन झाले. त्यावेळेस एका व्यापाऱ्याच्या घरावरील काचा फोडल्या गेल्या. त्याचे एक लाख रुपयाचे नुकसान झाले. समाजाला कसा न्याय मिळेल ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

मी काल या ठिकाणी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. राज्य शासनाकडून त्याचे उत्तर मिळालेले नाही. देवरी येथे एका अल्पवयीन आदिवासी मुलीवर बलात्कार झाला. त्यासंबंधीचे निवेदन सुध्दा या ठिकाणी करण्यात आले नाही. ती मेडिकल हॉस्पिटलमध्ये भरती आहे. तिला कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. तिला औषधे मिळत नाहीत. त्यामुळे सरकारबद्दल आदिवासी समाजामध्ये उद्रेक निर्माण झाला तर हे आंदोलन पुन्हा पेटेल. मोरगावअर्जुनी येथील लोक आंदोलन करीत आहेत. मी त्यांना सांगितले की, तुम्ही आंदोलन करु नका, सरकार निश्चितपणे कारवाई करील.

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रामध्ये नक्षलवादी चळवळ आहे. कोणत्याही गावामध्ये शांतता व सुव्यवस्था नाही. मला माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, गावागावामध्ये जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना होमगार्डचे प्रशिक्षण द्यावे. आपल्याकडे होमगार्डची यंत्रणा आहे. त्यामध्ये आपण काही सुधारणा करुन गावातील लोकांना, गावातील युवतींना जर होमगार्डचे प्रशिक्षण दिले तर त्या होमगार्डच्या माध्यमातून निश्चितपणे गावाची सुरक्षिता ठेवता येऊ शकेल. पोलिसांची व्यवस्था केव्हा होईल हे सांगता येत नाही. आतापर्यंत आपण होमगार्डच्या माध्यमातून शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम राज्यामध्ये करीत आहोत. आपण या सूचनेप्रमाणे कार्यवाही केली तर तेथील बेरोजगारांना रोजगार मिळेल. त्यांना फार मोठा पगार दिला पाहिजे असे नाही. ज्याप्रमाणे होमगार्डस्ना भत्ता देतो त्याप्रमाणे काही व्यवस्था केली तर नक्षलवादी चळवळ असलेल्या चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तसेच आंध्र प्रदेशला लागून असलेल्या आपल्या राज्यातील भागामध्ये कायदा व सुव्यवस्था राखू शकतो. आज गावातील कोणत्याही माणसाला माझे जीवन सुरक्षित आहे याबद्दल विश्वास नाही. नक्षलवादी येतात, घरी बसतात, जेवण करतात आणि धाकदपटशा करतात की, बाहेर बोलू नका. कोणी खरे बोलावयास गेला तर निरपराध माणसांना जेलमध्ये टाकले जाते आणि त्यांच्यावर अन्याय केला जातो. मग कायदा व सुव्यवस्था कोठे आहे ? आपण रात्री 10.00 वाजल्यानंतर लाऊडस्पीकर वाजवण्यावर बंदी घातली. मग जुगाराचे अड्डे, सट्टा का बंद करीत नाही ? या ठिकाणी मोठ्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/ KTG/

श्री. केशवराव मानकर .....

प्रमाणावर सट्टा चालतो. त्या ठिकाणी घोळके जमा होतात. दररोज रात्री घरफोड्या होतात. चोरीचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राहात नाही. या सर्व बाबींच्या संदर्भात शासन अपयशी ठरलेले आहे. याबाबत शांततेने विचार करण्याची गरज आहे. शांतता व सुव्यवस्था ठेवावयाची असेल, शांतपणे आंदोलन करु द्यावयाचे असेल तर निश्चितपणे महाराष्ट्रामध्ये चांगले वातावरण निर्माण केले पाहिजे. बाकीचे जे मुद्दे आहेत त्याबाबत मी विवेचन करणार नाही. परंतु या सर्व मुद्यांवर विचार झाला पाहिजे. त्यादृष्टीने काळजी घेतली पाहिजे आणि जनतेला सुराज्यात जगू दिले पाहिजे तसेच शांतता व सुव्यवस्था ठेवली पाहिजे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/ KTG/

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी या अंतिम आठवडा प्रस्तावाव्दारे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी शासनाला निर्णय घेत असताना उपयुक्त ठरतील अशा अनेक चांगल्या सूचना केलेल्या आहेत आणि चांगल्या अपेक्षाही व्यक्त केलेल्या आहेत. काही अपवादात्मक गोष्टी सोडल्या तर राजकीय अभिनिवेश न ठेवता महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था चांगली राहिली पाहिजे हा सगळयांचाच आग्रह या चर्चेच्या निमित्ताने पुढे आला आहे. सभापती महोदय, देशभरातील अन्य राज्यांच्या तुलनेत तसेच जगभरातील अन्य देशांच्या तुलनेत, इतर राज्यांमधील गुन्हेगारी पाहिली तर सप्रमाण ही गोष्ट सिध्द करता येऊ शकते की, महाराष्ट्र निश्चितच अधिक सुरक्षित आहे. परंतु आकडेवारीने या गोष्टी सिध्द करुनही ज्या काही घटना घडल्या त्या सुध्दा घडल्या नसत्या तर अधिक चांगले झाले असते. ते घडू नये म्हणून निश्चित काही उपाययोजना करण्याची जरुरी शासनाला सुध्दा वाटते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 11:00

(श्री. आर.आर.पाटील...)

सभापती महोदय, आपण बघितले तर महाराष्ट्र राज्य हे देशाचे शक्तिस्थळ आहे. औद्योगिकीकरणाच्या बाबतीत आपले राज्य सगळयांच्या पुढे आहे. मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हटले जाते. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये मोलाची भर टाकण्याचे काम महाराष्ट्राकडून केले जाते. आज दहशतवादाच्या संदर्भात ज्या काही चर्चा झाल्या त्याचा उहापोह मी यापूर्वीही केलेला आहे. परंतु वेळोवेळी महाराष्ट्रालाच लक्ष्य का केले जाते हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. ज्या वेळी देशाला दुबळे करायचे असते, परकीय शक्ती जेव्हा हा मनसुबा ठरवून काम करायला लागतात त्यावेळी देशाच्या शक्तिस्थळावर हल्ला केला जातो, वर्मी घाव घातला जातो. बाम्बस्फोट कुठल्या तरी डोंगरावर जाऊन आवाज करण्यासाठी हे लोक करीत नाहीत. तर देशाच्या अर्थव्यवस्थेला हादरा द्यावा या अर्थाने मुंबईला लक्ष्य करण्यामध्ये परकीय यंत्रणा, दहशतवादी संघटना ह्या नेहमी कार्यरत राहिलेल्या आपणाला दिसून आलेले आहे. एका बाजूला देशाचे शक्तिस्थळ मुंबई उद्ध्वस्त करुन महाराष्ट्राला उद्ध्वस्त केले जात आहे तर दुस-या बाजूला माओवादी विचारसरणी जगामध्ये वाढविण्यासाठी त्यांची विचारधारा प्रयत्न करीत असताना सलग असलेला जंगल प्रदेश हा महाराष्ट्रामध्ये समाविष्ट आहे. एका बाजूला महाराष्ट्रातील पोलीस दलाला दहशतवाद्यांशी लढावे लागत आहे तर दुस-या बाजूला नक्षलवाद्यांशी लढावे लागत आहे.फार पूर्वीपासून संघटित गुन्हेगार जगाच्या कानाकोप-यात राहून त्यांनी मुंबई हीच आपली कर्मभूमी मानलेली आहे. त्यांचाही धोका अधूनमधून होताना दिसतोय. आज महाराष्ट्रातील पोलीस दलापुढचे आव्हान बघितले तर एका बाजूला दहशवाद्यांबरोबर, दुस-या बाजूला आतंकवाद्यांबरोबर आणि तिस-या बाजूला संघटित गुन्हेगारीबरोबर पोलीस सातत्याने संघर्ष करीत आहेत. त्यातच कधीकधी राजकारणातील गुन्हेगार जोरदार बनतात. राजकीय अभिनिवेशासाठी काही संघर्ष निर्माण करतात आणि तेथेही पोलिसांना उतरावे लागते. काही सामाजिक तर काही आर्थिक प्रश्न आहेत. जागतिकस्तरावर कापसाचे भाव पडत आहेत. जागतिकस्तरावरील परिणाम महाराष्ट्रावर होतोय, शेतक-यांच्या उद्रेक वाढतोय, त्याठिकाणी शांतता ठेवण्यासाठी पोलीस दलाला पुढे यावे लागत आहे. संपूर्ण देशामध्ये आरक्षणाच्या संदर्भात भूमिका घेतलेली आहे. पुरोगामित्वाची ती पावले आहेत. परंतु प्रतिक्रिया म्हणून दोन्ही बाजूंनी आंदोलने होत आहेत. तेथेही पोलीस मध्ये येत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

आहेत. आज दोष समाजाचा आणि अर्थकारणाचा असला तरी दोन्ही बाजूंनी झटके मात्र पोलीस दलाला सहन करावे लागत आहेत. ही सर्व आव्हाने असताना सुध्दा अत्यंत शिताफिने आणि अहोरात्रपणे पोलीस दल काम करीत आहे. त्यांच्या चुकांचे समर्थन मी कधीच करणार नाही. पण जे काही चांगले करण्याचा प्रयत्न करतात त्यांनाच आपल्या चर्चेतून डिमॉरलाईज केले जाता कामा नये. अनेक सन्माननीय सदस्यांनी पोलीस दलातील आधुनिक तंत्रज्ञानाबदल आणि पोलिसांच्या संख्येबद्दलचे प्रश्न उपस्थित केले. एखादा प्रसंग घडला, बॉम्बस्फोट घडला की आम्हाला आमच्या गुप्तचर संघटनेची आठवण होते, एखादे आंदोलन भडकले की पोलिसांच्या संख्येबद्दलचे प्रश्न आम्हाला सतावतात. पण एरव्ही आम्हाला आमचे इरिगेशन प्रोजेक्ट महत्वचाचे वाटतात, राज्याचे औद्योगिकीकरण महत्वाचे वाटते, त्याच प्रमाणे रस्ते, आरोग्य, शिक्षण या गोष्टी महत्वाच्या वाटतात. मी हे मान्य करतो की, विकासाच्या दृष्टीने ह्या गोष्टी महत्वाच्या आहेतही. परंतु सर्वसाधारण वातावरणामध्ये पोलीस दलाच्या बजेट बद्दल कधीही चर्चा होत नाही. गृह खात्यावर चर्चा होते त्यावेळी पहिल्यांदा पोलिसांना टारगेट केले जाते. त्यातूनही जागा नसेल तर गृहमंत्र्यांना टारगेट केले जाते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ D/ 11:05

श्री.आर.आर.पाटील....

पण आज सन्माननीय सदनाने पोलीस दलाच्या बजेटबद्दल, पोलीस दलाच्या संख्येबद्दल, पोलीस दलाच्या ट्रेनिंगबद्दल अनेक चांगल्या पध्दतीच्या सूचना केलेल्या आहेत. सभापती महोदय, राज्यामधील वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, वाढते शहरीकरण या सगळयातून निर्माण झालेले प्रश्न वाढत असताना त्या तुलनेत पोलिसांची संख्या मात्र वाढलेली नाही. आज आपल्या देशातील जर सगळया राज्यांचा सरासरी खर्च पाहिला तर देशातील प्रत्येक राज्ये आपल्या बजेटच्या 5.3 टक्के खर्च हा अंतर्गत सुरक्षिततेसाठी करतात. गरीबातील गरीब राज्ये सुध्दा आपल्या प्लॅनिंगच्या 5.3 टक्के खर्च करतात आणि मी प्रांजळपणाने ही गोष्ट कबूल करतो, आताच नव्हे तर मागील कित्येक वर्षात अंतर्गत सुरक्षिततेच्या बाबतीत आमचे नक्कीच दुर्लक्ष झाले. राज्य बदलले तरी सुध्दा दुर्लक्ष होते आणि आजअखेर दुर्लक्ष सुरुच आहे असे म्हटले तरी सुध्दा चुकीचे ठरु नये. राष्ट्रीय सरासरी 5.3 टक्के आहे आणि महाराष्ट्राचा खर्च 3.7 टक्के आहे. ज्या राज्यांना नक्षलवाद्यांचा, अतिरेक्यांचा धोका नाही, संघटित गुन्हेगारीचा धोका नाही ती राज्ये सुध्दा महाराष्ट्रापेक्षा अधिकचा खर्च करतात आणि हे सगळे धोके असून आमचा खर्च मात्र राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे.

सभापती महोदय, मी सदनाला सुरुवातीलाच सांगू इच्छितो, येणा-या बजेटपासून टप्प्याटप्प्याने अंतर्गत सुरक्षिततेवरील आमचा खर्च राष्ट्रीय सरासरीपर्यंत आणण्यासाठी आमचे शासन प्रयत्न करील आणि मी त्यादृष्टीने प्रयत्नाला सुरुवात केली आहे. एक तर आमचा सुरक्षिततेवरचा खर्च वाढता पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे पोलिसांची संख्या वाढविणे. अत्यंत अभ्यासू पध्दतीने चिकित्सा करणाऱ्या, विश्लेषण करणाऱ्या मॅकेन्झी कंपनीकडून सर्वेक्षण करुन घेतले आणि काही धक्कादायक माहिती पुढे आली. 70 टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना 3 महिन्याच्या काळात एकही सुट्टी मिळत नाही, रजा मिळत नाही. सगळ्या पोलीस दलाला सरासरी रोज 14 तास डयुटी करावी लागते. सभापती महोदय, कल्पना करा, रोज 14 तास डयुटी आणि 3 महिने एकही सुट्टी नाही आणि मानसिक संतुलन कायम ठेवून त्यांच्याकडून आम्ही चांगल्या सेवेची अपेक्षा करतो. ही गोष्ट खरी आहे, चांगले पगार नाहीत, चांगल्या निवासाची व्यवस्था नाही. आता कुठे आरोग्याच्या व्यवस्था थोडयाफार प्रमाणात उपलब्ध केल्या आहेत. परंतु अनेक अडचणींना तोंड देऊन या दलाचे जवान चांगले काम करतात. कुठेतरी एखादा मोरे चुकतो म्हणून सगळे पोलीस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ D/ 11:05

श्री.आर.आर.पाटील.......

दल महिलांचे संरक्षण करण्यास अपात्र आहे असा निष्कर्ष काढता उपयोगाचे नाही. नक्षलवाद्यांच्या विरोधात लढताना अनेकांनी प्राणाची आहुती दिली. गेल्या वर्षभरातील घटना पाहिल्या तर चार पोलिसांना मृत्यू पत्करावा लागला, शहीद व्हावे लागले. त्याचबरोबर 23 नक्षलवाद्यांचे प्राण घेण्यात, 80 जणांना शरण आणण्यात आणि 16 जणांना जिवंत पकडण्यात देशभरातील कोणत्याही पोलीस दलापेक्षा सगळयात चांगले यश कोणत्या पोलीस दलाला मिळाले असेल? मला अभिमान वाटतो, महाराष्ट्राच्या पोलीस दलाचा. नक्षलवाद्यांच्या विरोधात अत्यंत चांगली कामगिरी महाराष्ट्राच्या पोलीस दलाने करुन दाखविली आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या मी लक्षात आणून देतो. ही गोष्ट खरी आहे, श्री.नरेंद्र मोदी साहेबांनी पाठविलेले बक्षिस अद्याप पोलिसांपर्यंत पोहोचलेले नाही. मी मागे देखील उल्लेख केला. देशातील कोणत्या पोलिसांच्या भाग्यात ही गोष्ट आहे. शेजारच्या आंधप्रदेश राज्याने 10 लाख रुपयांचे बक्षिस माझ्या हातावर ठेवले आणि सांगितले, तुमच्या पोलिसांना द्या. परंतु शेजारच्या गुजराथ राज्याने 10 लाख रुपयांचे बक्षिस राज्य सरकारकडे पाठविले. हे तुमच्या पोलीस दलाला द्या. महाराष्ट्रातील पोलीस दलाबद्दल टीकाटीप्पणी करीत असताना श्री.फुंडकर साहेबांच्या गुजराथ शासनाने महाराष्ट्राच्या पोलीस दलाचे शाब्दिक नव्हे तर 10 लाख रुपये देऊन कौतुक केले आणि पाकिस्तानमध्ये असलेला एक डाव नागपूरच्या भूमीत महाराष्ट्राच्या पोलीस दलाने उधळून लावला. महाराष्ट्राच्या पोलीस दलाकडे गुजराथचे मुख्यमंत्री ज्या दृष्टीने बघतात त्या दृष्टीने सन्माननीय श्री.फुंडकर साहेब, आपण सुध्दा बघा, एवढीच कळकळीची विनंती या निमित्ताने करतो. देशभरातील सगळयात मोठा दरोडा हैद्राबादला पडला.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, त्या घटनेशी महाराष्ट्र पोलीस दलाचा काही एक संबंध नव्हता परंतु या घटनेच्या संदर्भातील माहिती जेव्हा टी.व्ही. वर महाराष्ट्रातील क्राईम ब्रँचच्या जवानाने बघितली आणि अशाच प्रकारची घटना 9 वर्षापूर्वी झाल्याचे त्याला आठवले. लगेच हा जवान पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि अशाच प्रकारची चोरी झाल्याची मागील 9 वर्षाची फाईल उघडली, आरोपीचा शोध घेतला आणि 72 तासाच्या आत 6.5 कोटी रुपयांच्या मुद्देमालासह चोराला पकडण्यात आले. हैद्राबाद येथे घडलेल्या घटनेच्या संदर्भात महाराष्ट्र पोलिसांचा तसा काही एक संबंध नव्हता परंतु त्या चोरीचा शोध घेण्याचे काम महाराष्ट्राच्या पोलीस दलाने केलेले आहे. गुन्हे कोठेही घडत असले तरी त्याचा शोध घेतला गेला पाहिजे ही भावना महाराष्ट्रातील बहाद्दूर पोलीस दलाची आहे. मुंबईतील लोकल गाडयांमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्याला कोणीही नाकारु शकत नाही, मालेगाव मध्ये जो बॉम्बस्फोट झाला त्याला देखील कोणीही नाकारु शकत नाही. मुंबईतील बॉम्बस्फोटाचा तपास मुंबईच्या पोलिसांनी कसा केला हे बघावयास स्कॉटलंडचे पोलीस आले होते, इतर देशाचे पोलीस आले होते. या बॉम्बस्फोटाच्या संदर्भातील केसचा मुंबई पोलिसांनी जो शोध घेतलेला, जो छडा लावलेला आहे तो छडा जगातील पोलिसांना मार्गदर्शक ठरलेला आहे अशा प्रकारची भावना जगातील अनेक देशांनी व्यक्त केलेली आहे. त्यामुळे आमच्या पोलीस दलाच्या उत्कृष्ट कामगिरीचे अजून आपल्याला कोणते सर्टिफिकेट हवे आहे? महाराष्ट्र पोलीस दलाला शेजारच्या राज्याने चांगले म्हटलेले आहे, जगातील देश महाराष्ट्र पोलीस दलाला चांगले म्हणून कौतुक करीत आहेत. पोलीस दलामध्ये काही उणिवा, काही त्रुटी नाहीत असे मी म्हणत नाही. त्यामुळे आम्ही पोलीस दल अजून सक्षम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आता गुन्हेगार नव्या आयडीया लढवून स्फोट घडवून आणीत आहेत. एखादा स्फोट झाला म्हणून "महाराष्ट्र गवताच्या गंजीवर उभा आहे" असे म्हणणे, निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. आज जगभरातील कोणतेही राष्ट्र सुरक्षीत राहिलेले नाही. जगात सर्वात भक्कम सुरक्षेची फळी असलेल्या अमेरिकेतील जुळे टॉवर आतंकवाद्यानी उडवल्याची घटना आपल्याला माहितीच आहे. जगामध्ये स्कॉटलँड यार्डच्या पोलीस दलाचे नाव आघाडीवर आहे असे असतांनाही लंडनच्या रेल्वेमध्ये स्फोट घडलेले आहेत. एका बाजूने दंडुका आणि मनगटाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलाला काम करावे लागत आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

ज्यावेळेस लंडनच्या रेल्वेत स्फोट झाले त्यावेळेस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी 1350 कोटी रुपये खर्च करुन सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आणि एका बाजूला आपल्या लोकल गाडयामध्ये बॉम्बस्फोट झाले त्यामुळे रेल्वेस्टेशनवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी 50 लाख रुपये महाराष्ट्र शासनाने खर्च करावयाचा की, रेल्वेने खर्च करावयाचा याबाबत चर्चा झाली परंतु आता 50 लक्ष रुपयांचे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची जबाबदारी रेल्वेने स्वीकारलेली आहे. ज्या ठिकाणी पोलिसांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध असतांना बॉम्बस्फोट होत आहेत. असे असतांना आपल्या महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाची राजवट असतांना पोलिसांना जास्त सोयी सुविधा दिल्या पाहिजेत याचा विचार केला गेलेला नाही. परंतु पोलिसांना सोयी सुविधा देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. महाराष्ट्र पोलीस दलाला आता सक्षम करण्याची वेळ आलेली आहे. सभापती महोदय, एका बाजूला व्हाईट कॉलर गुन्हेगार सायबर क्राईम करीत आहेत. एका प्रकरणात आपल्या देशातून, पुणे शहरातून अमेरिकेच्या खात्यातून आपल्या खात्यावर इंटरनेट द्वारे एक व्यक्ती पैसे काढत होती .ही गोष्ट जेव्हा पुण्याच्या पोलिसांना समजली तेव्हा त्यांनी या प्रकरणाच्या संदर्भात शोध घेऊन व्हाईट कॉलर गुन्हेगाराला अटक केली. सभापती महोदय, महाराष्ट्र पोलीस दलाची संख्या देखील वाढवण्याची नितांत आवश्यकता आहे. आता महाराष्ट्र पोलिसांची जबाबदारी वाढलेली आहे. एका बाजूला लोकप्रतिनिधींना पोलीस सरंक्षण द्यावे लागत आहे, एका बाजूला मोर्चे, आंदोलने निघत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी, नियंत्रण ठेवण्याचे काम पोलीस दलाला करावे लागत आहे. परंतु यासंदर्भातील विचार शासनाने तब्बल दोन वर्षापूर्वीच केलेला होता.

यानंतर श्री. अजित.......

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

पोलिसांना किमान आठ तासांची डयुटी असावी,त्यांना आठवड्यातून एखादी सुट्टी असावी म्हणून त्यांच्या कामांचे योग्य पध्दतीने नियोजन करुन आवश्यक असणारी पोलीस भरती करावी अशा पध्दतीचे धोरण राज्य सरकारने स्वीकारलेले आहे. पोलिसांच्या कामाचे योग्य पध्दतीने नियोजन व्हावे यासाठी ज्या विविध समित्या गठीत करण्यात आल्या होत्या, त्या समित्यांच्या रिपोर्टप्रमाणे अजून 55 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. ही सर्व पदे एकाच वेळी भरली तर त्यांना ट्रेनिंग देण्यास अडचण निर्माण होईल तसेच त्यांच्या प्रमोशनबाबत देखील प्रश्न निर्माण होतील, म्हणून टप्प्याटप्प्याने भरती करणे आवश्यक आहे. आतापर्यंत एका वर्षात जास्तीत जास्त 3500 उमेदवारांची पोलिसात भरती केली जात होती. गेल्यावर्षी जवळ जवळ 14 हजार उमेदवारांची भरती करण्यात आलेली आहे. त्यापैकी 11 हजार उमेदवारांची अतिरिक्त पोलीस म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे तर नियमाप्रमाणे रिक्त होणारी पदे भरण्यासाठी 3 हजार उमेदवारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अजून 55 हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात 11 हजार पदे भरण्यात आलेली आहेत. पुढच्या वर्षी 11 हजार पदे भरण्यात येतील. दर वर्षी टप्प्याटप्प्याने अशी भरती करण्यात येणार आहे. याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी पोलिसांची पदे भरण्यात यावीत अशा सूचना केल्या. याबाबत मी उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, पोलिसांच्या घरांच्या दुरुस्तीबाबत तसेच पोलिसांना नवीन घरे बांधून देण्यासाठी चांगली तरतूद करण्यात आलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे अनेक ठिकाणी पोलिसांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल त्यांच्या क्षमतेत आणखी वाढ होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिलेले आहे. असे पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या उमेदीने काम करीत आहेत.

सभापती महोदय, शेवटी पोलीस हा समाज व्यवस्थेतून आलेला असतो. त्यामुळे पोलीस दलात सुध्दा काही व्यसनी अधिकारी - कर्मचारी आहेत. ते गंभीर चूका करतात. गेल्या दोन वर्षात डी.जी.लेव्हलपासून पोलीस कॉन्स्टेबलपर्यंत ज्यांच्याकडून चुका झालेल्या आहेत त्यांना राज्य सरकारने पाठीशी घातलेले नाही. आय.पी.एस. अधिकारी ते कॉन्स्टेबलपर्यंत जे चुकले त्यांना एक

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

तर निलंबित करण्याची भूमिका घेतली गेली किंवा घटनेच्या कलम 311 नुसार सेवेतून कायम स्वरुपी काढून टाकण्यात आले आहे. राज्य सरकारने कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रयत्न केलेला नाही. जे योग्य पध्दतीने काम करीत आहे त्यांच्या पाठिशी उभे राहण्याची भूमिका सरकारने घेतलेली आहे. भविष्यातसुध्दा हीच नीती अवलंबिली जाईल. एखादा पोलीस अधिकारी चांगले काम करीत असताना त्याच्या हातून एखादी चूक झाली तर त्याचा हेतू लक्षात घेऊन ती पोटात घालण्याची भूमिका सरकारने स्वीकारलेली आहे आणि असे करणे काळाची गरज आहे. परंतु जर कोणी जाणूनबुजून चूका करीत असतील तर त्यांना सरकार कधीही पाठिशी घालणार नाही.

सभापती महोदय, काहीही घडले तरी प्रथम पोलिसांना आरोपिच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. त्यांच्यावर सर्व स्तरातून टीका केली जाते. याठिकाणी भुसावळ येथील घटनेचा तीन सदस्यांनी उल्लेख केला. वाईट गोष्टींचे मी समर्थन करीत नाही आणि करणारही नाही. मी खालच्या सभागृहात देखील सांगितले की, कोणावरही टीका करीत असताना, समोरच्याकडे बोट दाखवीत असताना उरलेली चार बोटे आपल्याकडे वळलेली असतात याचे भान ठेवावे. भुसावळ येथील व्यक्तीला राजकारणात कोणी आणले याचा प्रथम विचार करावा. त्यास नगराध्यक्ष कोणी केला हेही आठवावे. ती व्यक्ती आपल्याकडे नगराध्यक्ष होती तोपर्यंत आपल्याला त्याच्यातील दोष दिसले नाहीत. आता अचानकपणे त्या व्यक्तीतील दोष दिसू लागले. खालच्या सभागृहातील सदस्य श्री.सुरेशदादा जैन यांनी देखील टीका केली होती. मी उत्तर देताना सांगितले की, सर्वप्रथम तुम्हीच त्या व्यक्तीला विधानसभेचे तिकिट द्यावे म्हणून माझ्याकडे घेऊन आला होता. त्या व्यक्तीला तिकिट द्यावे म्हणून त्याचे समर्थन केले, त्यास नगराध्यक्ष केले. त्याच्यावर अलिकडच्या काळात फारसे गुन्हे नाहीत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, या सर्व प्रकरणाची आय.जी.स्तरावर चौकशी केली जाणार आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ D/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 11:20

श्री.आर.आर.पाटील...

कोणी चुकत असेल तर त्याबाबतीत पोलीस स्टेशनमध्ये न्याय मागता येईल. पोलीस स्टेशनमध्ये न्याय मिळाला नाही तर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे न्याय मागता येईल. मी या सदनाला विश्वास देऊ इच्छितो की, गुन्हेगार कुठल्याही पक्षाचा असला तरी, तो माझ्या पक्षाचा असला तरीसुध्दा त्याला समर्थन देण्याची भूमिका स्वीकारली जाणार नाही. परंतु कोणीतरी त्याला आपणच गुन्हेगार ठरवायचे आणि त्याची मालमत्ता पेटवून आपणच पोलीस बनायचे, हे योग्य नाही. यातून सामाजिक स्वारस्य बिघडत असते. अशाप्रकारे कोणाला तरी गुन्हेगार ठरवून त्याचे घर पेटवायचे, त्याची मालमत्ता पेटविण्याचे अधिकार कोणाला कसे प्राप्त होऊ शकतात ? कायद्यावर विश्वास असताना माणसाने या गोष्टी केल्या नसल्या तर अधिक चांगले झाले असते. वरिष्ठ पोलीस अधिकारीच या घटनेचा तपास करणार आहेत. याबाबतीत शासनाची स्पष्ट भूमिका आहे की, कुठल्याही गुन्हेगाराला पाठीशी घातले जाणार नाही. काहीवेळा पोलिसांनी गोळीबार केला म्हणून त्यांना अतिरेकी ठरवणे, योग्य नाही. माननीय फुंडकर साहेब, आपणही वणीला गेला होतात, मीही वणीला गेलो होतो. त्यासंदर्भातील काही नांवे पोलिसांकडे आहेत. त्याठिकाणच्या व्हीडीओ टेपमध्ये काही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते स्पष्ट दिसत आहेत. त्याची एक प्रत मी आपल्याकडे पाठवतो. एका बाजूला शेतकरी असंतुष्ट असल्यामुळे आम्ही त्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहोत. कापसाच्या बाबतीत काही अतिरिक्त देण्यासंबंधीची भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. याबाबतीत कालच मंत्रिमंडळामध्ये निर्णय झालेला असून त्यासंबंधीची घोषणा आज होईलच. त्याठिकाणी सी.सी.आय. ही दिल्लीची यंत्रणा कापूस खरेदी करीत होती. त्याठिकाणी योग्य पध्दतीने खरेदी झालेली नाही, या मताशी मी सहमत आहे. त्याठिकाणी शेतकऱ्यांच्या हालअपेष्ठा होत होत्या. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एका निरपराध शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्याठिकाणी पुरेसे मनुष्यबळ असते तर असे झाले नसते. अशावेळी गोळया नेम धरुन मारता येत नाहीत. प्रथम हवेत गोळीबार केला जातो, परंतु चुकून एखादी गोळी लागून एका निरपराध माणसाला मरावे लागले. याबाबतची मॅजेस्टीककडून चौकशी होणारच आहे. त्यामध्ये कोणता पोलीस दोषी असेल तर त्यांवर कारवाई होईलच. परंतु आज पोलिसांच्या हातामध्ये बंदुका देऊन गोळया झाडण्याची स्थिती राज्यामध्ये आहे का ? गेल्या दोन वर्षाची आकडेवारी पाहिली तर कमीत कमी फायरिंग व कमीत कमी गोळीबार करण्याची दक्षता पोलिसांनी घेतलेली

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

आहे. आंदोलने ठरवून, सांगून केली तर त्याठिकाणी आपल्याला जास्तीचे पोलीस बळ, पाण्याचे फवारे किंवा अन्य यंत्रणा उभी करता आली असती. परंतु अचानकपणे आंदोलन झाले तर त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या मनुष्य बळातूनच पोलिसांना काम करावे लागते. याबाबतीतील टेप मी माननीय फुंडकर साहेबांना देणारच आहे. त्यातून त्यांच्या लक्षात येईल की, वर अडकलेल्या 14 जणांना कसे जाळून मारण्याचा प्रयत्न केला. त्याठिकाणी मोठयाप्रमाणात दगडफेक झालेली आहे. ज्यांचा शेतीशी सुतराम संबंध नाही असे काही एलिमेंटस् त्यामध्ये घुसलेले आहेत. त्यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनातध्ये घुसून तशा प्रकारचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये अनेकांचे अनेक हेतू असू शकतात. काही जबाबदाऱ्या पार पाडत असताना नकळतपणे डूक ठेऊन राहिलेले शत्रू अशा प्रसंगी हात साफ करण्याची शक्यता असते. म्हणून आंदोनल करतानासुध्दा, आंदोलन जर गांधीजींच्या मार्गाने शांततेने झाले तर पोलीस दलाला अतिरिक्त बळाचा वापर करावा लागणार नाही. परंतु अशाप्रकारे कुठे जर अनावश्यक वापर झाला असेलतर त्याबाबतत निश्चितपणे दुरुस्त्या करण्याची शासनाची भूमिका राहणार आहे. राज्यातील 10 कोटी जनतेला बंदुकीच्या धाकावर ठेवले जाऊ शकत नाही. सामंजस्याच्या वातावरणामध्येच शांतता टीकून राहू शकते. पोलिसांच्या हातामध्ये आंदोलने दडपण्यासाठी हत्यारे दिलेली नाही तर नक्षलवादी ठेसण्यासाठी, अतिरेक्यांना टीपण्यासाठीच आपण हत्यारे दिलेली आहेत. या गोष्टीची पुरेपूर जाणीव व कल्पना माझ्या पोलीस दलाला आहे. आपल्या राज्यातील पोलीस दल पाहिले तर 95 टक्के पोलीस कर्मचारी हे थेट शेतकऱ्यांच्या कुटुंबातून आलेले आहेत. त्यांना आपल्या शेतकरी बांधवांवर गोळीबार कसा करावा वाटेल ?

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...............

परंतु, कर्तव्य भावनेने काही वेळा काम करावे लागते. चुकीचे एलिमेंटस् घुसले तर नाईलाजाने एखादी कृती करावी लागते, ही शासनाची अडचण समजून घेतली पाहिजे.

सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणाचा उल्लेख या ठिकाणी झाला. राज्याच्या दृष्टीने अतिशय दुर्देवी घटना घडली, ही घटना घडावयास नको होती. काही पोलीस कर्मचा-यांनी चुक केली म्हणून सुरुवातीलाच त्यांच्यावर कठोर कारवाई केली आहे. माझा विश्वास आहे की, ज्या पध्दतीने सी.बी.आय.तपास सुरु आहे आणि महाराष्ट्र पोलीस दलाने पुरावे गोळा केले आहेत ते आरोपींना फासावर लटकवण्याएवढे मजबूत आहेत आणि हे गुन्हेगार फासावर लटकाविले जातील. या घटनेची प्रतिक्रिया म्हणून आंदोलन होणे स्वाभाविक आहे, ही गोष्ट देखील माझ्या लक्षात आली आहे. नेहमी आंदोलने राजकीय कार्यकर्त्यांकडून केली जातात. यावेळी झालेले आंदोलन हे उत्स्फुर्त होते, त्यामध्ये शिकलेल्या मुलांचा, विद्यार्थ्यांचा सहभाग होता, मोठया प्रमाणात महिला उतरल्या होत्या आणि नेहमीप्रमाणे अनेक आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. जे गुन्हेगार नाहीत, स्वाभाविक आंदोलन करण्यासाठी आले होते अशा आंदोलकांवर दाखल झालेल्या गुन्हयांकडे वेगळया दृष्टीने बघितले जाईल आणि त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी ही सहानुभूतिची राहील. परंतु, जे गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी वेगळी राहील. एकंदरीत वातावरण आता शांततेचे झाले आहे.

सभापती महोदय, राज्याचा इतिहास बघितला तर निवडणुकीच्या तोंडावर छोटया छोटया घटनांना राजकीय अर्थ प्राप्त होतात आणि राज्यामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण होते. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होईपर्यन्त असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे या गोष्टीची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. अशा परिस्थितीमध्ये वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न केला तर वातावरण शांत ठेवण्यासाठी जी उपाययोजना करणे आवश्यक आहे ती केली जाईल.

सभापती महोदय, मागील काळात गुजराथचे मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी यांची सभा मुंबईमध्ये ठेवली होती. त्यावर अबु आझमी यांनी प्रतिक्रिया दिली की, जर नरेंद्र मोदी मुंबईमध्ये आले तर 20 कोटी मुसलमान रस्त्यावर उतरतील. जणुकाही 20 कोटी मुसलमान त्यांच्या खिशात आहेत. दुस-या बाजुने सांगितले गेले, सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांनी केलेले भाषण वाचून बघावे,

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.............

त्यामधून अशी प्रतिक्रिया आली की, 20 कोटी मुसलमान रस्त्यावर उतरले तर या बाजूने 80 कोटी लोक रस्त्यावर उतरतील. 20 कोटी मुसलमान रस्त्यावर उतरणार म्हणून कारवाई करण्याची मागणी करण्यात येते मग 80 कोटी लोक रस्त्यावर उतरणार असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यास आपण परवानगी देणार काय ? राजकीय अभिनिवेशातून अनेक वेळा भाषणे केली जातात. माझ्या विभागापुढे टेन्स होता, त्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या 4 बैठका घेतल्या. खूप बंदोबस्त ठेवला गेला. स्टेट इंटेलिजन्समध्ये काम करणारा अधिकारी मला हसत सांगत होता, की सर्व शांततेत पार पडेल. नरेंद्र मोदींचे 80 कोटी लोक येणार होते आणि अबु आझमींचे 20 कोटी लोक येणार होते. मला फोन आला की, भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये चिंता आहे की, षण्मुखानंद हॉल कसा भरेल ? हा हॉल भरण्यासाठी बाहेरुन माणसे मागवावी लागतील काय ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तुमची इतकी टीका मी शांतपणे ऐकून घेतली आता दुस-याने केलेली टीकादेखील ऐकून घेतली पाहिजे, मी वस्तुस्थिती सांगत आहे. त्या दिवशी षण्मुखानंद हॉल भरण्यासाठी ठाण्यातून, पुण्यातून माणसांना पाचारण करण्यात आले आणि 80 कोटीची भाषा करणा-यांचे लोक षण्मुखानंद हॉलमध्ये मावले. माझ्याकडे फोटोग्राफ्स आहेत, षण्मुखानंदची गॅलरीदेखील रिकामी होती.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी माननीय गृहमंत्र्यांच्या सूचनेवरुन आम्हाला विनंती केली होती की, श्री.नरेंद्र मोदींची सभा षण्मुखानंद हॉलमध्ये घ्यावी आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून आम्ही ही विनंती मान्य केली होती.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्या विनंतीला मान देऊन गॅलरी रिकामी राहिली असेल तर त्यांचा मी आभारी आहे. श्री.नरेंद्र मोदी येणार असल्यामुळे अबु आझमींचे 20 कोटी लोक आले तर काय करावयाचे ? हा देखील प्रश्न होता. बंदोबस्त जोरात होता. माझ्या पोलीस अधिका-याचा फोन आला की, सगळया आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेत आहोत.

यानंतर श्री.गागरे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGS/ KGS/ MHM/ यापूर्वी श्री. गागरे.... 11:35

श्री. आर.आर.पाटील... ( पुढे सुरु )

मुंबई मध्येही अनेक ठिकाणी पोलीस स्टेशन नाहीत. ज्यावेळी आपली सत्ता होती त्यावेळी कधी पोलीस स्टेशन बांधावयाची आपल्याला आठवण झाली नाही. आज मात्र राजकारणासाठी पोलीस स्टेशन बांधण्यासाठी आग्रही भूमिका घेतली जाते. तणाव निर्माण झाला तर ते योग्य नाही होणार नाही. सभापती महोदय, जे जनरल स्वरुपाचे प्रश्न उपस्थित केले होते त्याला मी उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच अन्य सूचना आणि अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत त्यांना मी लेखी उत्तरे देईन. माझे विचार शांतपणे ऐकून घेतल्याबद्दल धन्यवाद.

-------

Z-2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Z-2

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेते ) : सभापती महोदय, काल अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा झाली. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयावर अनेक प्रश्न उपस्थित केले. मला असे वाटत होते की, माननीय श्री. आर.आर.पाटील हे उपस्थित केलेल्या प्रश्नांना नीट उत्तरे देऊन सभागृहाचे समाधान करतील असे वाटले होते पण माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी मूळ मुद्याला हात घातला नाही त्यानी नेहमीप्रमाणे राजकीय भाषण केले. मला माननीय श्री. आर.आर.पाटील यांच्याबद्दल आदर आहे. प्रबळ इच्छाशक्ती ठेऊन महाराष्ट्राच्या पोलीस खात्याला सक्षम बनविण्याची त्यांची इच्छा आहे. परंतु परिस्थिती त्यांना सहकार्य करीत नाही. माननीय श्री. आर.आर.पाटील, गृहमंत्री झ ााल्यापासून या महाराष्ट्राचे एकंदर वातावरण चांगले होण्याऐवजी रोज महाराष्ट्रामध्ये काही ना काही घटना घडत आहे. काल या सभागृहात चर्चा झाली. परंतु ज्या पध्दतीने त्यांच्याकडून उत्तरे येणे अपेक्षित होते त्या पध्दतीने त्यांच्याकडून उत्तरे आली नाहीत. राज्यातील मुंबई मधील बॉम्बस्फोटासंबंधी या सभागृहात काल काही मुद्दे मी उपस्थित केले. या राज्यात अजूनही प्रचंड प्रमाणात आरडीएक्सचे साठे आहेत अशाप्रकारची माहिती आहे. मुंबई बॉम्बस्फोटामधील आरोपी पकडले गेले आहेत परंतु रेल्वे बॉम्बस्फोटात अजून पूर्णपणे आरोपी पकडले गेले नाहीत. मालेगांव बॉम्बस्फोटामधील काही आरोपी पकडले गेले काही पकडले गेले नाहीत. पोलीस खात्याचे मनोबल डाऊन खच्ची करण्यासाठी या ठिकाणी कोणीही पोलिसांवर हेतुपुरस्सर आरोप केले नाही. भुसावळच्या घटनेसंबंधी माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी आपल्या आमदारांना सर्टिफिकेट दिले. हे खरे आहे की, आमदारांनी पक्ष बदलला, आम्ही त्यांना तुमच्याकडे पाठविले आणि ते फार चांगले झाले हा काही भाग नाही. ज्यावेळेला ते नगराध्यक्ष होते त्यावेळेला सुध्दा ते व्यवस्थित काम करित होते. तुमच्या पक्षात आल्यानंतर त्यांच्यावर गुन्ह्याची मालिका सुरु झाली जवळपास पन्नास पर्यंत गुन्हे या आमदारावर दाखल झालेले आहेत. आमदाराच्या भावावर दाखल झालेले आहेत. मी या ठिकाणी आपणाला सांगू इच्छितो की, गेली पाच वर्षे भुसावळमध्ये सतत हैदोस चालू आहे. या आमदाराच्या भावावर जवळजवळ 307 गुन्हे दाखल झाले त्यांच्या भावावर गुन्हे दाखल झाले आहेत आणि अशा गुन्हेगाराला तो ज्या पक्षाचा जिल्ह्याचा उपाध्यक्ष आहे त्याला एसपीने संरक्षण द्यावे यासाठी श्री. पातोडे यांनी पत्र लिहले आहे.

Z-3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..... ( पुढे सुरु )

श्री. अनिल चौधरी यांनी संरक्षण मागितले नव्हते तरीसुध्दा त्यांना संरक्षण दिले जाते माननीय श्री. आर.आर.पाटील या ठिकाणी अनेक आमदार आपल्याला संरक्षण मागतात, सिक्युरिटीच्या बाबतीमध्ये आपले एक धोरण आहे की सिक्युरिटी आता कमी केली पाहिजे, आम्ही त्याला विरोध केला नाही. ज्याला संरक्षण देणे आवश्यक त्याला ते दिले पाहिजे आणि ज्याला आवश्यक नाही ते त्याच्याकडून काढून घेतले पाहिजे.

यानंतर श्री. बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MHM/ प्रथम श्री.सोनावणे......... 11:40

श्री.पांडुरंग फुंडकर .........

संरक्षण देण्यासाठी आम्ही विरोध केला नाही. ज्याला संरक्षण आवश्यक आहे त्याला ते दिले पाहिजे. परंतु ज्याला संरक्षणाची आवश्यकता नाही त्याचे संरक्षण काढून घेतले पाहिजे. भुसावळ येथील पोलीस अधिकारी जिल्हा अधीक्षकाला लिहितात की, त्यांना संरक्षण द्या. तो राजकीय कार्यकर्ता आहे, आमदाराचा भाऊ आहे. त्याने संरक्षण मागितलेले नव्हते. मग संरक्षण देण्याची मागणी त्यांनी कोणत्या आधारावर केली ? भुसावळ शहरामध्ये खडणी वसूल करण्याचे प्रकार वाढलेले आहेत. डॉक्टरकडून, भाजीपाला विक्रेत्यांकडून, दूधवाल्यांकडून खंडणी वसूल केली गेली. अलिकडच्या काळामध्ये भुसावळ शहरामध्ये मोठया प्रमाणात क्राईम वाढलेला आहे आणि दिनांक 4 डिसेंबरच्या दंगलीमध्ये त्याचा स्फोट झाला. या प्रकरणाची आपण चौकशी करणार आहात की नाही ? या प्रकरणाची पोलीस कमिशनरकडून नाही तर न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. आबासाहेब गृहमंत्री आहेत. त्यांच्याच पक्षाचा तो आमदार आहे. त्याच्याच पक्षाचा जिल्हा उपाध्यक्ष आहे. मी कालच सांगितले की, तुम्ही समान न्याय करा. या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करा. दुधका दूध और पानी का पानी होऊ द्या. आबाबसाहेब गुन्हेगाराला पाठीशी घालण्याचे तुमचे धोरण नाही. परंतु ज्याच्या कारकिर्दीमध्ये हे गुन्हे घडले त्यांना शिक्षा झाली पाहिजे. भुसावळमध्ये 5 वर्षापूर्वी गुन्हे रजिस्टर झालेले आहेत आणि त्याच विभागाकडून चौकशी केली तर संशयाचे वातावरण निर्माण होईल आणि संशयाची सुई तुमच्याकडे येईल. म्हणून माझी अशी मागणी आहे की, याची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. 1,500 तक्रारी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना यांनी केलेल्या आहेत. ही घटना घडल्यानंतर ठाणेदार श्री.पातोंड यांची ट्रान्सफर झाली. ट्रान्सफर अशी झाली की, त्याला प्रमोशन देऊन त्याची ट्रान्सफर करण्यात आली. ही परिस्थिती लक्षात आल्यानंतर त्याचे प्रमोशन कमी करण्यात आले. आपण श्री.पातोंड यांची चौकशी करुन त्याला निलंबित करणार आहात काय ? मी या पकरणाची न्यायालयीन चौकशी मागितलेली आहे आणि ती चोकशी करण्याचे आपण सभागृहामध्ये मान्य करावे. मी सुरुवातीलाच सांगितले की, पोलीस दलाचे मनोबल खच्चीकरण करण्याचा आमचा प्रयत्न नाही. मी काही घटनांचे समर्थन केले. महाराष्ट्राचे पोलीस खाते काही वर्षे मनोधैर्याने वागले. परंतु मागच्या 5 वर्षामध्ये ज्या घटना महाराष्ट्रामध्ये घडत आहेत त्यावरुन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2........

श्री.पांडुरंग फुंडकर .........

असे दिसते की, कोठे तरी पाणी मुरत आहे. पोलीस दलाचे मनोबल खच्चीकरण करण्याचे काम विरोधी पक्ष करीत आहे, असे नाही. तुम्ही पोलिसांना पगार वाढ दिली. परंतु ती पगारवाढ त्यांना मिळाली नाही. पोलिसांना 1 हजार रुपये पगार वाढ जाहीर करण्यात आली. परंतु त्यांच्या हातामध्ये फक्त 500 रुपये मिळाले. पोलिसांची डयुटी, त्यांचे कामाचे तास, त्यांचा कामाचा ताण याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. 14-14 तास काम करुन देखील पोलिसांना 3-3 महिने सुटया मिळत नसतील तर पोलीस दलामध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढेल. ज्याप्रमाणे शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे त्याप्रमाणे पोलिसांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढेल. पोलिसांचा कामाचा ताण वाढला, त्यांना सुट्या मिळत नाहीत, पगार वाढ मिळत नाही, कुटुंब बरोबर चालविता येत नाही. त्यामुळे काही पोलीस आत्महत्या करण्यास निघाले आहेत आणि काही पोलिसांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पोलिसांचे मनोबल वाढले पाहिजे. माननीय मंत्री महोदयांना माझी अशी विनंती आहे की, भुसावळच्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. मी काल सभागृहामध्ये एक मद्दा उपस्थित केला की, राज्यामध्ये बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. सभापती महोदय, बलात्काराचे प्रमाण कोठ पर्यंत गेले ? पोलीस दलातील लोकच बलात्कार करीत आहेत. परवा अकोला जिल्हयातील पातूर येथे सायंकाळी 6.00 वाजता श्री.निरंजन, बक्कल नंबर 215 या पोलिसाने 28 वर्षाच्या महिलेवर बलात्कार केला. यामुळे पोलिसांची नाचक्की किती झाली ? त्या महिलेने आरडा ओरड केली. त्यावेळी गावातील लोकांनी त्या पोलिसाला पकडून त्याला चांगले चोपले आणि गावातून त्याची धिंड काढली.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

कपडे उतरवून त्याची धिंड काढली गेली आणि पोलीस ठाण्यामध्ये नेऊन पोलिसांच्या ताब्यात त्याला दिले गेले. परंतु अद्याप त्याला निलंबित केलेले नाही. तेव्हा कशा पद्धतीने गृहखात्याची पोलिसांवर जरब असेल याचा आपणच विचार करावा आणि या दृष्टीने काही निर्णय आपण घेतले पाहिजेत. तसेच भुसावळच्या प्रकरणाशी संबंधित असलेलो पोलीस फौजदार श्री.पातोंड याला निलंबित करण्याची कारवाई आम्हाला आपल्याकडून अपेक्षित आहे. एवढे बोलून मी थांबतो.

श्री. फौजिया खान : सभापति महोदय, सभागृह में एक बार फिर से आमदार निवास के किसी कमरे में आतंकवादी ठहराने का उल्लेख हुआ है. मैं तो यह समझती हूँ कि मेरे द्वारा निवेदन करने के बाद माननीय सभापति महोदय ने यहां पर कहा था कि इसके बाद इस विषय पर सभागृह में कोई चर्चा नहीं होगी. लेकिन हम पर फिर से छींटे उड़ रहे हैं. मैं माननीय मंत्री महोदय से निवेदन करना चाहती हूँ कि इस चीज की तह तक पहुंचने के लिए आप सी.बी.आय. या ज्युडिशियल इन्क्वायरी कीजिए, लेकिन जो छींटे हमारे ऊपर उड़ रहे हैं, उससे हमें बरी करना चाहिए. आतंकवाद को कंडेम करने के लिए हमने हमेशा काम किया है. सन 2001 में परभणी में विश्व शांति मिशन के अंतर्गत हजारों लोगों की रैली निकाली गई थी. यह रैली 1 किलोमीटर लम्बी थी और इसमें हजारों की संख्या में दलित, मुस्लिम और हिन्दू भाइयों ने मिलकर आतंकवाद को कंडेम किया है और उस रैली का नेतृत्व हमने किया है. हमारे ऊपर इस प्रकार से छींटे उड़ाना ठीक नहीं है, इतना ही निवेदन मैं आपसे करना चाहती हूँ.

**उपसभापती** : अगर माननीय सभापति ने इस प्रकार का उल्लेख किया है तो मेरे ख्याल से यहां पर दुबारा इस बात को उठाना दु:खदायक बात है. इसके बाद इसका उल्लेख दुबारा यहां पर नहीं होगा. मैं खुद इस बात के लिए खेद व्यक्त करता हूँ.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझे ग्रह कोणत्या स्थितीत आहेत याची मला तरी अजून कल्पना नाही किंवा मी अजून त्याबाबत काळजी देखील कधी केलेली नाही. इतकेच काय पण मी माझ्या हातामध्ये कसल्याही अंगठ्या देखल घातलेल्या नाहीत. परंतु खरोखरी माझे ग्रह बिघडले असतील तर मी जरूर त्याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांचे मार्गदर्शन घेईन, थोडेसे तपासून घेईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : आम्हाला आपल्या पदाची आणि तुमचीच चिंता जास्त आहे म्हणून मी ते सांगितले.

...... बीबी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, भुसावळच्या घटनेची न्यायालयीन चौकशी करावी अशी या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केलेली आहे. आता अगोदरच न्यायालयातील प्रलंबित दाव्यांची संख्या पाहिली तर ती लाखावर गेलेली आहे त्यात अशा एका एका घटनेवर आपण न्यायाधीश नेमू लागलो तर मोठे अवघड होईल. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो या घटनेमध्ये न्यायालयीन चौकशी करण्यासारखे असले तरी सध्या आपण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून, आय.जी. कडून चौकशी करीत आहोत. तीन महिन्यामध्ये त्यांचा अहवाल आल्या नंतर त्यातून आणखी चौकशी करण्याची आवश्यकता भासली तर तीही केली जाईल. परंतु पुन्हा असे प्रकार भुसावळमध्ये घडू नयेत म्हणून त्या गोष्टी केल्या जातील. सभापती महोदय, बॉम्बस्फोटामध्ये जे आरोपी देशामध्ये होते ते अत्यंत शिताफीने पकडले आहेत. देशातील पोलिसांनी, अगदी बिहार राज्याच्या पोलिसांनी, केंद्रीय पोलीस यंत्रणांनी या कामी आपल्याला चांगली मदत केली आहे. या प्रकरणातील जे आरोपी देशाबाहेर आहेत तेही मिळविण्याचा आमचाप्रयत्न आहे. आपणा सगळ्यांनाच माहिती आहे की, अलिकडच्या काळात येथे गुन्हा करून परदेशी पळून जाण्याचे प्रकार वाढले आहेत. परंतु दुबईहून 11 गुन्हेगारांना परत आणण्यात आपले पोलीस यशस्वी झालेले आहेत. आणखीही काही गुन्हेगार हाती लागण्याची शक्यता आहे. तेव्हा ज्यांनी कोणी राज्यामध्ये गुन्हे केले आहेत ते कोणीही सुटणार नाहीत. त्यांना पकडण्यामध्ये वेळ लागेल पण ते निश्चितपणे पकडले जातील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. सभापती महोदय, 1993च्या बॉम्ब स्फोट खटल्यामध्ये जवळपास 123 आरोपींसंबंधात निकाल घोषित करण्यात आलेला आहे आणि त्यातील 100 जण दोषी मानले गेले आहेत. जगामध्ये हा रेकॉर्ड आहे. 100 लोकांना एका प्रकरणामध्ये दोषी मानणे आणि त्यांच्यावर दोष शाबित करणे हा जगात रेकॉर्ड आहे. तेही काम या निमित्ताने घडलेले आहे. गुन्हेगारांना शिक्षा होण्यात वेळ लागत असेल पण ते कायद्याच्या कचाट्यातून सुटत नाहीत हे यातून सिद्ध झालेले आहे. तेव्हा या चर्चेतून आपण ज्या काही सूचना केल्या आहेत त्यावर योग्य ती कारवाई शासनातर्फे निश्चितपणे करण्यात येईल एवढेच मी सांगतो. दुसरे असे की, अकोल्याच्या बलात्काराच्या केसमधील पोलीस हवालदारास रात्रीच निलंबित केलेले आहे आणि केवळ 1 आठवड्यामध्ये त्याचा रिपोर्ट मागविण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे ..... सीसी 1 ...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, अशा लोकांना घटनेच्या 311 कलमाचा वापर करुन नोकरीतून कायम काढून टाकले जाईल. आणि या केसचा लवकर निकाल लागेल अशाप्रकारे यंत्रणा उभी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : याबाबत आपण चौकशी करुन कारवाई करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : यासंबंधात आय.जी.पी. कडे चौकशीसाठी प्रकरण सुपूर्द केले आहे. तसेच, त्यांना त्या हद्दीमधून बदलले आहे, ते आता एनसीपीमध्ये नाहीत.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्दयावरील निवेदनासंबंधी**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या झालेल्या अपमानासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन सात दिवस झाले. तरी सुध्दा शासनाकडून त्यासंबंधी निवेदन करण्यात आले नाही. काल प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर निवेदन होईल असे सांगण्यात आले होते. परंतु आज तीन दिवस झाले तरी शासनाकडून त्यासंबंधी निवेदन कां केले जात नाही?"

**उपसभापती** : माननीय सदस्यांच्या भावना मला समजल्या आहेत. शासनाने यासंबंधी सभागृहामध्ये निवेदन करावे असे निदेश दिले होते. आज प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात निवेदन करावे अशा स्पष्ट सूचना मी देत आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या दोन औचित्याच्या मुद्दयासंबंधी माननीय राज्यमंत्र्यांना निवेदन करण्यास सांगितले होते. ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास सांगतो.

**उपसभापती** : माननीय गृहमंत्र्यांनी निवेदन करावे अशा मी स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक

L.A.BILL NO. LXXXIX OF 2005.

( A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND AGHORI PRACTICES AND CUSTOMS THRIVING, ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE THE EVIL AND SINISTER PRACTICES AND AGHORI PRACTICES BORN OUT OF BELIEFS PROPAGATED IN THE NAME OF SOME SO CALLED DIVINE OR SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY QUACKS AND CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING AND HARMING MENTALLY, PHYSICALLY AND FINANCIALLY THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

(चर्चा पुढे चालू)

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, काल मी ज्याठिकाणी माझे भाषण थांबविले होते, त्याठिकाणी आज पुन्हा सुरु करीत आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जादूटोणा विधेयकाच्या संदर्भात काही घटनात्मक मुद्दे उपस्थित केले होते. ते कसे गैरलागू आहेत हे सांगण्याचा माझा हेतू आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

श्री. कपिल पाटील...

कलम 25 चा उल्लेख केला होता. धर्म स्वातंत्र्याच्या अधिकाऱ्याच्या संदर्भात मी याठिकाणी वाचून दाखविले त्यामधील "क" मध्ये असे म्हटले आहे की, "धर्माचरणाशी निगडीत असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकेतर कार्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या" आणि "ख" मध्ये म्हटल्याप्रमाणे "सामाजिक कल्याण व सुधारणा यांबाबत अथवा सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदू धार्मिक संस्था हिंदूंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खुल्या करण्याबाबत उपबंध करणाऱ्या, कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही." इतके स्पष्ट भारतीय संविधानाच्या कलम 25 मध्ये मूलभूत स्वातंत्र्याचे अधिकार दिले आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

त्या कलमामध्ये ही तरतूद आहे. वैयक्तिक स्वातंत्र्यावर या देशातील नागरीक म्हणून माणूस म्हणून वैयक्तिक स्वातंत्र्याकडे पाहिले गेले आहे. त्यावर अन्य धर्माचे अतिक्रमण होऊ नये यासाठी समाज कल्याणासाठी, सामाजिक सुधारणेसाठी कोणताही कायदा करण्यात प्रत्यवाय नाही. संविधानातील कलम त्याला बाधा करीत नाही. हे जे विधेयक याठिकाणी मांडण्यात आले आहे, त्यामधील परिशिष्ट 12 या कलमामध्ये धर्माचाराशी संबंधित आहे असा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दावा केला. मूळ मसुद्यामधील तरतूद पाहिली तर असे लक्षात येईल की, मूळ मसुद्यामध्ये धर्माशी अनेक संबंधित गोष्टी आहेत. त्यामध्ये भानामती, गंडेदोरे असणे हा भाग वेगळा, ते मी मांडीत नाही. परंतु मंत्र तंत्र करणे, मंदिरामध्ये प्रार्थना करणे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (पुढे सुरू.....

मूळ मसुद्यामध्ये ते होते. 'प्रार्थना', असा शब्द वापरला असता तर आपल्याला राष्ट्रगीतही म्हणायला अडचण आली असती. परंतु आता ते या विधेयकामध्ये दिसत नाही. माननीय मंत्री श्री.हंडोरे साहेबांनी हे अपत्या तिकडचे आहे, मागच्या सरकारमधील मंत्रीमंडळाने मंजूर केलेला मसुदा आहे, असे सांगितले. मी हे सांगोवांगी सांगत नाही. .."मंत्रा"चा अर्थ वेगळा आहे. सध्या आपल्या समोर जे विधेयक आहे त्यामध्ये 'मंत्रा'चा कोणताही उल्लेख नाही. परंतु मूळ मसुद्यामध्ये तो उल्लेख होता. विधेयकाच्या वैधतेबद्दल सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब बालले. हे घटनात्मकदृष्ट्या हे विधेयक मांडता येते की नाही, या अर्थाने मी बोलत आहे.

श्री.दिवाकर रावते : आपण आता विधेयकावर बोलत आहात. त्यावर बोलायचे असेल तर त्याला माझी तयारी आहे...

श्री.कपिल पाटील : विधेयकातील सुधारणेचा रेफरन्स मी देतो. आपल्याला माहीत आहे की, मसुदा निश्चित होतो त्यानंतर विधेयक तयार होते..

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी मला उद्देशून बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, मी आपल्याला उद्देशूनच बोलत आहे. मूळ मसुद्यातील सातव्या भागामध्ये म्हटलेले आहे की, धर्म, देवदेवतांच्या किंवा देवाच्या नावावर फसवणूक करण्यासाठी याचा उपयोग करणे. धर्मसंप्रदाय अगर देव देवीच्या नावावर पशुहत्त्या करणे. हा उल्लेख कलम 12 मध्ये नाही.

श्री.दिवाकर रावते : मी घटनात्मक मुद्याच्या संबंधाने बोललो. मी या विधेयकाच्या गाभ्याच्या संबंधात अजून बोललो नाही. मी 13 कलमाच्याबाबतीतच माझे विवेचन केलेले आहे.

श्री.कपिल पाटील : मी या विधेयकावर बोलत नाही. सभापती महोदया, आपल्याला आणि सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना माहित आहे की, मी या विधेयकावर बोलत नाही तर मी घटनात्मक मुद्यावरच बोलत आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी जे मुद्दे उपस्थित केले, ते मुद्दे मी टिपून घेतलेले आहेत. मी त्यांच्याशी स्वतंत्र चर्चा केलेली आहे. परंतु बाहेरची चर्चा येथे महत्वाची नाही तर सभागृहातील चर्चा महत्वाची आहे, तेवढ्यापुरतेच मी बोलतो आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब हे या विधेयकाच्या विरोधात नाहीत, विधेयकातील गाभ्याच्या विरोधामध्ये नाहीत. त्यांचीही अंधश्रध्देच्या विरोधात भूमिका आहे. अंधविश्वास दूर झाला पाहिजे,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (पुढे सुरू....

अशी त्यांची भूमिका आहे, याची मला नक्की खात्री आहे. त्यांचे कौतूक करण्यासाठी मी हे सांगत नाही किंवा त्यांनी आक्षेप घेतला म्हणून मी हे सांगत नाही. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांच्या पुढाकाराने प्रबोधनकार ठाकरे यांचा पुतळा उभा केलेला आहे -जे आम्हाला कायम वंदनीय राहिले- प्रबोधनकार ठाकरे यांचा पुतळा मुंबईमध्ये नव्हता. ते संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार होते हा भाग वेगळा आहे. परंतु या बिलाच्या संबंधाने प्रबोधानकारांनी त्यावेळेला लिहून ठेवलेले आहे की, ही माणसे पुढचे पहातात. त्यांचा पुतळा त्या भूमिकेतून उभा केलेला आहे. केवळ ते शिवसेना प्रमुखांचे पिताजी आहेत, म्हणून त्यांचा पुतळा उभा केलेला नाही. त्यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. या देशातील पुरोगामी चळवळीतील सगळे कार्यकर्ते शाहू, फुले, बाबासाहेब आंबेडकर यांच्या रांगेमध्ये प्रबोधनकारांना नेहमी मानत आलेले आहेत. त्या प्रबोधनकारांनी जो मार्ग सांगितला आहे, त्या मार्गाची मी आठवण करून देतो. कोणत्याही गोष्टीचे प्रतिबिंब मानवी मनाशी घट्ट चिकटून बसते, ही गोष्ट त्याज्य असली तरी तिचा त्याग करणे माणसाच्या जीवावर येते, ही गोष्ट खरी आहे. पुढे प्रबोधनकार म्हणतात की, त्यागाशिवाय कोणत्याही बाबतीत प्रगती होणे शक्य नाही वर्षानुवर्षाची घट्ट परंपरा आहे. संस्कार आहेत. त्यातून अनेक गोष्टी चिकटत असतात. आपण कितीही म्हटले तरी कोतीही गोष्ट पटकन फेकून देता येत नाही. मानवी मनावर हजारो वर्षांचा संस्कार असतो. कायद्याने तो सुटतो अशातला भाग नाही. या विधेयकामध्ये काय आहे, त्याच्या खोलामध्ये मी जात नाही. प्रबोधनकारांचे "ज्वलंत समाज प्रबोधन" या पुस्तकामध्ये समाज प्रबोधनाविषयीच्या लेखांचे संकलन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी काल मुद्दे उपस्थित केले म्हणून मी मुद्दाम पुस्तक आणलेले आहे, असे नाही. मी कॉलेजमध्ये जाऊ शकलो नाही त्या अगोदर प्रबोधनकारांची दोन पुस्तके मला वाचावयास मिळाली. 'ज्वलंत समाज प्रबोधना'चे पुस्तक आणि 'गाडगे महाराजां'चे चरित्र अशी प्रबोधनकारांची दोन पुस्तके आहेत. ती वाचल्यानंतर माझे विचार बदलले. त्यापूर्वी मी गंडेदोरे, उपासतापास करत होतो. पण ही दोन पुस्तके वाचल्यानंतर सगळे सोडून दिले आणि इहवादाची भूमिका स्वीकारली.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ...

मी जेव्हा हे पुस्तक वाचावयास सुरुवात केले त्याच्या खूप आधी हे पुस्तक प्रकाशित झाले होते. हे प्रबोधनकारांनी लिहून ठेवलेले आहे. द्रष्टी माणसे कालातील मार्गदर्शन करुन ठेवतात. सन्माननीय सदस्य हे प्रबोधनकारांच्या भूमिकेपासून तसूभरही मागे हटले नाहीत असे मला म्हणावयाचे आहे.

तिसरा घटनात्मक मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय महत्वाचा आहे. तेवढ्यापुरतेच मी बोलणार आहे. मूळ मसुद्यामध्ये 50 कलमे होती. अगदी गंडे दोऱ्यांपासून मंत्र-तंत्र आणि बकऱ्यांपासून गोपाला संतान विधीपर्यंतचा उल्लेख त्यामध्ये होता. त्यातील बाब क्रमांक 38 मध्ये "धर्म, संप्रदाय, पंथ अगर देवाचे किंवा देवीचे नवस फेडण्याच्या नावाखाली कोंबड्या बकरी किंवा अन्य प्राणी यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करणे"असा उल्लेख आहे. बाब क्रमांक 39 मध्ये "धर्म, संप्रदाय, पंथ किंवा नवस फेडण्याच्या नावाखाली हालहाल करुन प्राण्यांची कत्तल करणे" असा उल्लेख आहे. कार्ल्याच्या एकविरा देवीच्या ठिकाणी तसे करतात. एकविरा देवी हे माझे कुलदैवत आहे. प्रबोधनकारांचेही ते कुलदैवत होते.

श्री. दिवाकर रावते : मी तसे करीत नाही.

श्री. कपिल पाटील : तुम्ही ते करीत नाही तसेच मीही ते करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हे व्यक्तिगत जीवनामध्ये काहीही पाळत नाहीत. ते अत्यंत प्रागतिक विचारांचे आहेत. राजकीय कारणांसाठी त्यांना भूमिका घ्यावी लागलेली आहे. पण तसे म्हणणेही बरोबर नाही. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांना बिलाच्या मेरीटवर बोलण्यास परवानगी दिलेली आहे काय ? अंधश्रध्दा बिलाच्या बाबतीत माझी पूर्ण सहमती आहे. काही ज्या बाबी धर्मावर आक्रमण करणाऱ्या आहेत तेवढ्यापुरतेच मी माझे म्हणणे मांडलेले आहे. बिलावर चर्चा करावयाची असेल तर मी तयार आहे. बिलावर माझे भाषण व्हावयाचे आहे.

श्री. कपिल पाटील : यामध्ये धर्माशी निगडित असे काहीही नाही हे मी सांगत आहे. मूळ मसुद्यामध्ये धर्मासंबंधी जी जी कलमे होती, त्यामध्ये 50 ते 52 कलमे होती, ती सगळी आता गाळलेली आहेत आणि आता जी 12 कलमे यामध्ये आहेत हे सुधारित अपत्य या शासनाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2....

श्री. कपिल पाटील ....

माझा आक्षेप त्याच्यावर आहे. परंतु चांगल्या भूमिकेतून, सर्वांच्या सहमतीने ते केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, श्री. गोपीनाथ मुंडे यांच्याशी बोलून हे केलेले आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांच्याशी बोलले नाहीत. त्यांच्याशी सुध्दा बोलावयास पाहिजे होते. मूळ जो मसुदा आहे तो धर्माशी जोडलेला आहे आणि नवीन जो मसुदा आहे त्यामध्ये 12 परिशिष्टामध्ये जो उल्लेख केला आहे त्याचा धर्माचरणाशी काडीमात्र संबंध येत नाही. या 12 कलमांमध्ये हे सर्व नाही हे आपण मान्य करावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य सुध्दा याच्याशी सहमत आहेत. धर्माचरणाशी संबंध असला तरी धर्म सुधारणेचे कायदे संमत होतात. ते कायदे करण्यामध्ये कायदेमंडळाला, संसदेला संविधानाचा कोणताही अटकाव नाही. यामुळेच अस्पृश्यता निवारणाचा कायदा होऊ शकला. असे कायदे केल्यामुळे जी स्त्री बंद दाराच्या आड राहिली असती ती आज शिकावयास बाहेर पडली. सर्वधर्मात स्त्रीला दुय्यम स्थान दिलेले आहे. जो समाज आणि स्त्रिया मागे पडल्या होत्या त्या सगळ्यांना पुढे आणण्याचे काम या धर्मसुधारणांच्या कायद्यामुळे झालेले आहे.

यानंतर श्री. शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 12:05

(श्री. कपिल पाटील...)

हे आपण विसरु शकत नाही. मी राजाराम मोहन राय पासून प्रबोधनकारापर्यन्तचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत म्हणाले की, प्रत्येक वेळी महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांचे नाव घेतले जाते. यावेळीच फक्त प्रबोधनकार यांची आठवण कशी झाली ? मी सांगू इच्छितो की, ही सर्व थोर मंडळी मला रोज आठवतात आणि त्यांच्या विचारांशी मी पक्का आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेबांनी आयपीसीचा उल्लेख करुन समांतर कायद्याची आवश्यकता नाही असा घटनात्मक मुद्दा उपस्थित केला. खरे तर हा घटनात्मक मुद्दा होत नाही.

श्री. दिवाकर रावते : घटनेच्या कलम 19(जी) नुसार हा घटनात्मक मुद्दा कसा होतो ते मी स्पष्टपणे मांडलेले आहे.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्यांचा अभ्यास फार आहे. त्यांचा व्यासंग दांडगा आहे. त्यांच्या व्यासंगाला मी बोट लावू इच्छित नाही. माझा अभ्यास त्या मानाने खूप कमी आहे. परंतु मला जे कळते त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांचा मुद्दा हा कसा घटनात्मक होत नाही हे मी सांगण्याचा प्रयत्न करतोय. सन्माननीय सदस्यांनी घटनेतील 25व्या कलमाचा उल्ले्ख केला. मी देखील ते कलम वाचलेले आहे. धर्माचरणाच्या संदर्भात घटनेतील कलम 25 (क) आणि (ख)मध्ये सर्वांना स्वातंत्र्य दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी आयपीसीचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, यातील कोणत्याही गुन्ह्यासाठी आययपीसीमधील तरतुदी लागू होत नाहीत. आयपीसी लागू होत असता तर मानवत खून खटल्यातील आरोपी सुटले नसते...(अडथळा).. ज्यांनी अघोरी कृत्य करायला लावले ते जेलमध्ये गेले नाहीत. बिचारी सामान्य माणसे जेलमध्ये गेली. परवा शहापूरमध्ये अशीच एक घटना घडली. मामा-मामींकडे त्यांची सख्खी भाजी शिकायला होती. संतान व्हावे म्हणून मामा-मामींनी आपल्या भाचीचा नरबळी दिला.

श्री. दिवाकर रावते : मी या सगळ्या गोष्टींच्या विरोधी आहे हे मी सांगितलेले आहे. परंतु एखादी गोष्ट इण्टरप्रिट करताना आमच्या भूमिकेला ते फेस करीत असतील तर आम्हाला देखील त्यासंदर्भात त्याच वेळी सांगितले पाहिजे. मी या सगळ्या गोष्टींच्या विरुध्द आहे.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : मला एवढेच सांगायचे आहे की, या देशामध्ये मानवी जीवना इतकी मौल्यवान आणि पवित्र गोष्ट दुसरी कोणतीही नाही. मानवी जीवनासाठी हे कायदे आहेत. कोणतीही परंपरा, कोणताही संपद्राय हा मानवी जीवनाच्या आड येत असेल तर त्यामध्ये सुधारणेसाठी वाव आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी हिंदू धर्मातील कान टोचण्याचे आणि मुस्लिम धर्मातील सुंता करण्याचे उदाहरण दिले. मी एकच उदाहरण देतो. पैगंबर साहेबांना लोक असे विचारत होते की, तुम्ही स्वत:ला देवाचे प्रेषित म्हणविता, तर मग काही चमत्कार करुन दाखवा. चमत्काराशिवाय नमस्कार होत नाही. 1400 वर्षापूर्वी पैगंबरसाहेबांनी सांगितले की, मी माणूस आहे आणि माणसाला चमत्कार करण्याचा अधिकार नाही आणि अशा प्रकारे कोणताही चमत्कार होत नाही. मी हे सांगू इच्छितो की, कोणताही धर्म जेव्हा अस्तित्वात येतो त्यावेळी त्यावेळच्या समाजसुधारणेला तो पर्याय असतो. अगोदरच्या न पटणा-या रुढी, परंपरातून बाहेर पडण्याचा तो मार्ग असतो. ...(अडथळा)...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापसात युक्तिवाद करु नयेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 12:10

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्यांची अशी समजूत झालेली दिसते की, या कलमाचा धर्माशी संबंध आहे. तसेच धर्म आणि परंपरा, धर्म आणि रुढी, धर्म आणि समजुती यांना सुध्दा एक मानता, त्यातून हा घोळ सुरु होतो. परंपरा वेगळया आहेत. धर्म वेगळा आहे. रुढी वेगळया आहेत. त्या रुढी हितसंबंधी जो वर्ग आहे, पुरोहित असा शब्द मी वापरत नाही अन्यथा त्याला आक्षेप घेतला जाईल. त्या काळातील त्या त्या वर्गाने या रुढी निर्माण केल्या आहेत. मूळ धर्माचा उद्देश, धर्माची मांडणी आणि परंपरा, समजुती, रितीरिवाज, कर्मकांड पूर्णपणे वेगळे आहे. कर्मकांड आणि धर्म यांचा संबंध जोडला तर मग पूर्वीची 50 कलमे जोडता येतात. मग यातील 12 कलमे देखील लागू होत नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य जे माहिती नाही ते बोलत आहेत हे कसे चालेल?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जो आक्षेप सन्माननीय सदस्यांनी घेतला आहे, ती कलमे आणि आक्षेप याबाबत मी बोलत आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, महत्वाच्या बिलावरील घटनात्मक वैधतेबद्दल चर्चा सुरु आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य उदाहरण देत असताना कुत्री, मांजरी, बकऱ्या, प्रेषित पैगंबर यांचा उल्लेख करुन सभागृहाचा वेळ वाया घालवित आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदयांना हे बिल आजच मंजूर करुन घेण्याची इच्छा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व श्री.कपिल पाटील हे आपापसात बोलून सभागृहाचा वेळ घेत आहेत. त्यांनी फक्त मुद्दे मांडावेत व सभागृहाचा वेळ घेऊ नये. सन्माननीय मंत्रीमहोदयांना घाई झाली आहे. आम्हाला देखील घटनात्मक वैधतेबद्दल बोलावयाचे असल्यामुळे फक्त मुद्दे मांडावेत.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, बिलकूल घाई नाही. या महत्वाच्या विषयावर चर्चा होऊ द्यावी. हे बिल कोणत्या एका समुहाच्या, धर्माच्या विरुध्द नाही.

श्रीमती फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी कुत्री, मांजरी, बकऱ्या व प्रेषित पैगंबरांचा उल्लेख केला आहे, तो आक्षेपार्ह असल्यामुळे कामकाजातून वगळण्यात यावा.

श्री.प्रकाश शेंडगे : मी असा उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी उल्लेख केला असल्याचे मी सांगितले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : कुत्री, मांजरी हा जो उल्लेख आहे तो वेगळया संदर्भात केला आहे. कोंबड्या, बकऱ्या हा उल्लेख वेगळया संदर्भात केला आहे व प्रेषित पैगंबर यांचा उल्लेख वेगळया संदर्भात आहे. त्यामुळे याठिकाणी आक्षेपार्ह असे काहीही नाही. तरी देखील रेकॉर्ड तपासून त्यामध्ये काही आक्षेपार्ह आढळले तर ते रेकॉर्डवरुन वगळण्यात येईल.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील याठिकाणी अंधश्रध्दा बिलावर बोलत आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे बिलाच्या घटनात्मक वैधतेवर बोलत आहेत आणि त्याच मुद्यावर त्यांनी बोलावे. जर मुद्याला सोडून काही वक्तव्य केले तर ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, विधिनियम 110 अन्वये बिलाच्या वैधतेबद्दल काही घटनात्मक मुद्दे उपस्थित केले गेले..........

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

तर त्याच्यावर आणखीन चर्चा करता येते असे पुस्तकात म्हटलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जो उल्लेख केलेला आहे त्या मुद्यांच्या संदर्भातच मी माझे विचार व्यक्त करीत आहेत.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात आपल्या जवळ एकूण 45 मिनिटे वेळ शिल्लक आहे. आपण या मुद्यावर जवळपास 15-16 मिनिटे बोलला आहात. त्यामुळे मला वाटते आपण 1-2 मिनिटात आपला मुद्दा पुर्ण करावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी मुद्दा मांडण्यासाठी जेवढा वेळ घेतला त्याच्या 1/4 तरी वेळ मला द्यावा.

**सभापती** : या मुद्याच्या संदर्भातील विचार सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दोन मिनिटात संपवावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आय.पी.सी.च्या कलम 322,324,503, 299 चा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी या ठिकाणी केलेला आहे. त्यांनी सांगितले आहे की, आय.पी.सी. च्या कलम 503 मध्ये शिक्षेच्या संदर्भात पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. आपल्याला अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्याच्या दिसून येतात. जादूटोण्याने दुखापत करण्याचा कोणाचा उद्देश नसतो असा बहाणा सांगून लोक सुटत असतात. जादूटोण्याने दुखापत करण्याचा उद्देश नसतो परंतु त्या दृष्टीने प्रवृत्त करण्याचा उद्देश असतो. परंतु यामध्ये बहाणे करुन लोक सुटल्याचे अनेक प्रकार आपल्याला दिसून येतात. त्यामुळे अशा प्रकारे सुटका होऊ नये यासाठी कायद्याची आवश्यकता आहे. शहरापूरच्या प्रकरणात नरबळी देण्यात आलेला आहे याची आपल्या सर्वांना माहिती आहे. परंतु जादूटोण्याने दुखापत करण्याचा उद्देश नव्हता असे सांगू लोक सुटत असतात. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना बाराव्या मुद्याच्या संदर्भात काही अडचण नाही. परंतु यामध्ये 13 मुद्याची अडचण आहे. 13 व्या मुद्यात स्पष्ट म्हटले आहे की, "शका दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येते ज्यामुळे व्यक्तीला मानसिक शारिरीक वा आर्थिक बाधा पोहोचत नाही असे कोणतेही धार्मिक विधी व धार्मिक कृत्ये अंतर्भूत असलेल्या कृतींना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होत नाही. "

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या मुद्याच्या संदर्भात अजून 4-5 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. आता आपल्याजवळ एकूण 40 मिनिटे वेळ शिल्लक राहिलेला आहे. आपण या मुद्याच्या संदर्भात ऑनलेग असल्यामुळे 15-16 मिनिटांपासून विचार व्यक्त केलेले आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी जे मुद्दे मांडणार आहे त्यासंदर्भात मी आपल्याला लेखी माहिती दिली होती. मी या मुद्याच्या संदर्भात एक दोन मिनिटात माझे विचार पूर्ण करतो.

**सभापती** : या मुद्याच्या संदर्भातील आपले विचार आपण एक मिनिटात संपवावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, विधेयकाच्या 2(ख) कलमात म्हटले आहे की, " जादूटोणा करणे आणि अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे" याचा अर्थ "एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या व वर्णन केलेल्या कृती करणे. इतरांकडून करवून घेणे वा इतरांना करण्यास प्रवृत्त करणे. "

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील........

याचा अर्थ बारा मुद्दे पूर्ण आहेत. तेवढ्या पुरता हे विधेयक आहे. या विधेयकाचा पूर्ण उद्देश या व्याख्येंमध्ये आलेला आहे. तेरावा मुद्दा हा शंका दूर करण्यासाठी आहे. तो कोणत्याही कृतीला लागू होत नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ही व्याख्या घटनेच्या दृष्टीने योग्य आहे. यातील एकही शब्द घटनेच्या बाहेर जात नाही. धर्म स्वातंत्र्यावर कोणताही आघात करीत नाही. श्रध्देच्या स्वातंत्र्यावर कोणताही आघात करीत नाही. देवाच्या अस्तित्वासंबधी कोणताही आघात करीत नाही. सभापती महोदय, कायदा हा सेक्युलर असतो. कायद्याला धर्म नाही. आपण धर्म मानू शकतो, देव मानू शकतो. देव आणि धर्म मानणारे सेक्युलर असतात. स्वातंत्र्यवीर सावरकर ईश्वर मानत नव्हते. परंतु महात्मा गांधी ईश्वर मानत होते. श्री.अडवाणी ईश्वर मानत नाहीत. त्यांची भूमिका वेगळी आहे...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे या सदनाचे सदस्य नाहीत त्यांचा उल्लेख करण्यात येऊ नये. अजून चार-पाच सदस्यांना बोलावयाचे आहे. आपण आतापर्यंत 17-18 मिनिटे बोललात तेव्हा आता आपण कृपया खाली बसावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी प्रबोधनकार ठाकरे यांचे "ज्वलंत समाज प्रबोधन" या पुस्तकातील एक वाक्य वाचून दाखवितो आणि माझे भाषण संपवितो. प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे की, " तो सच्चिदानंद परमेश्वर अखिल हिंदू भगिनी बांधवांना देव-देवळांची धार्मिक गुलामगिरी रसातळाला नेण्याची प्रेरणा देवो, एवढी अनन्य भावाने प्रार्थना करुन, हा बराच वाढलेला विचार आचारक्रांतीसाठी वाचकांच्या चरणी रुजू करतो." आपण मला बोलण्याची संधी त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्र. 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अधोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक विधानसभेने संमत केल्यामुळे प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी हे विधेयक मांडल्यामुळे त्यांचे देखील अभिनंदन करतो.

सभापती महोदय, भारत हा प्राचीन देश आहे. आपल्या भारत देशात निरनिराळ्या धर्माचे जातीचे लोक आहेत. मग त्यामध्ये जैन असतील, शिख असतील अशा अनेक जातीचे लोक आहेत. Hindu is not religion. It is way of life. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकाच्या बाबतीत काही घटनात्मक मुद्दे उपस्थित केले आहेत त्या मुद्यांपुरताच मी बोलणार आहे. या देशात सतीच्या प्रथेस मान्यता मिळाली होती. थोरले माधवराव पेशवे वयाच्या 24 वर्षी निधन पावले, त्यावेळी त्यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई ह्या अवघ्या 16 वर्षाच्या होत्या.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

थोरल्या पेशव्यांचे निधन झाल्यानंतर रमाबाईंना सती जावे लागले होते. सतीची प्रथा त्यावेळी देशातील सर्व समाजाने मान्य केली होती. या देशामध्ये ब्रिटीशांनी 150 वर्षे राज्य केले, परंतु त्यांनी कधीही आपल्या धर्मामध्ये हस्तक्षेप केला नाही. राजाराममाहेन रॉय हे समाजसुधारक होते, त्यांच्या आग्रहाखातर ती बंद करण्याच्या दृष्टीने धर्मामध्ये हस्तक्षेप करावा लागला. परंतु ते ब्रिटीशांनी केले नाही. मी याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देईन. दलितांना पाणी पिण्याची मूभा नाही, दलितांना देवळामध्ये जाण्याची मूभा नाही म्हणून त्यांनी चवदार तळयाचा सत्यागृह केला. नाशिक येथील काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश दिला पाहिजे, म्हणूनही त्यांनी आपली भूमिका मांडली व आंदोलने केली. अनटचॅबिलिटी प्रिव्हेन्शन ॲक्टमध्ये धर्मालासुध्दा असे असते, असे त्यामध्ये आहे. With due respect to hon. Member, Shri Rawateji. या विधेयकाचा आणि धर्माचा काहीही संबंध नाही. माननीय रावते साहेबांनी याठिकाणी घटनात्मक मुद्दे उपस्थित केले. Has this House have a right or jurisdiction to legislate this particular Act? The hon. Member, Shri Rawate has cited Article 245. Sir, what does Article 245 says. Sir, Article 245 says that who can legislate the Act. In this respect, the legislature powers are given to Parliament to legislate any enactment and it will have an effect all over the Country. The second point is that the concurrent list is there in our Constitution and as per that list the Parliament and the State Legislatures can legislate the Business. The third point is that there is an exclusive jurisdiction of a State. Now, does this Bill false under the exclusive jurisdiction of the State? In my opinion "Yes". त्यामुळे सभागृहामध्ये जे जादूटोणा बिल आणले गेले आहे, ते आणण्याचा पूर्ण अधिकार या सरकारला आहे. ज्युरिडिक्शनेही आपल्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. Does this Bill interfere with the Religion? In my opinion, the answer is "No" आपण जी सायटेशन दिली ती, These citations have no relevance whatsoever to this Bill. कुठल्याही बिलाच्या संदर्भात ते रिलिजिअसशी जोडलेले आहे. याठिकाणी आपण जे इंटरपिटीशन

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

वाचून दाखवले त्याचा अर्थ त्या धर्माचा अंतर्भाव आहे. तसेच याठिकाणी आपण रिट-पिटीशन वाचून दाखवले. हिंदू धर्मामध्ये कम्यूनिट करण्याचा हक्कच नाही. याठिकाणी माझा हक्क कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, तशाप्रकारचा अन्याय धर्मामध्ये नाही. ख्रिश्चन, इस्लाम धर्मामध्ये जे दिलेले आहे, त्या बाहेर त्यांना जाता येत नाही. Because, they concede to their religion.माननीय रावते साहेबांनी याठिकाणी बोहरींचे उदाहरण सांगितले. ते 26 कलमाच्या संदर्भात आहे. धर्माच्या विरुध्द भूमिका घेतली म्हणून धर्मगुरुंनी एक्स कम्यूनिट केले. त्यांच्या पध्दतीप्रमाणे ते करतात. That was correct. The person, who was ex-communicated from his community went to the High Court and challenged it in the High Court. The High Court decided the case against him. That person then again went in appeal against the judgment of the High Court to the Supreme Court. The Supreme Court interpreted Article 126 and said, 'Yes', they have got right because that is the direct interference in the religion of that particular community. That is the interpretation. The interpretation of Article 26 relates to the inference by the State in their religion. Hence, Mr. Chairman, Sir, I do not want to take much time of the House. Sir, what does this Bill says ? Does this Bill interfere in any way in the religion? The answer to the above question is 'No.'

नंतर श्री.रोझेकर.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही. Sir,what does this Bill says? Does this Bill interferes in the religion?बिलामध्ये व्याख्या आणि व्याप्ती दिलेली आहे. या बिलाच्या अनुसूचीमध्ये कुठल्या बाबी अघोरी समजल्या जातील, कोणत्या नाहीत याचा उल्लेख आलेला आहे. त्याबाहेर जाऊन या बिलाचा कुठलाही संबंध लावता येणार नाही. काही लोकांनी असा प्रचार केला की, हे बिल पास झाल्यानंतर, कायदा अंमलात आल्यानंतर श्री सत्यनारायणाची पुजा करता येणार नाही. असे मुळीच होणार नाही, तो प्रत्येकाचा धार्मिक अधिकार आहे, हक्क आहे. परंतु, जर मालवण तालुक्यातील नांदुस येथे नवी मुंबईतील कुटुंब जाऊन पुलाखाली गुप्तधन आहे ते तुम्हाला प्राप्त करुन देतो असे सांगून त्या ठिकाणी जर 7/8 लोकांचा डोंगरावरुन घसरुन मृत्यू होत असेल तर ते कृत्य अघोरी म्हणून गणले जाईल आणि अशा लोकांना शासन करण्याचा अधिकार या कायद्यान्वये प्राप्त होईल. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी जो घटनात्मक मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंदर्भात मी माझे विवेचन केले आहे आणि हे बिल या सभागृहात चर्चेसाठी आणि मंजूरीसाठी येऊ शकते, तसा अधिकार आहे, हा कायदा धर्मामध्ये हस्तक्षेप करणारा नाही . In my opinion, it does not interferes in the religion.आणि म्हणून हे बिल या ठिकाणी चर्चेला घ्यावे, अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

--------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा ) : सभापति महोदय, अभी हम यहां पर भारतीय संविधान की बात कर रहे हैं. जो मुद्दा कुछ माननीय सदस्यों ने यहां पर उठाया है उस बारे में मैं सिर्फ दो लाइन यहां पर पढ़कर सुनाना चाहूंगा. आर्टिकल 25 में यहां पर कहा गया है . It is about freedom of conscience and free profession, practice and propagation of religion. Sir, kindly note this point that the sentence itself starts with " Subject to public order, morality and health and to the other provisions of this Part, all persons are equally entitled to freedom of conscience and the right freely to profess, practice and propagate religion." Sir, so, the liberty and powers given under Article 25 of the Constitution of India is not absolute. It is linked with certain conditions subject to Public Order. The Act which is on the floor of the House, Sir, does not interfere into freedom of any religion, any sect or any tribe. More over, the hon. Member, Shri Kulkarni has referred to Article 245 and according to that Article the State Legislature has absolute freedom to legislate law independent of Parliament's guidance or any law made by the Parliament. Sir, I must appreciate one thing that the State of Maharashtra is very progressive State and it has taken a lead way back in the year 1998-1999 to formulate a Law for banning black magic, witchcraft etc. Sir, the State of Maharashtra is the first State that this Bill has come for discussion on the floor of the House and in the meanwhile, there is another State Chattisgarh, which has enacted a law

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

after the Bill, has been passed by the Maharashtra Legislative Assembly in December 2005. Hence, as per the provision of the Constitution, it is certainly not violatation of any Constitutional Law, our Constitution has given religious liberty to the citizens of our Country, and our Legislature is free to legislate on the subject of witchcraft.

..3......

15-12-2006 ( †ÃÖã¬ÖÖ×¸üŸÖ ¯ÖÏŸÖ / ¯ÖÏ×ÃÖ¨üßÃÖÖšüß ®®ÖÖÆüß )

KK-3

SRR/ KGS/ D/ KTG/ MAP/ 12:30

Shri S.Q. Zama ctd..

Sir, I would like to make another point. I have certain suggestion about this Law. In Para (1), (6), (7), (8) and (9), wherever the words "male (he)/ (his)" has been used, it should be added with the words of "she/her". It is very relevant. Sir, under this proposed Act, the Police Officer is to be nominated as a Vigilance Officer and they will be having absolute powers to put a curb on such activities. I would suggest that either making an amendment to this Bill or making provisions under the Rules, there should be a provision of a Review

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Committee. There are chances of misusing this absolute authority with the Vigilance Officers to investigate such activities. Sir, I request to the Govt. that there should be a provision of constituting a Review Committee at District Level and the State Level.

Thank you, Sir.

यानंतर श्री.गागरे...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सभागृहात महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयकासंबंधी आणि त्याच्या वैधतेसंबंधी चर्चा सुरु आहे. घटनेतील कलम 25 (2) अन्वये धर्मावर कायदा करता येईल का ? जर एखादी प्रथा धर्माची अंतर्गत बाब असेल तरीही कायदा करता येईल का ? जर ही प्रथा अमानवी, अमानुष आणि नितीमुल्ये जपणारी नसेल तर कायदा करता येईल का ? सती किंवा अस्पृषता यावर कायदा करता येईल का ? याबाबत या ठिकाणी बरीच चर्चा झालेली आहे. येथे व्यावृत्ती क्रमांक 13 वाचत असताना मला सभागृहाच्या हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, याठिकाणी कलम 13, कलम 13 असे वारंवार म्हटले जात आहे. वास्तविक पाहता, यास कलम 13 नाही तर या व्यावृत्तीस एक्सेप्शनल किंवा सिव्हील क्लॉज असे म्हटले जाते. कोणाच्याही मनात काही शंका असतील तर त्या दृष्टीने हा क्लॉज टाकलेला आहे. या क्लॉजमध्ये कोठेही पनिशमेंटसाठी तरतूद केलेली नाही. कायदयात या क्लॉजच्या संदर्भात शिक्षेसाठी तरतूद नाही तर एक्सेप्शनलमध्ये सूट देण्यासाठी हा कायदा केलेला आहे. या व्यावृत्ती 13 चा अन्वयार्थ काढत असताना व इंटरप्रिटेशन करीत असताना निगेटीव्ह इंटरपिटीशन केले जात आहे. प्रिझंम्शनवर आधारीत इंटरप्रिटेशन आपण करीत असून आपल्याला असे इंटरप्रिटेशन करता येणार नाही. या संपूर्ण बिलामध्ये धर्माच्या संबंधात उल्लेख आलेला नाही. धार्मिक विधीची तरतूद केल्यास बाधा पोहचत नसेल तर नियम लागू होत नाहीत. याचा अर्थ बाधा पोहचत असेल तर हा नियम लागू होतो, असा निगेटीव्ह अर्थ आपल्याला घेता येणार नाही.

या विधेयकामध्ये जे क्लॉजेस आहेत त्याच्याबाबत एक-एक बाब मला या ठिकाणी स्पष्ट करावयाची आहे. या विधेयकास "अधिनियम महाराष्ट्र जादूटोणा अनिष्ट प्रथा याचे समूळ उच्चाटन 2005" असे नाव दिलेले आहे. याबाबत अजून एक खुलासा आला आहे की, या विधेयकामध्ये 12 कलमे आहेत, ती वाचून मी आपला वेळ घेणार नाही. परंतु ती जर आपण वाचली नाहीत तर त्यातील कंटेन्ट्स काय आहेत हे आपल्याला समजणार नाही. 12 कलमे वाचायची नाहीत, 13 कलमच वाचावे असे येथे सांगितले गेले आहे. त्या कलमामध्ये सोयीप्रमाणे दोन अर्थ निघतात. आपण व्याख्येमध्ये असे म्हटलेले आहे की,

.....2

श्रीमती उषाताई दराडे.....(पुढे सुरु)

"जादूटोणा करणे अनिष्ट, अघोरी प्रथांचा अवलंब करणे याचा अर्थ एखाद्या व्यक्तीने अधिनियमात नमूद केलेल्या व वर्णन केलेल्या कृती करणे, इतरांकडून करुन घेणे, इतरांना करण्यास प्रवृत्त करणे" क्लॉज 12 मध्ये ज्या कृती असतील त्याच्या व्यतिरिक्त कोणत्याही कृतीमध्ये पनीशमेंट लागू होत नाही. सेक्शन 3(1) मध्ये प्रोव्हीबीट केलेले आहे व त्या अनुषंगाने पनीशमेंट दिलेली आहे. 2 मध्ये 3 (3) मधील अमेंडमेंटद्वारे शिक्षेची तरतूद केलेली आहे. माझे सबमिशन असे आहे की 246 (2), 246 (3) आणि 254 विधिमंडळ समवर्ती सूची क्र. 3 मधील विषयावर कायदा करु शकते. राज्य विधिमंडळ राज्य सूची क्रमांक 2 विषयावर कायदा करु शकते. या ठिकाणी एक ऑब्जेक्शन आलेले आहे की, या सूचीमध्येच हा विषय नाही आणि म्हणून हा कायदा करता येणार नाही. अशा प्रकारचा वादविवाद झाला तर त्याचा खुलासा मला करणे क्रमप्राप्त आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .........

ए.आय.आर.2003 सुप्रीम कोर्ट 1266 यामध्ये सिव्हील अपिल नंबर 5168/1998 असे बरेच सिव्हील ॲप्लीकेशन्स आहेत. त्यांचे नंबर घेऊन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. Welfare Association Maharastra and another, appellants V/s. Mr. Ranjit P Gohil and others, Respondents. सभापती महोदय, आपल्याला सूचितील सर्व शब्दांचा शब्दश: अर्थ काढता येणार नाही. खरे म्हणजे मला हे वाचण्याची परवानगी मिळावी. आम्ही सभागृहामध्ये 20-20 सायटेशन्स वाचलेले आहेत. पण जे कायद्याचे इंटरप्रिटेशन करणारे सायटेशन आहे. त्याबाबत या ठिकाणी बेसिकली प्रश्न निर्माण झालेला आहे की, ज्याला कलम 13 म्हटलेले आहे ते कलम 13 नाहीच आहे आणि मग हे त्यामध्ये बसते की नाही, असा नव्याने प्रश्न निर्माण होतो. मला वाचून दाखविण्याची परवानगी आहे काय ?

**सभापती** : तुम्हाला भाषणासाठी फक्त 4 मिनिटांचाच वेळ दिलेला आहे. तुम्ही ते पटलावर ठेऊ शकता.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मी हे कागदपत्र पटलावर ठेवते. It is necessary to examine the pith and substance of the Act and to find out if the matter comes substantially within an item in the List.

सभापती महोदय, कलम 25 मधील काही भाग मी आपल्याला वाचून दाखविते. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, समाज कल्याण व समाज सुधारणा तसेच हिंदू धार्मिक संस्था इतरांना खुले करण्याबद्दलचा कायदा आहे. राज्यसूचिमध्ये सार्वजनिक सुव्यवस्था असे म्हटलेले आहे. मग सार्वजनिक सुव्यवस्थेच्या व्याख्येमध्ये आपली 1 ते 12 कलमे येतात की नाही ? हे प्रथम तपासून पाहणे गरजेचे आहे. समवर्ती सूचिमध्ये सामाजिक सुरक्षा अशा प्रकारचा उल्लेख आहे. खरे म्हणजे या ठिकाणी 12 कलमातील सर्व सेक्शन्स समवर्ती सूचीला आणि राज्य सूचीला अभिप्रेत अशीच केलेली आहेत याचा या ठिकाणी खुलासा आहे. सुप्रीम कोर्टाचे सायटेशन या ठिकाणी साईट केले गेले त्यामध्ये असलेल्या सर्व प्रिंसिपल्सचा मी आदर करते. सर्व प्रिंसिपल्स आहेत I Here by accept all principles. त्या सर्व सायटेशनच्या फॅक्ट्स आणि या बिलाच्या फॅक्ट्समध्ये इतका डिफरंट आहे की, तो या बिलाला लागू करता येत नाही. म्हणून त्यावर जे केलेले भाष्य आहे ते

......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ......

या बिलाच्या संदर्भात आपल्याला घेता येणार नाही. या ठिकाणी असा उल्लेख झाला की, केंद्र किंवा राज्य शासन घटनेतील 7 व्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या विषयावरच विधिमंडळ कायदा करु शकते, या ठिकाणी मी आपल्याला सायटेशन दिलेले आहे. घटनेच्या कलम 25 (2), 26 आणि 29 यावर व्यापक चर्चा झाल्या. त्याविषयी कोणाचे अज्ञान आहे, असे मला म्हणावयाचे नाही. परंतु हे घटनेचे कलम सामाजिक न्याय अबाधित ठेवण्यासाठी आहे आणि आपण या ठिकाणी जादू टोणासारख्या अघोरी कृत्यांच्या विरोधात कायदा करीत आहोत. कोणत्याही धर्माच्या विरोधात कायदा करीत नाही. जेव्हा जेव्हा समाजामध्ये अस्तित्वात असलेले कायदे न्याय देण्यासाठी कमी ठरतात त्यावेळी आपण असे कायदे करावे लागतात व तसे आपण केलेले आहेत. आपण सती बंदीचा कायदा केलेला आहे, घरगुती अत्याचार प्रतिबंधक कायदा आपण केलेला आहे. एवढेच नव्हे तर दलितांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालता यावा म्हणून आय. पी. सी. अंतर्गत तरतूद असतांनाही ॲट्रॉसिटी ॲक्ट आपण स्वतंत्रपणे केलेला आहे. आय.पी.सी. असतांना आपण हे कायदे केलेले आहेत. सभापती महोदय, माझी सूचना अशी आहे की, या ठिकाणी कलम 13 चे जे इंटरप्रिटेशन केले गेले आहे ते चुकीचे केले गेले आहे. हा कायदा हिंदूंच्या भावनांना दुखविणारा नाही. हिंदू समाजाच्याच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्वच समाजातील अघोरी प्रथा काढून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आलेले हे विधेयक आलेले आहे आणि म्हणून या ठिकाणी जे ऑब्जेक्शन्स रेज केलेले आहेत ते अत्यंत चुकीच्या पद्धतीचे आहे. हा कायदा विधिवत आहे आणि हा कायदा मांडण्याचा देखील अधिकार आहे कारण तो समाजिक न्यायाला न्याय देणारा आहे, घटनेला धरुन आहे अशा प्रकारचे माझी सूचना आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, अघोरी रुढीचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने समाजात जागृती आणि जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता हे विधेयक आणण्यात आले आहे. या विषयासंदर्भात ज्या संवैधानिक अशा प्रकारच्या डायलेमा तयार करण्याचा पेचप्रसंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे तो चुकीचा आहे असे मला सांगावेसे वाटते. मी काही घटना तज्ञ ा नाही. परंतु तांत्रिक दृष्टया विचार केला तर घटनेच्या संदर्भात देखील समाजामध्ये सामाजिक स्वास्थ्य योग्य रहावे, चांगले रहावे, समाजामध्ये अनेक प्रकारच्या दुष्ट प्रथा, परंपरा दूर व्हाव्यात म्हणून अनेक प्रकारचे कायदे करण्यात आले. मग तो अस्पृश्यता निवारणाचा कायदा असेल, सतीची चाल बंद करण्याचा कायदा असेल......

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

केशवपनाचा असेल, विधवा-विवाहाचा असेल, मंदिर प्रवेशाचा असेल, असे अनेक प्रकारचे कायदे करण्यात आलेले आहेत. आर्टिकल 24(2) असूनही अशा प्रकारच्या अनेक सुधारणांसाठी कायदे करण्यात आलेले आहेत. त्यामुळे केवळ या विधेयकाला मनापासून विरोध नसूनही केवळ राजकीय अभिनिवेशाने, राजकीय दृष्ट्या याला अडविण्याचा प्रयत्न केला जातो आहे, घटनात्मक पेच टाकून अडविण्याचा प्रयत्न केला जातो आहे तो योग्य नाही. तसे पाहिले तर आमचे विरोधी पक्षनेता हे अतिशय पुरोगामी विचारांचे आहेत, तसेच विरोधी पक्षातील सर्वच आमचे मित्र देखील पुरोगामी विचारांचे आहेत, मग ते सन्माननीय सदस्य श्री.गडकरी असोत वा श्री.रावते असोत., असे असतानाही या विधेयकाला विरोध केला जातो आहे हे आम्ही समजू शकत नाही. सभापती महोदय, हे विधेयक 13 कलमासंबंधात आणण्यात आलेले आहे. केवळ यातील 12 कलमे आहेत त्यालाच हे लागू आहेत. म्हणजे ज्या अघोरी, अनिष्ट अशा प्रथा आहेत त्यांनाच हे लागू आहे. मग तो बौद्ध धर्माच्या बाबतीतील प्रथा असतील वा अन्य दुसऱ्या कोणत्याही धर्मातील असतील, त्यांना देखील हे लागू आहे. सुदैवाने बौद्ध धर्मामध्ये अशा कोणत्याही अघोरी प्रथा नाहीत त्याचा मला अभिमान वाटतो. सभापती महोदय, आज आमच्या देशातील, राज्यातील जनता अनिष्ट आणि अघोरी प्रथांना बळी पडत आहे. त्यासाठी आयपीसी कायदा लागू असूनही, आयपीसीमध्ये त्यासाठी अनेक प्रकारच्या तरतुदी असूनही त्यांना पूरक ठरतील असे अनेक कायदा केंद्र सरकारने तसेच राज्य सरकारांनी देखील आजवर केलेले आहेत आणि या विधीमंडळाला देखील असे कायदे करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे संवैधानिक विरोध करून या विधेयकाला अडविणे योग्य होणार नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सभापती महोदय, एडवर्ड बलवर या विद्वान तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे की, जगातील सर्व अतिहुशार, तीव्र बुद्धी असलेल्या डोक्यापेक्षाही प्रमाने भरलेले हृदय हे केव्हाही श्रेष्ठ असते. या राज्यामध्ये जी आमची गोरगरीब जनता आज अनिष्ट आणि अघोरी प्रथांना बळी पडत आहे त्यांना करूणने आणि प्रेमाने भरलेले हृदयच आधार देऊ शकते आणि तो आधार देण्याचाच हा एक प्रयत्न आहे. त्यामुळे या विधेयकाला कृपा करून आमच्या पुरोगामी मित्रांनी विरोध करू नये अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

***

...... एनएन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विषयी फार मोठा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे त्याबद्दल मला आपल्याला सांगावयाचे आहे. आपण त्यासाठी मला वेळ दिला आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मुळामध्ये हा कायदाच येथे अप्रस्तुत आहे. सभापती महोदय, आपल्या भारतीय घटनेमध्ये तीन लिस्टस् आहेत. एक राज्याची लिस्ट, दुसरी कंकरंट लिस्ट आणि तिसरी सेंट्रल लिस्ट. या कायद्यामध्ये जी कलमे आलेली आहेत ती मी काल रात्री बारकाईने वाचली आणि माझ्या लक्षात आले की, इंडियन पीनल कोड मध्ये जी कलमे आहेत त्याच कलमांची पुनरूक्ती या विधेयकामध्ये महाराष्ट्र सरकारने केलेली आहे. म्हणून माझा वैधानिक प्रश्न आहे की, जेव्हा आयपीसीमध्ये असलेल्या कलमांसारखीच कलमे महाराष्ट्र राज्य सरकारच्या कायद्यात आली तर आपल्या घटनेनुसार राज्य सरकारची ती कलमे रद्द होतात आणि केंद्रीय कायद्यातील कलमे श्रेष्ठ ठरतात, लागू ठरतात. तेव्हा केंद्रीय कायद्यातील कलमांचीच या कायद्यामध्ये पुनरूक्ती झालेली आहे त्यामुळे हा कायदाच नल ॲण्ड व्हाईड होतो. मी आपल्याला पुराव्यानिशी हे सांगतो. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... ओओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

सभापती महोदय, मी या कायद्यामधील सी.पी.सी. ची कलमे आपणास वाचून दाखवितो. माय लर्नेड फ्रेंड ॲड. मिस्टर गुरुनाथ कुलकर्णी, ॲड. उषाताई दराडे आपणास विनंती करतो की, माझे काही चुकत असेल तर आपण मला दुरुस्त करा. "मौल्यवान वस्तू, गुप्त धन, जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष कृत्य करणे" आय.पी.सी. कलम क्र. 299 " आणि जारणमारण अथवा देवदेवस्की यांच्या नावाखाली नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे,त्याकरिता प्रवृत्त करणे, अथवा प्रोत्साहन देणे" हे कलम 302, 117 मध्ये आहे. त्याचप्रमाणे "आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा अतिंद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करुन इतरांच्या मनात भीती निर्माण करणे वा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे" हे कलम 508 मध्ये आहे. आय.पी.सी. ॲक्टच्या कलमातील या तरतुदी असून आपण त्या तपासून घ्याव्यात. मी हे सर्व रेकॉर्ड आपणास देतो. सभापती महोदय, आय.पी.सी. कलम क्र. 494, 299, 302, 117 मांडली आहेत. या कलमांकरीता सदोष मनुष्य वध आहे., जन्मठेप आणि दंड हा दंड यामध्ये आहे. सभापती महोदय, कलम 302 खून हे कलम मुळातच आय.पी.सी. मध्ये आहे. कलम क्र. 117 मध्ये गुन्हा करणे आणि गुन्हा करण्यास प्रवृत्त करणे. गुन्हयाप्रमाणे फाशी आणि दंड आहे. मुळातच या तरतुदी आय.पी.सी. मध्ये आहेत.. त्याचप्रमाणे कलम 499, 508 मध्ये "आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा अतिंद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करुन इतरांच्या मनात भीती निर्माण करणे वा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे" याकरीता कलम 508 आहे. त्याचप्रमाणे दैवी प्रकोपाची भीती दाखविणे याकरिता एक वर्षाची शिक्षा अधिक दंड याची तरतूद आय.पी.सी. मध्ये आहे. "एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करणे, काळी विद्या करणे, भूत लावणे, मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आटवणे, असे सांगून त्या व्यक्तीबाबत संशय निर्माण करणे, त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकूनी आहे, रोगराई पसरल्यास कारणीभूत ठरणारी आहे, इत्यादी सांगून वा भासवून संबंधित व्यक्तीचे जगणे मुष्किल करणे त्रासदायक करणे वा कठीण करणे, कुठलीही व्यक्ती सैताना असल्याचे किंवा ती सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे" याबाबत आय.पी.सी. कलम 499 मध्ये तरतूद आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी...

सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना आव्हान देतो की, आजच्या अंधश्रध्देच्या कोणत्याही घटनेला आय.पी.सी. किंवा सी.आर.पी.सी. च्या आधारावर कारवाई करता येत नाही. अशी आपण एखादी घटना मला सांगितल्यास आपण मला सांगाल ते हरायला तयार आहे. म्हणजे केंद्र सरकारच्या आय.पी.सी. च्या कलमामध्ये तशी तरतूद आहे. पण प्रश्न इच्छाशक्तीचा आहे. नुसती भाषणे देऊन लोक पुरोगामी होत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज यांची नावे घेऊन दलितांबरोबर कसा व्यवहार करता हे आम्ही बघितले आहे. बोलण्याचा भाग वेगळा आहे, करण्याचा भाग वेगळा आहे. तुम्हाला करावयाचे असेल तर कायद्यातील तरतुदीनुसार आजही बंद करु शकता. सभापती महोदय, "जारणमारण, करणी किंवा चेटूक अथवा यांसारखे प्रकार केले या सबबीखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे, किंवा तिच्या रोजच्या व्यवहारावर बंदी घालणे" कलम क्र. 319 320, 322, 324...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये घटनात्मक तरतुदींवर गेली दोन दिवस आपण चर्चा करीत आहोत. माननीय सदस्यांनी याठिकाणी जेवढी आय.पी.सी. ची कलमे वाचून दाखविली आहेत ती मी वकिल नसतांना देखील माझी तोंडपाठ झाली आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी देखील कलमे वाचून दाखविली. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, एखादी गोष्ट सभागृहामध्ये वारंवार रिपिट होणार असेल तर ती आपण थांबविली पाहिजे...

(गोंधळ)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरीजी मी आपणास दोन मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडण्याची परवानगी दिली होती. त्याऐवजी आपण याठिकाणी सात मिनिटे घेतली. आपण आपले म्हणणे माझ्याकडे बघून मांडा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला याठिकाणी माझा मुद्दा मांडावयाचा आहे. "जारणमारण, करणी किंवा चेटूक अथवा यांसारखे प्रकार केले आहेत या सबबीखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे, किंवा तिच्या रोजच्या व्यवहारावर बंदी घालणे" यासाठी केंद्र सरकारचे सी.आर.पी.सी. अस्तित्वात असतांना त्याला काऊंटर चेक

DGS/ D/ MAP/

श्री. नितीन गडकरी...

करणारा दुसरा कायदा महाराष्ट्राच्या सरकारला करता येत नाही. सभापती महोदय, आपण माझे आर्ग्युमेंट ऐकून घ्यावे. हे कायदे मंडळ आहे. मला बिलावर बोलू दिले जात नाही. मला बिलावर बोलण्याचा अधिकार आहे.

(सत्ताधारी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरीजी मी माझा निर्णय देत असतांना तुम्ही ज्या पध्दतीने याठिकाणी सांगितले त्याची मला निर्णय देण्याच्या अनुषंगाने मदत होईल.

श्री.नितीन गडकरी : माझे ऑग्युमेंट वेगळे आहे, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे ऑर्ग्युमेंट वेगळे आहे. मला बोलू देणार नाही काय?

**सभापती** : आपण आपले म्हणणे एक मिनिटामध्ये संपविणार काय?

श्री. नितीन गडकरी : माय लर्नेड फ्रेंड ॲडव्होकेट श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण खाली बसा मी आपले दु:ख समजू शकतो. आपण कशाचे वकिल आहात?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो घटनात्मक मुद्दा याठिक्‌ाणी उपस्थित केला तोच मुद्‌दा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काल सभागृहामध्ये मांडला होता,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी (पुढे सुरू....

Sir, the argument made before the House is that as to whether this august House has got the jurisdiction to enact or legislate the particular Act? In my opinion, this House has got a right to legislate or enact the Act.

Shri Nitin Gadkari: Mr. Chairman, Sir, they have no right. There are legal provisions in the Criminal Procedure Code and Indian Penal Code. Hence, they have no right.

**सभापती** : गडकरीजी, मी आपल्याला बोलण्यासाठी याकरिता परवानगी दिली की, मी माझ्या निर्णयाप्रत येत असताना, आपण या ठिकाणी मांडलेला विचार किंवा मार्गदर्शन आहे, त्याचाही मला उपयोग व्हावा.

श्री.नितीन गडकरी : मला बोलण्यासाठी एक मिनिटाचा वेळ द्यावा.

**सभापती** : एक मिनिटामध्ये आपण संपविणार आहात काय ?

...(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)...

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.कपिल पाटील : मला बोलायचे आहे....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : कृपया मला बोलू द्यावे. मी सगळी कलमे वाचून दाखविली. माझा नवीन मुद्दा आहे. आपण मला वेळ दिला, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. Sir, there are three Lists in our Constitution. One is State List, Concurrent List and the Central List. Sir, the Indian Penal Code false under the Central List.

**सभापती** : मला सगळे समजले आहे.

श्री.नितीन गडकरी : मला बोलू द्यावे.

**सभापती** : आपण एक-दोन मिनिटामध्ये म्हणणे सांगून थांबणार होता. परंतु आपण सहा मिनिटे वेळ घेतलेला आहे. आपले सगळे मुद्दे मी ऐकून घेतलेले आहेत. मी निर्णय देत असताना...

श्री.नितीन गडकरी : आपला आदर ठेवून एक गोष्ट सांगतो.

**सभापती** : आता कशाकरिता सांगता ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बिलांच्या बाबतीतील विषय मी संपवीत आहे. मला माझे एक मिनिटामध्ये म्हणणे मांडू द्यावे.

**सभापती** : एक मिनिट म्हणता म्हणता सहा मिनिटे झाली. आता मी माझा निर्णय देत आहे.

श्री.नितीन गडकरी : आपण मला बोलू देत नाही. आपण म्हणत असाल तर मी खाली बसतो. या बिलावर आपण आमचे तोंड बांधून....

**सभापती** : या बिलाच्या संबंधात सदनाला आणि मला जे काही सांगायचे होते, ते सांगून झालेले आहे.

श्री.नितीन गडकरी : मी एक मिनिटामध्ये संपवितो.

**सभापती** : ठीक आहे. बोला.

श्री.नितीन गडकरी : या प्रस्तुत कायद्यामध्ये केंद्र सरकारचा आय.पी.सी. कायदा अस्तित्वात असल्यामुळे आणि कलमामध्ये रिपिटेशन असल्यामुळे, जेव्हा अशी स्थिती येते, तेव्हा सेंट्रल गव्हर्नमेंटचा कायदा ग्राह्य मानला जातो, राज्य सरकारचा मानला जात नाही. म्हणून हा कायदा अप्रस्तुत आहे, घटना बाह्य आहे म्हणून हे बील या ठिकाणी येऊ देऊ नये, असा माझा मुद्दा आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार बोलतील.

श्री. उल्हास पवार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,....

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : या विधेयकावरील चर्चेसाठी असणारा वेळ 11.30 ते 1.00 वाजेपर्यंत होता. या बिलाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे ऑन लेग आहेत. ही चर्चा मी या ठिकाणी आता थांबवित आहे. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दु. 1.15 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दु. 1.00 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**ॲण्टॉप हिल (मुंबई) येथील संगमनगर येथे एकतर्फी प्रेमातून तिला जिवंत जाळण्यात आल्याची घडलेली घटना**

**अल्पसूचना प्रश्न क्र. 24379** श्री. संजय दत्त : सन्माननीय उपमुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ॲण्टॉप हिल (मुंबई) येथील संगमनगर येथे एकतर्फी प्रेमातून एका 17 वर्षाच्या मुलीला 22/11/2006 रोजी वा त्या सुमारास तिच्या घरात घुसून तिच्याच घरातील रॉकेलचा कॅन तिच्या अंगावर ओतून तिला जिवंत जाळण्यात आल्याची भयंकर घटना घडली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या हैवान तरुणावर कडक कारवाई करण्याबाबत तसेच एकतर्फी प्रेमाच्या वाढत असलेल्या घटनांना आळा घालण्याबाबत शासनाने कोण्ती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणेतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आर.आर.पाटील** : (1) होय, मात्र सदर घटना दिनांक 18.11.2006 रोजी घडली आहे.

(2), (3) व (4) प्रस्तुत प्रकरणी फिर्यादी पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीनुसार वडाळा टी.टी. पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. 179/2006 भा.दं.वि.सं. कलम 307,302 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पीडित मुलगी औषधोपचार घेत असताना मृत्यू पावल्याने या गुन्हयात कलम 302 भादंवि वाढविण्यात आले आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्हयाचा अधिक तपास चालू आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अल्प सूचना प्रश्न क्रमांक 24379...)

श्री. संजय दत्त : अशा प्रकारच्या घटना ॲण्टॉप हिल परिसरामध्ये सतत घडत असतात. माझे दोन प्रश्न आहेत. या घटनेमध्ये बळी ठरलेल्या मुलीने मृत्यूपूर्वी दिलेली जबानी काय आहे ? आणि दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबईतील ॲण्टॉप हिल या भागामध्ये यापूर्वीही अशाच प्रकारच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे हा भाग सेन्सेटिव्ह झोन म्हणून डिक्लेअर करुन त्याबाबत शासन विशेष उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : या भागामध्ये पूर्वी किती घटना घडलेल्या आहेत याची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु आता घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. शेवटचा जो जबाब दिलेला आहे तो याप्रमाणे - "माझे तुझ्यावर प्रेम आहे. माझ्या प्रेमास होकार दे".... त्या मुलीने नकार दिल्यानंतर जवळच असलेल्या कॅन मधील रॉकेल ओतून तेथेच असलेल्या आगकाडीने तिला आग लावण्यात आली. हा जबाब 21 तारखेला दिला. घटना 18 तारखेला घडली. त्या मुलीने पहिला जबाब असा दिला की, स्टोव्हचा भडका होऊन मी भाजले. पण या प्रकरणी पोलिसांनी शेवटी दिलेला जबाब - डाईंग डिक्लरेशन - ग्राह्य धरुन 302 कलमाखाली गुन्हा रजिस्टर केलेला आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता दिनांक 21 जुलै 2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 17596 घेण्यात येईल.

**मुंबई उपनगरातील बीयर बार, पब व डिस्कोथेक यांना दिलेल्या मनोरंजनाच्या परवान्याबाबत**

**(३) * १७५९६ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरात सुरु असलेल्या बीयर बार, पब व डिस्कोथेक यांना देण्यात आलेल्या मनोरंजनाच्या परवान्याबद्दल व मनोरंजनकराबद्दल माहिती मिळविण्यासाठी विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडून दिनाक १ मार्च, २००६ व दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना निवेदने दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणत्या स्वरुपात कारवाई करण्यात आली आहे,

(३) कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक ०९.०६.२००६च्या पत्रान्वये करमणूक शुल्क वसुली व चुकवेगिरीची प्रकरणे याबाबतची माहिती विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांना सादर केली होती. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दिनांक ०१.०३.२००६च्या पत्रात नमूद केलेले अन्य मुद्दे (क्रमांक ७,८ व ९) हे परवाना प्राधिका-यांशी संबंधित होते. उदा - बृहन्मुंबई मध्ये बीयर बार, डिस्कोथेक, पब इत्यादिंना परवाने देणे, परवाने रद्द करणे इत्यादी. तसेच, बृहन्मुंबई मध्ये करमणुकीच्या उक्त प्रकारांसाठी अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर हे परवाना प्राधिकारी नसल्याने त्यांनी विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांना त्यांच्या दिनांक ०१.०३.२००६च्या पत्रातील मुद्दा क्रमांक ७ व ९ बाबत संबंधित परवाना प्राधिकारी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व मुद्दा क्रमांक - ८ बाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून माहिती प्राप्त करुन ती विरोधी पक्षनेता यांना दिनांक ०१.०९.२००६ व दिनांक ०७.१०.२००६ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( ता.प्र.क्र. 17596...)

श्री. पांडुरंग फुंडकर : डिस्कोथेक, बियर बार आणि पब यांना परवानगी देण्याच्या आणि त्यांच्याकडून वसूल करावयाच्या कराच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. मुंबईमध्ये अशा प्रकारचे एकूण 60 क्लब आहेत. अशा क्लबकडून मनोरंजन कराची वसुली केली जाते. परंतु केवळ 60 पैकी 18 क्लबकडूनची ही मनोरंजन कराची वसुली केली जाते. 18 क्लबकडून 2001-02मध्ये 12 कोटी 43 लाख 815 हजार रु., 2002-03मध्ये 2 कोटी 81 लाख 54 हजार रु., अशा प्रकारे 2005-06 पर्यन्त 14 कोटी रु. कराची वसुली केलेली आहे. मुंबईतील 60 क्लबपैकी फक्त 18 क्लबकडून कराची वसुली केली जाते. उर्वरित क्लब हे अवैधरीतीने चाललेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ D/ 13:20

ता.प्र.क्र.17596............ श्री.पांडुरंग फुंडकर...

मनोरंजन कर चुकविणे आणि विनापरवाना अशा प्रकारचे पब, डिस्कोथेक चालवून लाखो रुपयांचा कर बुडविला जात आहे. या 60 पैकी 18 पब व डिस्कोथेकना वगळून जे अनधिकृत पब व डिस्कोथेक, बिअर बार चालविले जात आहेत त्यांच्याकडून कर वसुलीसंबंधी शासन काय कारवाई करणार आहे?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागच्या अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला असताना आपण तो राखून ठेवल्यानंतर तो महसूल विभागास प्राप्त झालेला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे या संदर्भात निवेदन दिले, तक्रार केली त्यामधील माहितीच्या संदर्भात हा प्रश्न आहे. मागील काळात प्रश्न विचारला असताना अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या मुद्यांच्या संदर्भात माहिती मागवली असल्यामुळे ती दिली नव्हती. आता या प्रश्नाच्या अनुषंगाने पब व डिस्कोथेकच्या संदर्भात पूर्णपणे माहिती दिली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या संदर्भात कर चुकविला जातो, टॅक्स भरला जात नाही अशा सर्व पब व डिस्कोथेक, बिअर बारची पुन्हा ताबडतोब चौकशी केली जाईल आणि टॅक्स भरला जात नसेल तर कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : मी मंत्रीमहोदयांना यादी द्यायला तयार आहे. जर आम्हाला माहिती मिळू शकते तर शासनाला का मिळू शकत नाही? वर्षानुवर्षे पब व डिस्कोथेक, बिअर बार शासनाचा कर चुकवित आहेत. पंचतारांकित हॉटेल्स कर चुकवित आहेत. त्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. मी यादी द्यायला तयार आहे. ज्यांनी परवाना घेतला नाही, अवैधरित्या बार चालवित आहेत व लाखो रुपयांचा कर चुकवित आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडे जी यादी आहे ती त्यांनी माझ्याकडे द्यावी. येत्या 15 दिवसात ताबडतोबीने चौकशी करुन कायदेशीर कारवाई केली जाईल आणि टॅक्स चुकविला जात असेल तर त्याची वसुली सुध्दा केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 17596.....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली माहिती अतिशय गंभीर आहे. त्यांनी सांगितले की, 60 पैकी फक्त 18 पब व डिस्कोथेक वैधरित्या चालत आहेत. परंतु मी त्यापेक्षा अधिक विनापरवाना चालत असलेल्या पब व डिस्कोथेकची नावे सांगू शकतो. मुंबईच्या संस्कृतीचा तो एक भाग झाला आहे असे सन्माननीय माजी सदस्य श्री.प्रमोद नवलकर म्हणत असत. 60 पैकी 48 पब व डिस्कोथेक मुंबईमध्ये विनापरवाना सुरु आहेत. ते मनोरंजन परवाना न घेता चालत असतील तर ते किती वर्षापासून सुरु आहेत, त्यांनी तेवढया वर्षाचा कर भरला नसेल तर ते पब व डिस्कोथेक येत्या 15 दिवसात बंद करण्याची नोटीस दिली पाहिजे. जर विनापरवाना असे प्रकार चालू असतील तर त्याचा अर्थ असा होतो की, ते सरकारला जुमानत नाहीत. त्यांना सरकारच्या अस्तित्वाची जाणीव होईल अशी ठोस कारवाई केली जाईल का?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबईतील जे जे पब, डिस्कोथेक विनापरवाना चालत आहेत, ज्यांनी ज्यांनी कर चुकविला असेल, टॅक्स चुकविला असेल त्या सगळयांची चौकशी केली जाईल आणि ताबडतोबीने त्यांना नोटीस देऊन केलेल्या कारवाईचा अहवाल सुध्दा पटलावर ठेवला जाईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर व उत्तन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेकडे हस्तांतर करण्याबाबत**

**(१) * २०६१४ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे : दिनांक २१ जुलै, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकीत प्रश्नोत्तराच्या १८ व्या यादीतील प्रश्न क्रमांक १७७३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्र, भाईंदर व प्राथमिक आरोग्य केंद्र उत्तन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा महानगरपालिकेच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, निर्णय झाला नसल्यास वा कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विमल मुंदडा** : (१) होय.

(२) ग्राम विकास विभागाच्या दिनांक २० जुलै, १९९९ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक १४.११.२००६ पासून ६ आठवड्यांच्या आत सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा व इमारतींचे हस्तांतर करावे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधितांकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मिरा-भाईंदरची लोकसंख्या 8 लाखाच्या आसपास आहे. अलिकडेच मुंबईच्या लोकल रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट होऊन जे जखमी झाले त्यांच्यावर उपचार करण्यासाठी भाईंदर येथे अद्ययावत रुग्णालय नसल्यामुळे त्यांना इतरत्र हलविण्यात आले. उत्तरामध्ये म्हटले आहे की, 20 जुलै, 1999 रोजी प्रा.आ.केंद्र हस्तांतर करण्यासंबंधी जी.आर.काढण्यात आला आहे. या संदर्भात पूर्वी नगरपालिका व महानगरपालिकेने प्रस्ताव दिलेला असताना सुध्दा..........

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 20614** .........

श्री. संजय दत्त ....

या जी.आर.ची अंमलबजावणी का करण्यात आली नाही याचा खुलासा माननीय मंत्रीमहोदय करतील काय? तसेच उत्तरात असे म्हटले आहे की, दिनांक 14.11.2006 पासून 6 आठवडयाच्या आत सदर प्राथमिक आरोगय केंद्राची जागा व इमारतींचे हस्तांतर करावे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे हस्तांतरणाची निश्चित तारीख माननीय मंत्रीमहोदय सांगतील काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, उत्तान किंवा मिराभाईंदर महानगर पालिकेतील जागा ही ग्रामविकास विभागाची असून जिल्हा परिषदेच्या ठरावानुसार जिल्हा परिषदेशी चर्चा करुन आमच्या प्राथमिक आरोगय केंद्रास मिळण्यासाठी एक पीआयएल दाखल करण्यात आले होते. यासंदर्भात सचिव आरोग्य, नगरविकास व ग्रामविकास विभागाच्या सचिवांची बैठक होऊन निर्णय घेण्यात आला. ग्राम विकास विभागाच्या दिनांक 20 जुलै, 1999 च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक 14.11.2006 पासून 6 आठवडयाच्या आत सदर प्राथमिक आरोगय केंद्राची जागा व इमारतींचे हस्तांतर करावे असा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी ठाणे यांना प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा व इमारतींचे मुल्यांकनांच्या संदर्भात जी रक्कम आहे ती अदा करण्यास सांगितले आहे. तसेच महापालिकेची लोकसंख्या विचारात घेता त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधावे असे सांगितले आहे. तसेच यासंदर्भातील निर्णय सहा आठवडयाच्या आत द्यावयाचा आहे. त्यामुळे यासंदर्भात उच्च न्यायालयाने जे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे लवकरात लवकर काम करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या ठिकाणच्या रुग्णालयाचा प्रश्न गेल्या 20 वर्षापासून प्रलंबित आहे. ठाणे जिल्हा परिषदेने या रुग्णालयाच्या हस्तांतरणासाठी महानगरपालिकेडून 7 कोटी रुपयांच्या भरपाईची मागणी केलेली आहे. परंतु ही भरपाई देण्यात महानगरपालिका सक्षम नसल्यामुळे हस्तांतरण खोळंबलेले आहे. यासंदर्भात म्हात्रे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती व त्यानुसार उच्च न्यायालयाने यासंदर्भातील निर्णय दिलेला आहे. त्यामुळे दिनांक 20 जुलै, 1999 च्या जी.आर.प्रमाणे शासकीय दराप्रमाणे हस्तांतरण त्वरीत करण्यात येईल काय? तसेच जिल्हाधिका-यांनी जे मुल्यांकन केलेले आहे ते किती रुपयांचे आहे?

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, हे खरे आहे की, जिल्हा परिषदेने यांसदर्भातील निर्णय 2003 मध्ये घेतला होता परंतु आमचे प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच त्या ठिकाणचा स्टाफ प्राथमिक सोयी सुविधा जनतेला पुरवित असतो. सभापती महोदय, जिल्हाधिका-यांनी किती मुल्यांकन केलेले आहे यासंदर्भातील माहिती माझ्याकडे सद्या उपलब्ध नाही. यासंदर्भात जिल्हाधिका-यानी मुलयांकन करावे यासंदर्भात आरोग्य सचिवांनी सांगितल्याप्रमाणे ठराव घेतलेला आहे. या ठिकाणी 200 खाटाच्या रुग्णालयासाठी 6 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे व तशा प्रकारचे पत्रक महापालिकेच्या आयुक्तांना दिलेले आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, 14.11.2006 पासून सहा आठवडयाची मुदत उच्च न्यायालयाने दिलेली आहे. आता ही मुदत देऊन जवळपास एक महिना उलटला आहे. त्यामुळे यासंदर्भातील मुल्यांकन झाले नसेल तर हे मुल्यांकन केव्हा होणार आहे?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या संदर्भात कलेक्टरांना सूचना देण्यात आलेल्या असून 8 दिवसात यासंदर्भात योग्य तो निर्णय होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयामुळेच आपल्याला या यासंदर्भात निर्णय घ्यावा लागलेला आहे. यासंदर्भात कोर्टाचा निर्णय झाल्यामुळे आपल्याला तो बंधनकारक आहे. जमिनीचे हस्तांतरण करतांना असा निर्णय घेण्यात आला असे आपण म्हटले आहे. या ठिकाणी आपण जे ऊत्तर दिलेले आहे ते चुकीचे उत्तर आहे. त्यामुळे उत्तरात दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात कोर्टाचा निर्णय नसता तर आपण या विषयाच्या संदर्भात निर्णयच घेतला नसता. तसेच 7 कोटी रुपये जागा हस्तांतरणासाठी लागणार असून त्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध होतील का? प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी जी साधनसामुग्री लागते ती या ठिकाणी आहे का?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MHM/ 13:20

ता.प्र.क्र. 20614....

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ज्या सोयीसुविधा लागतात त्या उपलब्ध आहेत. आमच्याकडे कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र हे स्थानिक स्वराज्य संस्था किंवा जिल्हापरिषदेच्या निधीतून बांधण्यात यावेत. अशाप्रकारची पॉलिसी सुरु करण्याचा आमचा विचार सुरु आहे. जर महानगरपालिका हॉस्पीटल सुरु करत असेल तर चांगली गोष्ट आहे. शेवटी आपण लोकांच्या हितासाठी, त्यांच्या सुविधेसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देत आहोत. महानगरपालिकेने 200 खाटांचे अद्ययावत हॉस्पीटल बांधू अशाप्रकारचे कमिटमेंट दिलेले आहे. त्यामुळे जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी ग्राम विकास विभागाबरोबर दोन-तीन बैठका झ ालेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, इन्फ्रास्ट्रक्चर आहे काय ? तर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, विनामूल्य हॉस्पीटल बांधून ते शासनास देण्यास तयार आहोत अशाप्रकारचे प्रस्ताव अनेक नगरपालिकांनी सादर केलेले आहेत. उदाहरण सांगावयाचे झाले तर नंदूरबार जिल्ह्यातील शहादा नगरपालिकेने हॉस्पीटलची इमारत बांधून शासन स्तरावर त्याठिकाणी ग्रामीण रुग्णालय सुरु करावे यासाठी डी.पी.डी.सी.मध्ये एक ठराव देखील केलेला आहे. परंतु त्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. नगरपालिका शासनाला विनामूल्य दवाखाने द्यायला तयार आहेत. तेव्हा शासन त्याठिकाणी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देईल काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, एक महानगरपालिका हॉस्पीटल परत घ्या असे सांगत आहे, याठिकाणी ग्रामविकास मंत्री उपस्थित आहेत. जिल्हापरिषदेच्या वा ग्रामपंचायतीच्या ज्या विविध योजना आहेत त्याचा लाभ लोकांना मिळावा हाच आपला उद्देश आहे. ग्राम विकास विभाग आणि आरोग्य सचिवांनी एकत्र बसून निर्णय घ्यावयाचा आहे. महानगरपालिका 200 खाटांचे अद्ययावत रुग्णालय बांधून ते आपल्याकडे हस्तांतरीत करण्यासाठी तयार आहे.यासंबंधातील निर्णय घेण्याचे आपल्यावर सोपविलेले असल्यामुळे हा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय ग्रामविकास विभाग आणि नगर विकास विभागाच्या संमतीने झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छिते की, ग्रामीण रुग्णालय शहादा बाबत विचार करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20614........

श्री.एम.ए. अझीज : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक दिवसांपासून रखडला होता. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, हे हॉस्पीटल सुरु होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, महानगरपालिकेने 200 खाटांचे अद्ययावत रुग्णालय बांधू असे सांगितलेले आहे. आपण फक्त त्यांना जमीन उपलब्ध करुन देणार आहोत. हस्तांतरणाची प्रक्रिया व्यवस्थितपणे केली जाईल. महानगरपालिका आयुक्तांवर जबाबदारी सोपविण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20614....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी माननीय ग्रामविकास मंत्री व आरोग्य मंत्री उपस्थित आहेत. याठिकाणी सरकार कोणाचे जरी असले तरी गरीब लोकांना उत्तम सेवा मिळत नाहीत. आपल्या हॉस्पीटलमध्ये पुरेसा स्टाफ नसतो, इतरही सेवा नसतात. याठिकाणी माझी अशी मागणी आहे की, आपले हॉस्पीटल जर चॅरिटेबल ट्रस्टला दिले तर ते लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देऊ शकतील. आपल्याकडे सिध्दी विनायकसारख्या, शिर्डी ट्रस्टसारख्या मोठमोठया ट्रस्ट असून त्या जर याबाबतीत पुढे येऊन काम करणार असतील तर त्यांना आपण ही हॉस्पीटल चालविण्यासाठी देऊ शकता. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे उपस्थित आहेत, त्यांच्या हॉस्पीटलमध्ये बसेसची सोय आहे. त्या बसेसच्या माध्यमातून खेडयामध्ये फ्री ऑफ कॉस्ट सेवा पुरविली जाते. ही माणसे चांगली आहेत, सेवाही चांगल्या आहेत. त्यामुळे आपण अशी हॉस्पीटल्स् जर सेवाभावातून अशा संस्थांना दिली तर त्यातून आपला खर्चही कमी होऊ शकतो व तो पैसा आपण आदिवासी, दूर्गम भागामध्ये वापरु शकतो. त्यामुळे तशाप्रकारचे धोरण आखण्यासंबंधी ग्रामविकास विभाग व आरोग्य विभाग काही विचार करणार का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय चांगली आहे. परंतु हा विषय जमीन हस्तांतरणासंबंधीचा असून त्याठिकाणी जे 200 खाटांचे हॉस्पीटल महापालिका करणार आहे. त्यांनीच ती सेवा द्यायची आहे. हॉस्पीटल ट्रस्टला द्यावयाचे की नाही याबाबतीत महापालिकाच निर्णय घेऊ शकते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, गरिबांना सेवा देण्याच्या दृष्टीने ज्या संस्था पुढे येतील त्यांना आपण अशी हॉस्पीटल्स् दिली पाहिजेत, असे मला वाटते. यातून आपलाही आर्थिक भार कमी होणार आहे. यातील उरलेला पैसा आपण आदिवासी भागातील, गडचिरोली सारख्या भागातील लोकांसाठी उपयोगी आणू शकता. त्यामुळे याबाबतीत आपण निर्णय घेणार का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, अशाप्रकारच्या ग्रामीण आरोग्य केंद्राचा पार्ट हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनमध्येही आहे. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, ती निश्चितच स्वागतार्ह आहे. याबाबतीत आम्ही पुढील काळात विचार करु.

---------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पालघर (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये**
**मुलभूत सोयी सुविधाचा अभाव असल्याबाबत**

**(२) * २०३३८ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सोयी सुविधाचा अभाव असल्याबाबत अनेक संघटनांनी तसेच अनेक स्थानिक प्रतिनिधींनी पालघर नगर परिषद, पंचायत समिती व तहसिलदार यांना लेखी निवेदने देवून व प्रत्यक्ष भेटून सुध्दाही कोणत्याच प्रकारची कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नंतर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही वा मुलभूत सुविधा दिल्या नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता :** (१), (२) व (३) पालघर तालुक्यात एक सहकारी औद्योगिक वसाहत असून परंतु पालघर नागर पालिका क्षेत्रामध्ये ८ खाजगी औद्योगिक वसाहती आहेत. खाजगी औद्योगिक वसाहतीत मुलभूत सोयीसुविधांचा अभाव असून याबाबत येथील उद्योग घटकांनी नगरपरिषद कार्यालयावर मोर्चाही नेला होता. तसेच त्याबाबतची निवेदनेही तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालयाना दिलेली होती. तसेच या संदर्भात पालघर औद्योगिक वसाहत संघटना, पालघर यांनी त्यांच्या क्षेत्रात मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबतचे निवेदन दिले होते. माननिय जिल्हाधिकारी यांनी संबंधीत प्रशासकिय प्राधिकारीसोबत बैठक घेतली होती व मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी संबंधीतांना सूचना दिल्या होत्या.

(४) मुलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधीत नगरपालिका व ग्रामपंचायत यांची आणि खाजगी औद्योगिक वसाहतीबाबत अशी संस्था स्थापन करणाऱ्या विकासकांची आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, वेळोवेळी निवेदने देऊनही आंदोलकांना सुविधा न पुरविण्याची कारणे काय ? व जिल्हाधिकारी यांनी संबंधित प्रशासकीय प्राधिका-यांसोबत जी बैठक घेतली त्यामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासंबंधी ज्या सूचना केल्या होत्या, त्याची अंमबजावणी करण्यात आली का ?

..3....



SSP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.अजित.. 13:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20338...

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे की, या औद्योगिक वसाहती हया खाजगी आहेत. त्यामुळे त्याठिकाणी शासनाने सुविधा द्याव्यात असे अपेक्षित नाही. तरीही याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी नगरपरिषदेच्या व पंचायत समितीच्या अधिका-यांची बैठक घेतली होती. त्यामध्ये नगरपरिषदेचे असे म्हणणे आहे की, या उद्योगाकडे जवळपास 144 लाख रुपये डयू आहेत, ही रक्कम उपलब्ध करुन दिली तर निश्चितपणे सुविधा पुरविण्याचे काम करता येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उद्योग वसाहती निर्माण करण्याच्या दृष्टीने झोन निर्माण केले, त्यादृष्टीने अनेक ठिकाणी उद्घाटनेही झालेली आहेत. परंतु कुठल्याही औद्योगिक वसाहतीमध्ये एकही कारखाना वा कोणत्याही प्रकारची सुविधा देण्यात आलेली नाही. नंदूरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. त्याठिकाणी एमआयडीसीचे उद्घाटन करण्यात आले, परंतु अजूनही त्याठिकाणी कुठल्याही प्रकारची सुविधा वा सेवा देण्यात आलेली नाही, साधे ले-आऊटही तयार झालेले नाही. यासंदर्भात कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, शासनाचे उद्योग पॉलिसीचे धोरण जाहीर झालेले आहे. त्यामध्ये आपले असे प्रयत्न आहेत की, जो अविकसित भाग आहे, त्याठिकाणी उद्योगांना आकर्षित करणे. त्यामध्ये हाच मुख्य उद्देश आहे. मेगा प्रकल्पाच्या व्याख्येमध्ये थोडासा बदल आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KTG/ KGS/ प्रथम श्री.पुरी....... 13:40

**ता.प्र.क्र.20338**...........

राणा जगजितसिंह पाटील............

मेगा प्रोजेक्टची डेफिनेशन आपण बदलली असून आता 100 कोटी रुपयांची गुंतवणूक करणा-या कंपन्यांना देखील मेगा प्रोजेक्टचे स्टेटस देण्यात येणार आहे. 250 लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणा-या उद्योगांनाही मेगा प्रोजेक्टच्या सुविधा देण्यात येणार आहेत. आम्हाला अशी खात्री आहे की, 10 जिल्हयामध्ये नवीन उद्योग निश्चितपणे येतील. तसेच ॲग्रो इंडस्ट्रिजवर शासनाने जास्त प्रमाणात फोकस करण्याचे ठरविले असून त्यांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हयाच्या ठिकाणी व ग्रामीण भागात ॲग्रो इंडस्ट्रिज डेव्हलप होतील. ज्या एमआयडीसी तशाच पडून आहेत त्या ठिकाणी उद्योग येतील. ॲग्रो इंडस्ट्रिजसाठीची पॉलिसी येत्या एक महिन्यात जाहीर होईल अशी शक्यता आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, औद्योगिक वसाहतींमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितले. सद्य:स्थितीत अनेक उद्योग डबघाईला आलेले आहेत. उद्योगांकडे जी थकित रक्कम आहे ती ते आज ना उद्या भरणार आहेत. परंतु, त्यांना काही अटींच्या अधीन राहून सवलत देऊन मुलभूत सुविधा पुरविणार काय ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी पालघर औद्योगिक वसाहतीला 8/9 महिन्यांपूर्वी भेट दिली होती व तेथील उद्योजकांशी चर्चाही केली होती. त्यांना मी अशी सूचना केली होती की, जवळपासच्या परिसरात जर नवीन औद्योगिक वसाहत स्थापन केली तर त्या ठिकाणी तुम्ही जाण्यास तयार आहात काय ? या उद्योजकांनी ही सूचना मान्यही केली आहे. त्या परिसरात नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या ठिकाणी जे उद्योग व्यवसाय चालतात ते अतिशय चांगल्या पध्दतीने चालत असून काही उद्योजक आपला माल निर्यातही करीत आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, येथील असुविधांमुळे, रस्त्यांच्या परिस्थितीमुळे क्लायंटस्ना बोलाविण्यात मर्यादा पडते, कदाचित ऑडर्स कॅन्सल होण्याची शक्यता असते. या बाबींचा विचार करुन पालघरच्या जवळपास नवीन औद्योगिक वसाहत निर्माण करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20338**...........

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मुलभूत सुविधाबाबत मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. या ठिकाणी काही कारखाने चांगले चालतात. पण त्या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. तेथील उद्योगांच्या दुषित पाण्यामुळे पिण्याचे व शेतीचे पाणी दुषित झाल्याबाबत गावक-यांच्याही तक्रारी आहेत व यासंबंधी एक निवेदन त्यांनी जिल्हाधिका-यांना दिलेले आहे. यासंदर्भात विभागाने संबंधित उद्योगांविरुध्द कारवाई केली आहे का ? किती कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे ? आणि शासन याबाबत कोणती उपाययोजना करणार आहे.

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**व्यवसायोपचार व भौतिकोपचार वैद्यकीय शाखेच्या**
**विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३) * २०६२९ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसायोपचार व भौतिकोपचार वैद्यकिय शाखेच्या विद्यार्थ्यांच्या मागण्या गेल्या अनेक वर्षापासून शासन स्तरावर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, व्यवसायोपचार व भौतिकोपचार विद्यार्थी व अंतरवासीता संघटना, नागपूर यांच्या वतीने दिनांक १२ सप्टेंबर, २००६ रोजी मंत्री, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त संघटनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही, काही मागण्या मान्य करण्यात आल्या असून इतर काही मागण्यांबाबत विचार सुरु आहे.

(२) १) स्वतंत्र राज्य परिषद कार्यान्वित करण्याबाबत,

२) व्यवसायोपचार व भौतिकोपचार तज्ञांना वर्ग-२ चा दर्जा व पदोन्नतीची संधी मिळण्याबाबत.

३) जिल्हा आणि तालुका पातळीवर व्यवसायोपचार व भौतिकोपचार तज्ञांचे नवीन पद निर्माण करुन, रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत.

(३) दिनांक १९ नोव्हेंबर, २००६ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) व (५) प्रश्न उपभाग २ पुढील उत्तरात दर्शविलेल्या मागण्यांपैकी क्र.१ च्या मागणीच्या अनुषंगाने भौतिकोपचार व व्यवसायोपचारकांची नोंदणी करण्याकरीता राज्याने कायदा केला असून कायद्यातील तरतुदीनुसार नियम बनविण्याची कार्यवाही सुरु आहे. क्र.(२) व (३) च्या मागण्यांबाबत विचारविनिमय सुरु आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, स्वतंत्र राज्य परिषद कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने सन 2004 मध्ये घेतला आहे. तेव्हा, ही परिषद कार्यान्वित करण्याची कार्यवाही का करण्यात येत नाही ? दुसरा प्रश्न असा आहे की, बिहार, दिल्ली, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये व्यवसायोपचार व भौतिकोपचार तज्ञांचे पद वर्ग 2 चे करण्यात आले आहे. महाराष्ट्रात या पदाला हा दर्जा केंव्हा देणार ? ही जी पदे भरण्यात आलेली आहेत त्या पदांना मान्यता देण्याबाबतचा निर्णय कधी घेण्यात येईल ? मी गेल्या 5 वर्षांपासून हा मुद्दा सभागृहात उपस्थित करीत आहे. आज याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

..4............



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20629...........**

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन 2004 मध्ये स्वतंत्र राज्य परिषद कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. सन 2005 मध्ये त्याप्रमाणे आपण कायद्यात दुरुस्ती आणली. त्यानंतर परिषद गठीत करण्याबाबतची प्रक्रिया सुरु झाली. यासंबंधीचे नियम तयार करावयाचे होते, यासाठी विधि व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला, त्यांनी 8 ते 10 महिन्यात 150 पानांचे रुल्स तयार करुन दिले. या रुल्सना वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते त्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, 6 तारखेला नागपूरमध्ये सर्व प्रतिनिधी, विभागाचे प्रधान सचिव तसेच कार्यकारी संचालक यांच्याबरोबर बसून मी चर्चा केली आहे.

यानंतर श्री.बोरले.............

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20629**.........

श्री.सुरेश शेट्टी ........

त्यामध्ये असा निर्णय घेण्यात आला की, त्यांच्या ऑफिससाठी जागा लागेल, त्यांना इलेक्शन कंडक्ट करण्यासाठी फंड अलोकेट करावा लागेल, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मेंबरची एन्रोलमेंट करावी लागेल आणि त्यानंतर इलेक्शन कंडक्ट करण्यासाठी कॉम्पिटंट ॲथॉरिटी नेमावी लागेल. त्या मिटींगमध्ये पॉईंटवाईज डिस्कशन करुन असे ठरले की, तीन महिन्याच्या आत आपण कौन्सिलची निवडणूक घेणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याचे हे उत्तर आहे. तीन महिन्याच्या आत त्यांना ऑफिस देण्याचा निर्णय झालेला आहे. त्यांना फंड किती लागेल याचे वर्क आऊट सुरु आहे. तीन महिन्याच्या आत निवडणूक होईल आणि नवीन कौन्सिलची स्थापना करण्यात येईल. दुसरा प्रश्न रिक्त जागांसंदर्भात विचारण्यात आला. डायरेक्टर, मेडिकल एज्युकेशनमध्ये 13 जागा रिक्त आहेत. पण रिक्रूटमेंटवर हायकोर्टाने स्टे दिलेला आहे. कोर्टाचा निकाल लागल्यानंतर आम्ही ताबडतोब भरती करुन घेणार आहोत. डायरेक्टर, हेल्थ सर्व्हीसेसमध्ये ज्या जागा रिक्त आहेत त्या भरण्याची प्रक्रिया सुरु आहे अशी माहिती विभागाकडून मिळालेली आहे. मला असे वाटते की, ते सुध्दा लवकर होईल. कोर्टाने स्टे उठविल्यानंतर आपण प्रोसेस सुरु करु. तोपर्यंत आपल्याला काही करता येणार नाही. तिसरा प्रश्न ग्रेडसंबंधी उपस्थित करण्यात आला. त्यांना ग्रेड-3 मधून ग्रेड-2 मध्ये अपग्रेड करण्यासाठी आम्ही मिटींगमध्ये असा निर्णय घेतला की, प्रिंसिपल सेक्रेटरी, मेडीकल एज्युकेशन आणि सेक्रेटरी, हेल्थ या दोघांची समिती नेमलेली आहे आणि त्यांना सांगण्यात आले आहे की, कौन्सिलची स्थापना होण्यापूर्वी आम्हाला निर्णय द्यावा की आम्ही यांना कशा प्रकारे मदत करु शकतो. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, ओ.टी.पी.टी. संपूर्ण जगामध्ये आज महत्वाची फॅकल्टी म्हणून डेव्हलप होत आहे. आम्ही असा निर्णय घेतलेला आहे की, सर्व मेडीकल कॉलेजमध्ये ओ.टी.पी.टी. डिपार्टमेंट सुरु करणार आहोत आणि एम.यु.एच.एस.ला आणि डी.एच.एस.ला विचारुन डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्सेस सुध्दा सुरु करण्याचा आम्ही विचार करीत आहोत.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20629**.........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तीन महिन्यामध्ये कौन्सिल स्थापन करणार आणि सर्वांना रजिस्टर्ड करणार असे मंत्री महोदयांनी सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, ओ.टी.पी.टी.ची एकंदर संख्या किती आहे ? महाराष्ट्रात एकूण डॉक्टरांची संख्या किती आहे ? त्यांचे रजिस्ट्रेशन करणे साधी गोष्ट नाही. तीन महिन्याच्या आत रजिस्ट्रेशन करुन आपण निवडणुका कशा घेणार आहात ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, क्लास-2 चा दर्जा द्यावा एवढीच त्यांची मागणी नाही. ज्यावेळी आपण क्लास-2 चा दर्जा देणार त्यावेळी एम.बी.बी.एस. डॉक्टर जे असतील, मेडिकल ऑफिसर म्हणून जे काम करीत असतील त्यांना देखील तुम्ही ॲट पार ट्रिट करणार काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या लोकांना तुम्ही पाचवा वेतन आयोग लागू करणार काय ?

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20629....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जे मुद्दे येथे उपस्थित केलेले आहेत त्यातील पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये 3 हजार ओटीपीटीचे पॅक्टिशनर्स आहेत आणि त्यांची रजिस्ट्रेशन आपण तीन महिन्यात पूर्ण करू शकतो. त्यांना एमबीबीएसचा दर्जा देण्याची जी बाब आहे ते तपासून पहावे लागेल. कारण काही डॉक्टर्स, डॉ.दीपक सावंत यांच्यासारखे काही डॉक्टर्स याला विरोध करतात की त्यांना 'डॉक्टर' म्हणून दर्जा देऊ नये.

डॉ. दीपक सावंत : माझा त्याला विरोध नाही. एखादी गोष्ट चांगली होत असेल तर ती आपण निश्चित करावी असेच माझे म्हणणे आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्यांना 'डॉक्टर' नामानिधान लावायला द्यायचे की नाही या विषयी थोडी चर्चा करावी लागेल. कारण त्यामध्ये अनेक गोष्टी गुंतल्या आहेत. तेव्हा त्यांची संघटना आणि आम्ही मिळून याबाबत चर्चा करू व त्यावेळेस सन्माननीय सदस्यांना देखील विश्वासात घेतले जाईल. त्यानंतर मी आपल्याला सांगू इच्छितो की, पाचवा वेतन आयोग देण्यासंबंधात आपण जी समिती सचिव, आरोग्य आणि सचिव, वैद्यकीय शिक्षण यांची नेमलेली आहे त्या समितीकडून ही बाब तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तरात शेवटी आपण म्हटलेले आहे की, '...कायद्यातील तरतुदीनुसार नियम बनविण्याची कार्यवाही सुरू आहे. ..' तर ही कारवाई किती कालावधीत पूर्ण होईल. ? आणि त्यापुढे आपण म्हटले आहे की, '.... मागण्यांबाबत विचार विनिमय सुरू आहे.' म्हणजे नेमके काय आहे ? आणि किती कालावधीमध्ये या मागण्या पूर्ण होतील ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आताच सविस्तर दिलेल्या उत्तरात सांगितले आहे की, हे नियम तयार करण्याचे काम झालेले असून सुमारे 150 पानांमध्ये हे नियम तयार केलेले आहेत. यासाठी आपल्या विधी व न्याय विभागाने चांगले काम केलेले आहे. आता हे नियम वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविले जातील आणि वित्त विभाग त्यासाठी किती वेळ घेईल हे मी सांगू शकत नाही. परंतु आम्ही आमच्या अधिकाऱ्यांना लवकरात लवकर हे पूर्ण करून घेण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यास आम्ही सांगू. दुसरे असे की, 3 महिन्यात निवडणुका आम्ही घेणार आहोत तेव्हा तीन महिन्यापूर्वी हे पूर्ण करून बाकी प्रोसेस सुरू आपल्याला करावीच लागेल.

***

...... वायवाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाचा कारभार**
**शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाकडे देण्याबाबत**

**(4) * 23149 श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे** : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अकोला (जिल्हा-अकोला) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाचा कारभार शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांकडे देण्यास शासनाने ऑक्टोबर, 2006 मध्ये तत्वत: मान्यता दिली आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(3) याची प्रत्यक्षात अंमलबजावणी केव्हापासून करण्यांत येणार आहे?

**डॉ. विमल मुंदडा** : (1) नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, लोकशाही आघाडी सरकारने 1999 ते 2004 या कालावधीमध्ये राज्यामध्ये तीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन केली. कोकणामध्ये रत्नागिरी येथेही आम्ही एक वैद्यकीय महाविद्यालय मागत होतो पण आम्हाला ते मिळाले नाही. पण तरीही कोल्हापूर, लातूर आणि अकोला या तीन ठिकाणी ही महाविद्यालये स्थापन झालेली आहेत. आज त्या ठिकाणी अद्यावत महाविद्यालयाचे हॉस्पिटल बांधण्यात आलेले आहे. म्हणून त्या ठिकाणचे जे जिल्हा सामान्य रूग्णालय आहे, ... आता जिल्हा रूग्णालयांचा कारभार कसा चालते हे आपणा सगळ्यांच माहिती आहे, परवाच त्याबाबत येथे चर्चा आपण केली होती., तेव्हा मेडिकल कॉलेजचे हे जे अद्यावत हॉस्पिटल आहे त्याकडे जिल्हा रूग्णालयाचा कारभार आपण सोपविण्याचा निर्णय घेतला आहे काय ? घेतला असेल तर त्याची अमलबजावणी आपण करणार काय ? असल्यास, केव्हा करणार ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सर्व जिल्हा रूग्णालयांचा कारभार चांगलाच चालतो. तरीही मेडिकल कॉलेजला जिल्हा रूग्णालय हस्तांतरित करण्याचा हा जो प्रश्न आहे त्यासंबंधात मी आपल्याला सांगू इच्छिते की, तेथे बाकीच्या सुविधा वगैरे देण्याची जी प्रोसिजर आहे त्यामुळे

...... वायवाय 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मुंदडा (पुढे चालू...) ता.प्र.क्र.23149 ....

आम्ही यासाठी तत्त्वत: मान्यता दिलेली आहे. मेडिकल कॉलेजलालागणारी जी काही हॉस्पिटल असतात, हे तर शासकीय हॉस्पिटल आहे आणि आपल्याकडे सुविधा देखील आहेत शिवाय केंद्रीय कार्यक्रम जे आहेत त्यातूनही चांगल्या प्रकारे ही रूग्णालये चालविण्याचा आपला उद्देश असतो. त्यासाठी आम्ही तेथे सिविल सर्जनचे पद केलेले आहे तसेच अधीक्षक देखील नेमणार आहोत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला आपल्याकडे मेडिकल कॉलेज काढावयाचे असल्यास आपण जरूर काढावे, त्यासाठी आपण वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना विनंती करावी. मात्र या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छिते की, आमची जी हॉस्पिटल्स आहेत तेथे आवश्यक खाटांचे जे काही पेमेंट असेल ते दिले गेले तर आमची काहीही हरत नाही. तसेच त्यांनी त्यांच्याकडे मेडिकल कॉलेज काढले तरी आमची हरकत नाही.

****

....... वायवाय 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उमदी (ता.जत) येथील बेकायदा घरकुल मंजूरीच्या चौकशीच्या मागणीबाबत**

**(5) * 20658 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उमदी ता.जत येथील दारिद्रय रेषेखालील यादीत नांव नसतानाही इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करुन अनुदान वाटप केल्याप्रकरणी चौकशीची मागणी तेथील ग्रामस्थांनी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली यांचेकडे दिनांक 5 नोव्हेंबर, 2006 रोजी किंवा त्या दरम्यान केलेली आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याबाबत चौकशी करणेत आली आहे काय, तद्नुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विजयसिंह मोहिते-पाटील** : (1) होय.
(2) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, चार लाभार्थींना दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव नसतानाही लाभ दिल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या तत्कालीन गट विकास अधिकारी, एक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व एक वरिष्ठ सहाय्यक (लेखा) अशा तीन कर्मचाऱ्यांना दिनांक 14 डिसेंबर 2006 रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच अनुदान प्राप्त केलेल्या चार लाभार्थींपैकी दोन लाभार्थींकडून अनुदान वसूल करण्यात आले असून, उर्वरित दोन लाभार्थींकडून अनुदान वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... झेडझेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20658...

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सुधारीत उत्तर दिले आहे. त्यामध्ये गैरप्रकारामध्ये जे जे लोक सहभागी झाले होते त्यांच्यावर कारवाई केल्याबद्दल मंत्रिमहोदयांचा मी आभारी आहे. अशाप्रकारच्या गैरप्रकारापासून समाजाला वाचविण्यासाठी किंवा जे पात्र लाभार्थी आहेत त्यांना लाभ मिळावा यासाठी शासनाने मंजूर केलेल्या याद्या ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर लावण्याची व्यवस्था करण्यात येईल काय? जेणेकरुन लाभार्थी गावकऱ्यांना आपली नावे समजतील, आणि जे अपात्र आहेत त्यांच्या बाबतीत आपल्याकडे तक्रार करता येईल.

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : होय.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, एका कुटुंबामधील व्यक्तींची नावे घरकुल योजनेमध्ये समाविष्ट नसतांना देखील त्या कुटुंबातील व्यक्तींना घरकुल योजना मंजूर करण्यात आली. हे करीत असतांना या योजनेमधील अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करण्यात आली त्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. ज्यांचे घरकुल योजनेमध्ये नाव नसतांना त्यांनी योजनेचा फायदा घेतला, त्यांच्याकडून घरकुल ताब्यात घेण्यात आले.परंतु त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. असे लोक बेकायदेशीररित्या खोटे सांगून आपले नाव यादीमध्ये घुसवितात त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणार काय? त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लोकांची जी यादी आहे त्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रष्टाचार चालू आहे. म्हणून याठिकाणी सूचना करण्यात आली की, ही यादी आपण प्रसिध्द केली पाहिजे. त्यासाठी आपण कायदा केला पाहिजे. या योजनेचा फायदा फक्त दारिद्रय रेषेखालील लोकांनाच मिळाला पाहिजे असे आपले धोरण आहे. तरीसुध्दा या योजनेचा फायदा धनदांडगे लोक घेत आहेत. याकरीता या योजनेतील लाभार्थ्यांची यादी चावडीवर लावली पाहिजे. आणि चावडीवरील यादीमध्ये जे लोक बेकायदेशीररित्या आपली नावे घुसवतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल अशाप्रकारची उपाययोजना आपण करणार काय?

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी विचारल्याप्रमाणे घरकुल योजनेमधील लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीच्या कार्यालयामध्ये लावली जाईल. माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे त्यासंबंधीची बाब तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

----

...... ZZ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासनाने अल्पमुदतीच्या वैद्यकिय अभ्यासक्रमांना दिलेल्या मान्यतेबाबत**

**(६) * २३२५५ प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री.भास्कर जाधव , श्री. लक्ष्मण जगताप :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक ०७ जुलै, २००६ रोजी अल्पमुदतीच्या मेडीकल लॅब, डेंटल,एक्सरे, रेडीओलॉजी, अल्ट्रा सोनोग्राफी इत्यादी अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) संबंधित अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सोयीसुविधा तपासून न पाहताच २० पेक्षा जास्त संस्थांना मान्यता देण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरीता** : (१) होय.

(२), (३) व (४) संबंधित अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांची संचालनालय स्तरावर नियुक्त केलेल्या टास्क फोर्स समितीमार्फत पूर्णत: छाननी करुन सदर समितीने शिफारस केलेल्या एकूण २६ संस्थांना शासन स्तरावर मान्यता देण्यात आली आहे.

. . . नंतर किल्लेदार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . तारांकित प्रश्न क्रमांक 23255

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, इस प्रश्न के उत्तर में कहा गया है कि टास्क फोर्स समिति तैयार करके डायरेक्टर के स्तर पर 26 संस्थाओं को मान्यता दी गई है. मेरा पहला प्रश्न यह है कि यह समिति किस प्रकार की है और इसके मेम्बर कौन हैं ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि इसके अभ्यासक्रम किस ने तैयार किए हैं ? ये अभ्यासक्रम एक्सपर्ट लोगों ने तैयार किए हैं या संस्थाओं में चलाए जा रहे अभ्यासक्रम को स्वीकार किया गया है ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि इंडियन ओरल हैल्थ एज्यूकेशन एंड रिसर्च के डायरेक्टर डॉ. चन्द्रमणि मोरे और श्री. चव्हाण के खिलाफ विद्यार्थियों ने मुंबई और ठाणे में गुन्हा दर्ज किया है, क्या यह सच है ? अगर यह सच है तो इनको मान्यता कैसे दी गई ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्या ने 3 उप प्रश्न पूछे हैं. उनके 2 उप प्रश्न इस प्रश्न से संबंधित है और तीसरा उप प्रश्न इस प्रश्न से संबंधित नहीं है, फिर भी मैं उसका जबाब देने की कोशिश करुंगा. सब से पहले प्रश्न का उत्तर यह है कि टास्क फोर्स ने कॉलेज को मान्यता देने के लिए एक सिस्टम डिवलप किया है. सब से पहले तो संस्था की तरफ से अर्जी आती है और वह अर्जी आने के बाद डिवीजनल स्तर पर जो कमेटी है, उसमें विभाग प्रमुख उस विषय के एक्सपर्ट होते हैं, वह उस संस्था को विजिट करती है और इन्सपेक्शन होने के बाद बोर्ड के पास रिपोर्ट भेजती है. बोर्ड ने टास्क फोर्स बनाया है, इसके पास इन्सपेक्शन रिपोर्ट आती है. उस रिपोर्ट के आधार पर यह देखा जाता है कि संस्था के पास कितना इन्फ्रा-स्ट्रक्चर है और उसके बाद में यह मान्यता दी जाती है. इसके सदस्य इस प्रकार से हैं : (1) प्रो. एन.बी. पासलकर, डायरेक्टर, टेक्नीकल एज्यूकेशन, महाराष्ट्र. (2) श्री. बी.पी. तले, डायरेक्टर, महाराष्ट्र स्टेट टेक्नीकल एज्यूकेशन बोर्ड (3) श्री. ए.एस. अंधारे, डेप्युटी डायरेक्टर, टेक्नीकल एज्यूकेशन (4) श्री. जी.आर. शेखापुरे, डायरेक्टर, व्होकेशनल एज्यूकेशन (5) श्रीमती राधा सिन्हा, प्रिन्सिपल, प्रमिला विठ्ठलदास पोलीटेक्निक, मुंबई (6) श्री. वाय.आर. शाह, डीन, एस.बी.एम. पोलीटेक्निक, मुंबई (7) डॉ. एम.आर. सराफ, प्रिन्सिपल, बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मेसी, मुंबई (8) श्री. राजन लाका, जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई (9) श्री. पी.आर. बापट कॉरपोरेट एडवायजर, जीकेएस. इस प्रकार से 9 लोगों की समिति बनाई है. यह समिति जांच करने के बाद अपनी सिफारिश के साथ सरकार के पास रिपोर्ट भेजती है कि इस संस्था को यह कोर्स देना चाहिए अथवा नहीं.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . तारांकित प्रश्न क्रमांक 23255,( श्री. सुरेश शेट्टी जारी)

सभापति महोदय, दूसरा प्रश्न अभ्यासक्रम के बारे में पूछा है. अभ्यासक्रम तय करने के लिए एक एक्सपर्ट कमेटी बनाई जाती है और इसमें इंडियन ओरल हैल्थ सर्विस के एक्सपर्ट हैं. यह कमेटी अभ्यासक्रम तय करती है.

सभापति महोदय, तीसरा प्रश्न डॉ. चन्द्रमणि मोरे के बारे में पूछा है. डॉ. मोरे ने नवी मुंबई में 2004-05 में डेंटल कॉलेज शुरु किया था और इस प्रश्न से कुछ संबंध नहीं है. हमने उन्हें व्होकेशनल ट्रेनिंग में से किसी कोर्स की मान्यता उनको नहीं दी है. उन्होंने जो डेंटल कॉलेज शुरु किया था तो जब लोगों को पता चला कि यह बोगस संस्था है, इसको परमीशन नहीं है तो भारतीय विद्यार्थी सेना के कार्यकर्ता मेरे पास आए और कहा कि 10 विद्यार्थियों ने उस संस्था से डेंटल का कोर्स किया है. मुझे लगा कि गलती संस्था चलाने वाले की है. इसलिए हमने विचार किया कि 10 विद्यार्थियों की मदद हम किस प्रकार से कर सकते हैं. हमने इन विद्यार्थियों को डी.वाय. पाटिल और दूसरे डेन्टल कॉलेज में एडमीशन दिलाया, ताकि उनका भविष्य खराब न हो. बोगस संस्था चलाने वालों पर पुलिस ने कार्रवाई की है.

डॉ. एम.ए. अझिज : सभापति महोदय, जिनका मेडीकल क्षेत्र से कोई ताल्लुक नहीं है, ऐसे लोगों को टास्क फोर्स में शामिल किया गया है जबकि अभ्यासक्रम मेडीकल लॅब, डेंटल, एक्सरे, रेडीओलॉजी, अल्ट्रा सोनोग्राफी इत्यादि जो कोर्स दिए गए हैं, वे मेडीकल से संबंधित हैं. इस बारे में मंत्री महोदय का क्या कहना है ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, टास्क फोर्स कोर्स की स्क्रूटिनी नहीं करता है. व्होकेशनल कोर्स की एपलीकेशन्स टास्क फोर्स के पास आती हैं. इसमें डॉक्टर्स भी हैं, इसमें हर तरह के लोग शामिल हैं.

. . . नंतर बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 23255...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो अतिशय बरोबर आहे. त्या टास्कफोर्समध्ये कोण डॉक्टर आहे ते दाखववे. जी नावे मी ऐकली त्यामध्ये कोणीही डॉक्टर नाही. श्री. पासलकर जे टेक्निकल एज्युकेशनचे डायरेक्टर आहेत त्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती आहे. वास्तविक मेडिकल एज्युकेशन आणि टेक्निकल एज्युकेशन अशी मिळून ही समिती करणे आवश्यक होते. जो माणूस इन्फ्रॉस्ट्रक्चर तपासणार तो वैद्यकीय क्षेत्रातील नसेल तर ते काय करणार ? अल्ट्रा सोनोग्राफी कशाशी खातात हे टेक्निकल माणसाला कसे कळणार ? त्याला दुरुस्ती करण्याची माहिती असेल पण सोनोग्राफीची मशीनरी कोणती घ्यावी, कोणती अद्ययावत मशीनरी आलेली आहे हे ते कसे सांगणार ? त्यामुळे शासन या टास्कफोर्सची पुनर्रचना करणार काय ? आपण अशा प्रकारे 26 खाजगी संस्थांना परवानगी दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाकडे तंत्रज्ञांची कमतरता आहे. बरेच एक्सरे मशीन्स तंत्रज्ञ नसल्यामुळे बंद आहेत. महाराष्ट्र शासन ग्रामीण पातळीवर अशा प्रकारचे अभ्यासक्रम, मेडिकल लॅब, एक्सरे, रेडिओलॉजी, अल्ट्रा सोनोग्राफी असे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरु करणार काय ? याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे कोर्सेस सांगितले ते प्युअरली टेक्निकल कोर्सेस आहेत. यामध्ये मेडिकलचा संबंध नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, चुकीची माहिती रेकॉर्डवर येत आहे. हे सर्व मेडिकल कोर्सेस आहेत. जो माणूस अल्ट्रा सोनोग्राफी शिकविणार तो मूल किती महिन्याचे आहे हे सांगणार. टेक्निकल एज्युकेशनचे डायरेक्टर हे सांगू शकेल काय ? त्या ठिकाणी चुकीच्या कोर्सेसना मान्यता मिळते. त्या ठिकाणी इन्फ्रॉस्ट्रक्चरची तपासणी चुकीच्या लोकांकडून होत आहे.

**सभापती** : यामध्ये वैद्यकीय बेस असेल तर त्या अनुषंगाने हे कोर्सेस निश्चित करण्याकरिता, अभ्यासक्रम निश्चित करण्याकरिता असणारी जी उच्चस्तरीय समिती आहे त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित एक्स्पर्ट प्राधान्याने असणे गरजेचे आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की, ते बरोबर असावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात डॉ. चंद्रमणी मोरे यांचा उल्लेख करण्यात आला. ते अत्यंत उच्चशिक्षित आहेत. सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये ते डेंटल विभागाचे प्रमुख होते. त्यानंतर त्यांनी नवीन मुंबई येथे आपले डेंटल हॉस्पिटल काढले. त्या ठिकाणी जे ॲन्टी सोशल इलेमेंट्स आहेत त्यांनी त्यांच्याकडे खंडणीची मागणी केली. त्यांच्याबाबतीत पोलिसांकडे तक्रार केली. त्यांची सर्टिफिकेट्स खोटी आहेत अशी तक्रार करण्यात आली. त्यांच्या सर्टिफिकेट्सची चौकशी झाली. असे करताना आपल्या पोलीस खात्याच्या लोकांनी त्यांना खूप छळले. त्याबाबत चौकशी केली गेली नाही. आपण श्री. पासलकर यांची समिती निर्माण केली. ते वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ नाहीत. परंतु ते त्या समितीचे एक सदस्य होते. श्री. चंद्रकांत मोरे हे केवळ मागासवर्गीय असल्यामुळे, त्यांच्याकडून पैसे मिळाले नसल्यामुळे अशा पध्दतीने जी कारवाई केली गेली त्याची चौकशी करणार काय आणि त्यांना न्याय देणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी सुसंगत नसला तरी सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याच्या आधारे चौकशी करुन पाहीन. परंतु श्री. चंद्रमणी मोरे आणि श्री. रणजित चव्हाण या दोघांनी संस्था स्थापन केली आणि त्या संस्थेच्या माध्यमातून इंडियन ओरल हेल्थ एज्युकेशन ॲंड रिसर्च सेंटर नावाची संस्था नवीन मुंबईमध्ये काढली. ते तज्ज्ञ डॉक्टर असले तरी ही संस्था सुरु करताना किंवा अभ्यासक्रम सुरु करताना कोणत्याही ॲथॉरिटीची परवानगी घेतलेली नव्हती. कोणत्याही ॲथॉरिटीची परवानगी न घेता, राज्य सरकारची परवानगी न घेता एखादा कोर्स काढणे आणि तो चालविणे, विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांच्या भवितव्याशी खेळणे हे वागणे गुन्हेगारी स्वरुपाचे आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 23255.... (श्री. दिलीप वळसे-पाटील....)

म्हणून त्या संदर्भामध्ये राज्य शासनाने सर्व चौकशी केल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला होता. दोघंना अटक झाली. पोलीस रिमांड मिळाला, दोषारोपपत्र सादर करण्यात आले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:10

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या कृषी पंपाच्या अनुशेषाबाबत**

**(७) * २०८२० श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात कृषी पंपाचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर शिल्लक आहे, हे खरे आहे काय,

(२) हा कृषी पंपाचा अनुशेष पुर्ण करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) हा अनुशेष केव्हापर्यंत पूर्ण केला जाईल ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात कृषिपंपांचा विद्युतीकरणाचा अनुशेष शिल्लक आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| जिल्हा | निर्देशांक समितीने निर्धारित केलला अनुशेष १.४.९६ | ऑक्टोबर, २००६ अखेरचा अनुशेष |
|---|---|---|
| (१) रत्नागिरी | १८,९८७ | १५,१४२ |
| (२) सिंधुदुर्ग | ६,९९१ | २,३७८ |

(२) कृषि पंपांच्या विधुतीकरणाचा अनुशेष असणाऱ्या जिल्ह्यात वार्षिक कमाल उद्दिष्टांची मर्यादा विचारात न घेता आवश्यक बाबींची पूर्तता करणाऱ्या अथवा केलेल्या सर्व अर्जदार कृषिग्राहकांच्या पंपांना विद्युत पुरवठा करण्याबाबत वितरण कंपनीतर्फे निर्णय घेण्यात आला असून याबाबत सर्व स्थानिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील विविध जिल्ह्यातील कृषी पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष दुर व्हावा यासाठी वर्ष २००५-२००६ मध्ये ३५६.५८ कोटी रुपये कर्ज रुपात व वर्ष २००६-२००७ मध्ये रु.२८१.०० कोटी अनुदान रुपात शासनातर्फे वितरण कंपनीला प्रदान करण्यात आले आहे.

(३) राज्यातील सर्व जिल्ह्यातील कृषी पंपांचा विद्युतीकरणाचा अनुशेष दूर करण्याबाबत वितरण कंपनी प्रयत्नशिल असून याबाबत उपलब्धतेनुसार शासनातर्फेही अर्थसहाय्य देण्यात येते. मात्र अनुशेष दूर करण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील अर्जदार ग्राहकाने सर्व आवश्यक बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे, जसे सर्व विहीत आकार भरणे, विद्युत पंप बसविणे, चाचणी अहवाल सादर करणे, इत्यादि रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार केल्यास या दोन जिल्ह्यांमध्ये सर्व बाबींची पूर्तता केलेले व विद्युत पुरवठा करण्यायोग्य असे मार्च, २००६ अखेर फक्त अनुक्रमे ५०१ व ६९९ अर्ज प्रलंबित आहेत आणि या सर्व अर्जदारांना लवकरात लवकर विद्युत पुरवठा करण्यासंदर्भात वितरण कंपनी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : रत्नागिरी जिल्हयामध्ये 4845 आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 2713 कृषी पंपाना कनेक्शन दिलेले आहे. उर्वरित बॅकलॉग कधी भरणार ? 2005-06 सालामध्ये वीज वितरण कंपनीला 356.57 कोटी रुपये दिलेले आहेत. ही रक्कम ज्या कामासाठी दिलेली आहे त्याच

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 20820... (श्री. मधुकर चव्हाण...

कामाकरिता ती खर्च केली जाते की अन्य कामासाठी खर्च केली जाते ? याबाबतीत या वितरण कंपनीवर काही नियंत्रण आहे की नाही ? तसेच 501 आणि 699 विद्युत पंपांना एका महिन्याच्या आत वीज कनेक्शन दिले जाईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये विद्युत कनेक्शनच्या संदर्भात बॅकलॉग आहे अशा जिल्ह्यांची वेगळी यादी तयार केली जाते. वीज मंडळाला राज्यासाठी आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी टारगेट दिले जाते आणि त्यानुसार विद्युत कनेक्शन्स देण्याचा प्रयत्न केला जात असतो. विद्युत पंपांचा बॅकलॉग दूर कराण्यासाठी राज्य सरकार पैसे देत असले तरी ते पैसे त्याच कामासाठी वापरले पाहिजेत अशी सतर्कता बाळगली जाते. मी दरमहिन्याला आढावा घेत असतो. परिस्थिती अशी आहे की, कोकणातील जिल्ह्यांसाठी जेवढे कनेक्शन देऊ शकतो तेवढी मागणीही नसते. काही वेळा टेस्ट रिपोर्ट दिले जात नाही. लाईन टाकण्याच्या संदर्भात अडथळे निर्माण केले जातात. उर्वरित पेडपेंडिंग कनेक्शन्स त्वरित मार्च पर्यन्त पूर्ण करण्याची कारवाई निश्चितपणे केली जाईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : निदेर्शांक समितीने निर्धारित केलेला अनुशेष आणि ऑक्टोबर 2006 अखेरचा अनुशेष असा एकूण अनुशेष हा रत्नागिरी जिल्हयामध्ये 34129 आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 9369 इतका आहे. कोकणामध्ये काहीही अडचणी असल्यातरी हा अनुशेष भरुन काढण्यासाठी स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, मार्च 2006 अखेर रत्नागिरी मधील 501 आणि सिंधुदुर्ग मधील 699 अर्ज प्रलंबित आहेत. याचा अर्थ मार्च 2006 अखेर रत्नागिरी जिल्हयामध्ये 15642 आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 3078चा अनुशेष आहे. हा अनुशेष लवकरात लवकर भरुन काढला जाईल काय ? तसेच कोणीही मागणी केल्या नंतर त्याला ते कनेक्शन ताबडतोबीने दिले जाईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये असलेला कनेक्शनचा अनुशेष कोणत्याही परिस्थितीमध्ये मार्च पूर्वी पूर्ण केला जाईल. या जिल्हयातून आणखी अर्ज प्राप्त झाले आणि सर्व बाबींची पूर्तता त्यांनी केलेली असेल तर कनेक्शन द्यायला कोणतीही अडचण

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येणार नाही. याबाबतीत दर महिन्याला आढावा बैठक घेतली जाते आणि ही कनेक्शन्स जलदगतीने देण्याचा प्रयत्न केला जातो. सर्व कनेक्शन्स मार्च पर्यन्त दिली जातील.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपला असला तरी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विनंती केल्यामुळे त्यांना मी प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विद्युत वितरण कंपनीला बोगस कॅपॅसिटर पॅनल पुरविणाऱ्या कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(८) * २२००६ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्युत मंडळाने सन १९९७ साली एशियन इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या कंपनीकडून ३६ हजार कॅपॅसिटर पॅनल खरेदी व भाडे तत्वावर घेतले होते व त्यासाठी महिन्याकाठी ३ कोटी रुपये भाडे देण्याचा करार झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९७ नंतर दरवर्षी करारात वाढ करुन ती ३६७ कोटीपेक्षा अधिक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या राज्यातील ३६ हजार कॅपॅसिटर पॅनलपैकी अर्ध्याहून अधिक बंद आहेत व त्याचे भाडे मात्र भरले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) चौकशी व कारवाई अपूर्ण असल्यास ती केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) तत्कालीन म.रा.वि. मंडळाने एप्रिल,१९९७ मध्ये केलेल्या कराराप्रमाणे एशियन एलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या कंपनीकडून सरासरी रुपये ८०० प्रती कॅपॅसिटर प्रतिमहिना या दराने १० वर्षाच्या कालावधीसाठी ३४९९९ कॅपॅसिटर भाडे तत्वावर घेतले आहेत. या सर्व कॅपॅसिटरचे एका मिहिन्याचे सरासरी भाडे रुपये रुपये २.८० कोटी आहे.

(२) हे खरे नाही. एप्रिल,१९९७ मध्ये करारात दरवर्षी भाडयाच्या दरात वाढ करण्याची तरतूद नाही. या कराराचे एकूण मुल्य ( संपूर्ण दहा वर्षासाठी ) रुपये ३२४.०० कोटी आहे.

(३) हे खरे नाही, दर त्रैमासिकात कॅपॅसिटरची पाहणी करुन व बंद असलेल्या कॅपिसिटरचे भाडे कपात करुन संबंधित अधिक्षक अभियंता त्यांचा अहवाल देतात (Performance Report) व त्याप्रमाणे भाडे अदा करण्यांत येते.

(४) व (५) सदर कंत्राटासंदर्भात पूर्वी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वितरण कंपनीच्या दक्षता व सुरक्षा संचालनालयातर्फे या प्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे. या चौकशी दरम्यान सर्व कॅपॅसिटरची तपासणी करणे अवघड असल्यामुळे दक्षत व सुरक्षा संचालनालयाद्वारे नमुना दाखल कांही कॅपॅसिटरची तपासणी करण्यांत आली असून संचालनालयातर्फे जून-२००६ मध्ये अहवाल सादर करण्यांत आला आहे. सदर चौकशी अंती सध्या लातूर परिमंडळातील १० व कोल्हापूर परिमंडळातील १ असे एकूण ११ अधिकारी/कर्मचारी सकृतदर्शनी दोषी आढळून आले आहेत. या ११ अधिकारी/कर्मचाऱ्यापैकी एका अधिकाऱ्यावर दोषारोप पत्र ठेवण्यांत आले असून उर्वरित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून खुलासे मागविण्यांत आले आहेत. बंद कॅपॅसिटरचे भाडे अदा करण्याच्या प्रकरणात कंपनीच्या प्रतिनिधीने खोटा दस्ताऐवज तयार केल्याचे निदर्शनास आल्यावरुन जून,२००६ त्रैमासिक अखेरच्या देयकाच्या रकमेपैकी ३० टक्के रक्कम व सप्टेंबर,२००६ त्रैमासिक अखेरच्या देयकाची पुर्ण रक्कम रोखून ठेवण्यांत आली आहे.

----------

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, १९९७ साली महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने एशियन इलेक्ट्रिकल्स लिमिटेड या कंपनीकडून ८०० रुपये प्रती कॅपॅसिटर या दराने १० वर्षासाठी ३५ हजार कॅपॅसिटर खरेदी केले होते. ही खरेदी केल्यानंतर व त्याचे भाडे निश्चित झाल्यानंतर आजपर्यंत हे कॅपॅसिटर चाललेले आहेत. परंतु या कॅपॅसिटरमधील निम्मे कॅपॅसिटर बंद अवस्थेत आहेत अशी माहिती आहे. तरी देखील बंद कॅपॅसिटरचे भाडे कंपनीला दिले जात आहे अशी तक्रार आल्यानंतर त्यासंबंधी चौकशी झाली. काल वीज मंडळाच्या १० अधिकाऱ्यांना या संदर्भात निलंबित करण्यात आले. माझा प्रश्न असा आहे की, तक्रार आल्यानंतर किंवा सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झाल्यानंतर वीज मंडळाने चौकशी सुरु केली काय? या प्रकरणाची चौकशी केव्हा सुरु केली? जे अधिकारी निलंबित करण्यात आले ते कोणत्या ग्रेडमधील आहेत? निलंबित अधिकाऱ्यांपैकी कोणी निवृत्त झाले तर त्यांच्याविरुध्द कारवाई करता येत नाही. म्हणून ताबडतोब चौकशी करुन कारवाई केली जाईल का? किती कॅपॅसिटर बंद आहेत आणि किती बंद कॅपॅसिटरचे भाडे अदा करण्यात आले?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ही जी चौकशी आहे ती प्रश्न आल्यानंतर सुरु करण्यात आलेली नाही. ही चौकशी दिनांक १३.१२.२००५ रोजी सुरु करण्यात आली होती. सर्व जिल्हयांमध्ये हे कॅपॅसिटर खरेदी केलेले नव्हते. १९९७ साली एशियन इलेक्ट्रिकल्स लिमिटेड या कंपनीने ते कॅपॅसिटर लावायचे आणि ते चालतात की नाही हे बघण्याची जबाबदारी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांवर त्यावेळी टाकण्यात आली होती. मग त्यामध्ये अधीक्षक अभियंत्यांनी कॅपॅसिटर चालतात का हे सर्टिफाय केल्यानंतर रेज केलेल्या बिलापोटी भाडे दिले जायचे आणि बँकेतून ते भाडे मिळायचे. काही ठिकाणी असे लक्षात आले की, कॅपॅसिटर लावले परंतु ते चालत नाहीत. तरीसुध्दा संगनमताने त्यामध्ये काही कर्मचारी आणि काही वरिष्ठ अधिकारी एकत्रपणे येऊन त्या कॅपॅसिटरची बिले अदा करीत आहेत आणि १० वर्षाच्या कालावधीकरीता या कंपनीला ३२४ कोटी रुपये द्यावयाचे अभिप्रेत होते किंवा त्याचा हिशोब होता, त्यापैकी आतापर्यंत २०७ कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. या संदर्भात शासनाच्या ही बाब लक्षात आल्यानंतर, वीज कंपनीच्या लक्षात आल्यानंतर दक्षता समितीने जो अहवाल दिलेला होता त्या दक्षता समितीच्या अहवालाच्या आधारे जे जे लोक यासंदर्भात दोषी आहेत, ज्यांची नावे रेकॉर्डवर आलेली आहेत त्या १० कर्मचाऱ्यांना

..३..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२२००६...

श्री.दिलीप वळसे पाटील.....

निलंबित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता जे निलंबित केलेले कर्मचारी आहेत हे सहाय्यक अभियंता, दुय्यम अभियंता, कनिष्ट अभियंता या दर्जाचे आहेत. यामध्ये निश्चितप्रकारे जे जबाबदार आहेत, फक्त खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांपुरते प्रकरण मर्यादित असू शकत नाही. यामध्ये वरच्या दर्जाचे अधिकारी असण्याची शक्यता आहे आणि त्याची चौकशी करणे गरजेचे आहे. पहिल्या टप्प्याची चौकशी पूर्ण झाली असून दुसऱ्या टप्प्याच्या चौकशीचा अहवाल यावयाचा आहे. जी कंपनी आहे, त्या कंपनीने अशा प्रकारची कॅपॅसिटर्स देऊन वीज मंडळाची ज्या पध्दतीने दिशाभूल किंवा फसवणूक केल्याचे सकृत्‌दर्शनी समोर येत आहे त्या संदर्भात कंपनीच्या विरुध्द काय कारवाई करायची या संदर्भात तपासणी करीत आहोत. योग्य वेळी जे सर्व दोषी असतील त्यासर्व दोषींच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----------

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करण्याबाबत.**

**सभापती** : या अधिवेशनाच्या दिनांक 18 डिसेंबर, ते 22 डिसेंबर, 2006 या कालावधीसाठी मी जे तारांकित प्रश्न स्वीकृत केले होते ते प्रश्न विधानपरिषद नियम 20 प्रमाणे व्यपगत न करता सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित करण्याचा निर्णय मी घेतलेला आहे. त्यानुसार सदर याद्या सभागृहाच्या पटलावर अतारांकित म्हणून ठेवण्यात आल्याचे मी घोषीत करीत आहे.

उपरोक्त याद्यांत समाविष्ट असलेल्या प्रश्नांची उत्तरे शासनाकडून त्वरीत मागवून मुद्रीत याद्या यथावकाश माननीय सदस्यांना टपालाद्वारे वितरीत करण्यात येतील.

( **प्रेस : येथे सोबतची यादी छापावी.** )

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची 23 वी यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव (2) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची 23 वी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची 23 वी यादी सभागृहामसमोर ठेवण्यात आली आहे. या यादीच्या मुद्रित प्रती अद्याप मुद्रणालयातून आलेल्या नसल्यामुळे चक्रमुद्रित प्रती सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत. मुद्रित प्रती उपलब्ध झाल्यानंतर त्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

( **प्रेस : येथे सोबतची यादी छापावी**. )

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, गुजरात सरकारच्या विरोधी पक्ष नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे अवमानकारक उद्‌गार काढलेले आहेत त्यासंदर्भात ......

**सभापती** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे या बाबीनंतर मी आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी देईल.

----------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------

श्री. राणा जगजितसिंह ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2006-2007 चे अर्थविवरणपत्र व कामाचा कार्यक्रम आणि सन 2005-2006 चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र व सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------------

श्री. राणा जगजितसिंह : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेडचा सन 2002-03 चा चोविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

श्री. रविशेठ पाटील (वन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडचा सन 2004-2005 चा 32 वा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/

14:20

**पृ.शी./मु.शी.**: **विधेयकांना संमती व अधिसंमती**

**सभापती** : विधान परिषदनें पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेची संमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव (2) वाचून दाखवतील.

**प्रधान सचिव (2)** : खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली :-

1) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 20- महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (दुसरी सुधारणा) विधेयक-2006

2) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 21 - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, 2006

3) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 22 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2006

4) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 23 - हैदराबाद इनाम व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2006

-----------------

....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : पंचायत राज समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. दिवाकर रावते ( समिती सदस्य ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायत राज समितीचा सन 2005-2006 चा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायत राज समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

**पृ.शी./मु.शी. : माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती सदस्य ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

**पृ.शी./मु.शी. : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे.**

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष हक्क समितीचा ( यवतमाळ येथे चोरीच्या संशयावरुन अटक केलेल्या दोन आरोपींचा पोलीस अधिक्षक कार्यालयात झालेला मृत्यू, या विषयावरील लक्षवेधी सूचनेसंबंधात तत्कालीन मा. गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांनी केलेल्या लेखी निवेदनात जाणिवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आरोपित करुन त्यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या व सन्माननीय सदस्यांच्या विशेष हक्कभंगाच्या आणि अवमानाच्या प्रकरणावरील ) अहवाल सादर करतो

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.........

सभापत महोदय, मी,विधानपरिषद विशेष हक्क समिती प्रमुख , विशेष हक्क समितीने अधिकार दिल्यावरुन, "यवतमाळ येथे चोरीच्या संशयावरुन अटक केलेल्या दोन आरोपींचा पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेला मृत्यू" या विषयावर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधात तत्कालीन माननीय गृह राज्यमंत्री ( ग्रामीण ) यांनी केलेल्या लेखी निवेदनात जाणीवपूर्वक असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आरोपित करुन त्यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद व सन्माननीय सदस्यांच्या विशेष हक्कभंगाच्या आणि अवमानाच्या प्रकरणासंबंधीचा विशेष हक्कभंगाच्या प्रकरणासंबंधातील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते,वि.पस. यांनी दिनांक 8 मार्च 2004 रोजी माननीय सभापतींकडे तत्कालीन गृह राज्यमंत्री श्री.कृपाशंकर सिंह यांचेविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली होती. त्यांची सूचनेद्वारे मुख्यत्वे पुढील मुद्दा उपस्थित केलेला होता-

"यवतमाळ येथे चोरीच्या संशयावरुन दोन आरोपिंना करण्यात आलेली अटक त्यांना करण्यात आलेली बेदम मारहाण व त्यामुळे तेथील पोलीस अधीक्षक कार्यालयातच त्या दोन्ही आरोपिंचा झालेला मृत्यू व माननीय गृह राज्यमंत्री ( ग्रामीण ) यांनी लेखी निवेदनाद्वारे दोघांचा मृत्यू विषारी औषधे प्राशन केल्याने झाल्याची असत्य व सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती जाणीवपूर्वक दिल्याने सभागृहाचा आणि सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकार भंग."

माननीय सभापतींनी सूचनेद्वारे उपस्थित केलेला विशेषाधिकाराचा प्रश्न दिनांक 6 जुलै, 2004 रोजी म.वि.प नियम 251 अन्वये स्वेच्छाधिकाराने विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी सुपूर्द केला.

समितीने सदरहू प्रकरणी दिनांक 20 जुलै 2004 रोजी प्राथमिक बैठक घेऊन गृहराज्य मंत्री (ग्रामीण व शहरे) यांना "कारणे दाखवा नोटीस" पाठवून लेखी निवेदन सादर करण्याबाबत विनंती केली होती. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनाही सूचनेत उपस्थित केलेल्या मुद्यांव्यतिरिक्त आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास त्याबाबत लेखी निवेदन सादर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार तत्कालीन गृह राज्यमंत्री श्री.कृपाशंकर सिंह तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी समितीला लेखी निवेदने सादर केली. सूचनादेण्यात आली होती त्यावेळी दहाव्या विधानसभेच्या कार्यकाळात श्री.कृपाशंकर सिंह हे गृह राज्यमंत्री होते. आता ते सध्याच्या अकराव्या विधानसभेचे सदस्य आहेत. ते दुसऱ्या सदनाचे सदस्य असल्यामुळे विशेषाधिकार भंगाच्या दृष्टीने त्यांच्याबाबतीत तपासणी करण्यास समितीस बंधन येत असल्यामुळे या प्रकरणी माननीय सभापतींनी निर्णय घेणे योग्य होईल असे मी माननीय सभापतींना दिनांक 21 जून, 2006 रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तत्पूर्वी श्री.दिवाकर रावते यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात त्यांनी काही महत्वपूर्ण मुद्दे उपस्थित केल्याने या मुद्यांबाबत शासनाचा खुलासा मागविण्याबाबतचे निदेश माननीय सभापतींनी दिले होते. त्या अनुषंगाने माननीय उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा सादर केला होता. माननीय उपमुख्यमंत्र्यांकडून प्राप्त झालेली वस्तुस्थिती समितीच्या निदर्शनास आणून द्यावी असे माननीय सभापतींनी निदेश दिले होते.

सदरहू प्रकरणाच्या अनुषंगाने समितीच्या एकूण सहा बैठका झाल्या.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली सूचना, सूचनेसोबतची कागदपत्रे, समितीपुढे प्राप्त झालेली लेखी निवेदने व माननीय उपमुख्यमंत्र्यांचा खुलासा या सर्व बाबी समितीने काळजीपूर्वक तपासल्या. त्यावरुन तत्कालीन गृहराज्यमंत्री यांनी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या लक्षवेधी सूचनेवर केलेल्या लेखी निवेदनात सभागृहाला जाणीवपूर्वक असत्य माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती सभागृहाला दिली असल्याचे सिध्द झाले नाही. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उपलब्ध असलेल्या माहिती व्यतिरिक्त अन्य कोणतीही बाब सभागृहापासून लपवून ठेवल्याचे समितीस आढळून आले नाही.

माननीय गृह राज्यमंत्र्यांनी लेखी निवेदनातून जाणीवपूर्वक असत्य वा सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे सिध्द होत नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सभागृहाचा कोणाताही विशेषाधिकारभंग वा अवमान झालेला नसल्याचा समितीचा निष्कर्ष आहे.

तद्नुसार समिती सभागृहास अहवाल सादर करीत असून हे प्रकरण समाप्त करण्यात यावे, अशी शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------------- यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्दाबाबत.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आदेश दिले होते की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचे निवेदन माननीय उप मुख्यमंत्री करतील, त्याप्रमाणे त्यांनी निवेदन करावे. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना परवानगी द्यावी.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, बृहन्मुंबई विधीबद्दलचे निवेदन अजूनपर्यंत वितरीत करण्यात आलेले नाही, त्याबद्दलही आपण निदेश द्यावेत.

**सभापती** : ते नंतर बघू. प्रथम माननीय उप मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधीचे निवेदन करावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल गुजरातच्या विरोधी पक्षनेत्यांनी काही अनुद्‌गार काढल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. यासंबंधी आम्ही त्या सरकारकडून अधिकृत माहिती मागविली आहे. परंतु माध्यमातून ज्या बातम्या प्रसिध्द झाल्या त्या राज्याच्या अस्मितेच्या दृष्टीने धक्कादायक आहेत. ज्या कोणी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनुद्‌गार काढले असतील तर त्याचा या प्रवृत्तीचा तीव्र शब्दात धिक्कार केला पाहिजे. या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना गुजरात सरकारला कळविण्यात येतील.

--------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी माझ्याकडे नियम 47 अन्वये एक वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासंबंधी विनंती केली आहे. मी त्यांना त्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण मांडण्यास परवानगी देत आहे. ते जे वैयक्तिक स्पष्टीकरण करणार आहेत, ते कुठल्याही विवाद्य अशा पध्दतीचे नसावे, याची त्यांनी काळजी घ्यावी.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दलितांवरील अत्याचारासंबंधी प्रा.जोगेंद्र कवाडे, यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

**मु.शी.**: दलितांवरील अत्याचारासंबंधी प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

"सभापती महोदय, मी फेब्रुवारी, 2002 पासून विधान परिषद सभागृहाचा सदस्य आहे. विधीमंडळाच्या या वरिष्ठ सभागृहाने मला आजवरच्या काळात दिलेल्या सहकार्याबद्दल माझ्या अंत:करणात कृतज्ञता आहे. या सभागृहाचे माननीय सभापती म्हणून आपल्या पारदर्शी नेतृत्वाबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. संसदीय प्रथा आणि परंपरा यांची आब राखत या वरिष्ठ सभागृहाचा गौरव आपण वृध्दींगत करीत आहात, याबद्दल मी मनस्वी आनंद व्यक्त करतो. आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य दिल्याबद्दल त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करुन मी माझ्या राजीनाम्याबाबतचे निवेदन आपल्या स्वीकृतीसाठी सादर करतो. आपल्या निर्देशाप्रमाणे कोणतेही अडचणीचे विधान मी करणार नाही. राजर्षी शाहू, क्रांतीबा फुले आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीदर्शी पुरोगामित्वाचा वारसा लाभलेला, म्हणून ज्या महाराष्ट्राचा आम्ही गौरव करतो, अभिमान बाळगतो. त्या महाराष्ट्राला कलंकित करण्याचे प्रयास राजरोजपणे सुरु आहेत, हे पाहून मन व्यथीत होते. या वंदनीय महापुरुषांच्या सामाजिक विचार वैभवाने गौरवान्वित महाराष्ट्राच्या अस्मितेचा दलित बौध्दांवरील अन्याय, अत्याचाराचा कडेलोट झाला असून 29 सप्टेंबर रोजी अमानुषतेलाही लाजवणाऱ्या खैरलांजी येथे घडवून आणलेल्या जातीय अत्याचाराने अख्या मानवतेलाच निवस्त्र केले आहे. मानवतेची क्रुर थट्टा महाराष्ट्राच्या भूमीत घडावी, ही बाब संपूर्ण राष्ट्रासाठी क्लेशदायक, हृदयद्रावक तशीच संतापजनक आहे. दलित, बौध्दांवरील अत्याचार सतत वाढत आहेत. त्यांना प्रतिबंध घालण्याच्या संदर्भात जी शासनाच्या गृह विभागाची इच्छाशक्ती असावसास पाहिजे होती ती दिसत नाही. या जातीयवादी अत्याचाराचे लक्ष व भक्ष ठरलेल्या आणि त्यांच्या पाशवी मनोवृत्तीचे

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

बळी ठरलेल्या स्मृती शेष, सुरेखा भोतमांगे यांनी आपल्यावरील तक्रार आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेची मागणी करणारे निवेदन 2002 साली विभागीय आयुक्त यांना पाठवून त्या निवेदनाच्या प्रती, पोलीस महानिरिक्षक नागपूर विभाग, जिल्हाधिकारी भंडारा, पोलीस अधीक्षक, भंडारा, भाजपाचे आमदार भजनदासजी वैद्य आणि माझ्याकडे पाठविल्या होत्या. याबाबतीत त्वरित कारवाई करण्यासंबंधी मी निवेदन दिले होते. परंतु त्याकडे गृह विभागाने अत्यंत बेजबाबदारपणाने दुर्लक्ष केले आणि भोतमांगे कुटुंबियांचे संरक्षण करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. परंतु या भोतमांगे परिवाराचा वंश विच्छेद झाल्यानंतर मात्र आमच्या राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री, गृहमंत्री यांनी गृह खात्याने जतन करुन ठेवलेले सुरेखा बाईंचे निवेदन कवाडेंनाही पाठवले होते, असे सांगण्यासाठी वापरले.

नंतर श्री.रोझेकर....

अस्तुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : व्यक्तिगत स्पष्टीकरण करीत असतांना मी सुरुवातीलाच सांगितले होते की, कुठलाही विवाद्य पध्दतीचे वक्तव्य करु नये, अन्यथा दिलेली परवानगी मला स्थगित करावी लागेल. यापूर्वी सन्माननीय सदस्यांच्या वैयक्तिक स्पष्टीकरणात जे विवाद्य वक्तव्य आले असेल ते कार्यवृत्तांतातून वगळावे लागेल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : न्याय मागण्यासाठी आंदोलन करणा-यांवर निघृण लाठीमार, गोळीबार करुन आपल्या पाशवी वृत्तीचा परिचय आणि आंदोलन संपल्यानंतरही आंदोलनाचे मनोधैर्य खचेल अशा पध्दतीने आंदोलकांवर खुनाचा प्रयत्न दरोडेखोरी राष्ट्रद्रोह, झोपडपट्टीदादा ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांचा आदर ठेवून सांगेन की त्यांनी आपल्या भाषणात विवाद्य पध्दतीचे वक्तव्य काढलेले आहे. म्हणून याच ठिकाणी आपल्या वैयक्तिक स्पष्टकरणासाठी दिलेली परवानगी मी स्थगित करतो. I am very sorry

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी आता केवळ या सभागृहाला धन्यवाद देऊ इच्छितो. दलित, आदिवासी अल्पसंख्याक याची सुरक्षा त्यांच्या मानवी हक्काचे आणि स्वाभिमानाचे रक्षण ही माझ्याकरिता सर्वात महत्वाची आणि पवित्र बाब आहे असे मी समजतो. मी भीमसैनिक आहे याचा मला गौरव वाटतो. विधानपरिषदेचा सदस्य म्हणून दलित व अन्यायग्रस्त समाजाची सेवा करता यावी, आपल्या सर्वांच्या सहकार्याने विधायक काही करता यावे, असा माझा प्रयास आहे. समाजसेवेसाठी राजकारण या जाणीवेतून माझी चळवळ व आंदोलन सुरु आहे. सत्तेतील सन्माननीय वाटा आम्हालाही हवा आहे. परंतु सन्मान आणि स्वाभीमानाचा बळी देऊन वा इतरांच्या मेहरबानीने नव्हे तर बरोबरीच्या नात्याने, हक्क म्हणून. परमपुज्य बाबासाहेब आंबेडकरांनी एके ठिकाणी उधृत केलेले अवतरण मी माझ्या अंत:करणात कोरुन ठेवलेले आहे. "कोणतीही व्यक्ती आपल्या स्वत्व आणि स्वाभिमानाचा आणि कोणतीही स्त्री आपल्या चारित्र्याचा आणि कोणतेही राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञ राहू शकत नाही" या प्रज्ञायुक्त जाणीवेतून माझी व माझ्या गोरगरीब समाजाची वाटचाल सुरु आहे. माझा दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्यांक समाजाचे हित सुरक्षित नाही. शासनामध्ये राहून मला त्यांचे संरक्षण करता येत नाही या उद्विग्न करणा-या माझ या अंत:कराणातील भांवना मला सतत अस्वस्थ करतात. खैरलांजी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची कुणाचीही तयारी नाही ही भावना देखील मला व्यथित करते या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.............

पार्श्वभूमिवर माझ्या उपेक्षित समाजाच्या दु:खावर वेदना आणि व्यथेने व्याकुळ झालेल्या अंत:करणाने व पूर्ण विचारांती मी माझ्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. आपण तो स्वीकृत करावा आणि मला उपकृत करावे ही माझी विनंती आहे. या संपूर्ण कालावधीमध्ये आपण वडिलधा-या नात्याने वेळोवेळी आम्हाला मार्गदर्शन केले, आमचे काही चुकले-माकले तर दिशादर्शन केले. सत्तारुढ पक्ष असो, विरोधी पक्ष असो सर्वांनी आपुलकीने आणि प्रेमाने, बंधु-भावाने वेळोवेळी साथ दिली, माझे मनोधैर्य वाढविण्याचे काम केले, कोणत्या शब्दामध्ये आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, हे मला समजत नाही. मी नेहमीकरिता आपल्या सर्वांच्या ॠणात राहू इच्छितो आणि म्हणून सभापती महोदय मी प्रा.जोगेंद्र लक्ष्मणराव कवाडे,पिपल्स रिपब्लिकन पक्षाचा विधान परिषद सदस्य असून आज 15 डिसेंबर 2006 रोजी महाराष्ट्र विधान परिषद सदस्यत्वाचा दु:खीत अंत:करणाने राजीनामा देत आहे, तो आपण स्वीकारावा, ही माझी विनंती आहे. आपण दिलेल्या सहकार्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद. जयभीम. माझे राजीनामापत्र मी आपल्याकडे सुपूर्द करीत आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहाचा नेता म्हणून मी प्रा.जोगेंद्र कवाडे यांना विनंती करतो की, त्यांनी आपला राजीनामा मागे घ्यावा. त्यांचे मागील 5 वर्षाचे सभागृहातील काम अत्यंत चांगले आहे. हे सभागृह अनेक प्रश्नांवर आवाज उठवू शकते आणि जेथे अन्याय होतो तेथे न्याय मिळवून देऊ शकते. व्यथित अंत:करणाने ते राजीनामा देत आहेत. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये दलितांसमोर अनेक प्रश्न आहेत. हातात हात घालून हे प्रश्न सुटू शकतात. प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्या व्यथा मी समजू शकतो. यातून मार्ग काढणे ही निश्चितपणे आपली सर्वांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडीत असतांना शासनाच्यावतीने जी कार्यवाही पारपाडावी लागेल ती सकारात्मक भूमिका घेऊन स्वीकारली जाईल. मी सभागृहाच्यावतीने प्रा.जोगेंद्र कवाडे यांना विनंती करतो की, त्यांनी राजीनाम्याचा फेर विचार करावा.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य, आमचे मित्र प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी जे वक्तव्य केले ते ऐकून आम्हाला धक्का बसला. खरे म्हणजे आयुष्याची अनेक वर्षे दलित चळवळीमध्ये काम करणारे, दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणारे, या संघर्षातून जेल यात्रा अशी वाटचाल करणारे, लोकसभेमध्ये किंवा विधानपरिषदेमध्ये दलितांच्या समस्या मांडून त्यांना न्याय देण्याची भूमिका प्रा.जोगेंद्र कवाडे करीत असतात. चळवळीतील कार्यकर्ता किंवा फिल्डवर काम करणारा कार्यकर्ता ज्यावेळी असा व्यथित होता. ज्यावेळी त्याला न्याय मिळत नाही, त्यावेळी हतबल होऊन त्याच्यावर राजीनामा देण्याची वेळ येते यापेक्षा दुसरे दुर्दैव असूच शकत नाही. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये दलितांचे प्रश्न सुटत नाहीत म्हणून एका लोकप्रतिनिधीला राजीनामा द्यावा लागत आहे. आबा आपण याची दखल घेतली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आपण याची गांभिर्याने दखल घ्यावी, अशी विनंती करतो. प्रा.जोगेंद्र कवाडे यांच्यासारखा उपेक्षितांसाठी संघर्ष करणारा नेता सभागृहात पोहोचणे आणि त्यांच्या माध्यमातून दलितांचा आवाज सभागृहापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. खैरलांजी प्रकरणामुळे आम्ही व्यथित झालो. घडलेले प्रकरण कोणालाही आवडले नाही. कोणत्याही पक्षाला आवडले नाही. ज्यावेळी समाजामध्ये खैरलांजी प्रकरणासारख्या घटना घडतात त्यावेळी आम्ही व्यथित होतो. चळवळीमध्ये काम करीत असतांना, दलितांना न्याय देत असतांना एखादे प्रकरण

...2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ........

घडले तर आपण व्यथित होतो. आबांच्या मताशी मी सहमत आहे. प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी मी त्यांना विनंती करतो. त्यांनी मनात उद्वेग न आणता निश्चितपणे राजीनाम्याचा फेरविचार करावा, अशी मी त्यांना पुन्हा विनंती करतो.

---------

यानंतर श्री.सुंबरे .........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )

3J 1

KBS/ MHM/ D/ श्री. बोरले नंतर ---

14:45

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनातील आमचे एक सहकारी प्रा. जोगेंद्र कवाडे ज्या पद्धतीने आपल्या व्यथा येथे मांडतात, त्यातून जी उद्विग्नता दिसून येते, ज्याला इंग्रजीमध्ये 'हेल्पलेसनेस' म्हणतात आणि अशा या भावनेतून या सदनाचा राजीनामा देऊन ते बाहेर पडताहेत हे आपणा कोणालाही भूषणावह नाही. आपण येथे बसणारे सगळे सदस्य, सभापती महोदय, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून याकडे पाहिले तरी त्यांनी अशा प्रकारे राजीनामा देणे हे कोणालाही पटणारे नाही. दलितांसाठी काम करणारा, त्यांच्यासाठी संघर्ष करणारा एक कार्यकर्ता आणि नेता म्हणून आज त्यांची सर्वांमध्ये ओळख आहे. दलितांच्या प्रत्येक प्रश्नावर ते उभे राहिले आहेत, त्यांनी मते त्यांनी येथे मांडली आहेत आणि त्यावेळी कोठल्याही परिणामांची पर्वा त्यांनी केलेली नाही. खैरलांजी प्रकरणा संबंधात देखील त्यांनी येथे आपल्या वेदना बोलून दाखविल्या आहेत. त्यावेळी भाषण झाल्यानंतर सभागृहातून बाहेर जाताना त्यांनी आम्हाला म्हटले होते की, मी बाहेर गेलो की मला अटक होणार आहे याची मला कल्पना आहे आणि तरीही मी बाहेर जाणार आहे. सभापती महोदय, खरोखरी ते येथून बाहेर गेल्यावर त्यांना अटक झाली होती. इतका आत्मविश्वास त्यांना होता. ज्या शासनाकडून त्यांच्यावर हल्ला होणार होता त्याची पूर्ण कल्पना त्यांना होती. सभापती महोदय, कालच या ठिकाणी महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था यावर चर्चा झाली. मी त्या चर्चेत भाग घेतला नाही, पण पुढील वेळेस मात्र जरूर भाग घेईन. आता प्रश्न एवढाच आहे की, कोणावरही अन्याय होऊ नये, दलितांवर तर होऊच नये, दलितच नव्हे तर इतर कोणत्याही समाजावर अन्याय व्हावा आणि अन्याय झाल्या नंतरही त्यांना पोलिसांच्या काठ्या खाव्या लागाव्यात हे उचित नाही. सभापती महोदय, प्रा. कवाडे हे माझ्या सोबत लोकसभेमध्ये होते. तेथेही त्यांनी तीच भूमिका मांडलेली आहे. ज्या उद्देशाने ते आज बाहेर चालले आहेत, माझी विनंती आहे, सर्व विरोधी पक्ष सदस्यांच्या वतीने मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी आपला राजीनामा मागे घ्यावा आणि आमच्या बरोबर रहावे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही ज्या संघर्षामध्ये उभे ठाकाल त्यामध्ये आम्हीही आपल्या सोबत आहोत. मग तो दलितांचा प्रश्न असो वा अन्य कोणताही प्रश्न असो. दलितांचा प्रश्न हा आपणा सर्वांचाच प्रश्न आहे, देशाचा प्रश्न आहे. तुम्ही अशा प्रकारे या सभागृहाच्या बाहेर जाण्याचे ठरविले आहे ते बरोबर नाही. तरी आपल्याला विनंती आहे की, आपण आपला राजीनाम्याचा बेत रद्द करून, राजीनामा मागे घ्यावा आणि आपली मुदत पूर्ण होईपर्यंत येथे काम करावे. दलित चळवळीबरोबरच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इतर सगळ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्हा सगळ्यांना आपण सहकार्य करावे आणि सभापती महोदय, आपणही आम्हाला सहकार्य करावे अशी नम्र विनंती मी करतो.

****

15-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3 J -2

DD/KBS ( श्री सुंबरे के बाद ) 2.47

श्री सतीश चतुर्वेदी ( वस्त्रोद्योग मंत्री ) : सम्माननीय सभापति महोदय, विदर्भ के और महाराष्ट्र के दलित आंदोलन और अम्बेडकरवादी आंदोलन के जबरदस्त कार्यकर्ता तथा विद्यार्थी आंदोलन के समय के हमारे साथी प्रा. जोगेन्द्र कवाड़े जी ने अपने वक्तव्य के माध्यम से अपना इस्तीफा यहां पर जाहिर किया है.

माननीय सभापति जी, खैरलांजी में जो घटना हुई है उसकी वजह से उनका व्यथित होना स्वाभाविक है. सभापति महोदय, मैं यहां पर बताना चाहूंगा कि श्री भोतमांगे जी दिल्ली गए थे और वहां पर उन्होंने माननीय प्रधानमंत्री श्री मनमोहन सिंह जी और माननीय श्रीमती सोनिया गांधी जी से भेंट भी की थी. उनकी मांग थी कि यह प्रकरण सी.बी.आय. को सौंपा जाये. यह प्रकरण राज्य सरकार की ओर सी.बी.आय. को सौंपा गया है. इस संबंध में 28 तारीख तक रिपोर्ट आनी है. एक निश्चित कालावधि में यह रिपोर्ट आ रही है. दोषी व्यक्तियों को कड़ी से कड़ी सजा हो और कोई भी दोषी व्यक्ति इस सजा से न बच सके, उस भावना से यह कार्रवाई केन्द्र सरकार की ओर से हो रही है.

मैं माननीय सदस्य श्री कवाड़े जी से कहना चाहूंगा कि इस माननीय सभागृह को उनकी जरुरत है. हमें मालूम है कि लाचारी का राजकारण न करने का स्वाभाव श्री कवाड़े जी का है. मैं उनको बताना चाहूंगा कि हम सब लोग श्री कवाड़े जी के साथ हैं.साथ ही हाइएस्ट क्वार्टर से इंक्वायरी होकर दोषी व्यक्तियों को सजा देने के संबंध में कार्यवाही भी हो रही है. इसलिए मैं कहना चाहूंगा कि वह अपना इस्तीफा वापस ले लें. क्योंकि विधान परिषद में रहकर वह इस केस का फॉलोअप ज्यादा प्रभावी ढंग से कर सकते हैं इस फोरम का उपयोग वह इस केस को सुलझाने के लिए कर सकते हैं. जनता की समस्याओं को सुलझाने का यह हाइएस्ट फोरम है. यह महाराष्ट्र का सर्वोच्च सदन है. इसलिए इस सभागृह की सदस्यता को छोड़ना, मेरे ख्याल से उचित नहीं होगा. इसलिए माननीय सदस्य श्री कवाड़े जी से मेरी अपील है कि वह अपने निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पर पुनर्विचार करें. इस विधान परिषद में रहते हुए वह इस लड़ाई को लड़ें और इस लड़ाई में हम सब उनके साथ हैं, सरकार उनके साथ है, सब मिनिस्टर्स उनके साथ हैं. केन्द्रीय सरकार भी उनके साथ है. मुझे ऐसा लगता है कि नैराश्य भावना से यहां की सदस्यता छोड़ना उनके लिए ठीक नहीं होगा. वे लड़ाकू प्रवृति के हैं, इसलिए वह अपने निर्णय पर पुनर्विचार करेंगे, ऐसी विनती सभापति महोदय, आपके मार्फत मैं उनसे करना चाहता हूं. धन्यवाद.

( यानंतर श्री. सरफरे

..... 3के 1

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे सरांनी आपले निवेदन सभागृहासमोर केले आहे. या सभागृहामधून निवृत्त होण्याचे किंवा राजीनामा देण्याचे निवेदन नुकतेच त्यांनी याठिकाणी केले. याबाबत मला सकाळी माहिती मिळाली की, प्रा. जोगेंद्र कवाडे सर सभागृहामध्ये वैयक्तिक निवेदनाव्दारे आपला राजीनामा देणार आहेत. मला ज्यावेळी ही बातमी समजली त्यावेळी मी त्यांच्याशी बोललो. ज्या प्रश्नावर तुमचे मन व्यथित झाले, त्या भावना संपूर्ण महाराष्ट्राच्या आहेत, तुमच्या आमच्या सर्वांच्या आहेत. गेल्या रविवारी मी यवतमाळला गेलो होतो. त्याठिकाणी मोठा मेळावा भरला होता. त्यावेळी एका महिलेने मला चिठ्ठी पाठविली की, तुम्ही प्रियंकाबाबत बोलावे, श्री. भोतमांगे यांच्या कुटुंबासंबंधी बोलावे. त्यावेळी मी म्हणालो की, त्यासंबंधी माझ्याकडे बोलण्यासारखे काही नाही. संपूर्ण महाराष्ट्राची मान या घटनेमुळे शरमेने खाली गेली आहे. अशाप्रकारचे कृत्य महाराष्ट्रामध्ये होणे ही गोष्ट महाराष्ट्राला भूषणावह नाही. ज्या महापुरुषांची नावे घेऊन आपण राज्य करतो, त्या महापुरुषांच्या या राज्यामध्ये ही गोष्ट अभिमानास्पद नाही तर नामुष्कीची आहे. माननीय विरोधी पक्षनेते माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, माननीय मंत्री श्री. सतीश चतुर्वेदी आणि मी माझ्या पक्षाच्या वतीने आपणास विनंती करतो की, आपण आपला निर्णय मागे घ्यावा. सभापती महोदय, मला आपणास विनंती करावयाची आहे की, आपण माननीय प्रा. जोगेंद्र कवाडे सरांचे मन वळवावे. आपणाकडून त्यांचा राजीनामा स्वीकारला जावू नये अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, आता या सभागृहापुढे सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी आपला राजीनामा दिला आहे. सन 1923 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "मी ज्या समाजामधून जन्माला आलो तो समाज अन्याय आणि अत्याचाराने पिडीत आहे, मनुवादाच्या गुलामगिरीचा त्या समाजावर होणारा अन्याय दूर करण्यास जर मी कमी पडलो तर अखेरीस स्वत:ला गोळी घालून घेईन". माननीय कवाडे सर आपण या सार्वभौम सभागृहामधून गरीब जनतेला न्याय देण्याची प्रक्रिया करीत असता.आपण कायम अन्यायाविरुध्द लढत आला आहात. आम्ही आदर्श म्हणून आपणाकडे नेहमी बघितले आहे. दीन-दुबळयांवर अत्याचार होतो त्यावेळी आपले मन व्यथित होतांना बघितले आहे. खैरलांजीच्या प्रकरणामध्ये समस्त हिंदुस्थानाला शरमेने मान खाली घालावयास लावली. अन्याय संपला असे आपणास वाटत असले तरी मनुवादाविरुध्द आपली लढाई यापुढेही चालू राहणार आहे. आतापर्यंत आपण ज्या मनुवादाविरुध्द लढाई लढलात, आणि यापुढेही लढावी लागेल त्यासाठी आम्ही आपल्याबरोबर आहोत. जिथे जिथे गरज लागेल त्याठिकाणी आपण आम्हाला हाक द्या, आम्ही त्या अन्यायाविरुध्द, अत्याचाराविरुध्द लढण्यासाठी आपणाबरोबर आहोत. मी आपल्या मुलाप्रमाणे आहे. आपल्या कुटुंबाच्या प्रत्येक कार्यक्रमाला मी उपस्थित राहिलो आहे. माझी आपल्याला प्रामाणिक विनंती आहे की, या राज्यामध्ये, सभागृहामध्ये आपल्याबरोबर नेहमी असतांना आपण असे व्यथित होऊन, भावनाविवश होऊन राजीनामा देऊ नये. हे संपूर्ण सभागृह आपल्याबरोबर आहे, अशाप्रकारची भावना मी व्यक्त करतो. आणि माननीय सभापतीं महोदयांना व सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांना विनंती करतो की, आपण या प्रकरणी लक्ष घालून त्यांचा राजीनामा नामंजूर करावा, आणि त्यांनी या सभागृहामध्ये सदस्य म्हणून रहावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी जे निवेदन केले त्यामुळे सभागृहाला मोठा धक्का बसलेला आहे. मी एक-दोन दिवस त्यांच्या सोबत होतो. त्यांना समजावत होतो. त्यांच्या भावना या अधिक महत्वाच्या आहेत. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत प्रा.जोगेंद्र कवाडे यांना पुन्हा एकदा आवाहन करून विनंती करतो की, शासन आणि सभागृह यामध्ये फरक केला पाहिजे. शासनाबद्दल मनामध्ये राग असू शकतो. सभागृह हे सर्वोच्च आहे. हे कायदेमंडळ आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानातून कायदे मंडळ जन्माला आलेले आहे. शासन चुकले असेल तर ती चूक दुरुस्त करण्याचा अधिकार सभागृहाला आहे. भावनातिरेकातून उचललेले कोणतेही पाऊल स्वीकारू नये. आपण आपला व्हेटो वापरावा,अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला हे आताच मला कळले. आपण सभागृहामध्ये चर्चा करतो, वादविवाद करतो,टीका करतो, या सगळया गोष्टीच्या मागे एक भूमिका असते. सभापती महोदय, गेल्या काही दिवसापासून विशेषत: खैरलांजी प्रकरणानंतर ते व्यथित झाले. त्यांनी नेहमी सभागृहामध्ये दलित, पिडित, शोषित जनतेचे प्रश्न चांगल्या रितीने मांडलेले आहेत. त्यांना उद्वेग आला असेल, त्यांना नाराजी आली असेल तर ती दूर करावी. त्यांनी या सभागृहामध्ये रहावे, सन्माननीय सदस्य हे आमच्या बरोबर पाहिजेत, अशी आमची सगळयांची भावना आहे. मला वाटते,सरकारी पक्षाशी त्यांनी चर्चा करावी. काही मुद्दे असतील तर ते सोडविण्याकरिता सरकारने देखील मार्ग काढावा. राजीनामा देण्यासारखी कृती त्यांनी करू नये. ते माझे चांगले मित्र आहेत. मी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण मागे असे म्हणाला होता की, प्रा.कवाडे यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून मी गोळ्या झाडत होतो, परंतु त्यावेळेस श्री.कवाडे हे मला मोर्चाला जावयाचे असल्यामुळे मला पहिल्यांदा बोलू द्यावे असे सांगण्यासाठी माझ्याजवळ आले होते. कदाचित आपला संशय असेल...

**सभापती** : यावर अन्य चर्चा करण्याचे कारण नाही.

श्री.नितीन गडकरी : आपण म्हणत असाल तर मी खाली बसतो.

**सभापती** : मी कधीही असे म्हणणार नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KTG/ D/

श्री.नितीन गडकरी : मला मंत्रीमहोदयांच्याबाबतीत काही म्हणायचे नाही . उलट मी त्यांना मदत करत आहे.

**सभापती** : नियम 47 अन्वये सन्माननीय सदस्यांनी वैयक्तिक स्पष्टीकरण केलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : या सभागृहात मी अनेक वर्षे काम करीत आहे त्यामुळे मला नियमांची पूर्ण माहिती आहे.

**सभापती** : त्या दिवशीच्या चर्चेचा विषय उपस्थित करू नये एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री.नितीन गडकरी : मी त्यांचीच बाजू मांडतो आहे. ती ऐकून घ्यावी, अशी विंनती आहे. माझी एवढीच विनंती आहे की, सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय गैरसमजातून बोलले असतील. कदाचित त्यातून त्यांना राजीनामा देण्याची भावना निर्माण झाली असेल....

**सभापती** : ठीक आहे.

श्री.नितीन गडकरी : आम्ही सभागृहात आमचे विचार मांडतो बाकीचे काही मांडत नाही. एवढीच विनंती आहे की, सन्माननीय सदस्य कवाडे साहेब हे या सभागृहामध्ये हवे आहेत. त्यांनी राजीनामा आपल्याकडे दिला असेल तर तो आपण स्वीकारू नये एवढीच विनंती करतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे, जे या सदनामध्ये मागासवर्गीय, ओ.बी.सी. यांच्याकरिता नेहमी लढा देणारे सन्माननीय सदस्य आहेत. नुकतीच त्यांच्या राजीनाम्याची वाच्यता झाल्यानंतर मी माननीय मुख्यमंत्र्यांना फोन केला आणि त्यांना सांगितले की, असा असा प्रकार झालेला आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहाच्या बाहेर असल्यामुळे त्यांना फोन करावा लागला. त्यांनी मला लगेच असे सांगितले की माझ्यावतीने आपण त्यांना विनंती करा की, आपण हा राजीनामा देऊ नये. अशा प्रकारची विनंती या सभागृहामार्फत सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना करावयास सांगितले आहे. मी माझ्या वतीने आणि महाराष्ट्रातील तमाम ओ.बी.सीं.च्या वतीने त्यांना विनंती करतो की, त्यांनी आपला हा निर्णय मागे घ्यावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपण स्वत: तसेच राज्याच्या माननीय मुख्यमंत्री महोदयांनी, आपल्या सभागृहाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री सन्माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब तसेच संपूर्ण सभागृहातील सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. मी सुरुवातीलाच म्हणालो की, सभागृहात कधी ओबडधोबड बोललो असेन, कधी बोलण्यामध्ये अतिरेक केला असेल, कधी कोणाच्या भावना दुखावल्या असतील. तरीही मी माझा राजीनामा परत घ्यावा म्हणून संपूर्ण सभागृहाने आणि सभागृहाच्या बाहेर देखील अनेक विविध मान्यवरांनी, कार्यकर्त्यांनी वारंवार मला विनंती केली. आपण जो विश्वास व्यक्त केला, मी सभागृहामध्ये राहावे आणि राजीनामा परत घ्यावा अशा प्रकारची भावना व्यक्त केली त्याबद्दल खरोखरच मी आपणा सर्वांची परत कृतज्ञता व्यक्त करतो. मी आज सकाळी जेव्हा माननीय सभापतींना भेटलो तेव्हा त्यांनी प्रचंड आग्रह केला की, तुम्ही असे काही करु नका. सभापती महोदय, भावनेच्या भरामध्ये घेतलेला हा निर्णय नाही. वैफल्यग्रस्त मानसिकतेतून घेतलेला हा निर्णय नाही. पण त्या दिवशी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी एका गोष्टीची आठवण करुन दिली. "No man can become great at the cost of his self-respect; No Woman can become great at the cost of her chastity; No Nation can become great at the cost of its liberty." या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषवाक्यावर नितांत श्रध्दा असलेला मी कार्यकर्ता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KTG/ D/

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

आहे, भीमसैनिक आहे. आपणा सर्वांच्या भावनांचा मी आदर करतो. सभागृहामध्ये राहून जे दलित असतील, आदिवासी असतील ओबीसी असतील, अल्पसंख्यांक समाज असेल, बहुजन समाज असेल, हिंदू समाज असेल, कोणतीही जात असो, कोणताही धर्म असो, त्या सर्वांसाठी मी या ठिकाणी बोललो. आपणा सर्वांच्या सहकार्याने बोललो. या गरीब उपेक्षित तमाम जातीधर्माच्या जनतेच्या लढ्यासाठी आपण मला जे सहकार्य दिले तसेच सहकार्य मी सभागृहात नसलो तरी सभागृहाच्या बाहेर देखील आपण सर्वांनी करावे अशी मी सर्वांना अंत:करणपूर्वक विनंती करतो. परंतु कृपाकरुन राजीनाम्याच्या निर्णयापासून मागे फिरण्याची विनंती आपण मला करु नका. कारण हा निर्णय झ ालेला आहे. पुन्हा एकदा सांगतो की, भावनेच्या भरात किंवा वैफल्याच्या भरात नव्हे तर एका विशिष्ट हेतूने मी हा निर्णय घेतलेला आहे. सभापती महोदय, मी आपल्या माहितीकरिता सांगतो की, मी काही राजकारणी नाही, राजकारण हा माझा पिंड नाही. राजकारणाचे डावपेच मला समजत नाहीत. सामाजिक जाणीव ठेवून काम करणारा मी एक साधा कार्यकर्ता आहे. अपघाताने राजकारणात आलो. राजकारणात येऊन असे वाटावयास लागले की आपण समाजाप्रती काही तरी नवीन करु शकू. "Pay back to the Society" Pay back to the Society means pay back to the Nation. Pay back to the Society means pay back to the Indian Society as such and not a particular community or caste. या जाणीवेतून मी सातत्याने कार्य करत आलो आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

जे ध्येय मी उराशी बाळगलेले आहे त्यासाठी मी सदैव कार्य करीत आलो आहे. मी सभागृहामध्ये असलो काय नि नसलो काय, बाहेर देखील अशा प्रकारचे सहकार्य आपणाकडून लाभावे. मी आपणा सर्वांच्या भावनांचा आदर करतो आणि सर्वांना विनंती करतो की, मी जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयापासून मला परावृत्त करु नका. सभापती महोदय, आपल्या चरणी माझी विनंती आहे की, माझ ा राजीनामा आपण स्वीकारावा. धन्यवाद.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडेजी हे या सर्वोच्च सभागृहाचे सन्माननीय सदस्य म्हणून अनेक वर्षे काम करीत आहेत. त्यांनी या ठिकाणी व्यक्तिगत स्पष्टीकरण केले. या स्पष्टीकरणाच्या शेवटी त्यांनी या सदनासमोर आपल्या भावना व्यक्त करीत असतानास या सर्वोच्च सभागृहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचे घोषित केले. त्यानंतर त्यांनी मला आपले राजीनामापत्र सादर केले. सदनाचे सन्माननीय नेते उपमुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्षनेते, सदनाचे गटनेते आणि सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी ज्या पध्दतीचा त्याग या ठिकाणी व्यक्त केला त्यापासून त्यांना परावृत्त करण्याच्यादृष्टीने माझ या समोर त्यांना विनंती केलेली आहे. संविधानाच्या अनुच्छेद 190 (3)(अ) अन्वये विधानपरिषदेचा सभापती म्हणून मी, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जे राजीनामापत्र दिलेले आहे ते जरुर तपासून पाहीन. ते तपासून पाहत असताना या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा योग्य पध्दतीने आदर राखून आणि मला सभापती म्हणून संसदीय लोकशाहीच्या अनुषंगाने जे घटनात्मक अधिकार प्राप्त झालेले आहेत त्यांचा आदर करुन मी याबाबतीत यथावकाश निर्णय घेईन. मी सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडेसाहेबांना एवढेच सांगेन की, अजूनही आपण दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करावा असे व्यक्तिगत मला वाटते. मी माझा निर्णय यथावकाश घेईन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपण माझा राजीनामा स्वीकृत करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपले राजीनामापत्र मला मिळालेले आहे. सदनाच्या सन्माननीय नेत्यांच्या, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या आणि अन्य सहका-यांच्या भावना मला समजलेल्या आहेत. याबाबतीत काय निर्णय घ्यायचा याचा मी विचार करीन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी सदनाला वंदन करतो आणि आपला निरोप घेतो.

( सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे बहिर्गमनाच्या तयारीत असतात.)

**सभापती** : मी जोपर्यन्त निर्णय देत नाही तोपर्यन्त सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे हे या सदनाचे सदस्य आहेत. त्यांना सभागृहातून जाता येणार नाही. अन्य वेळी मी वडीलकीच्या नात्याने विनंती करीत होतो. परंतु आता सभापती म्हणून मी आपणास आदेश देत आहे. It's my order.

आता सदनाचे कामकाज मी अर्ध्यातासाकरिता तहकूब करीत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.40 वाजता सुरु होईल.

(दुपारी 3.09 ते 4.30 बैठक स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्याचे काम अर्धवट असणे.

**मु. शी.** : ठाणे जिल्हयातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्याचे काम अर्धवट असणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, नितीन गडकरी, रामनाथ मोते, जितेंद्र आव्हाड, संजय केळकर, मधुकर चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मुझफ्फर हुसेन सय्यद, विनोद तावडे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील शीळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असून या रस्त्याची दशा अतिशय दयनीय अवस्थेत असणे, गेली 3-4 वर्षे मुंब्रा ते शिळफाटा आणि मुंब्रा रेती बंदर ते बेलापूर हा पट्टा जड वाहनांसाठी बंद असणे, परिणामी न्हावाशेवा बंदर आणि पुण्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना वरील रस्त्याचाच वापर करावा लागणे, सदर वाहतूक दाट वस्तीच्या कल्याण शहरातून जात असल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ होणे, उक्त प्रकरणी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात या प्रश्नासंबंधी विविध आयुधांमार्फत शासनाचे लक्ष वेधूनसुध्दा परिस्थितीत सुधारणा न होणे, या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्लस मलेशिया या ब्लॅकलिस्टेड विदेशी कंपनीस काम देणे, परंतु सदर कंपनीच्या कामाची कूर्मगती लक्षात घेता सदरचे काम सन 2007 च्या पावसाळ्यापूर्वीदेखील अपूर्णावस्थेत राहण्याची निर्माण झ ाालेली व्यवस्था, स्थानिक जनतेच्या जीवाला व वित्ताला निर्माण झालेला धोका, सदरचे काम पावसाळ्यापूर्वी युध्दपातळीवर करुन घेण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना. "

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाममंत्री ) : सभापती महोदय, निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. निवेदनाच्या दुसऱ्या पृष्ठावरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये "16 महिन्याऐवजी" "18 महिने" असे वाचावे. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी दुरुस्तीसह ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : सुधारल्याप्रमाणे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. अनेक रुपाने ब्रेकिंग ठरलेला हा प्रश्न आहे. मागील 4-5 अधिवेशनामध्ये सतत अनेक आयुधांच्या माध्यमातून शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेळोवेळी माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात आश्वासने दिलेली आहेत. त्यापेक्षाही सर्वोच्च पदावरुन पीठासीन अधिकाऱ्यांनी निर्देश देऊनही त्याचे पालन झालेले नाही. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर यासर्व शहरांची लाईफलाईन असलेला हा रस्ता आहे. या पाचही शहरातून हा रस्ता मुंबई शहराला जोडला जातो. सभापती महोदय, निवेदनाच्या माध्यमातून चुकीची माहिती दिली जाते. प्रत्येक आठवडयातील 3-4 दिवस मी स्वत: या रस्त्यावरुन प्रवास करतो. मुंबई शहरात जायला किमान 3 ते 4 तास लागतात. प्रवाशांचे काय हाल होत असतील याचे मी शब्दात वर्णन करु शकत नाही. आतापर्यंत या रस्त्यावर 200 ते 250 नागरिकांचे प्राण गेले, 700 ते 800 नागरिक गंभीररित्या जखमी झाले आणि दररोज तासा-तासाला या रस्त्यावर अपघात होत असतात. आणखी किती नागरिकांचे प्राण गेल्यानंतर शासन या प्रश्नाकडे लक्ष देणार आहे? शासनाला अपघातात आणखी किती मृत्यू व्हावेत असे वाटते? या विभागाचे मंत्री अत्यंत कार्यक्षम आहेत. ठाण्यामध्ये अशा प्रकारचा प्रश्न भेडसावत असताना आपण स्वत: पुढाकार घेतला, लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला आणि मंत्रीमहोदयांच्या माध्यमातून तो प्रश्न सोडविण्यात आला.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 15:45

श्री. संजय दत्त....

मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना हात जोडून विनंती करतो की, या ठिकाणचे हजारो नागरिक आपल्याकडे हा रस्ता होईल म्हणून अपेक्षेने पहात आहे. या रस्त्याच्या कामामध्ये अधिकारी आपल्याला टेक्निकल अडचणी सांगून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु आपण तशी भूमिका न घेता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून हे काम पूर्ण करावे. या कामामध्ये टेंडरींग, रिटेंडरींग झ ाालेले आहे. हे काम ब्लॅक लिस्ट कंपनीला देण्यात आलेले आहे. त्यामुळे हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी रिटेंडरींग करण्यात येईल काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय हा रस्ता शीळफाटा-कल्याण-भिवंडीच्या संदर्भात आहे. हा रस्ता कल्याण मधून जातो. हा रहदारीचा रस्ता असून महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्याच्या कामाला माननीय गडकरी साहेब या खात्याचे मंत्री असतांना 1998 मध्ये सुरुवात झाली होती. परंतु काही अडचणीमुळे या रस्त्याचे काम होऊ शकले नाही. परंतु हे काम प्लस कन्सेप्ट या मलेशियन कंपनीला देण्यात आले असून या कंपनीचा वाटा 63 टक्के आहे. 18 महिन्याच्या आत हे काम पूर्ण करण्याचा त्या कंपनीने करार केलेला आहे. या कामाचे ॲग्रीमेंट 2006 रोजी झालेले असून फेब्रुवारी, 2008 मध्ये या रस्त्याचे काम पूर्ण होणार आहे. या कंपनीने कामाला सुरुवात केलेली असून वर्क ऑर्डर काढल्यापासून 3.5 महिन्यात या कंपनीने कामाला सुरुवात केलेली आहे. या रस्त्याच्या संदर्भात माननीय उपसभापती महोदयांनी सुध्दा निदेष दिले होते त्या निदेषाचे पालन करुन या कामाचे टेंडर काढण्यात आले असून कामाला सुरुवातही झालेली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली - ठाणे या परिसरातील लोकांचा हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी देखील सहमत आहे कारण मी सुध्दा त्याच परिसरामध्ये राहतो तसेच माननीय उपसभापती महोदय सुध्दा त्याच परिसरात रहातात त्यामुळे त्यांना सुध्दा या रस्त्याचा अनुभव आहे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली आहे असे सांगितलेले आहे परंतु या कामाला अजून सुरुवात झालेली नाही. या ठिकाणी केवळ रस्त्याच्या डागडुजीच्या कामाला सुरुवात झालेली आहे. या रस्त्याचे काम 288 कोटी रुपयांचे आहे. या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, या रस्त्याचे काम मलेशियन कंपनीला दिले आहे परंतु या मलेशियन कंपनीने हे काम दुस-याच कंपनीला दिलेले आहे. जर या मलेशियन कंपनीने हे काम दुस-या कंपनीला दिले असेल तर ती कंपनी ब्लॅक लिस्टेड आहे हे खरे आहे काय? ....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या रस्त्याच्या कामाची वर्कऑर्डर दिलेली असून रस्त्याच्या कामाला सुरुवात देखील झालेली आहे. हे काम 18 महिन्याच्या आत पूर्ण होणार आहे. एमएसआरडीसीचा अध्यक्ष म्हणून मी ही ग्वाही देतो. या रस्त्याच्या डागडुजीचे काम चालू आहे. देसाई ब्रिजच्या खाली तसेच कटईच्या ठिकाणी काम चालू आहे. रस्त्याने जातांना सुरु असलेले काम आपल्याला दिसत नाही. मागच्या पावसाळयात ज्या ठिकाणी नागरिकांना त्रास झाला होता त्या ठिकाणच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली असून हे काम पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर पूर्ण होईल. या ठिकाणचे काम 4 कि.मी. अंतराचे असून पावसाळयापूर्वी ते पूर्ण केले जाणार आहे. तसेच 18 महिन्याच्या आत संपूर्ण काम पूर्ण केले जाईल अशी मी ग्वाही देतो. या कंपनीला जे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे ती कंपनी ब्लॅक लिस्टेड आहे का अशी विचारणा या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख.............

मी सुरुवातीलाच सांगितले की, मे.प्लस कन्सेप्ट कन्सॉशियम ही कंपनी ब्लॅक लिस्टेड नाही. या कपंनीचे 63 टक्के शेअर्स आहेत. त्या कपंनीने सब कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे किंवा कसे याची माहिती घेण्यात येईल. सदरहू कंपनीला अठरा महिन्यात काम पूर्ण करण्यास सांगितलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे मला या विषयावर बोलण्याची इच्छाच नाही. मागील सात वर्षापासून या रस्त्याचे काम रखडलेले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी मी आणि आपणही अनेक वेळा प्रयत्न केला होता. काही वर्तमानपत्रातून कारण नसताना आपल्यावर इनडायेक्ट टीका करण्याचा प्रयत्नही झाला होता. या खराब रस्त्यामुळे कल्याण-डोंबिवलीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी आठवडाभर रोज सायंकाळी 6.00 ते रात्रौ 9.00 वाजता तेथून प्रवास करावा. तेथे आठवडाभर प्रवास करुन झालेल्या त्रासामुळे मंत्रिमहोदय त्यांच्या पदाचा राजीनामा देतील. मंत्रिमहोदय नागपूर येथे राहतात. त्यामुळे त्यांना त्या रस्त्याची कल्पना येणार नाही. सभापती महोदय, मागच्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी आपण निर्देश दिले होते की, वीस दिवसांच्या आत काम सुरु करावे. आपण दिलेल्या निर्देशांचे पालन झाले नाही. आपल्या निर्देशांना मंत्रिमहोदयांनी केराची टोपली दाखविली. आता या रस्त्याचे काम ब्लॅक लिस्ट केलेल्या मलेशियन कंपनीला देण्यात आलेले आहे. या कपंनीने देखील अर्धवट अवस्थेत काम सोडून दिलेले आहे. रस्त्याच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही. सभापती महोदय, काल आपल्या चेंबरमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे महापौर भेटले. त्यांनी देखील या रस्त्याचे काम सुरु झाले नसल्याचे सांगितले. आताच याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त आणि रामनाथ मोते यांनी देखील सांगितले की, रस्त्याचे काम सुरु झालेले नाही. असे असताना या रस्त्याचे काम सुरु आहे अशी माहिती अधिकारी मंत्रिमहोदयांना कशी देतात ? ती कंपनी काम करण्यास तयार नाही म्हणून त्या कंपनीला आठ दिवसांपूर्वी टर्मिनेशन ऑर्डर दिलेली आहे अशी माझी माहिती आहे. ती कंपनी काम करण्यास तयार नाही आणि त्या कंपनीने सबकॉन्ट्रॅक्ट दिलेली कंपनी ब्लॅक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

लिस्टेड आहे किंवा कसे याची तपासणी करुन हे काम पुन: रिकंन्ट्रक्ट करावे आणि एक शॉर्ट टेंडर नोटीस काढून हे काम एक वर्षाच्या आत करण्याची अट घालण्यात यावी. एका वर्षात काम झाले नाही तर पेनॅल्टी लावण्यात येईल अशीही अट टाकण्यात यावी. सभापती महोदय, आपण निदेश देता. आपल्या निदेशनाचा अवमान होत असेल तर आपण कृपया निदेश देऊ नका. आमचा अवमान झाला तरी हरकत नाही. परंतु किमान आपला अवमान होऊ नये अशी आमची इच्छा आहे. सभापती महोदय, या रस्त्यामुळे लोकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, त्यांना इतका त्रास सहन करावा लागत आहे की, कदाचित लोक आपला राजीनामा मागायला देखील येतील. मी मंत्री असताना माझ्याकडे सुध्दा अनेक निवेदने आली होती. मलाही लोकांच्या टीकेला सामोरे जावे लागले होते. तेव्हा मी मधाशी सांगितल्याप्रमाणे नवीन टेंडर काढून एक वर्षाच्या आत काम पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात येईल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण मागे निर्देश दिल्याप्रमाणे खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले होते. आता या कामाचे टेंडर काढण्यात आले होते. त्यानुसार मे.प्लस कन्सेप्ट या कंपनीला काम देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी या विभागाचे मंत्री होते त्यावेळी म्हणजे् 1998 मध्ये प्रथम टेंडर काढण्यात आले होते. त्यावेळी रुबी कंपनीला हे काम देण्यात आले होते. त्यावेळी या कंपनीने काम अर्धवट सोडून दिले होते.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख...

1998 मध्ये टेंडर काढले असून त्या कंपनीच्या बाबतीत तक्रार नाही. त्याठिकाणी लाईनने कामे सुरु असून संपूर्ण डेंडरिंग झालेले आहे. त्या कंपनीस आपण 18 महिन्यांचा कालावधीही दिलेला आहे. तसेच त्यामध्ये मेलिशियाची कंपनीही असून ती कंपनी चांगली आहे. त्यामध्ये तिचे 3 टक्के शेअर्सही आहेत. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी कामाबाबत जे सांगितले त्याबाबत....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंबंधीचे कागदपत्रे माझ्याकडे आहेत. टाईम्स ऑफ इंडियामध्ये हे सर्व आलेले आहे. "Finally NHAI has wielded the stick with time overruns dragging back India's ambitious Golden Quadrilateral highways project. NHAI has blacklisted 17 domestic and foreign contractors, depriving them of other project work, while also initiating measures to build manpower and equipment capacity. The Indian and foreign contractors put on the "non performing" list since August 2004 disallows them from any project or contracts with NHAI anywhere in the Country. These include malaysian firms like Bhoomi Highway, UEM, Dolomite and China Coal, the last being a Chinese Company." आपण मलेशिया कंपनीच्या बाबतीत का इंट्रेस्टेड आहात ? माझी विनंती आहे की या सब कॉन्ट्रॅक्ट कंपनीला आपण डीले करा, कारण केंद्र सरकारच्या कंपनीनेही तीला ब्लॅक लिस्ट केलेले आहे, ती आज काम करु शकत नाही. आज त्याठिकाणची जनता त्रस्त आहे. त्यामुळे अशाप्रकारे ती कंपनी ब्लॅक लिस्टेड असेल, तिचा परफॉर्मन्स चांगला नसेल तर माझी विनंती आहे की, आपण यासंदर्भात चौकशी करुन आपण या कंपनीला आजच टर्मिनेट करावे. आज त्याठिकाणी माणसे आपल्या सर्वांना शिव्या घालत आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टी आपण तपासून तिला आपण ताबडतोब टर्मिनेट करावे व दुसऱ्या चांगल्या कंपनीला नेमण्यासंबंधी आपण विचार करावा. सभापती महोदय, हा रस्ता कल्याण-डोंबिवलीची हार्टलाईन आहे. त्यामुळे याबाबत आपण तपासणी करावी व योग्य ती कारवाई करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2.....

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, आपण चांगल्या कंपनीला काम दिले असून ती कंपनी ब्लॅकलिस्ट नाही. ज्या सब कॉन्ट्रॅक्ट कंपनीला काम दिलेले आहे....(अडथळा) तसे रेकॉर्डवर नाही. तरीही युईएन कंपनीला जरी हे काम दिले असले तरी ....(अडथळा) त्यासंबंधीची संपूर्ण माहिती घेण्यात येईल व चौकशी करण्यात येईल. युईएम च्याबाबतीत आमच्या रेकॉर्डवर काहीही नाही. आम्ही त्यांना जर...(अडथळा)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी पुरावा देण्यास तयार आहे. आजतागायत कोणत्याही प्रकारची मशिनरी त्या कंपनीने आणलेली नाही. हे काम अतिशय महत्वाचे असताना व या कंपनीचा परफॉर्मन्स चांगला नसतानाही गेल्या अनेक वर्षापासून याच कंपनीला काम देण्यात आले. या कंपनीचा परफॉर्मन्स चांगला नसल्यामुळे या कंपनीला ब्लॅक लिस्ट केलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .........

सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्रीमहोदयांना या ठिकाणी आव्हान देतो की, मे.प्लस कन्सेप्ट कन्सॉशियम या कंपनीने जर सबलेट केले असे सिध्द झाले आणि एनएचअेआयने या कंपनीला ब्लॅकलिस्ट केले हे खरे ठरले तर त्या कंपनीला आपण टरमिनेट करणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, युईएम कंपनी सबलेटमध्ये इन्व्हॉल्व असेल तर त्याबाबतची माहिती घेण्यात येईल. आणि सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याचा विचार करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी महत्वाचा प्रश्न या ठिकाणी विचारला की, युईएम या कंपनीला काम सबलेट केलेले आहे असे सिध्द झाले तर कंपनीवर कारवाई करणार काय ? वास्तविक पाहता नियमाप्रमाणे काम सबलेट करता येत नाही. भारत सरकारच्या एनएचअेआयने संपूर्ण देशात या कंपनीला काम करण्यासाठी ब्लॅकलिस्ट केले असेल तर तुम्ही या कॉंट्रॅक्टरचा करार रद्द करणार काय ? मी दिलेली माहिती खरी ठरली तर कारवाई करणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी उत्तरात सांगितले की, अशा पध्दतीने काम सबलेट केले असेल आणि कंपनी बॅकलिस्टेट असेल तर सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या सूचनेचा विचार करु, टरमिनेट करण्याचा देखील विचार करु.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अत्यंत खेदाने हे सांगावेसे वाटते की, मंत्रीमहोदयांचे उत्तर हे वेळकाढूपणाचे आहे. आजपर्यन्त त्या ठिकाणी हजारो रुपये खड्डे भरण्यामध्ये, माती टाकण्यामध्ये खर्च केलेले आहेत. त्या ठिकाणी अतिशय हेवी ट्रॅफिक आहे. कच्चे काम केले तर दुस-या तिस-या दिवशी पुन्हा खड्डे होतात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याकडे पुरावा मिळाला आहे. याच कॉंट्रॅक्टरविरुध्द जे.एन.अहमद, एम.डी. यांनी कलम क्रमांक 6 बाबत असे लिहिले आहे की,"UEDI the contractor is planning to start the RHS side widening on 14th December, 2006." ज्या कंपनीला एनएचअेआयने देशातून धक्के मारुन बाहेर काढले, त्याचा पुरावा मी तुम्हाला देतो, हा सूर्य आणि हा जयद्रथ.

..2...........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली ती तपासून पाहू. आम्ही त्या कंपनीबरोबर एमओयू केलेला आहे. संबंधित कंपनीने जर सबलेट केले असेल तर त्याची चौकशी करु आणि या चौकशीमध्ये दोषी आढळून आले तर त्यांना टरमिनेट करु. माझी एकच विनंती आहे की, सन 1998 पासून हा प्रश्न प्रलंबित आहे. यामध्ये रुफिट ही कंपनी कोर्टात गेल्यामुळे रस्ता झाला नाही. आपण निर्देश दिले त्याप्रमाणे टेंडर काढून लोअेस्ट असलेल्यांना काम देण्यात आले. पहिल्या आणि दुस-या निविदेमध्ये मोठा फरक होता. ज्या कंपनीला काम देण्यात आलेले आहे त्या कंपनीने एक महिन्याच्या आत काम पूर्ण करु असे कबूल केले आहे. ही मलेशियन कंपनी असून या कंपनीला भारतात कामे करावयाची असल्यामुळे टेंडर लोअेस्ट झाले असले तरी काम 18 महिन्यांमध्ये पूर्ण करु, असे कंपनीचे म्हणणे आहे. वर्कऑर्डर देऊन साडेतीन महिने झाले आहेत. हा 21 किलोमीटरचा रस्ता आहे. काम चालू झालेले आहे. या कंपनीला काम पूर्ण करण्याबाबत काही माईलस्टोन देण्यात आलेले आहेत. पहिला माईलस्टोन 25 मेपर्यन्तचा आहे. तोपर्यन्त जेवढे काम करणे अपेक्षित आहे तेवढे केले नाही तर कंपनीला दररोज 2 लक्ष रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. म्हणून कंपनीला कालमर्यादेत काम करावे लागेल. काम पूर्ण करण्याबाबत कंपनीने ग्वाही दिलेली आहे व त्याप्रमाणे काम चालू आहे. जर संबंधित कंपनीने सबलेट केले असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल व दोषी आढळून आल्यास करार टरमिनेट करण्याची कार्यवाही करु.

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेवर जवळ जवळ 20 ते 25 मिनिटे चर्चा झाली आहे. या रस्त्याच्या बाबतीत शासनाने ज्या प्रकारची उदासिनता दाखविली ती निश्चितच भूषणावह नाही.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :(पुढे चालू.....)

या लक्षवेधी सूचनेवर 20-25 मिनिटे चर्चा झालेली आहे. एक गोष्ट निश्चित आहे की, या रस्त्याबाबत शासनाने ज्या प्रकारची उदासिनता दाखविली आहे, ती निश्चितच भुषणावह नाही, याबाबत बरीच चर्चा झालेली आहे. काही कामाच्या बाबतीत चांगल्या हेतूने आपण सूचना व निर्देश देत असतो. निर्देश दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे असे वाटते. मागील 2-3 वर्षापूर्वीची घटना मी उदाहरणादाखल सांगतो. शिरुर तालुक्यातील एका गावातील प्रकल्पाच्या पाणीपुरवठयाबाबत निर्देश दिले होते. माननीय श्री.अजित पवार त्यावेळी जलसंपदा मंत्री होते. माननीय श्री.अनिल देशमुख यांच्या कार्यक्षमतेबद्दल माझ्या मनात शंका नाही. त्यावेळी जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांनी त्या कामाच्या संदर्भात निर्देश दिले व हे काम केवळ तीन दिवसात केले गेले. त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना त्वरीत पाठविण्यात आले, त्या कामाबद्दलच्या देय रकमेचा चेक जिल्हाधिकारी घेऊन आले व पी.डब्ल्यू.डी.ला दिला व तो ब्रीज तयार झाला. पाचव्या दिवशी खालची चारी करुन तेथील जनतेला पाणी उपलब्ध करुन देण्यात आले. अशा विधायक कामाच्या ठिकाणी पैशाचा प्रश्न नसतो परंतु शासन एखाद्या प्रकल्पावर रक्कम खर्च करीत असेल तर तेथील लोकांना त्याच्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत या मताचा मी आहे.

घोडबंदर रोडच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी प्रयत्न केले आहेत. आम्हाला त्यावेळी सभागृहात निर्देश द्यावे लागले होते. माननीय मुख्यमंत्री, व माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी प्रयत्न केल्यानंतर हे काम मार्गी लागले होते. परंतु या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे स्थानिक आमदार आहेत, तसेच सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आहेत व श्री.संजय केळकर आहेत, मी स्वत: त्या भागातील आहे. मी लोकहिताकरीता या कामाच्या संदर्भात निर्देश दिले तरी हे काम त्वरीत पूर्ण व्हावे, असे वाटते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम मंत्री माननीय श्री.अनिल देशमुख यांनी सभागृहात असे सांगितले आहे की, ज्या U.A.E. कंपनीला काम देण्यात आलेले आहे, ती कंपनी जर ब्लॅकलिस्टेड असेल तर त्याबाबत चौकशी करुन पुढील कारवाई करण्यात येईल. याबाबत माननीय सभापती महोदयांनी स्पष्ट निर्देश दिल्यास हा प्रश्न सुटू शकेल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या प्रकरणाबाबत माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना कल्पना असून ते याबाबत बोललले आहेत. ते स्वत: 3-4 महिन्यापूर्वी एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी डोंबिवली येथे आले होते. त्यावेळी त्यांना या मार्गाने डोंबिवलीला जायला तीन तास लागले. त्यावेळी स्वत:ची गाडी सोडून त्यांना ट्रेनने यावे लागले. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, आजतागायत या रस्त्याची जशी आहे तशीच दुरावस्था आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, काम जोरात सुरु आहे, परंतु माझ्या माहितीनुसार ही केवळ धुळफेक चालू आहे. अद्याप त्या ठिकाणी कामाला सुरुवात झालेली नाही. डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर व परीसरातील नागरिकांडून या रस्त्याचा वापर होत आहे, त्यांच्या यातना कदाचित आपल्याला माहिती नसतील परंतु याबाबत मी सांगतो की, "हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे, हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुखः ठावे". प्रशासनाच्या हातात धनुष्य आहे. डोंबिवलीकर जनतेचे हाल कोणाला कळणार नाहीत, असे वाटते. याबाबत श्री.नितीन गडकरी यांनी माझ्याकडे काही कागदपत्रे सादर केलेली आहेत. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी एखादा पुरावा सादर केला असेल तर तो तपासून पाहण्यात यावा असे मी जाहीरपणे बोलत आहे. परंतु ही गोष्ट खरी असेल व ब्लॅकलिस्टेड कंपनीला कॉन्ट्रक्ट दिले असेल तर निश्चितपणे हे कॉन्ट्रक्ट ताबडतोब रद्द केले पाहिजे.

..... यानंतर श्री.सोनावणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....( पुढे सुरु )

तर हे कॉन्ट्रॅक्ट ताबडतोब कॅन्सल करण्यात यावे. काम झाले आहे की नाही याची शहानिशा करण्याकरिता येत्या सोमवारी त्या भागातील सन्माननीय सदस्य आणि त्या खात्याचे अधिकारी यांनी त्या ठिकाणी भेट देऊन रस्त्याची पाहणी आणि जर तेथे काम झालेले नाही असे आढळले तर पुढची कार्यवाही करावी. आपण एक सूचना केली, त्यानुसार ज्यांनी सेकण्ड लोअेस्ट टेंडर भरले असेल व ती कंपनी जर काम करावयाला तयार असेल तर त्यांना विचारणा करण्यात यावी आणि जर ती कंपनी तयार नसेल तर एक महिन्याच्या आत शॉर्ट टेंडर काढावे आणि ताबडतोबीने योग्य त्या स्पर्धात्मक निविदा काढून या रस्त्याच्या डागडुजीचे काम एक वर्षाच्या आत व्हायलाच पाहिजे. अन्यथा मला असे वाटते शासनाच्या बाबतीत या ठिकाणी सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, मलाही तशी भूमिका घ्यावी लागेल, असे मी ठामपणे सांगतो.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मला सोमवारी अडचण असल्याने आपल्या सोईनुसार पुढील तारीख व वेळ देण्यात यावी.

**उपसभापती** : आपण येथे सगळयांच्या समक्ष भेटलो आहोत आणि सगळयांच्या समक्ष सूचना केली आहे. आपण येत्या सोमवारी भेटू.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मला सोमवारी अडचण असल्याने मला पुढील तारीख देण्यात यावी ही विनंती करतो.

**उपसभापती** : या रस्त्यावरुन जाणारा जो सामान्य माणूस असेल तो देखील आपल्याला सांगेल, मेहरबानी करुन हा सगळा खेळखंडोबा कोठे तरी थांबवावयाला लागेल आणि माझी आपल्याला विनंती आहे की, आपण जी वर्क ऑर्डर दिली, सन्माननीय सदस्यांनी वर्णन केल्याप्रमाणे जर ही परिस्थिती असेल आणि त्या ठिकाणी जर काम चालू नाही असे आढळल्यानंतर मी सांगितल्याप्रमाणे आपण निर्णय घ्यावा.

श्री. अनिल देशमुख : वर्क आर्डर देऊन साडेतीन महिने झाले आहेत, त्यांचे ॲग्रीमेंट अठरा महिन्याचे आहे. आपण जर साडेतीन महिन्यामध्ये अठरा महिन्याचे काम दाखवायला लागलो तर ते कसे शक्य होणार आहे ? हा रस्ता खूप महत्वाचा आहे याची सर्वांना कल्पना आहे. मी सुध्दा अनेकवेळा या रस्त्याची पाहणी केली आहे.

3U-2...

**उपसभापती** : घोडबंदर रस्ता व्हावा म्हणून माननीय श्री. आर.आर.पाटील यांना माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार साहेबांना सुध्दा साकडे घालावे लागले.

श्री. अनिल देशमुख : अशा पध्दतीने जर आपण कारवाई केली तर मला एकच भीती वाटते की, एकदा रस्ता लिटीगेशनमध्ये गेला तर 1998-2005 मध्ये जी गत झाली तशी पुन्हा होऊ नये. कारण एकदा लिटीगेशनमध्ये गेला तर हा रस्ता पुन्हा पाच वर्षे होणार नाही.

श्री. नितीन गडकरी : युअेई कंपनीला सब कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. एम.डी.च्या आलेल्या पत्राची कॉपी मी आपल्याला दिली आहे. ज्यांना देशात काम करावयास बंदी आहे असा कॉन्ट्रॅक्टर जर तुम्ही आणला हे जर सत्य असेल तर त्या आधारावर हे टर्मिनेट करा आणि ताबडतोब एक वर्षाच्या आत काम होण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करा.

श्री. अनिल देशमुख : माझे उत्तर एकच आहे की, अशा पध्दतीने त्या कंपनीने सबलेट काम केले असेल तर त्याच्यावर कडक कारवाई करु आणि त्यांचे कॉन्ट्रॅक्ट जर रद्द करावयाची वेळ आली तर ते रद्द करु. परंतु सभापती महोदय, मला तपासू ते तरी द्या ? यासंदर्भात अधिकाऱ्यांसोबत आमच्या अनेकदा बैठका झाल्या आहेत. त्यांनी जे काम केलेले आहे ते योग्य पध्दतीने केलेले आहे. मला एकच भीती वाटते की, लिटीगेशनमध्ये गेला तर हा रस्ता पुढच्या पाच वर्षामध्ये होणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**उपसभापती** : पुढे जाऊन रखडण्यापेक्षा शॉट टेंडर एक महिन्यात काढण्यात यावे. तुम्ही गोष्ट सांगितली ती माझ्या मनाला लागली. त्याचे परिणाम मी भोगले आहेत. काम झाले नाही तर जनता तुमचा राजीनामा मागेल. त्यासंदर्भात लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मला माझी जागा डोंबिवलीकरांनी दाखवून दिलेली आहे. निर्देश न ऐकल्यामुळे काय होऊ शकते.....

श्री. अनिल देशमुख : जो रस्ता 8 वर्षे रखडला आहे तो पुढे रखडू नये म्हणून त्याच्यामध्ये आपण योग्य तो मार्ग काढू, रुफींगवाल्याने कॉन्ट्रक्ट रद्द केला आणि तो कोर्टामध्ये गेला ती केस कोर्टामध्ये अजूनही सुरु आहे.

यानंतर श्री. बोरले.....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, लोकप्रतिनिधींवर अविश्वास व्यक्त करण्याचे कारण काय आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले की, सब कॉन्ट्रॅक्टरला काम दिले असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : मी आता ही लक्षवेधी सूचना येथेच संपवित आहे. लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी सभागृहामध्ये जे निर्देश दिलेले आहेत त्याचे माननीय मंत्री महोदयांनी पालन करावे, अशी मी आपल्याला सूचना करतो. आपण त्यावर होय किंवा नाही असे उत्तर द्यावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याला भेटून आपली तारीख घेतो.

-----

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील वायरी-भुतनाथ येथील किशोर सामंत यांची झालेली हत्या.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील वायरी-भुतनाथ येथील किशोर सामंत यांची झालेली हत्या यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री वसंतराव चव्हाण, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, जोगेंद्र कवाडे, श्रीमती फौजीया खान, सर्वश्री जगन्नाथ शेवाळे, सदाशिवराव पोळ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील वायरी-भुतनाथ येथील कै.किशोर सामंत याची माहे नोव्हेंबर, 2006 मध्ये समीर किनरे व त्याच्या मित्रांनी केलेली निघृण हत्या, त्याचा मृतदेह तारकर्ली येथील समुद्रामध्ये फेकून सदरचा अपघात असल्याचे दाखविणे, यामधील दोषींवर कारवाई करण्याची संजिवनी सामंत यांनी गृह विभाग तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, याप्रकरणी कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, किशोर सामंत याची निघृणपणे केलेल्या हत्त्येची उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचे उत्तर आम्हाला अजून मिळालेले नाही. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी एका आईचा हंबरडा सभागृहासमोर ठेऊ इच्छितो. कै.किशोर सामंत हे चुकीचे नाव छापले गेले आहे. कै.केदार सामंत हा त्याच्या मित्रांबरोबर तारकर्ली समुद्र किनारी गेला होता. त्याच्या आईचे रात्री 10.00 ते 10.30 च्या दरम्यान त्याच्या मित्रांशी बोलणे झाले. कै.केदारने त्याच्या आईला सांगितले की, येथे रिक्षा मिळत नसल्यामुळे मला आणण्यासाठी रिक्षा पाठव. त्याच्या आईला रिक्षा मिळाली नाही. त्याची आई रिक्षा पाठवू शकली नाही. कालांतराने त्याच्या आईने फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला की, रिक्षा मिळत नाही, तू तसाच निघून ये. परंतु फोनवर संपर्क होऊ शकला नाही आणि सकाळी त्याचा मृतदेह पाहण्याचे त्याच्या आईच्या नशिबी आले. प्रश्न असा आहे की, कै.केदार सामंत हा पट्टीचा पोहणारा होता. त्याचा ज्या परिस्थितीमध्ये मृतदेह मिळाला, त्याची लुंगी एकीकडे पडलेली होती, बनीयन एकीकडे पडलेले होते. पोस्टमार्टेम रिपोर्ट सुध्दा संशयास्पद आहे. पोलिसांनी पटकन त्याने वैफल्यगस्त भावनेतून आत्महत्या केल्याचे निवेदन प्रेसला दिले. हे सर्व संशयास्पद आहे. तो मुलगा आपल्या बरोबर नाही हे त्याच्या मित्रांनी त्याच्या आईला कळवावयास पाहिजे होते. केदार आमच्या बरोबर नाही. तर केदार कोठे आहे ? याची चौकशी करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तशा प्रकारची चौकशी केली नाही. हा संशयास्पद प्रकार निर्माण झालेला आहे. त्याच्या आईने आपल्याला आणि माननीय मंत्री महोदयांना निवेदन पाठविलेले आहे. हा अतिशय संवेदनशील विषय आहे. यातील पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. माझी अशी मागणी आहे की, या सर्व परिस्थितीचा विचार करता पोलिसांची अक्षम्य चूक लक्षात घेता हा तपास पोलिसांकडून काढून घेऊन माननीय गृहमंत्री हा तपास सी.बी.आय.कडे देतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलिसांची कोणतीही भूमिका संशयास्पद नाही. महाराष्ट्र पोलीस म्हणण्याऐवजी आपण त्यांना संशयास्पद पोलीस या लेव्हलवर आणत आहात. कै.केदार सामंत याचे 6 मित्र कोल्हापूर येथे वकिली करणारे आहेत. या सामंतचे तेथे पॅराडाईज नावाचे हॉटेल आहे. हे वकील ज्यावेळी त्या परिसरामध्ये फिरावयास येत होते त्यावेळी त्या हॉटेलमध्ये राहत होते. त्यांनी नेहमीप्रमाणे हॉटेल मालकाला फोन केला होता की आम्ही फिरायला येणार आहोत. आमच्यासाठी हॉटेल बुक करुन ठेव. सभापती महोदय, ही घटना घडण्यापूर्वी त्याचे

..4..



GRB/ MHM/ KGS/ प्रथम श्री.सोनावणे ......... 16:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील......

हॉटेल बंद होते. त्याची परिस्थिती खालावली होती. कौटुंबिक वाद होते. अशा स्थितीमध्ये त्याने ही कायमचे गि-हाईके आहेत म्हणून मी तुमची दुस-या हॉटेलमध्ये व्यवस्था करतो असे सांगितले व ठरल्या प्रमाणे कोल्हापूरचे 6 वकील दोन गाडयांमधून त्या हॉटेलमध्ये आले होते.

यानंतर श्री.सुंबरे .........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

ते हॉटेल दाखविण्यासाठी त्यांच्याबरोबर तेथपर्यंत देखील गेले. मग त्यांच्याबरोबर जेवून रात्री दीड वाजेपर्यंत ते समुद्राच्या किनाऱ्यावर बसले होते. त्यांचा एकमेकांशी चांगला परिचय होता. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे भांडण वा वैरभाव असल्याचे देखील चौकशीत आढळून आलेले नाही. रात्री दीड वाजल्यानंतर त्यांचा त्याच्याशी कोठलाही संपर्क आला नाही आणि मग सकाळी 6 नंतर त्याचा मृतदेह आढळून आला. त्याच्या बद्दल त्या वकील मित्रांनाही विचारले तेव्हा त्यांनीच त्याची ओळख पटविली. तेव्हा सीआयडीने या प्रकरणी तपास करण्याची परिस्थिती नाही. आपले पोलीसच या प्रकरणी सखोल तपासणी करतील.

****

....... 3डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मौजे दापोडे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील जमिनींचा बिल्डरच्या मदतीने अप्पर मंडल अधिकारी यांनी केलेला घोटाळा.

मु.शी. : मौजे दापोडे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील जमिनींचा बिल्डरच्या मदतीने अप्पर मंडल अधिकारी यांनी केलेला घोटाळा यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

" मौजे दापोडे, ता.भिवंडी, जिल्हा ठाणे येथील नवीन शर्तीच्या जमिनी बिल्डरच्या मदतीने जुन्या शर्तीच्या असल्याचे दाखवून शासनाला मिळणाऱ्या अनर्जित कोट्यावधी रूपयांचे नुकसान होणे, या प्रकरणी अप्पर मंडल अधिकारी, भिवंडी यांनी दापोडे येथील सर्व्हे क्र. 49, 116, 27, 103 या जमिनी 1954-55 सालापासून सातबाराच्या उताऱ्यावर नवीन शर्तीच्या असूनही तहसिलदार यांची केलेली दिशाभूल, सध्याच्या महिला तहसिलदार यांनी या प्रकरणी चौकशी सुरू केल्यानंतर अप्पर मंडळ अधिकारी यांनी स्थानिक बिल्डर व स्थानिक वर्तमानपत्रांना हाताशी धरून सुरू केलेली बदनामीची मोहीम याबाबत स्थानिक जनतेमध्ये व कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे तसेच संतापाचे वातावरण, अप्पर मंडळ अधिकारी यांनी किन्हवली येथे व भिवंडी येथे कुटुंबियांच्या नावे घेतलेल्या शेकडो एकर जमिनीची व मालमत्तेची चौकशी करण्याबाबतची चर्चा या प्रकरणी अप्पर मंडळ अधिकारी, स्थानिक बिल्डर यांची अँटी करप्शनमार्फत चौकशी करण्याची मागणी व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....3डब्ल्यू 3 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा. राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मौजे दापोडे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील हे प्रकरण आहे. एकंदर 14 सर्व्हे नंबर्समधील 41610 चौ.फूट जमीन अप्पर मंडळ अधिकारी यांनी नवीन शर्तीच्या जमिनी जुन्या शर्तीच्या असल्याबद्दल तहसिलदारांवर दबाव आणला आणि त्याप्रमाणे कागदोपत्री दुरूस्ती करावी असे सांगितले. त्यामुळे त्या शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे. सभापती महोदय, माझ्याजवळ 7 केसेस अशाच आहेत. अशा पद्धतीने अप्पर मंडळ अधिकाऱ्यांनी बिल्डरांशी संगनमत केले आणि त्या जमिनी हडपण्याचा प्रयत्न केला. नाशिक-मुंबई हायवेवर या सगळ्या जमिनी आहेत. जेव्हा तहसिलदारांनी हा दबाव मानला नाही आणि याबाबत चौकशी केली तेव्हा हा सारा प्रकार लक्षात आला. म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, हे जे अप्पर मंडळ अधिकारी आहेत त्यांनी अशा प्रकारे त्या भागामध्ये प्रचंड माया जमविली आहे. अशी शेकडो प्रकरणे त्यांनी केलेली आहेत. तेव्हा या अप्पर मंडळ अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी आपण करणार का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या निवेदेनामध्ये सांगितल्याप्रमाणे त्या अप्पर मंडळ अधिकाऱ्यांची प्राथमिक चौकशी झालेली आहे आणि सकृतदर्शनी ते या प्रकरणांमध्ये दोषी आढळले आहेत. त्यामुळे त्यांच्या निलंबनाची मी येथे घोषणा करतो व आजपासूनच त्यांना निलंबित केले जाईल. त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे नं.1 ची जमीन नंबर 3 ची केलेली आहे अशी 41610 चौ.फूट जमीन देखील शासनाकडे वर्ग करण्यात येईल. तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या नावे त्यांनी जी काही जमीन माया जमविली असेल त्याचीही चौकशी करून त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

****

..... 3डब्ल्यू 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासकीय सेवेत असलेल्या ओबीसींना पदोन्नतीमध्ये आरक्षण नसणे.

मु.शी. : शासकीय सेवेत असलेल्या ओबीसींना पदोन्नतीमध्ये आरक्षण नसणे यासंबंधी सर्वश्री सुधाकर गणगणे, संजय दत्त, पांडुरंग फुंडकर, एम.ए.अझिज, धोंडीराम राठोड, जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" महाराष्ट्र राज्यातील ओ.बी.सी. प्रवर्गातील 52 टक्के असणाऱ्यांना 19 टक्के शासकीय सेवेत आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्यात येणे, परंतु त्यांना पदोन्नती देण्यात येत नसणे, गेल्या दोन वर्षांपासून वेळोवेळी ही महत्त्वाची बाब शासनाला विधानमंडळाद्वारे निदर्शनास आणल्यानंतर याबाबत विधानमंडळात देखील आरक्षण देण्याचे शासनाने आश्वासन देणे, तसेच याबाबतची राज्याचे मंत्रिमंडळाच्या उपसमितीने याबाबतची शिफारस करूनसुद्धा याबाबत शासन उदासीन असून कोणत्याही प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेत नसणे, यामुळे राज्यातील 52 टक्के ओबीसी प्रवर्गातील शासकीय कर्मचारी वर्गात निर्माण झालेली अनास्था व असंतोष तसेच सामाजिक अन्याय लक्षात घेता शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.....3डब्ल्यू 5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा. सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ..)

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, ही जी लक्षवेधी सूचना आहे ती या सभागृहामध्ये पाचव्यांदा आलेली आहे. महाराष्ट्रातील 52 टक्के ओबीसींचा हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे आणि हजारो कर्मचारी या सामाजिक न्यायापासून उपेक्षित राहिलेले आहेत. तेव्हा या लक्षवेधी सूचनेवर शासनाकडून जे निवेदन आलेले आहे ते अत्यंत दिशाभूल करणारे आहे असे माझे मत झाले आहे. ही लक्षवेधी सूचना गेल्या दोन वर्षांमध्ये 3-4 वेळा तरी सभागृहामध्ये आलेली आहे आणि त्या प्रत्येक वेळी शासनाकडून करण्यात आलेल्या निवेदनामध्ये असे कोठेही म्हटलेले नव्हते की, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यावेळेस त्यांनी म्हटले होते की, एक महिन्यात शासन यावर निर्णय घेईल. 52 टक्के ओबीसींपैकी 19 टक्के ओबीसींना आरक्षणाद्वारे शासकीय सेवेत आपण नोकऱ्या दिल्या पण त्यानुसार पदोन्नतीमध्ये मात्र आरक्षण दिलेले नाही. आपल्याला न्याय खात्याच्या लोकांनी अंधारात आजपर्यंत ठेवले होते काय ? नसल्यास, आपण यतसे का उत्तर दिले ? आणि आता सध्या ज्या कायद्यान्वये सगळ्या प्रवर्गाला टक्केवारीने पदोन्नती मिळते .....

( यानंतर श्री. सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे...

माझी आपणास विनंती आहे की, शासनाकडून या प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे की, हे अपिल जर रोखले गेले असेल तर न्यायालयाला अधीन राहून पदोन्नतीसंबंधी आपण निर्णय घ्याल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला याठिकाणी थोडेसे सविस्तर सांगावयाचे आहे. माननीय सदस्यांनी सांगितले की, ही लक्षवेधी सूचना 5-6 वेळा मांडण्यात आली. त्यासंबंधी शासनाची भूमिका सांगणे आवश्यक वाटते. प्रामुख्याने ओ.बी.सी. समाजाचे शासकीय कर्मचारी, अधिकारी...

श्री. दिवाकर रावते : न्यायालयामध्ये कोण गेले ते सांगा? ते सांगितले तर वस्तुस्थिती काय आहे हे आपल्या लक्षात येईल.

श्री.राजेश टोपे : आपल्याला क्रोनॉलॉजी सांगितली तर आपल्या लक्षात येईल...

श्री. दिवाकर रावते : न्यायालयामध्ये कोण गेले? न्यायालयाची सध्याची परिस्थिती काय आहे ते सांगा?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, न्यायालयामध्ये श्री. घोगरे व इतर अशी मंडळी गेली आहेत...

श्री. दिवाकर रावते : ही मंडळी न्यायालयामध्ये गेली, ती आपल्या हक्कासाठी गेली. शासनाची भूमिका ओ.बी.सी. ना आरक्षण देण्यासंबंधी सकारात्मक आहे असे सांगून आपण महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये लोकांवर इंम्प्रेस करण्यापेक्षा आपली भूमिका न्यायालयामध्ये मांडा. ती मांडली तर याचिका मागे घेतली जाईल.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला मंत्री म्हणून याठिकाणी उत्तर देण्याचा अधिकार आहे. त्या दृष्टीकोनातून आपण मला उत्तर देण्याची संधी द्यावी, आणि मला संरक्षण द्यावे.

श्री. दिवाकर रावते : तुम्ही तुमची भूमिका न्यायालयाला कां सांगत नाही?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी स्वत: राज्यमंत्री असतांना मागील अधिवेशनामध्ये उत्तर दिले होते की, ओ.बी.सी. प्रवर्गाला सर्व टप्प्यांवर आरक्षण देण्याची शासनाची भूमिका राहील. त्यादृष्टीने आम्ही मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करु. ती समिती गठीत केली. त्या अनुषंगाने समितीने शिफारस केली. त्यानंतर मंत्रिमंडळापुढे हा विषय गेला. आणि हे प्रकरण न्यायालयामध्ये

श्री. राजेश टोपे...

असल्यामुळे न्यायालयाचा जो निर्णय होईल त्या दृष्टीकोनातून मंत्रिमंडळाचा निर्णय घेण्यात येईल. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉस्टिटयुशनल बेंचने दिनांक 19.10.2006 रोजी निर्णय घेतला. त्यामध्ये मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आली.त्या मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने फायनल निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 6.11.2006 रोजी घेतला. त्यामध्ये असे सांगितले की, मुंबईच्या हायकोर्टामध्ये या संदर्भातील सर्व टप्प्यावरील आरक्षण प्रकरण पेंडींग असून त्यांनी आठ आठवडयाच्या आत मार्गदर्शक तत्वाच्या आधारावर निर्णय घ्यावा. आठ आठवडयाचा अर्थ 5 जानेवारी 2007 ही अंतिम तारीख होणार आहे. त्यामुळे 5 जानेवारी 2007 च्या अगोदर मुंबई हायकोर्टाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निर्णय घ्यावा लागेल. शासनाची अत्यंत स्पष्ट भूमिका आहे की,कोणत्याही परिस्थितीत सर्व टप्प्यावर ओ.बी.सी. ना पदोन्नती देण्याची भूमिका लेखी स्वरुपामध्ये हायकोर्टामध्ये मांडण्यात आली आहे. त्यामुळे शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. ओ.बी.सी. ना हे आरक्षण सर्व टप्प्यावर असावे अशी शासनाची भूमिका असून यासंबंधीचा निर्णय दिनांक 5.1.2007 ला लागेल. त्या अनुषंगाने हे शासन पुढील कारवाई करील.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. सुप्रिम कोर्टामध्ये काही मुद्दे उपस्थित होऊ शकतात. त्याकरीता आपली तयारी आहे. ओ.बी.सी. ना पदोन्नतीसाठी आरक्षण दिले पाहिजे अशी शासनाची तयारी आहे, व मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, न्यायप्रविष्ठ बाब असल्यामुळे आम्हाला निर्णय घेता येत नाही. माझी आपणास विनंती आहे की, न्यायालयाचा जो निर्णय येईल त्याला अधीन राहून आपण निर्णय घ्या.

(यानंतर श्री. सरफरे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : तशा पध्दतीने निर्णय घेणे शक्य नाही. कारण यापूर्वीच ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेतलले आहे. मागच्यावेळेस सन्माननीय सदस्यांबरोबर ॲडव्होकेट जनरल यांची भेट घालून दिली. शासनाची भूमिका स्पष्ट आहे. यामध्ये नाही म्हणण्याचे काही कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाला 5 जानेवारी 2007 पर्यन्त निर्णय देण्याबाबत मुदत दिलेली आहे. याचा अर्थ 15-20 दिवसाचा प्रश्न आहे. शासनाची भूमिका हायकोर्टामध्ये मांडणार आहोत. जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्ये त्यांचा निर्णय येईल. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : या विषयाची लक्षवेधी सूचना पाच वेळा या सभागृहामध्ये चर्चेला आलेली आहे. यामधील उत्तर असे येते की, ओ.बी.सी.च्या आरक्षणाच्या संबंधातील प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवून एक महिन्यात निर्णय घेऊ. आता हायकोर्टात प्रकरण असल्याचे सांगितले जात आहे. 25 मे 2004 रोजी हायकोर्टामध्ये प्रकरण गेले. खरे म्हणजे त्यानंतर तीन वेळा ही लक्षवेधी सूचना चर्चेला आली. त्यावेळेस कोर्टामध्ये प्रकरण असल्याबाबत उल्लेखही करण्यात आलेला नव्हता. आता कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर याबाबतचा निर्णय घेऊ असे आता सांगण्यात येत आहे. म्हणजे हायकोर्टामध्ये प्रकरण असतानाही मंत्रीमंडळासमोर ठेवून याबाबतचा निर्णय घेऊ असे सभागृहाला सांगण्यात येत होते. आता माननीय मंत्री महोदय, गुमराह करत आहेत. खरे म्हणजे न्यायालयामध्ये प्रकरण आहे हे कधीच सभागृहामध्ये सांगण्यात आलेले नाही. एक महिन्याच्या आत मंत्री मंडळासमोर ही बाब ठेवून मंजूरी घेऊ असे सांगण्यात येत होते. ओबीसीच्या संदर्भातील शासनाचे धोरण अतिशय उदासीन आहे. ओबीसींच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम चाललेले आहे. आता कोर्टाच्या निर्णयाला अधिन राहून ओबीसीच्या आरक्षणाच्या संबंधात एक महिन्याच्या आत निर्णय घेणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : प्रकरण न्यायालयामध्ये आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्टेथस्को दिलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : मागच्या अधिवेशनामध्ये आपण प्रकरण कोर्टामध्ये आहे असे सांगितलेले नव्हते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : कोर्टाच्या निर्णयाची 5 जानेवारी 2007 रोजी निर्णय घेण्याची अंतिम तारीख आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जास्तीत जास्त 20 दिवस जाणार आहेत. हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे निश्चित प्रकारे कारवाई केली जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)

**उपसभापती** : मंत्री महोदयांनी 5 जानेवारी 2007 पर्यन्त हायकोर्टाचा निर्णय येईल असे सांगितलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : यामध्ये आणखी काही नवीन मुद्दे कोर्टासमोर जाऊ शकतात. कोर्टामध्ये 2004 पासून हे प्रकरण प्रलंबित आहे. 20 दिवसात हा निर्णय झाला नाही तर कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून शासन निर्णय घेईल काय ?

श्री. राजेश टोपे : यामध्ये जी कायदेशीर बाब आहे ती तपासून निश्चित प्रकारे सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

----

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : पुणे (विद्यावाडी) येथे श्री. दत्तात्रय संभाजी वाघमारे यांच्या घरी झालेली घरफोडी.

**मु. शी**. : पुणे (विद्यावाडी) येथे श्री. दत्तात्रय संभाजी वाघमारे यांच्या घरी झालेली घरफोडी यासंबंधी श्री.सदाशिवराव पोळ, प्रा. फौजीया खान व श्री. जितेंद्र आव्हाड, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. फौजीया खान ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे (विद्यावाडी) येथील चंद्रमणी को.ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीतील श्री. दत्तात्रय संभाजी वाघमारे, वय वर्षे 72 निवृत्त समाजकल्याण अधिकारी यांच्या घरी दिनांक 12 नोव्हेंबर, 2006 रोजी वा त्या दरम्यान झालेल्या घरफोडीत रु. 1,22,000/- चे सोने व रोख रक्कम लुटारुंनी चोरुन नेणे, यासंदर्भात दिनांक 13 नोव्हेंबर, 2006 रोजी विश्रांतीवाडी पोलीस स्टेशन (आळंदी रोड) येथे एफ.आय.आर. क्र. 261 अन्वये गुन्हा नोंदवूनही चोरट्यांचा अद्यापपावेतो तपास न लागणे, यासंदर्भात विद्यावाडी-टिंगरे नगर (पुणे) परिसरात नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. आर. आर. पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजीया खान :माननीय अध्यक्ष महोदय, इस प्रकरण में जिन संशयित आरोपियों को पकड़ा गया है उनके नाम क्या हैं तथा उनको किस संशय में गिरफ्तार किया गया है. यदि ये आरोपी पी.सी.आर. में होते तो असली गुन्हेगार मिलने की शक्यता ज्यादा थी. अब इनको एम.सी.आर. मिल गया है. इसलिए मुझे पूछना है कि असली गुन्हेगार को ढूंढने के लिए क्या कार्रवाई की जा रही है तथा चोरी गया हुआ सोना और पैसा ढूंढने के लिए क्या कार्रवाई की जा रही है ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, श्री. जुबेर खान, वय 24 वर्षे तसेच श्री. अनिल शिवाजी धोत्रे, रा. विश्रांतवाडी, पुणे अशी संशयितांची नावे आहेत. संबंधित पोलीस स्टेशन या चोरीचा तपास लावण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहे. संशयितांवर नजर ठेवलेली आहे. चोरीचा तपास लावण्याच्या दृष्टीने, चोरीचा माल घेणाऱ्यांच्या लिस्टमध्ये जे सोन्याचे व्यवहार करणारे आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवणे या सगळ्या बाबींवर पोलीस बारकाईने लक्ष ठेवून आहे.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे सिरोंचा येथील श्री. शेख अफरोज यांचा पोलिसांच्या मारहाणीत झालेला मृत्यू.

**मु. शी.** : मौजे सिरोंचा येथील श्री. शेख अफरोज यांचा पोलिसांच्या मारहाणीत झालेला मृत्यू यासंबंधी प्रा. जोगेंद्र कवाडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण भागात पवन ऊर्जा प्रकल्पाच्या खाजगी फिरत्या पथकाकडून जनतेमध्ये निर्माण झालेली दहशत.

**मु. शी.** : नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण भागात पवन ऊर्जा प्रकल्पाच्या खाजगी फिरत्या पथकाकडून जनतेमध्ये निर्माण झालेली दहशत यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, राजन तेली, रमेश निकोसे, संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदुरबार जिल्हयातील ग्रामीण भागात सुझलॉन पवन ऊर्जा प्रकल्पातील काही वस्तूंच्या चोरीस आळा घालण्यासाठी पवन ऊर्जा प्रकल्पाने काढलेले फिरते खाजगी पथक ग्रामीण भागातील सर्वसामान्य व गरीब जनतेमध्ये दहशत निर्माण करीत असल्याचे डिसेंबर, 2006 च्या पहिल्या आठवडयात आढळून येणे, या खाजगी पथकात बाहेरील गुंड प्रवृत्तीच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात येणे, हे सदस्य नेहमी रात्री बेरात्री ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या घरात शिरुन घरांची झडती घेत असणे, काही वेळा घरात महिला एकट्याच असल्याने त्यांची विटंबनाही केली जात असल्याचे आढळून येणे, रात्री केव्हाही शेतावर राहणाऱ्या शेतकऱ्यांचीही झडती घेण्यात येणे, तसेच त्या परिसरातील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांचीही झडती घेणे, यामुळे सर्वसामान्य गरीब ग्रामस्थ व शेतकरी यांच्या मनात दहशत निर्माण होणे, याबाबत जिल्हयातील ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, नंदुरबार व जिल्हाधिकारी, नंदुरबार त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक यांचेकडे लेखी निवेदन देणे, सबब, या खाजगी पथकावर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...6...

RDB/ D/ KTG

श्री. विनय कोरे ( अपारंपारिक ऊजा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गृह खात्याशी निगडित होती परंतु या ठिकाणी अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केलेले आहे. माननीय उपमुख्यमंत्री सुध्दा या ठिकाणी उपस्थित आहेत. त्या भागात एकदा पवन ऊर्जा प्रकल्प आला तर आमच्या भागाचा विकास होईल अशी स्वप्ने खऱ्या अर्थाने आमच्या परिसरातील जनतेने पाहिलेली होती. परंतु दुर्दैवाने या पवन ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून ही सुझलॉन कंपनी नंदुरबार तालुक्यामध्ये आल्यापासून गुन्हेगारी अत्यंत मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. पवन ऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने सुझलॉन कंपनीने आमच्या भागामध्ये समांतर सरकार उभे केले आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या घरामध्ये जाऊन झडती घेण्याचे काम या कंपनीचे सुरक्षा रक्षक करतात. रस्त्यावर सुध्दा तपासणी पॉईन्ट लावतात आणि येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या गाड्या ही मंडळी तपासतात. शासनाने त्यांना अधिकार दिलेले आहेत काय ? या उत्तरामध्ये सुध्दा शासनाने मान्य केले आहे. लोकांच्या घराची झडती घेतात याबाबत लक्षवेधीमध्ये मुद्दा उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात निवेदनात असे म्हटले आहे की, झडत्या पोलीसच घेतात आणि घर झडत्या घेताना कंपनीच्या खाजगी सुरक्षा रक्षकांची मदत घेण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षामध्ये या सुरक्षा रक्षकांनीच झडत्या घेतल्या. एकही पोलीस त्यांच्याबरोबर नव्हता. रात्री 2-3 वाजता जाऊन शेतामध्ये असलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या घराची झडती घेतात. त्या भागात रात्री 12.00 वाजता वीजपुरवठा सुरु होतो आणि सकाळी 4.00 वाजता वीजपुरवठा जातो. ते शेतकरी रात्री 12.00 वाजता शेतात पाणी भरावयास जातात त्यावेळी त्यांना रस्त्यावर त्या कंपनीचे लोक अडवतात. तू कोठे चालला आहेस असे त्यांना विचारतात. एवढा त्रास त्या भागामध्ये या कंपनीच्या माध्यमातून होत आहे. या कंपनीच्या लोकांनी बेकायदेशीर झडत्या घेतलेल्या आहेत. त्या ठिकाणी जैन धर्मियांचे देशातील पवित्र तीर्थक्षेत्र आहे. त्या ठिकाणी हे लोक येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक माणसाची गाडी तपासतात. त्यांनी हे जे गैरकृत्य केलेले आहे त्यासंदर्भात त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार काय ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी माहिती दिली. परंतु अशा प्रकारे खाजगी सुरक्षारक्षकांकडून कुणाच्या घराची झडती घेतली गेली आहे अशी तक्रार त्या परिसारातील पोलीस ठाण्यात दाखल झालेली नाही.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये विसंगती आहे.

श्री. विनय कोरे : 41 लाखाच्य मालाची चोरी झाली. 16 गुन्हे दाखल झाले. पोलिसांच्या रेकॉर्डवर गुन्हेगार म्हणून असलेल्या 21 जणांच्या घरांची झडती घेण्यात आली आणि त्यांच्या घरातून 41 लाख 43 हजार रु.चा माल हस्तगत करण्यात आला. नंदूरबार जिल्ह्यामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी पवन ऊर्जा प्रकल्प आहेत. नंदूरबार व्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी पवन ऊर्जा कंपन्यांना सुरक्षारक्षक ठेवण्याची वेळ आली नाही. नंदूरबार जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर चो-या होतात...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, खाजगी सुरक्षारक्षक घर झडत्या घेतात असा प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेला आहे. या लक्षवेधीच्या निवेदनावरुन त्या ठिकाणी भरपूर चो-या झालेल्या आहेत ही गोष्ट स्पष्ट होते. जरी चोरी झाली तरी खाजगी सुरक्षारक्षकाला कुणाच्या घरापर्यन्त जाता येणार नाही. या घटनेमध्ये खाजगी सुरक्षारक्षकांनी कुणाच्या घराची झडती घेतली होती का याची पोलिसांमार्फत चौकशी केली जाईल. जर त्यांनी अशी झडती घेतली असेल तर त्यांच्यावर ट्रेस पासिंगचे गुन्हे दाखल केले जातील. कंपनीला खाजगी सुरक्षारक्षक ठेवावे लागतात याचा अर्थ चो-या होत असतात. अशा चो-या होऊ नयेत म्हणून बंदोबस्त करण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

श्री. दिवाकर रावते : खाजगी सुरक्षारक्षकांनी घरांची झडती घेणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. आपल्या संरक्षणासाठी खाजगी कंपन्या सुरक्षारक्षक ठेवतातच. लक्षवेधीचे निवेदन आणि माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर यामध्ये विसंगती आहे. घरांची झडती घेताना खाजगी सुरक्षारक्षकांची मदत घेतली होती असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. म्हणजे हे खाजगी सुरक्षारक्षक झडती घेत होते. सन्माननीय मंत्री महोदयांनी असेही उत्तर दिले की, खाजगी सुरक्षारक्षकांनी घराची झडती घेतल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला कुणी केलेली नाही. खाजगी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

रक्षकांनी घरांची झडती घेतली हे निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये विसंगती आहे.

श्री. विनय कोरे : पोलिसांच्या रेकॉर्डवर जे चोर आहेत अशा 21 जणांच्या घरांची पोलिसांनी झडती घेतली. त्यावेळी सुरक्षारक्षक बरोबर होते.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : नंदूरबार जिल्ह्यामध्ये चो-या होतात असे मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितलेले आहे. त्यामुळे आमच्या नंदूरबार जिल्ह्याला कलंक लागलेला आहे याचे मला दु:ख होत आहे. जेव्हा ही सुझलॉन कंपनी आमच्याकडे आली तेव्हापासून चो-या व्हायला सुरुवात झाली. पूर्वी या कंपनीच्या स्टोअर मधून त्या कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने चो-या होत होत्या. त्या चो-या बंद झाल्यानंतर आता टॉवरमधून चो-या होतात. नंदूरबारमध्ये महाराष्ट्रातील गुन्हेगारी टोळ्या कार्यरत झालेल्या आहेत. या गुन्हेगारी टोळ्यांचे आपसात केव्हाही युध्द भडकेल. आतापर्यन्त ज्या चो-या पोलिसांनी पकडल्या त्या या टोळयांच्या आपसातील वैमनस्यामुळे पकडलेल्या आहेत. पोलिसांनी स्वत:च्या कौशल्याने ह्या चो-या पकडलेल्या नाहीत. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, नंदूरबार आणि निझामपूर पोलीस स्टेशनला चोरांकडून आणि सुझलॉन कंपनीकडूनही हप्ते जात आहेत.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी.........

असे प्रकार या तालुक्यामध्ये फार मोठया प्रमाणात होतात म्हणून अत्यंत कर्तव्यदक्ष आणि कठोर अधिकारी नेमावा. परंतु चोऱ्या होऊ नयेत अशी इच्छा सर्व लोकप्रतिनिधींची आहे. म्हणून सन्माननीय गृहमंत्र्यांनी अत्यंत कर्तव्यदक्ष व कठोर अधिकारी नेमावा अशी विनंती करतो. ती विनंती मान्य होईल का?

श्री.आर.आर.पाटील : संपूर्ण घटनेची आय.जी.मार्फत चोकशी करण्यात येईल आणि पुन्हा अशा घटना होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल.

--------

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विनंती केल्यानुसार मी आता 12 व्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पवन ऊर्जा प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींना योग्य तो भाव न मिळणे.

**मु. शी.** : पवन ऊर्जा प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींना योग्य तो भाव न मिळणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक ऊर्जामंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्ह्यातील कवळे महाकांळ, तासगांव, आटपाडी, जत आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या दुष्काळी पट्टयातील हजारो एकर जमीन कवडीमोल भावाने पवन ऊर्जा प्रकल्पासाठी विकत घेण्याच्या सपाटा दलालांच्या मार्फत मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील धनदांडग्या उद्योगपतीनी लावणे, या धनदांडगांच्या पवन चक्क्यांना सरकारने सर्व सवलतींच्या खिरापती वाटल्या असतांनाही शेतकऱ्यांना किमान एकरी 2 लाख रुपये भाव न देणे, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील किमान 2 व्यक्तींना रोजगार न देणे, पवनचक्क्या उभ्या करण्याचे काम गुजरातमधील सुजलॉन कंपनी करीत असून या कामासाठी लागणारे कॉन्ट्रॅक्टर गुजरात राज्यातून आणल्यामुळे स्थानिक कॉन्ट्रक्टरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणे, त्याचप्रमाणे येथे उत्पन्न होणारी वीज या दुष्काळी भागात पुरवठा करुन या भागातील शेतकऱ्यांचे वीज भारनियमन कमी करण्याऐवजी ही वीज शहरांना पुरविण्यात येणे, या सर्व बाबींमुळे या दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेले संतापाचे व असंतोषाचे वातावरण, या संदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका. "

श्री.विनय कोरे ( अपारंपारिक ऊर्जामंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेबाबत मी विजेच्या मळ्यात अंधाराचे साम्राज्य असे वर्णन करतो. सांगली जिल्हयातील जे अतिदुष्काळी तालुके आहेत त्यात कवठे महाकाळ, जत, तासगावचा पूर्व भाग, सन्माननीय उपमुख्यमंत्री निवडून आले तो भाग त्याचप्रमाणे सांगोला तालुक्याचा भाग याठिकाणच्या हजारो एकर जमिनी कवडीमोल भावाने दलालांमार्फत संपूर्ण देशातील धनदांडगे, या मंत्रीमंडळातील काही मंत्री, त्यांचे नातेवाईक यांनी विकत घेतल्या आहेत. मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, या भागात दुष्काळ पाचवीला पुजलेला आहे. पीक येत नाही, अशा वेळेला त्या शेतकऱ्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन दलालांमार्फत 30 ते 40 हजार रुपयांमध्ये जमिनी हडप करण्यात आल्या. स्थानिकांना या प्रकल्पांमध्ये नोकरी दिली जात नाही. वीज आमच्या शेतात पिकत असताना आम्ही मात्र अंधारात चाचपडतो. थोडीफार वीज या दुष्काळी भागाला दिली तर काही प्रमाणात लोडशेडिंग कमी होऊ शकते. म्हणून या भागाला न्याय देण्यासाठी पडिक जमिनीसाठी 2 लाख रुपये प्रती एकर भाव शेतकऱ्यांना दिला जाईल का? ज्या शेतजमिनी आहेत त्यासाठी प्रती एकर 4 लाख रुपये भाव दिला जाईल का? प्रत्येक कुटुंबातील 2 व्यक्तींना नोकरी देणार का? अंधाराचे साम्राज्य दूर होण्यासाठी वीज पुरवठा केला जाईल का?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, कुठल्याही परिसरात पवन ऊर्जा प्रकल्प विकसित होतो त्यावेळेला पवन ऊर्जेचे पोटेन्शियल त्या परिसरात किंवा त्या गावात आहे का हे तपासण्यासाठी विण्डमास्ट दोन वर्षे लावले जाते. सरकारच्या वतीने लावले जाते व जे खाजगी प्रवर्तक प्रकल्प उभा करतात त्यांच्या वतीने सुध्दा उभे केले जाते. दोन वर्षाचा वारा त्याठिकाणी किती वाहतो त्याचे रिडिंग घेऊन चेन्नई येथील संस्था अभ्यास करुन एमएनएसच्या दिल्ली येथील कार्यालयात कळविते व एखादी साईट एमएनएस जाहीर करते. ज्या गावात प्रकल्प होत असतो त्या गावातील शेतकऱ्यांना विण्डमास्ट बसविल्यानंतर दोन वर्षात त्या ठिकाणी प्रकल्प होणार याचे ज्ञान असते. जमीन खरेदी-विक्री करणे यावर शासनाचे कोणतेही बंधन नाही. पूर्णपणाने खाजगी स्वरुपाचा व्यवहार आहे. हा व्यवहार त्याठिकाणी झालेला आहे. काही विभागात शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्हाला जमीन द्यावयाची नाही. महाराष्ट्रात ज्या ज्याठिकाणी अशा प्रकारचे पवन ऊर्जा प्रकल्प आले त्यापैकी काही ठिकाणी शेतकऱ्यांनी जमिनी भाडयाने सुध्दा दिलेल्या आहेत. खास करुन ज्या परिसरातील लक्षवेधी सूचना विचारली आहे त्या परिसरातील हा प्रश्न आल्यानंतर विभागाने

..4..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.....

माहिती घेतली. जिल्हाधिकाऱ्यांकडून सगळया खरेदी विक्रीच्या बाबतीतील माहिती घेतली त्यावरुन एक गोष्ट दिसून येते की, तेथील जमिनीचा सरकारचा मिनिमन जो दर आहे त्यापेक्षा जास्त रक्कमेचा खरेदी विक्री व्यवहार झालेला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे....

सभापती महोदय, यासंदर्भातील संपूर्ण माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : दुष्काळी भागातील जमिनी या प्रकल्पासाठी घेतल्या जात आहेत. आम्ही या जमिनीसाठी केवळ 2 लक्ष रुपये प्रती एकर भाव मागत आहोत तुम्ही एस.इ.झेड. च्या प्रकल्पातील जमिनीला एकरी 40 लक्ष रुपये भाव देत आहात. मग येथे दोन लाख रुपये एकरी भाव द्यावा. तसेच ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्या घरातील दोन व्यक्तींना नोकरी देण्यात यावी एवढीच आम्ही मागणी करीत आहोत त्यामुळे याबाबत सरकार कारवाई करेल काय?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. जमीन खरेदीचा व्यवहार हा दोन माणसांमध्ये होत असतो. या व्यवहारामध्ये शासनाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कोणताही संबंध येत नाही. प्रत्यक्ष 1 मे.वॅ. वीज तयार होते त्या ठिकाणी 1 रोजगार मिळतो व ज्या ठिकाणी अप्रत्यक्ष 1 मे.वॅ. वीज तयार होते त्या ठिकाणी 2 रोजगार उपलब्ध होतात. तसेच आपण मागणी केलेली आहे की, आमच्या भागात वीज तयार होत असतांना प्रत्यक्षात मात्र आमच्याकडे अंधार आहे त्यामुळे आमच्या भागाला जास्त वीज मिळण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, वीज किती तास द्यावी, किती तास देऊ नये यासंदर्भातील विषय हा एमईआरसी कडे आहे. एमईआरसीच्या सूचने प्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी ही या विजेचे वितरण करीत असते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या शेतक-यांच्या जमिनीवर पवन ऊर्जेचे प्रकल्प सुरु होतात त्या शेतक-याच्या कुटुंबातील दोन मुलांना त्या ठिकाणी रोजगार मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे असे पवन ऊर्जा प्रकल्प ज्या ठिकाणी होतात, तेथील शेतक-याच्या कुटुंबातील दोन मुलांना नोकरी मिळण्याच्या संदर्भात आपण जी.आर. काढून गरीब शेतक-याला न्याय मिळवून देणार आहात काय?

**सभापती** : पवन ऊर्जेच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयात प्रकल्प मोठया प्रमाणात येत आहेत. या ठिकाणी जमिनीच्या विक्रीचा व्यवहार करतांना अनेक लोकांची फसगत होत असते अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात आपल्या विभागाचा डायरेक्ट संबंध येत नसला तरी यासंदर्भात महसूल विभागाचे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे. तसेच ज्या ठिकाणी पवन ऊर्जेचे प्रकल्प येतात त्या ठिकाणच्या कुटुंबातील दोन व्यक्तींना प्राधान्याने नोकरी देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता आले तर करावेत असे सन्माननीय सदस्यांचे मत आहे.

.....2

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पवन ऊर्जेला प्रोत्साहन दिले पाहिजे आणि जास्तीत जास्त पवन ऊर्जेचे प्रकल्प आपल्याकडे येण्यासाठी माननीय मंत्रीमहोदय प्रयत्न करीत आहेत याची आम्हाला कल्पना आहे. परंतु आदिवासी शेतक-याच्या जमिनीवर पवन ऊर्जेचे प्रकल्प येतात त्या सर्व कंपन्या करोडो रुपये उत्पन्न मिळवित असतात तसेच शासन त्यांना करोडो रुपयांचे कर माफ करीत असते. ज्यांच्या जमिनी घेतल्या जातात त्यांना किराया म्हणून जास्त रक्कम मिळण्याची आवश्यकता आहे, तसेच त्या कुटुंबातील दोन मुलांना नोकरी मिळण्याची आवश्यकता आहे. एका कुटुंबातील दोन मुलांना नोकरी देणे हे त्या कंपनीला अनिवार्य केल्याशिवाय आदिवासी कुटुंबाला न्याय मिळणार नाही. तसेच पवन ऊर्जेचे प्रकल्प होतांना आदिवासी आणि शेतक-यांच्या हक्काचे रक्षण होण्यासाठी विशेष प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. आंध्र आणि कर्नाटक मध्ये जमिनीचे भाडे 25 हजार रुपये दिले जाते तशाच पध्दतीने आपल्याकडे शेतक-यांना जमिनीचे भाडे मिळण्याच्या संदर्भात काही प्रयत्न केले जातील काय?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, माननीय गडकरी साहेबांनी दोन वेगवेगळे विषय उपस्थित केलेले आहेत. पवन ऊर्जेसाठी आदिवासी जमिनीचा वापर करतांना त्यासाठी वेगळे धोरण आहे. आदिवासींच्या जमिनी या विकत घेतल्या जात नाही तर त्या जमिनी भाडे पट्टयांने घेतल्या जातात. आदिवासींच्या जमिनीची विक्री करता येत नाही असे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे.........

खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनी विकल्या जातात त्या जमिनींवर अशाप्रकारचे प्रकल्प उभारले जातात. त्यांच्यामध्ये जो खरेदी-विक्रीचा व्यवहार होतो ती बाब पूर्णत: खाजगी स्वरुपाची असते. तो खाजगी स्वरुपाचा व्यवहार असतो. ज्या शेतकऱ्यांना कल्पना असते ते शेतकरी स्वत:ची जमीन भाड्याने देतात. महाराष्ट्रात अनेक शेतकऱ्यांनी अशाप्रकारच्या प्रकल्पांसाठी भाड्याने जमिनी दिलेल्या आहेत. ज्या गावात पवन ऊर्जा प्रकल्प उभे राहणार आहेत त्याठिक्‍ाणच्या लोकांना पवन ऊर्जेच्या प्रकल्पाबाबत माहिती होण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये सविस्तर माहिती देण्यात येईल. लोकप्रतिनिधींना देखील माहिती देण्यात येईल. लोकांना अधिक जागरुक करण्यासाठी आमच्या विभागामार्फत प्रयत्न करण्यात येतील.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. :दूध उत्पादक संघांना लीटर मागे 1 रुपया 10 पैसे कमिशन देण्याचा काढलेला आदेश रद्द झाल्याबाबत.

**मु. शी**. : दूध उत्पादक संघांना लीटर मागे 1 रुपया 10 पैसे कमिशन देण्याचा काढलेला आदेश रद्द झाल्याबाबत यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, सागर मेघे, विनोद गुप्ता, प्रकाश शेंडगे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पशुसंवर्धन खात्याने 50 हजार जिटरपेक्षा कमी उत्पादन असलेल्या दूध उत्पादक संघांना लिटर मागे 1 रुपया 10 पेसे कमीशन देण्याचे आदेश काढणे, या आदेशाचा लाभ विदर्भातील दुध उत्पादक संघानाच मिळत असल्याचे निदर्शनास येताच तीन महिन्यात काढलेल्या आदेशात सुधारणा करण्यात येणे, या सुधारित आदेशात खाजगी डेअरींचे दूध संकलनही मोजण्यात यावे असे नमूद करण्यात येणे, या आदेशाने विदर्भातील दूध उत्पादक संघामध्ये निर्माण झालेला असंतोष, या सुधारित आदेशाचा फटका विदर्भाला बसणे, डॉ. स्वामीनाथन आयोग विदर्भात आल्यानंतर पशुसंवर्धन खात्याने काढलेला आदेश मा.पंतप्रधानांचा दौरा संपताच सुधारित करुन विदर्भाच्या तोंडाला पाने पुसणे, यामुळे विदर्भातील दूध उत्पादकांमध्ये तसेच दूध उत्पादक संघांमध्ये उसळलेली संतापाची लाट, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिस अहमद ( दुग्धविकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, दूध उत्पादकांना सरसकट दरवाढ देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर या निर्णयात सुधारणा करण्यात आली. त्यामुळे विदर्भातील दूध उत्पादकांवर अन्याय होत आहे. कारण विदर्भात दूध उत्पादन फार कमी आहे. त्यादृष्टीने सुधारणा करण्यात येईल का ? दुसरे म्हणजे विदर्भातील दूध उत्पादकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आपण ज्या डेअरी सुरु करतो त्यासाठी ग्रामपंचायतीचा दाखला, एन.ओ.सी. सर्टीफिकेटची आवश्यकता लागते. आता आपण लिबरल धोरण स्वीकारलेले आहे. तेव्हा वरील अट रद्द करणार काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, विदर्भात दूधाचे उत्पादन कमी आहे. या विभागाचे मंत्री विदर्भातील आहेत. पण सर्व दूध सोसायट्या कोल्हापूरमध्ये आहेत. तेव्हा विदर्भात दूधाचे उत्पादन वाढविण्यासाठी येथील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त गायी देण्यात येतील काय ?

श्री.अनिस अहमद : माननीय सभापति महोदय, जहां पर 50 हजार लिटर से कम दूध होता है वहां पर हमने 1.10 रुपए कमीशन देने का निर्णय लिया है. माननीय सदस्य ने भी कहा कि 1.10 रुपए कमीशन देना चाहिए. इस बारे में यदि केबिनेट के सामने भी जाना पड़ा तो हम जायेंगे. यह बात सच है कि 94 प्रतिशत दूध पश्चिम महाराष्ट्र में उत्पादित हो रहा है. मराठवाडा और विदर्भ में दूध का उत्पादन कम हो रहा है. दूध उत्पादन एक ऐसा जोड़ धंधा है जिससे किसानों की जान बच सकती है. आपने यहां पर छोटी-छोटी एन.ओ.सी. देने की बात कही है. मैं आपको बताना चाहूंगा कि इस बारे में हम हर तरह की रिलेक्सेशन देने को तैयार हैं. मुख्यमंत्री निधि से अभी तक हमने 5 हजार गाय बांटी हैं. प्रधानमंत्री निधि का पैसा भी आ गया है. एक जिले में हम एक-एक हजार गाय बांटने वाले हैं आने वाले तीन साल में हमको 18 हजार गाय बांटनी हैं और पांच गुना उत्पादन हमें दूध का बढ़ाना है. ऐसा करने से ही विदर्भ और मराठवाडा में किसानों की जान बच सकती है.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, दिनांक 13.6.2006 रोजी उत्पादकांना एक रुपया दहा पैसे कमिशन देण्याचा पहिला जी.आर.काढला. नंतर त्यामध्ये सुधारणा करुन दिनांक 11.9.2006 रोजी दुसरा जी.आर.काढला. यामध्ये तीन महिन्यांचा कालावधी गेला. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या तीन महिन्यांचे पैसे दूध संकलन करणाऱ्या शेतकऱ्यांना देणार का ?

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, किसानों का जो नुकसान हुआ है, उन तीन महीने के पैसे भी देंगे. जो भी रिलेक्सेशन देनी पड़ेगी वह देंगे और हर तरह से किसानों की हम मदद करेंगे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण तज्ज्ञांनी तयार केलेल्या गणिताच्या अभ्यासक्रमाकडे शासनाने पाठ फिरवल्याबाबत

**मु. शी.** : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण तज्ज्ञांनी तयार केलेल्या गणिताच्या अभ्यासक्रमाकडे शासनाने पाठ फिरवल्याबाबत यासंबंधी डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, ॲड.अनिल परब, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सांवत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" एसएससी, एचएससी व महाविद्यालयांच्या गणित या विषयात राज्यातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात अनुत्तीर्ण (नापास) होत असून हीच परिस्थिती थोड्या फार प्रमाणावर देशपातळीवर असल्याने गणित विषयांत विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी म्हणून देशपातळीवर व युध्दपातळीवर सुरु असलेल्या प्रयत्नाचा भाग म्हणून केंद्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या तज्ज्ञांनी तयार केलेला गणिताचा अभ्यासक्रम यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून आंध्रप्रदेश कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, बिहार उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा आदि 15 राज्यांनी एनसीईआरटीने तयार केलेला गणिताचा प्रस्ताव स्विकारला असून या महत्वाच्या विषयाकडे शासनाने पाठ फिरविली असणे, याबाबत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (एनसीईआरटी) संस्थेने महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव देऊन शासनाने दिलेला थंडा प्रतिसाद, शासनाने गणित हा विषय सक्तीचा न करता तो ऐच्छिक ठेवण्याचा धरलेला आग्रह, या शासनाच्या प्रवृत्तीमुळे राज्यातील गणित हा अत्यंत महत्वाचा विषय ऐच्छिक करण्याची मागणी केल्याने एनसीईआरटीच्या गणित व शास्त्र विभागाचे प्रमुख प्रोफेसर हुकुमसिंग यानी व्यक्त केलेला खेद व दाखविलेली स्पष्ट नापसंती, परिणामी तमाम विद्यार्थी वर्गात पालकांत व शिक्षण तज्ज्ञांत व जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, गणित हा विषय ऐच्छिक असावा की अनिवार्य असावा यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, तिसरे चर्चासत्र औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येणार आहे. या तीनही चर्चासत्रांमध्ये व्यक्त झालेले विचार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

परंतु कोणत्याही प्रकारचा निर्णय अजूनपर्यंत झालेला नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, एकूण 10 वीच्या परीक्षेमध्ये प्रत्यक्षात गणित विषयामध्ये किती विद्यार्थी नापास झाले ? तसेच, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " गणित या विषयामध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण बरेच जास्त आहे. इयत्ता 10 वीच्या परीक्षेस बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी केवळ 11.5 टक्के विद्यार्थी इयत्ता 12 वीच्या परीक्षेला गणित विषय घेतात." गणित विषय घेऊन इंजिनिअरिंगला जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या 12-15 टक्के आहे, असे यामध्ये म्हणणे चुकीचे आहे. 12 वीला किती विद्यार्थी गणित विषय घेतात, यापेक्षा 10 वीला नापास होणा-या विद्यार्थ्यांकडे आपण लक्ष दिले पाहिजे. तसेच, गणित विषया बरोबरच दुसरा एखादा विषय घेऊन यासंदर्भात आपण एकत्रित योजना आखणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, 10 वी आणि 12 वीमध्ये गणित या विषयामध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. 10 वी परीक्षेमध्ये पास होऊन 12 वीमध्ये जवळपास 11.5 टक्के विद्यार्थी गणित विषय घेऊन सायन्स घेतात. यामध्येही नापासचे प्रमाण प्रचंड आहे. त्याप्रमाणे यामध्ये दोन-तीन पर्याय आहेत. यामध्ये आपण दोन लेव्हलला कॉम्पेनसेट करु. तसेच, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, याबाबत आम्ही साकल्याने विचार करु.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हे कधीपर्यंत होईल ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, येत्या शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीपर्यंत होईल.

-------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 10 व 11 बाबत.</u>**

**सभापती** : कामकाजपत्रिकेतील क्रमांक 10 व 11 या दोन लक्षवेधी सूचना पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील.

आता आपण विधानसभेने संमत केलेले सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 109-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (तिसरी सुधारणा) विधेयक घेऊ.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रधान सचिव (2) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक 8 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 275 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 275 ही निवेदने कृपया छापावी.)

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (तिसरी सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. CIX OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)**

श्री.राजेश टोपे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 109-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम,1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री.राजेश टोपे : मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 109-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम,1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 109 संमत कराण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 109 संमत झाले आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण आताच दोन लक्षवेधी सूचना पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील असे सांगितले. या लक्षवेधी सूचना ज्या सन्माननीय सदस्यांच्या आहेत, ते या सभागृहामध्ये नव्याने आलेले आहेत. त्यांनी पूर्ण काळ सभागृहात काम केले आहे. त्यामुळे त्यांची लक्षवेधी सूचना आल्यानंतर आपण ती नंतर घेणार असे सांगणे योग्य होणार नाही. माझी विनंती आहे की, आपण त्यांना दोन-तीन प्रश्न विचारण्यास संधी द्यावी.

**सभापती** : ठीक आहे. दोन्ही बिले झाल्यानंतर मी त्यांना परवानगी देईन.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

**मु.शी.**: सन 2004 चे वि.पवि.क्रमांक 28 - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 28-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्याकरिता नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीने आपला अहवाल सादर करण्यासाठी नेमून दिलेली मुदत पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त वाढविण्यात यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------------------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चालू हंगामात शेतक-यांच्या कापूस खरेदीबाबत शासनाकडून केल्या जाणा-या उपाययोजना

**मु.शी.**: चालू हंगामात शेतक-यांच्या कापूस खरेदीबाबत शासनाकडून केल्या जाणा-या उपाययोजना संबंधी माननीय पणन राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर सभागृहात ज्यावेळी चर्चा झाली होती त्यावेळी सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली होती की, कर्ज आणि व्याज माफ करण्यासंदर्भात तसेच कापसाला 2700 भाव देण्याबाबत गांभीर्याने विचार करावा. परंतु, निवेदनावरुन असे दिसून येते की, व्याजमाफी झाली नाही तसेच कर्जही माफ झाले नाही तसेच कापसाला 2700 रुपये भावही दिलेला नाही. शेतक-यांच्या डोळयात अश्रू आणणा-या शासनाच्या या भूमिकेचा मी तीव्र शब्दात निषेध करतो.

---------------

यानंतर श्री.गागरे............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 10 बाबत**

**सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर क्रमांक 10 वर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर वि.प.स. यांनी या "अलिबाग जवळच्या गावांमध्ये समुद्रकाठच्या शेतीची खार बंदिस्ती फुटून शेतीत पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबत" या विषयावर दिलेली लक्षवेधी सूचना दाखविलेली आहे. तथापि संबंधित खात्याचे माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर घेतली जाईल.

---------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहातील कामकाजाबाबत**</u>

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना काही निवेदने सादर करावयाची असल्यास त्यांनी ती पटलावर ठेवावीत. आतापर्यंत 18 निवेदने माझ्याकडे दाखल करण्यात आलेली आहेत.

श्री.नितीन गडकरी : नियम 93 अन्वये च्या सूचना चर्चेला घेणार असे सांगितले होते, त्याबाबत काय झाले ?

**सभापती** : मला सांगितले गेले आहे की, त्या अनुषंगाने माननीय उपसभापतींनी निर्णय घेतलेला आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचना आता चर्चेला येणार नाहीत. संसदीय कामकाज मंत्री सभागृहात आल्यानंतर त्यांच्या माध्यमातून मी शासनाला सांगेल की, सभापती किंवा उपसभापती यांनी सन्माननीय सदस्यांना किंवा शासनाला एखादा आदेश किंवा सूचना दिली असेल तर ती पाळणे गरजेचे आहे, या अनुषंगाने सातत्याने त्याचा पाठपुरावा करावा.

सभागृहात उपस्थित असलेले मंत्री महोदय डॉ.सुनिल देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दिनांक 6.12.2006 रोजी लक्षवेधी सूचना विचारली होती, त्यावेळी माननीय उपसभापतींनी असे निर्देश दिले होते की, "लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या "चिकनगुन्याच्या बाबतीत खरेदीत भ्रष्टाचार" या संबंधी मुख्य सचिवांनी कोणती कार्यवाही केलेली आहे ? त्याचा अहवाल शासनाकडून या सदनात उपलब्ध करुन देण्यात यावा" परंतु असा अहवाल अद्याप आलेला दिसत नाही.

.....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्दयाबाबत**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ज्यावेळी या सभागृहात एस.ई.झेड.वर चर्चा झाली, त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री यांनी एस.ई.झेड. खाली गावठाण जमीन संपादित केली जाणार नाही असे आश्वासन दिले होते परंतु आज दैनिक लोकसत्ता (मुंबई) येथे प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार शहापूर रिलायन्स एनर्जी प्रकल्पाकरिता भूसंपादनाचे काम करणारे रिलायन्स एनर्जीचे अधिकारी श्री.एन.एस.जगताप हे जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन अधिकारी कार्यालयात सरकारी खुर्चीवर बसून शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यांचे कागदपत्रे पाहताना दिसले, त्यांचे छायाचित्रही दैनिक लोकसत्ताने प्रकाशित केले आहे. या प्रकरणी रायगडचे जिल्हाधिकारी श्री.दादासाहेब झगडे यांनी भूमी संपादन अधिकारी श्री.परांजपे यांना रिलायन्सचे अधिकारी श्री.जगताप यांनी हजर करण्याचे आदेश दिले आहेत. फक्त खुर्चीवर बसण्याचा प्रश्न नसून जिल्हाधिकारी कार्यालयाचा ताबा घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनीवर वरवंटा फिरवायच्या प्रकाराची विधिमंडळाने गंभीर दखल घ्यावी व हा प्रकार परत होऊ नये म्हणून श्री.जगताप यांच्यावर कडक कारवाई करावी अशा प्रकारची माहिती मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे देत आहे.

डॉ.सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : या बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल, व कार्यवाही करण्यात येईल.

..... यानंतर श्री.बोरले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून एक विषय दिला होता. परंतु तो सभागृहामध्ये येऊ शकला नाही म्हणून औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो. प्रश्न साधा आणि अत्यंत महत्वाचा आहे. तो असा की, बृहन् महाराष्ट्र मंडळ दिल्लीमध्ये काम करते. संपूर्ण देशामध्ये विविध प्रांतांमध्ये जेवढी मराठी माणसे आहेत त्या मराठी माणसांकरिता काम करणारे केंदीय बृहन् महाराष्ट्र मंडळ अनेक वर्षापासून कार्यरत आहे. कै.काकासाहेब गाडगीळ, कै.चिंतामणराव देशमुख, कै.यशवंतरावजी चव्हाण यांच्या पासून अगदी वसंतराव साठेंपर्यंत अनेकांनी या बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून दिल्ली आणि विविध प्रांतांमध्ये मराठी भाषा, मराठी संस्कृती जपणारी जी मंडळी आहेत त्यांच्यासाठी काम केले. त्या मंडळाची आर्थिक स्थिती बरोबर नाही. 75 व्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत चेन्नई येथे बृहन् महाराष्ट्र मंडळाचे संमेलन झाले. त्या संमेलनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या संपूर्ण मागण्या, निवेदन आणि सर्व अडचण पाहता माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:च्या भाषणामध्ये आश्वासन दिले होते की, बृहन् महाराष्ट्र मंडळाला शासनाच्या वतीने वेळोवेळी जी आर्थिक मदत केली जाते, तसेच महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये या बृहन् महाराष्ट्र मंडळाला मदत करण्यासाठी कायम स्वरुपी व्यवस्था म्हणून दरवर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येईल. या घटनेला चार-पाच वर्षे होऊन गेली, परंतु अद्यापही ही तरतूद प्राप्त झाली नाही, असे मला वाटते. या मंडळाच्या कार्यकर्त्यांचे वेळोवेळी विविध कार्यक्रम होत असतात. म्हणून या औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने मी पुन्हा शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या मंडळासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार राज्याच्या बजेटमध्ये तरतूद करण्यात यावी.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, होय, या बाबीची नोंद घेण्यात आली आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासात क्वचितच एखाद्या कुटुंबावर अशी पाळी आली असेल म्हणून अशा घटनेकडे या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे. ते म्हणजे श्री.रामकृष्ण विठोबा पिंगळे, राहणार दैठना खुर्द, तालुका घणसावंगी, जिल्हा सांगली यांच्या घरासमोर शेख लकी या इसमाने त्याच्या मुलीचे प्रेत आणून त्याच्या दरवाज्यासमोर पुरले. दैठना खुर्द ग्रामपंचायतीने या ठिकाणी कब्रस्तान नव्हते असा दाखला दिलेला आहे. विशेष म्हणजे या व्यक्तीची जागा जायकवाडी प्रकल्पामध्ये गेली असल्याने तो धरणग्रस्त झालेला आहे व त्याचे पुनर्वसन जिल्हाधिका-यांनी या ठिकाणी केले. या जागेवर त्याला ग्रामपंचायतीने बांधकामाचा परवाना दिला व त्याने तेथे 20 वर्षापूर्वी घर बांधले. परंतु मागच्या महिन्यामध्ये या शेख लकी नांवाच्या मुस्लिम व्यक्तीने येथे कब्रस्तान आहे म्हणून त्याच्या मुलीचे प्रेत दारामध्ये आणून पूरलेले आहे. या घटनेमुळे या घरात राहणारे पिंगळे या व्यक्तीचे कुटुंब उध्वस्त झालेले आहे, बेघर झाले आहे. माझी शासनाला या औचित्याच्या माध्यमातून अशी विनंती आहे की, असे प्रकार घडून नयेत यासाठी ताबडतोब उपाययोजना करावी आणि जेथे कब्रस्तान आहे तेथे हे प्रेत नेऊन पुरवावे, आणि या कुटुंबाला न्याय द्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, होय.

--------------

......3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एक औचित्याचा मुद्दा मांडत आहे. आमदारांना जनतेच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयांमध्ये जावे लागते आणि त्या ठिकाणी गेल्यानंतर संबंधित अधिका-यांशी चर्चा करतांना वेगवेगळया शासन निर्णयांचा किंवा परिपत्रकांचा संदर्भ घेतला जातो. सभापती महोदय, मार्च, 2005 च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये यासंदर्भातील विषय उपस्थित करण्यात आला होता. शासनाचे वेगवेगळया विभागांचे जे जी.आर. निघतात ते सर्व आमदारांना पाठवावेत अशा प्रकारचे निर्देश आपण दिले होते. सभापती महोदय, दिनांक 7 जून, 2005 ला सामान्य प्रशासन विभागाने अशा प्रकारचे आदेशही काढले जे शासन निर्णय निघतील ते सर्व आमदारांना पाठविण्याची व्यवस्था व्हावी. आम्हाला फक्त कृषी विभागाने सर्व जी.आर. मिळतात अन्य विभागांचे जी.आर. मिळत नाहीत. जे नवीन जी.आर. निघतात त्यांच्या प्रती सर्व आमदारांना देण्याचे निर्देश आपण शासनाला द्यावेत, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, होय.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये दिलेली सूचना ही ग्रामविकास विभागाला होती परंतु त्यावर उत्तर मात्र कृषी मंत्र्यांकडून आलेले आहे. तेव्हा त्यामध्ये सुधारणा व्हावी ही विनंती. तसेच औचित्याच्या मुद्याद्वारे मी आपल्याला विनंती करणार आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये संपूर्ण रोजगार आणि बीपीएलच्या माध्यमातून धान्य पुरवठा होतो त्यात काळाबाजार झालेला आहे आणि त्यातील प्रमुख अनिल खपरे यांचे रेशन दुकान रद्द करण्यात आले. पण त्यानंतर मात्र त्या आदेशाला स्थगिती दिली गेली. तर ती स्थगिती का दिली गेली याबद्दल शासनाने निवेदन करावे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या गोष्टीची नोंद घेण्यात येईल.

****

...... 4आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अत्यंत खेदाने काही गोष्टी मला या ठिकाणी नमूद कराव्या लागत आहेत. कामगारांच्या प्रश्नाबद्दल मी लक्षवेधी सूचना दिली होती, हिंदुस्थान लीवर कंपनीतील कामगारांच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना होती., तसेच एसआरए बद्दल देखील एक लक्षवेधी सूचना मी दिली होती. पण तीही लागली नाही. आता अधिवेशन काळ कमी झाल्यामुळे तसे झाले असावे. पण जे जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत त्याबद्दल मात्र कोणत्याही प्रकारे लक्षवेधी सूचना मान्य झाली पाहिजे, लागली पाहिजे आणि त्यावर चर्चाही झाली पाहिजे. तरी आता या औचित्याच्या मुद्याद्वारा मी हिंदुस्थान लीवर कंपनी आणि त्यातील कामगारांची अवस्था याबाबत सभागृहाला आणि शासनाला माहिती देतो आणि त्याबाबत शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, हिंदुस्थान लीवर ही देशातील एक अग्रगण्य कंपनी आहे आणि त्या कंपनीमध्ये जवळपास 600 ते 700 कायम कामगार आहेत व ते सर्व भूमिपुत्र आहेत. पण कंपनी व्यवस्थापनाने अचानक कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा कामगार आयुक्तांनी ही कंपनी बंद करता येणार नाही असा निर्णय दिला, आदेश दिला. हे घडल्यानंतर परत महिनाभर मध्ये गेल्यानंतर कंपनीने पुन्हा कामगार आयुक्तांकडे कंपनी बंद करण्यासंबंधात अर्ज केला. आता या ठिकाणी माननीय कामगार मंत्री उपस्थित नाहीत. पण त्यावेळेस दुर्दैवाने कामगार मंत्र्यांच्या दबावाने कामगार आयुक्तांनी सदर कंपनीच्या व्यवस्थापनाला कंपनी बंद करण्यास परवानगी दिली. हा केवढा मोठा विरोधाभास आहे. अशा प्रकारे मोठमोठ्या कंपन्या बंद केल्या जात आहेत. कित्येकदा या मोठ्या कंपन्या छोटी छोटी प्रॉडक्टस् बंद करतात आणि हळूहळू कंपनी बंद पाडण्याच्या दिशेने पावले टाकतात. या कंपन्यांना भूखंड, कर वगैरेंमध्ये शासनाकडून सवलती मिळतात, निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये या कंपन्या प्रथमत: आपले उद्योग चालवितात, शासनाच्या सर्व सवलती घेऊन हे उद्योग चालवितात आणि एस्टाब्लिश झाले की, दुसरीकडे आपले उद्योग घेऊन जातात. ही आज सर्वत्र परिस्थिती आहे. तेव्हा शासनाने यामध्ये लक्ष घालून या हिंदुस्थान लीवर कंपनीला बंद करण्यासाठी कशासाठी परवानगी दिली, त्यामागे काय कारणे आहेत आणि मग त्या कंपनीतील कामगारांचे भवितव्य काय आहे ? हा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मुद्याची नोंद घेण्यात येईल.

***

.....4आय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती आणि रजा सवलत मिळते आहे. केवळ एकच घटक असा राहिलेला आहे आणि तो म्हणजे नगर परिषदेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी. नगरपरिषदेच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती आणि रजा सवलत अद्यापपर्यंत लागू झालेली नाही. अनेक वेळा या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर शासनाकडून आश्वासन देखील मिळाले होते परंतु अजूनपर्यात त्यावर विचार झालेला नाही. तरी कृपया त्यांच्याकडे शासनाने सहानुभूतीने लक्ष देऊन ताबडतोब या सवलती त्यांनाही लागू कराव्यात अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारा विनंती करतो.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, शिक्षकांकडे शासनाचे विशेष लक्ष आहेच. तेव्हा माननीय सदस्यांच्या या मुद्याची खास नोंद घेतली जाईल.

****

....... 4आय 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, देशामध्ये पहिली मुलींची शाळा काढणाऱ्या आणि आद्य शिक्षिका असलेल्या सावित्रीबाई फुले यांची 175 वी जयंती 3 जानेवारी 2007 रोजी येते आहे. आरोग्य क्षेत्रातील देखील त्यांचे काम अतुलनीय असेच आहे. स्त्रियांना तसेच बहुजन समाजाला शिक्षणाचा हक्क त्यांनी मिळवून दिला होता, अनेक सामाजिक सुधारणा त्यांनी घडवून आणल्या होत्या. आरोग्य क्षेत्रातही प्लेगच्या साथीमध्ये त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असेच होते आणि शेवटी त्यातच त्यांचे बलिदान झाले आहे. त्यावेळी त्यांच्याबरोबर फातिमा शेख याही होत्या. ज्याप्रमाणे आपण महापुरूषांच्या स्मृतीदिन, जयंत्या साजऱ्या करतो त्याप्रमाणे या महास्त्रीचा जयंती दिन देखील आपण साजरा केला पाहिजे. त्यासाठी 3 जानेवारीला शासनाने सार्वजनिक सुटी जाहीर करावी तसेच शाळा-शाळांमध्ये तो दिन राष्ट्रीय दिनाप्रमाणे साजरा करावा असा मी औचित्याचा मुद्दा येथे मांडत आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या मुद्याची नोंद घेतली गेली आहे.

***

(यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सोमवार, दिनांक 04 डिसेंबर 2006 ते शुक्रवार, दि. 15 डिसेंबर, 2006

## या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** :हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो. एकुण बैठकीची संख्या 10 आहे. एकूण काम आपण 84 तास आणि 40 मिनिटे इतके केले आहे. यामध्ये वाया गेलेला वेळ 3 तास 40 मि. आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज 81 तास आहे. रोजचे सरासरी कामकाज 08 **तास** 05 मिनिटे झालेले आहे.

***तारांकित प्रश्न :-***

एकूण 4056 तारांकित प्रश्नांच्या सूचना आल्या. या पैकी कार्यवाहीसाठी 2986 तारांकित प्रश्न घेण्यात आले. 725 प्रश्न स्वीकृत झाले व सभागृहात 58 तारांकित प्रश्नांना तोंडी उत्तरे देण्यात आली.

***अल्पसूचना प्रश्न :-***

एकूण 9 अल्पसूचना प्रश्न प्राप्त झाले. यापैकी 2 अल्पसूचना प्रश्न स्वीकृत झाले व सभागृहात 1 अल्पसूचना प्रश्न उत्तरीत झाला.

***नियम 93 अन्वये सूचना :-***

एकूण 101 सूचना प्राप्त झाल्या. यापैकी 42 सूचनांवर निवेदने करण्यात आली व यापैकी 35 सूचनांवर चर्चा करण्यात आली

***लक्षवेधी सूचना -***

एकूण 1045 सूचना प्राप्त झाल्या. यापैकी 314 सूचना मान्य झाल्या व 39 सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***विशेष उल्लेख :-*** एकूण 26 विशेष उल्लेखाच्या सूचना मांडण्यात आल्या.

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा :-**

एकूण 10 सूचना प्राप्त झाल्या. यापैकी 09 सूचना मान्य झाल्या व 03 सूचनांवर चर्चा करण्यात आली.

***शासकीय विधेयके :-*** एकूण 18 विधेयके संमत करण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ D/ KGS/ MHM/

***अशासकीय विधेयके :-*** एकूण **4** अशासकीय विधयके विचारार्थ घेण्यात आली.

***अशासकीय ठराव :-*** एकूण 3 अशासकीय ठरावांवर चर्चा झाली.

***अर्धातास चर्चा :-***

एकूण **82** अर्धा तास चर्चेच्या सूचना आल्या. त्यापैकी **67** सूचना मान्य करण्यात आल्या व **8** सूचनांवर चर्चा करण्यात आली.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, " महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 12 मार्च, 2007 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( 5 वाजून 28 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

*****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही